मो. २६१ खंड २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — [illegible]

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक —

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

स्याङ्मत

संग्रह ३०/३०

ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

एडमंडबर्कच्या 'प्रझेंट डिस्कंटेंट्स' चें

भाषांतर.

# आधुनिक असंतोष.

[stamp]

हें पुस्तक

मोरो केशव दामले एम्. ए.

प्रोफेसर ऑफ लॉजिक अँड मॉरल फिलॉसफी

माधवकॉलेज

उज्जैन,

याणीं केलें तें,

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए. संपादक याणीं

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' व पुणें 'आर्यभूषण' छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

किंमत १ रु०, ट० हां० ८१८६.

## शुद्धिपत्र.

# आधुनिक असंतोष.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ७ | ७ | संबंधाचीही | संबंधाची ही |
| ९ | ७ | साधनें वस्तुविशेष कालपरत्वें | साधनें व वस्तुविशेष कालपरत्वें |
| १० | ३ | मनस्वातंत्र्य | मतस्वातंत्र्य |
| १९ | उपांत्य | औदार्याचे | उदारतेच्या |
| २० | ५ | देण्यांत | देण्यास |
| २१ | १० | कोणासही | कोणाही |
| २३ | ९ | वाचून | वांचून |
| २७ | उपांत्य | मित्रास | मित्रांस |
| ३० | अंत्य | मिळून सर्व | मिळून होणाऱ्या सर्व |
| ३२ | १७ | यांस | आपणांस |
| ३६ | २२ | होणाऱ्या, अरिष्टा- वांचून | होणाऱ्या अरिष्टावांचून, |
| ४५ | १३ | मिळून | ह्मणून |
| ४६ | ८ | व्यवस्थाकडे | व्यवस्थांकडे |
| ,, | १० | ते | त्या |
| ,, | ११ | ' ते स्वतंत्र झाले | ' त्या स्वतंत्र झाल्या |
| ४७ | ६ | झाल्या | झालीं |

४८ ह्या पृष्ठावरचें शेवटचें वाक्य पुढील पृष्ठाचे आरंभीं थोड्याशा फरकानें पुन: छापलें आहे; तें गाळावें.

| | | | |
|---|---|---|---|
| ४९ | ८ | होतो | होता |
| ५१ | ७ | उत्पन्नाचीही | उत्पन्नाची ही |
| ५७ | १ | त्याचें | त्याच्या |
| ५८ | २३ | योजनांचे | नियोजनांचे |
| ६५ | अंत्य | प्रायश्चित्तहीन व | प्रायश्चित्तहीन होणार व |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६ | १ | मार्ग होणार नसावया-चाच | मार्ग नसावयाचाच |
| ६८ | ११ | असली | असला |
| ७० | १२ | मनुष्य त्यांस. | मनुष्य, त्यासच |
| ८१ | उपांत्य | व्यवहार सृष्टींत | व्यवहारसृष्टींत |
| ८४ | २३ | आणि जर त्या | आणि त्या |
| ८९ | ९ | दशदिशा | दशदिशांस |
| ९३ | १४ | दृढप्रिय, | दृढ, प्रिय, |
| ९४ | १५ | एक दुसऱ्यास परिपोषक व्हावें | पहिले दुसऱ्यांस परिपोषक व्हावे |
| ९६ | १९ | प्रयत्नांपासून तेव्हांच | प्रयत्नांपासून भिन्नपणें तेव्हांच |
| ९८ | २१ | नाहीं, | नाहीं.' |
| ९९ | २० | ज्यास वाटत नाहीं स्वत:ला | ज्यास स्वत:ला वाटत नाहीं |
| १०२ | उपांत्य | होऊन जाऊन | होऊन |
| ,, | शेवटच्या ओळीचे आधींची एक ओळ अजीच गाळली गेली आहे. ती अशी:—देशांत अंतस्थ बंडावा माजेल; नाहीं तर जुलमी अमलाखालीं निस्तेज होऊन जाऊन ते | | |

एडमंड बर्ककृत

# आधुनिक असंतोष

बर्कनें वर्णिलेला

# असंतोष

ज्या लोकांत उत्पन्न होण्याचा संभव नाहीं

त्यांस हें पुस्तक

प्रेमपूर्वक

अर्पण केलें असे.

भाषांतरकर्ता.

सं·भा ३-/३०

# प्रस्तावना.

बर्कचे लेख आधीं मुळांतच समजण्यास कठिण आहेत; ह्याचें कारण केवळ त्याच्या विचारांचें गहनत्व हेंच होय. त्यांतही त्याचा प्रकृत लेख भाषांतराच्या रूपानें वाचकांस सादर करण्यांत येत आहे, तेव्हां त्याचें दुर्बोधत्व अधिकच होण्याचा जास्त संभव आहे; तथापि भाषांतर जितकें सुलभ करवेल तितकें करण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखाच्या आधारानें स्वतंत्र पण सुलभ रचना कां केली नाहीं? भाषांतरानें लेखाचें दुर्बोधत्व वाढतें हें जर खरें आहे, तर जाणून बुजून त्याच मार्गाचें कां अवलंबन करावें? या प्रश्नाचें सविस्तर उत्तर देण्याचा हा प्रसंग नव्हे. तरी थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, मूळ पदार्थ, त्याचें प्रतिबिंब, व त्याचें चित्र ह्यांमध्यें जो भेद तोच भेद एका भाषेंतील मूळ लेख, त्याचें भाषांतर, व त्याचे आधारानें लिहिलेला लेख ह्यांमध्येंही आहे. ह्मणजे ज्याप्रमाणें चित्रापेक्षां प्रतिबिंब पाहिल्यानें मूळ पदार्थाची कल्पना विशेष व्यक्त होते, त्याचप्रमाणें आधारभूत लेखापेक्षां भाषांतरानें मूळ लेखाची कल्पना अधिक व्यक्त होते. अर्थात्च प्रतिबिंब व भाषांतर हीं ज्या मानानें हुबेहूब असतील, त्या मानानें मूळाची कल्पनाही कमीअधिक व्यक्त होईल. ह्या दृष्टीनें उत्तम भाषांतर हें आधारभूत स्वतंत्र लेखापेक्षां जास्त महत्वाचें आहे. प्रकृत भाषांतर हुबेहूब करण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे, हें ठरविणें सुज्ञ वाचकांकडे आहे.

## महत्त्वाच्या ऐतिहासिक शब्दांस योजिलेले

# मराठी शब्द.

House of lords बडे लोकांची सभा; ज्येष्ठ सभा.
House of Commons मध्यम स्थितींतील लोकांची सभा; कनिष्ठ सभा.
Parliament प्रमुख प्रजेची सभा; प्रमुख सभा.
Ministry; Cabinet. मंत्रिमंडळ; प्रधानमंडळ.
Legislature नियामक सत्ता.
Executive Government विधायक सत्ता.
Election नियोजन; निवड.
Electors नियोजक.
Constituents मतदार.
Cabal चौकडी.
Court दरबार.
Party. पक्ष.
Faction तट; स्वार्थसाधु पक्ष.
Prerogative राजाधिकार
Civil List राजखर्चखातें.
Sinking Fund तरणोपाय फंड.
Committee of Supply साहाय्यसभा.
Opposition प्रतिपक्ष.
Previous Question पूर्व प्रश्न. ही एक पार्लमेंटांतील सभासदांची युक्ति आहे. ह्या युक्तीनें त्यांस कोणत्याही प्रश्नाचा विचार लांबणीवर टाकितां येतो.
Place-Bill आधिकार बिल.

# उपोद्घात.

'आधुनिक असंतोष' हा लेख नीट समजण्यासाठीं ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या साधारण स्वरूपाची वाचकांस ओळख करून देणें अत्यंत अवश्य आहे.

ब्रिटिश राज्यव्यवस्थेचे मुख्य तीन अवयव आहेत. ते :–पहिला राजा; दुसरा वडे लोकांची सभा; व तिसरा मध्य स्थितींतील लोकांची सभा. ह्या तीन अवयवांचा मान वरील क्रमानेंच आहे. राजास सर्वांहून अधिक मान मिळतो. त्याच्या खालोखाल बडेलोकांच्या सभेस किंवा ज्येष्ठ सभेस; आणि त्याच्याही खालोखाल मध्यमस्थितींतील लोकांच्या सभेस किंवा कनिष्ठ सभेस. असें आहे तरी राज्यव्यवस्थेंतील महत्वाचे दृष्टीनें शेवटच्यासच पहिला नंबर दिला पाहिजे. ह्मणजे राज्यव्यस्था कनिष्ठ सभेचे हातांत जितकी आहे, तितकी ज्येष्ठ सभेच्या हातांत नाहीं; आणि ज्येष्ठ सभेचे हातांत जितकी आहे तितकीही राजाचे हातांत नाहीं. ब्रिटिश राज्यव्यवस्थेचे दोनच अवयव आहेत, असेंही कधीं कधीं ह्मणण्यांत येतें. तेव्हां दुसरा व तिसरा हे दोन्ही मिळून एक करून दुसरा अवयव सांगण्याची चाल आहे. ते दोन अवयव येणेंप्रमाणें :––पहिला राजा; व दुसरा प्रमुख प्रजेची सभा. ह्या दुसऱ्या अवयवाचे ह्मणजे प्रमुख प्रजेच्या सभेचे दोन भाग आहेत. एक ज्येष्ठ सभा व दुसरा कनिष्ठ सभा. एकूण राजा, ज्येष्ठ सभा, व कनिष्ठ सभा हे तीन अवयव मुख्य होत, असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आतां ह्या तिहींची प्रकृति व परस्परसंबंध वाचकांस थोडक्यांतच सांगण्याचा माझा उद्देश आहे.

प्रथम **राजा** ह्मणजे तक्ताधिपति, हा पुरुष किंवा स्त्रीही असूं शकतो, हें विशेषेंकरून सांगण्याची जरूर नाहीं, तें वाचकांच्या तेव्हांच नजरेस येईल. आतां हा गादीचा मालक कुलक्रमाप्रमाणेंच निवडला जातो. ह्मणजे वंशपरंपरेनें मृत राजाचे ज्येष्ठ चिरंजीवास इंग्लंडची गादी मिळते; आणि चिरंजीवाचे अभावी त्याचे कन्येस मिळते. आणि त्यास जर मुलींच

अपत्य नसेल, तर त्याच्याच घराण्यांतील निकट वारसास मिळते. तात्पर्य गादीच्या मालकीविषयीं आमच्या देशांत जे साधारण नियम दृष्टीस पडतात, तेच दत्तविधानाशिवाय तिकडे इंग्लंडांतही दृष्टीस पडतात, असें साधारणपणें ह्मणतां येईल. तरी भावी राजास एक अट तिकडे विशेष आहे, ती ही. इंग्लंडांत जो ख्रिस्तिधर्माचा ' एस्टाब्लिशड् चर्च ' नांवाचा पंथ आहे, त्या पंथाचा तो अनुयायी असला पाहिजे. आतां ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत राजास कोणते अधिकार आहेत तें पाहूं. राजास अन्य राष्ट्रांशीं वैर किंवा स्नेह करण्याचा, तसेंच त्यास आपले मंत्रिमंडळ निवडण्याचा, प्रमुख प्रजेची सभा वाटेल त्या वेळेस भरविण्याचा व वाटेल त्या वेळेस विसर्जन करण्याचा पूर्ण अधिकार आहे; त्याच्या संमतीवांचून कोणताही कायदा अस्तित्वांत येत नाहीं, किंवा रद्द होत नाहीं. ड्यूक, अर्ल्, मार्किस इत्यादि सर्व पदव्या त्यास वाटेल तेव्हां वाटेल त्या मनुष्यास देतां येतात; आणि वाटेल त्या बंदिवानास त्यास बंदींतून मुक्त करितां येतें. राजास इतके अधिकार असतां, महत्वाचे मानानें राज्यव्यवस्थेंत त्याचा नंबर डावेकडूनच कां पहिला असा प्रश्न साहाजिक उत्पन्न होतो. त्याचें उत्तर इतकेंच कीं, त्यास हे व आणखी कांहीं गौण अधिकार जे आहेत, ते केवळ कागदावरील राज्यव्यवस्थेंत किंवा विचारसृष्टींतच होत. व्यवहारांत किंवा आचारांत त्याचे हातपाय कसे बांधले गेले आहेत, व बहुतेक सर्व सत्ता कनिष्ठ सभेच्या हातांत कशी आली आहे, हें बाकीच्या दोन अवयवांची ह्मणजे ज्येष्ठ व कनिष्ठ सभा यांची प्रकृति सांगितल्यानंतर, स्पष्ट करण्यांत येईल.

**ज्येष्ठ सभा :**—या सभेंत सर्व बडे लोकांस ह्मणजे लार्ड् साहेबांस व धर्मखात्यांतील उच्च प्रतीच्या अधिकाऱ्यांस बसतां येतें. ( या ठिकाणीं असें सांगितलें पाहिजे कीं, इंग्लंडांत व इतर बहुतेक ख्रिस्ति राष्ट्रांत ' धर्मखातें ' या नांवाचें एक सरकारी खातें असतें. व खालपासून वरपर्यंत सर्व दरज्यांचे धर्माधिकाऱ्यांची नेमणुक सरकारांतून होते, व त्यांस सरकारांतूनच पगार मिळतो. हें वाचून अथवा ऐकून

ह्मटलें असतांच बरें—आमच्याकडील धर्माधिकाऱ्यांस ख्रिस्ति धर्माधिकाऱ्यांचा हेवा वाटल्यावांचून राहणार नाहीं. ) लाट् साहेबांच्या पदव्या वंशपरंपरेनें चालावयाच्या असतात. बापाच्या पाठीमागें त्याची पदवी त्याच्या वडील मुलासच मिळते. . लाहानास मिळत नाहीं. फार तर काय बापाची वडिलोपार्जित सर्व मालमत्ताही इतर सर्व लोकांच्या मालमत्तेप्रमाणें, वडील मुलांसच मिळते. लहान मुलांची स्थिति केवळ गरीब स्थितींतील लोकांच्या मुलांप्रमाणेंच असते, असें ह्मटलें पाहिजे. या सभेंतील दुसरे सभासद जे उच्च प्रतीचे धर्माधिकारी त्यांचा मात्र सभेंत बसण्याचा हक्क कुलक्रमागत नाहीं. ज्या ज्या वेळीं जे जे लोक उच्च प्रतीचे धर्माधिकारी असतील त्यांस त्या त्या वेळीं ज्येष्ठ सभेंत बसण्याचा हक्क आहे. शिवाय पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राजा ज्या नवीन लोकांस लाटपदाप्रत पोहोंचवील, त्यांसही हा हक्क प्राप्त होतो. राज्यव्यवस्थेंतील या सभेचे अधिकार फारच बेताचे आहेत. या सभेस पैशाच्या बाबीशिवाय कोणत्याही बाबीचें बिल तयार करून त्याचा उहापोह करितां येतो; आणि कनिष्ठ सभेंत जीं बिलें पसार होतील, त्यांचाही विचार करून त्यांजवर आपलें अनुकूल किंवा प्रतिकूल मत देतां येतें. शिवाय राजा व प्रधान, किंवा ज्येष्ठ व कनिष्ठ सभेंतील कोणताही सभासद, यांपैकीं कोणीही राजकीय नात्यानें गैरकायदा वर्तन केलें असतां त्याची चौकशी करण्याचा ज्येष्ठ सभेसच अधिकार आहे. ह्मणजे ही सभा न्यायाची ब्रिटिश राज्यांतील अत्युच्च कचेरी होय. इच्या निकालावर कायदेशीर अपिल नाहीं. या सभेचा हा अधिकार फारच महत्वाचा व सन्माननीय आहे यांत संशय नाहीं. सभेस पसंत पडलेल्या बिलांवर मत देण्याचाही या सभेचा अधिकार,—स्वतंत्रपणें ह्मणजे कनिष्ठ सभेचे डावपेच एकीकडे ठेवून विचार केला असतां,—कांहीं लहान नाहीं खरें; तरी अखेरीस तो लुलाच पडतो, हें याच उपोद्घातांत पुढें स्पष्ट करून दाखविलें आहे.

**कनिष्ठ सभा:**—मध्यम स्थितींतील लोकांचे प्रतिनिधी या सभेचे सभासद होत. प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार एकजात सर्व

लोकांस नाहीं. ज्याप्रमाणें हल्लीं आमचे इकडे म्युनिसिपालिटीचे सभासद निवडण्याचा अधिकार शहरांतील एकूणएक सर्व लोकांस नसून केवळ कांहीं विशिष्ट लोकांसच असतो; किंवा लेजिस्लेटिव्ह काउन्सिलांत पाठविण्याचा प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार म्युनिसिपालिटींतील सर्व सभासदांस नसून त्यांपैकीं कांहींसच प्राप्त होतो; त्याप्रमाणेंच बड्या लोकांशिवाय राज्यांतील सर्व लोकांस, कनिष्ठ सभेंत पाठवावयाचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार नाहीं. ह्मणजे नियोजनाचे वेळीं सर्व लोकांस आपलें मत देतां येत नाहीं. तर त्यांपैकीं बऱ्याच विशिष्ट लोकांस हा अधिकार असतो. या लोकांस मतदार किंवा नियोजक ह्मणतात. ( मतदार होण्यास कोणते गुण अंगीं असले पाहिजेत, किंवा कोणत्या योग्यतेचे लोक मतदार होण्यास लायक आहेत हें विशेषेंकरून सांगण्याची येथें गरज नाहीं ). आतां ज्याप्रमाणें शहरव्यवस्थेचे प्रतिनिधि निवडण्यासाठीं शहराचे ' वॉर्ड्स् ' नांवाचे भाग केलेले असतात, त्याप्रमाणेंच **संयुक्त राज्याचे**ही ( ब्रिटन व आयर्लंडचेही ) भाग केले आहेत. आणि प्रत्येक भागांतील मतदारांस किंवा नियोजकांस, त्या त्या भागाचे महत्वाचे मानानें, एक किंवा अधिक प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. याप्रमाणें नियोजकांनीं निवडलेले प्रतिनिधी किंवा मुखत्यार हे कनिष्ठ सभेचे सभासद होत. एकदां निवडलेल्या प्रतिनिधींस सात वर्षेंपर्यंत कनिष्ठ सभेचे सभासद होतां येतें. प्रत्येक सात वर्षांनीं पुन्हां नवें नियोजन होतें; पण वर सांगितलेंच आहे कीं, राजास वाटेल त्यावेळीं या सभेचें विसर्जन करितां येतें. त्याप्रमाणें राजानें सात वर्षांचे आंतच केव्हांही जर ही सभा विसर्जन केली, तर नवीन नियोजन झालें पाहिजे; पण सात वर्षांनीं-- राजा सभा विसर्जन करो अथवा न करो, नवीन नियोजन झालेंच पाहिजे. मध्यम स्थितींतील लोकांच्या मुखत्यारांच्या या सभेस ' कनिष्ठ सभा ' ह्मणतात. या सभेस ज्येष्ठ सभेप्रमाणेंच कोणतेंही बिल तयार करून त्याचा उहापोह करण्याचा अधिकार आहे; परंतु पैशाच्या बाबीचीं बिलें तयार करून प्रथम पसार करण्याचा अधिकार कनिष्ठ सभेसच आहे. त्या बाबतींत ज्येष्ठ सभेस

स-भा-३७/३०

मुळींच हात घालितां येत नाहीं. सारांश, कनिष्ठ सभेस वाटेल तर सर्व प्रकारचीं बिलें तयार करून त्यांवर आपलें मत प्रथम देतां येतें; ज्येष्ठ सभेस एक शिवाय करून बाकीच्या सर्व प्रकारचें बिलांसंबंधानें वाटेल तर तसें करितां येतें. इतकाच जर कनिष्ठ सभेचा अधिकार आहे, तर अधिकाराचे मानानें तिला श्रेष्ठत्व कसें प्राप्त होतें? या प्रश्नाचें उत्तर मुख्यतः वरील ' तत्वमसीं 'तच आहे. तें कसें हें राजा, ज्येष्ठ सभा, व कनिष्ठ सभा यांच्या परस्परसंबंधाचें सूक्ष्म अवलोकनानें व्यक्त होईल; पण ह्या त्यांच्या परस्परसंबंधास हात घालण्यापूर्वी राज्यव्यवस्थेंतील आणखी एका महत्वाचे संस्थेकडे आपणास प्रथम लक्ष दिलें पाहिजे. ती संस्था ' मंत्रिमंडळ ' ही होय.

**मंत्रिमंडळ**—राजास आपले प्रधान नेमण्याचा अधिकार आहे, हें वर सांगितलेंच आहे. याचा अर्थ वाटेल त्या मनुष्यास त्याला आपला प्रधान करितां येतें असा नाहीं; तर प्रमुख प्रजेच्या सभेंतील, ह्मणजे ज्येष्ठ सभा व कनिष्ठ सभा या सभांतील सभासदांपैकीं वाटेल त्यास त्यानें प्रधान नेमावें. असें जरी आहे, ह्मणजे राजास जरी मंत्रिमंडळांतील सर्व प्रधान नेमण्याचा अधिकार आहे, तरी हा अधिकार राजा प्रत्यक्ष गाजवीत नाहीं, किंवा राजास गाजवितां येत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. तो फक्त आपला मुख्य मंत्री निवडितो, व नंतर तो मुख्य मंत्री आपल्या मदतनिसांची निवड करून त्यांची इतर प्रधानांचे जागीं नेमणूक करितो. राज्याची सर्व व्यवस्था याच मंत्रिमंडळाचे स्वाधीन असते. ह्मणून या मंडळास कधीं कधीं व्यवस्थापकमंडळ व मंत्र्यांस व्यवस्थापक ह्मणण्याचाही परिपाठ आहे. आतां मुख्य प्रधान आपले मदतनीस निवडितो असें जें वर सांगितलें आहे, त्यावरून सर्व प्रधान साधारणपणें एकाच मताचे असतात किंवा एकाच पक्षाचे असतात हें उघड आहे. ते एकाच पक्षाचे असावे असा नियम नाहीं, तरी पण मुख्य प्रधानाकडे इतरांची निवड करण्याचें काम असल्यामुळें आणि राज्यव्यवस्था सर्वांनीं मिळून एकविचारानें करावयाची असल्यामुळें, त्यास आपल्याच पक्षाचे लोक आपले साहाय्यकारी नेमणें इष्ट असतें.

ह्या ठिकाणीं पक्ष ह्मणजे काय, ह्याचा खुलासा करणें जरूर आहे. बर्कनेंच ‘ आधुनिक असंतोषां ’ त पक्षाची व्याख्या केली आहे, ती अशी :—‘ स्वसंमत तत्वविशेषास अनुसरून एकप्रयत्नानें राष्ट्रहित साधण्यास तयार झालेल्या जनसमूहास पक्ष ह्मणतात ’ ह्मणजे राष्ट्रहित साधण्याचें सर्वसंमत विशेष तत्व पक्षाचें लक्षण होय. ह्यावरून राष्ट्रहित साधण्याचीं जितकीं निरनिराळीं तत्वें देशांत प्रचलित असतात, तितके राजकीय पक्ष अस्तित्वांत असतात हें उघड आहे. तरी पण साधारणपणें सदोदित दोन तीनच पक्ष प्रमुख असतात. शब्दपर्यायानें, राष्ट्रहित साधनाचीं दोन तीनच तत्वें मोठमोठ्या जनसमूहांस मान्य असतात व त्यांमध्येंच चढाओढ चाललेली असते. हीं तत्वें सदोदित एकच नसतात. कालदेशवर्तमानाप्रमाणें त्यांत बदल पडत जातो, व त्यामुळेंच देशांतील प्रमुख राजकीय पक्षांचीं नांवें बदलतात. कारण पक्षांचीं नांवें तत्संमत तत्वांवरूनच पडलेलीं असतात. तिसऱ्या जॉर्ज राजाचे कारकीर्दींत, ह्मणजे ज्या कालास उद्देशून बर्कनें प्रकृत लेख लिहिला आहे, त्यावेळीं व त्याचे मागेंपुढें बरींच वर्षेपर्यंत जे दोन राजकीय पक्ष प्रमुख होते त्यांस ‘ व्हिग ’ व ‘ टोरी ’ असें ह्मणत असत. हल्लीं जे दोन पक्ष प्रमुख आहेत त्यास ‘ लिबरल ’ व ‘ कॉन्सरव्हेटिव्ह ’ असें ह्मणतात हें सर्व विश्रुतच आहे. अशा तऱ्हेचे पक्ष हल्लीं आमचेकडेही उत्पन्न झाले आहेत. राष्ट्रीयसभेस अनुकूल जे लोक आहेत, त्यांस ‘ कांग्रेसवाला ’ असें ह्मणतात; व तीस प्रतिकूल जे लोक आहेत, त्यांस ‘ ॲन्टिकांग्रेसवाला ’ असें ह्मणतात. हे दोन पक्ष हिंदुस्थानचें हित कोणत्या मार्गानें साधितां येईल, याविषयीं मतभेद असल्यानेंच, उत्पन्न झाले आहेत हें उघड आहे.

लोकांत असे भिन्न पक्ष असल्यामुळें, जे लोक ज्या पक्षाचे असतात ते लोक त्याच पक्षांतील मनुष्य आपला प्रतिनिधि ह्मणून निवडून देतात. ह्या प्रमाणें लोकांतील पक्ष स्वाभाविकपणें त्यांचे प्रतिनिधींतही प्रतिबिंबित होतात. ह्मणजे भिन्न भिन्न पक्षांचे प्रतिनिधी भिन्न भिन्न पक्षांचे नियो-

जकांचे वतीनें कनिष्ठ सभेंत येतात. आणि ज्येष्ठ सभेंतील लाट साहेब व मुख्य धर्माधिकारी यांमध्येंही, एकंदर लोकांत असलेला राष्ट्रहिताविषयींचा मतभेद, दृष्टीस पडतो. येणेंप्रमाणें ज्येष्ठ व कनिष्ठ या दोन्ही सभांत अथवा प्रमुख प्रजेच्या सभेंत निरनिराळे पक्ष असतात. आतां राजास या दोन सभांपैकीं वाटेल त्यास आपला मुख्य प्रधान करितां येतें, व नंतर तो आपले मदतनीस आपल्या पक्षांतून निवडतो असें वर सांगितलें आहे. तरी व्यवहारांत सदोदित असें घडतें कीं, कनिष्ठ सभेंत जो पक्ष सर्वांत प्रबल असतो, ह्मणजे ज्या पक्षाचे प्रतिनिधी सर्वांत जास्त असतात, अथवा शब्दपर्यायानें जो पक्ष देशांतील बहुजनसमाजास मान्य असतो, त्याच पक्षाच्या अग्रणीस राजा आपला मुख्य प्रधान करितो, व तो मग आपले सहाय प्रधान निवडितो. कारण इतर पक्षांतील प्रतिनिधीच मंत्रिमंडळांत बसण्यास ह्मणजे राज्यव्यवस्थेचीं सूत्रें आपल्या हातीं घेण्यास तयार नसतात. ह्याचें कारण असें. मंत्रिमंडळांतील व्यवस्थापक राज्यव्यवस्थेसाठीं अवश्य ह्मणून ज्या सूचना ज्येष्ठ किंवा कनिष्ठ सभेपुढें आणितात त्या, जर त्यांचा पक्ष प्रबल नसेल, तर बहुमतानें पसार होण्याचा संभव मुद्लींच नसतो. आणि त्या पसार झाल्या नाहींत ह्मणजे मग त्यांस आपल्या मताप्रमाणें राज्यव्यवस्था चालवितां येत नाहीं. ह्मणून निर्बल पक्षांतील लोक प्रथमच राज्यशकट वहाण्यास सिद्ध होत नाहींत. एकंदरींत राजास जरी स्वेच्छेनुसार आपले प्रधान निवडण्याचा पूर्ण अधिकार आहे, तरी व्यवहारदृष्ट्या तो केवळ पोकळ आहे, आणि कनिष्ठ सभेंत जो पक्ष प्रबल असतो त्याच पक्षाचे लोकांचे हातीं त्यास आपल्या राज्याचा कारभार सोंपवावा लागतो हें उघड आहे. सारांश मंत्रिमंडळ ह्मणजे कनिष्ठ सभेंतील प्रबल पक्षाचे अग्रणींची सभा असाच अर्थ समजला पाहिजे. आणि याच अग्रणींचें हातीं राज्यव्यवस्था असणें हें योग्य आहे. कारण देशांतील बहुजनसमाजास त्यांचाच पक्ष मान्य असल्यामुळें, बहुजन समाजास साधारणपणें रुचेल अशी राज्यव्यवस्थेची पद्धति तदितर पक्षाच्या अग्रणींपासून मिळणें अशक्य असतें. ह्या प्रमाणें मंत्रिमंडळ लोकांस संमत असलें ह्मणजे, राज्यव्यवस्था अप्रत्यक्ष रीतीनें लोकां-

च्याच हातीं असते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मंत्रिमंडळ ज्या पक्षाचें असतें त्यास सत्ताधारी पक्ष ह्मणतात; कारण त्याचेच हातीं सर्व सत्ता असते. आणि इतर सर्व पक्षांचे समुदायास प्रतिपक्ष ह्मणतात, कारण, हे सत्ताधीन पक्षास प्रतिकूल असतात.

येथपर्यंत राजा, ज्येष्ठ सभा, कनिष्ठ सभा, व मंत्रिमंडल यांची प्रकृति व राज्यव्यवस्थेंतील अधिकार यांचें स्पष्टीकरण झालें. आतां त्यांचा परस्परसंबंध दाखवून नामधारी कनिष्ठ सभा वास्तविक सर्वांत श्रेष्ठ कशी आहे हें सांगतों.

राज्यव्यवस्थेचें मुख्य साधन कायदे. हे कसे तयार होतात, हें प्रथम सांगितलें पाहिजे. पैशाच्या बाबीशिवाय कोणत्याही इतर बाबीचें बिल ज्येष्ठ किंवा कनिष्ठ सभेपुढें प्रथम त्या त्या सभेंतील कोणताही सभासद आणितो. तेव्हां त्या सभेचा अध्यक्ष आपलें स्थान सोडून सभासद मंडळींत येऊन बसतो; व अध्यक्षाचे मेजावरील गदा जी सभेचें चिन्ह असतें, ती मेजाखालीं ठेवण्यांत येते. असें झालें ह्मणजे सभा मोडून तिची कमेटी झाली असें ह्मणण्याचा सांप्रदाय आहे. सभा व सभेची कमेटी यांत वादविवादासंबंधानें असा फरक आहे कीं, कमेटींत प्रत्येक सभासदास वादविषयक सूचनेवर एकापेक्षां अधिक वेळ बोलतां येतें; पण सभेंत त्यास एकापेक्षां अधिक वेळ बोलतां येत नाहीं. या कमेटीमध्यें बिलाचा उहापोह होऊन शेवटीं मतें घेण्यांत येतात, आणि जर तें बिल बहुमतानें पसंत ठरलें, तर त्याचें पहिलें वाचन झालें असें ह्मणतात. ह्या नंतर तें बिल पुन्हा सभेच्या कमेटीपुढें येतें. त्या वेळींही वादविवाद होऊन तें बहुमतानें पसंत ठरल्यास त्याचें दुसरें वाचन झालें असें ह्मणतात. ह्या प्रमाणेंच तें तिसऱ्यानदां बहुमतानें पसार झालें ह्मणजे त्याचें तिसरें वाचन झालें कीं, तें त्या सभेकडून ज्येष्ठ सभेकडे व ज्येष्ठ सभेकडून कनिष्ठ सभेकडे पाठविण्यांत येतें. या ठिकाणींही पुन्हा सभेच्या कमेटीपुढें त्याचीं पूर्वीप्रमाणें तीन वाचनें झालीं पाहिजेत; ह्मणजे त्याजवर तीन वेळ वादविवाद होऊन तें तिन्ही वेळ पसंत ठरलें पाहिजे. ह्या

रीतीनें प्रत्येक सभेच्या कमेटीपुढें बिलाचें तीन वेळ वाचन झालें ह्मणजे त्यास राजाची संमति मिळण्यासाठीं तें त्याजकडे पाठविण्यांत येतें. तेथें त्यास राजाची संमति मिळाली ह्मणजे तें बिल कायदा होतें. पैशाच्या बिलांत व इतर बिलांत फरक इतकाच कीं, पैशाचीं बिलें तयार करून सभेपुढें प्रथम आणण्याचा कनिष्ठ सभेसच अधिकार आहे; ज्येष्ठ सभेस नाहीं. बाकी इतर गोष्टींत तीं व इतर बिलें यांत कांहीं एक फरक नाहीं. कायदा तयार होण्याच्या वर ज्या सात पायऱ्या सांगितल्या—प्रत्येक सभेंतील तीन तीन वाचनें व राजाचें अनुमोदन—त्यांपैकीं कोणतीही पायरी मोडली असतां सर्व जिना कोसळून बिल खालीं पडतें. कायदे करण्याच्या दृष्टीनें कनिष्ठ व ज्येष्ठ सभा मिळून होणाऱ्या प्रमुख प्रजेच्या सभेस 'नियामक सभा' असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. आणि या 'नियामक सभेच्या' संबंधानें मंत्रिमंडळास 'व्यवस्थापक' असें ह्मणतात. ही कायद्याची उपपत्ति झाली.

आतां जीं बिलें कनिष्ठ सभेंत तीन वाचनें झाल्यानंतर ज्येष्ठ सभेकडे पाठविण्यांत येतात, त्यांचे संबंधानें तरी ज्येष्ठ सभा कनिष्ठ सभेपेक्षां वरिष्ठ नाहीं काय? ज्येष्ठ सभेनें तीं बिलें नापसंत केलीं ह्मणजे तीं जमिनदोस्त होत नाहींत काय? होतात; पण तेवढ्यानेंच तिचें वरिष्ठत्व स्थापित होत नाहीं. कारण, ज्येष्ठ सभेनें एकदां नापसंत केलेलें बिल जर कनिष्ठ सभेच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें असेल तर, ती तें बिल पुन्हां तीन वेळ पास करून ह्मणजे त्याचें तीनदां वाचन करून तें पुन्हा ज्येष्ठ सभेकडे पाठविते. ह्या वेळींही तें बिल तिनें नापसंत केल्यास कनिष्ठ सभा त्याचें आणखी एकदां तीन वेळ वाचन करून तें ती ज्येष्ठ सभेकडे पाठविते. ह्या वेळीं तें बिल ज्येष्ठ सभेनें मान्य केलें तर बरें; नाहीं तर कनिष्ठ सभा आपलें अखेरचें शस्त्र उपसण्यास मागें पुढें पहात नाहीं. मंत्रिमंडळ हें कनिष्ठ सभेंतील प्रबल पक्षाचे अग्रणी असतें, व राजास नवीन लार्ड साहेब करण्याचा अधिकार आहे, ह्या पूर्वी निर्दिष्ट केलेल्या दोन गोष्टी वाचक विसरले नसतील. या दोहोंच्याच संमेलनानें कनिष्ठ सभेचें अखेरचें अस्त्र बनलें आहे. तें असें. कनिष्ठ सभेनें बहुमतानें

पसंत ठरवून ज्येष्ठ सभेकडे तीनदां पाठविलेलें बिल, ज्येष्ठ सभेनें तीन्ही वेळ नापसंत केलें ह्मणजे कनिष्ठ सभेंतील बहुमताच्या पक्षाचें जें मंत्रिमंडळ तें आपल्या मताचे लागतील तितके नवीन लॉर्ड् करण्यास राजास सल्ला देतें. त्याप्रमाणें राजानें नवीन लॉर्ड्स केले ह्मणजे कनिष्ठ सभेचें कार्य झालेंच. जर राजानें तसें करण्याचें नाकारिलें तर वरील सल्ला देणारें मंत्रिमंडळ आपल्या कामाचा राजीनामा देतें. ह्मणजे मग राजास नवीन मंत्रिमंडळाची योजना करावी लागते. हें नवीन मंत्रिमंडळ त्यास प्रथम मिळतच नाहीं. कारण, इतर पक्ष आपल्या समजुतीप्रमाणें निर्जीव असल्यामुळें ते राज्य व्यवस्था आपले हातीं घेण्यास तयार होत नाहींत. आणि एखाद्या पक्षांतील लोक यदाकदाचित् तयार होऊन राजास नवीन मंत्रिमंडळ मिळालेंच, तर त्यासही लवकरच राजीनामा देण्याची पाळी येते. कारण, सत्ताधीश नवीन पक्ष निर्जीव पडल्यामुळें व प्रतिपक्ष प्रबल असल्यामुळें, ( कारण पूर्वींचा सत्ताधीश प्रबल पक्ष प्रतिपक्ष झाला आहे, किंवा प्रतिपक्षांत मिळाला आहे ), सत्ताधीश पक्षाची कोणतीही सूचना पसार कनिष्ठ सभेंत होत नाहीं; व त्यास आपल्या मताप्रमाणें राज्यव्यवस्था करितां येत नाहीं. येणेंप्रमाणें मूळच्या सत्ताधीश पक्षाशिवाय कोणताही पक्ष राज्यव्यवस्था करण्यास समर्थ नसतो; व त्यामुळें राजा अगदीं पेंचांत सांपडून अखेरीस मूळ मंत्रिमंडळाचे सल्ल्यास आपली संमति देतो. ह्याप्रमाणें शेवटीं ज्येष्ठ सभेचा पराभव होऊन कनिष्ठ सभेचाच विजय होतो. बरें राजा तरी सर्वांत श्रेष्ठ आहे असें ह्मणतां येईल काय? नाहीं. कारण, जरी साधारण गोष्टींत ज्येष्ठ सभेप्रमाणेंच त्याला कोणतेंही बिल नापसंत करितां येतें, ह्मणजे अमुक एक गोष्ट कायदा होणें न होणें हें जसें ज्येष्ठ सभेच्या इच्छेवर साधारणपणें अवलंबून आहे, तसेंच राजाच्याही इच्छेवर अवलंबून आहे, तरी वर सांगितल्याप्रमाणें जशी अखेरीस ज्येष्ठ सभेची फजिती होते, त्याचप्रमाणें शेवटीं राजासही हार खावी लागते; व दोन्ही सभांत पसंत ठरून त्याजपुढें आलेल्या बिलास त्यास निरुपायास्तव आपलें अनुमोदन देणें भाग पडतें. ह्याप्रमाणें राजाच्या संमतीशिवाय कोणताही कायदा पास

होत नाहीं–किंवा रद्द होत नाहीं–ह्मणजे कायदा रद्द करण्याची सूचना पसार होत नाहीं–असा जो ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतील नियम आहे, तो जरी विचारदृष्टीनें अक्षरशः अनपवादक आहे, तरी व्यवहारांत किंवा आचारदृष्टीनें असाधारण प्रसंगीं अगदीं गतप्राण झाला नाहीं, तरी तो मृतप्राय होऊन त्याचें अस्थिचर्म मात्र जाग्यावर कायम रहातें, हें निर्विवाद आहे.

आतां पैशासंबंधाचीं बिलें तयार करून सभेपुढें आणण्याचा कनिष्ठ सभेसच जो अधिकार आहे, त्यांत कोणकोणत्या महत्वाच्या गोष्टींचा अन्तर्भाव होतो हें सांगितलें पाहिजे. राज्यव्यवस्थेचें मुख्य साधन कायदा ह्मणून वर सांगितलें आहे; परंतु कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीनें झाल्यावांचून राज्यव्यवस्था सुरळीत चालावयाची नाहीं. हितकारक कायदे तयार होणें देशास जितकें महत्वाचें आहे, तितकेंच, किंबहुना त्याहून जास्त महत्वाचें त्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी होणें हें आहे. या मुद्याचें बर्कनेंही आपल्या 'आधुनिक असंतोषां' त चांगलें विवेचन केलें आहे. या मुद्याविषयीं याच उपोद्घातांत पुढें जरा सविस्तर लिहावयाचें आहे, ह्मणून येथें त्याचा फक्त नामनिर्देशच केला आहे. येथें सांगावयाचा मुख्य मुद्दा इतकाच आहे कीं, कायद्याची अंमलबजावणी, योग्य अथवा अयोग्य कोणत्या तरी रीतीनें, झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ही अंमलबजावणी करण्यास पैशाची अत्यंत आवश्यकता आहे. एकंदरींत, सरकारच्या दृष्टीनें कायदा तर महत्वाचा खराच; पण तो एकटाच महत्वाचा नाहीं. सरकारास पैशाचेंही महत्व तितकेंच आहे. आतां सरकारचें उत्पन्न प्रजेच्या उत्पन्नाहून निराळें नाहीं. प्रजेच्या उत्पन्नांतीलच करांच्या रूपानें कांहीं भाग वसूल करून सरकारास आपला खर्च भागविला पाहिजे. ही गोष्ट सर्व राज्यांस सारखीच लागू आहे. ब्रिटिश राज्याचा विशेष ह्या पुढेंच आहे. तो असा. प्रजेपासून घ्यावयाचे कर कोणत्या बाबींवर किती व कसकसे बसवावे, हें सर्व ठरविणें कनिष्ठ सभेच्याच हातांत आहे. प्रजेपासून वाटेल त्या वेळेस, वाटेल त्या बाबतींत, वाटेल त्या रीतीनें पैसा सर-

कारी तिजोरींत येईल; त्यावर राजाची पूर्ण सत्ता आहे; तो त्यास राज्यव्यवस्थेचेच कामीं वाटेल तसा खर्च करितां येतो इतकेंच नाहीं, तर वाटेल त्या कामीं—खासगी अवश्य व अनवश्य ह्मणजे निव्वळ चैनीच्या बाबतींतही वाटेल त्या वेळीं वाटेल तसा खर्च करितां येतो; या बाबतींत तो करील ती पूर्व दिशा; त्यास कोणी विचारता ना पुसता, इतकेंच नव्हे तर, या कामीं त्यास कोणी कांहीं विचारणें ह्मणजे राजद्रोहाचा भयंकर गुन्हा करणें होय—अशी जी आमच्या लोकांची अनादिकालापासून चालत आलेली समजुत आहे, तीस ‘ संयुक्त राज्यांत ’ कधींही थारा मिळालेला नाहीं. तिकडील लोकांच्या ह्या विषयींच्या कल्पना आमच्या कल्पनांहून अगदीं प्रथमपासूनच सर्वथैव भिन्न आहेत. कनिष्ठ सभेच्या—ह्मणजे अप्रत्यक्ष रीतीनें लोकांच्या—संमतीशिवाय राजास त्यांजपासून कोणत्याही रीतीनें केव्हांही पैसा गोळा करितां येत नाहीं; कनिष्ठ सभेच्या संमतीनें सरकारच्या तिजोरींत जो पैसा येतो त्याजवर राजाची अणुमात्रही सत्ता नाहीं; तो पैसा केवळ सार्वजनिक होय. आणि त्याचा खर्चही लोकांच्या संमतीनें सार्वजनिक कामांकडेच झाला पाहिजे; राजाच्या खासगी खर्चाचा त्याशीं कांहीं एक संबंध नाहीं; त्याच्या खासगी खर्चासाठीं लोकांच्या वतीनें कनिष्ठ सभेनें जी नेमणुक करून दिली आहे, त्यांतच त्यानें आपला खर्च भागविला पाहिजे; सारांश, सार्वजनिक पैशावर त्याचा कोणत्याही तऱ्हेचा हक्क नाहीं; तो पैसा लोकांच्या वतीनें कनिष्ठ सभेच्या—लोकप्रतिनिधींच्या स्वाधीन केलेला आहे; आणि सार्वजनिक पैशाची राजानें कोणत्याही रीतीनें अफरातफर केल्यास त्याची इतर अपराध्यांप्रमाणेंच, कायद्यानें योग्य तजवीज करण्यास कांहीं हरकत नाहीं, अशी त्या लोकांची समजुत आहे. ह्या प्रमाणें सार्वजनिक पैशाची अव्वलपासून अखेरपर्यंत सर्व प्रकारची व्यवस्था लोकप्रतिनिधींचे स्वाधीन असल्यामुळें पैशावर अवलंबून असणारीं राज्यव्यवस्थेंतील सर्व सार्वजनिक कामें अप्रत्यक्ष रीतीनें त्यांच्याच हातीं आहेत. कारण, राज्यव्यवस्थेचीं प्रत्यक्ष सूत्रें, व्यवस्थापक जें मंत्रिमंडळ त्याचे हातीं असतात. आणि हें मंत्रिमंडळ वर सांगितल्याप्रमाणें जरी

साधारणपणें कनिष्ठ सभेंतील प्रबल पक्षाच्याच वतीनें असतें, तरी, कदाचित् आपल्या पक्षाचीं तत्वें एकीकडे ठेवून अप्रामाणिकपणें तें राजाच्या एककली मर्जीप्रमाणें चालण्यास तयार होण्याचा थोडासा संभव आहे. अशा प्रसंगीं त्यांचीं कृत्यें किंवा सूचना बहुमतास पसंत नसल्या तर, त्या पसार होत नाहींत, व त्यांस पैशाची मदत मिळत नाहीं. ह्याप्रमाणें त्यांनीं लोकमताविरुद्ध जाण्याचा प्रयत्न केलाच, तर तो अंतीं निष्फल झाल्यावांचून रहात नाहीं.

येथपर्यंत सर्वसाधारण भापेनेंच ह्या मुद्याचें स्पष्टीकरण झालें. आतां त्याजकडेच आपण एका विशेष दृष्टीनें पाहूं. ह्मणजे वरील सामान्य नियम एका उदाहरणास लावून दाखवूं. ह्मणजे त्या नियमाचें स्पष्टीकरण होऊन, त्या उदाहरणाचेंही खरें स्वरूप, नियमाच्या साहाय्यानें व्यक्त होईल. नियम व उदाहरण यांजवर परस्परांचा प्रकाश पडून दोन्ही उज्वलित होतील. राजास अन्य राष्ट्रांशीं लढाई अथवा तह करण्याचा पूर्ण अधिकार आहे असें वर सांगितलेलें वाचकांस स्मरत असेलच. लढाई पैशावांचून होत नाहीं, हें स्पष्ट करून सांगण्याची जरूर नाहीं. लढाईस पैशाची आवश्यकता इतकी आहे कीं, त्याची इंग्रजींत 'युद्धाचे स्नायूंत'च गणना केली आहे. आतां एकाद्या राष्ट्राशीं युद्ध करावें असें इंग्लंडचे राजाचे मनांत आलें, असें समजा. त्यास आपला हेतु सिद्धीस नेतां येईल काय? राजास अमुक अमुक अधिकार आहेत, असें जें पूर्वीं सांगितलें आहे, त्याप्रमाणें त्याला आपला हेतु तडीस नेण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं; परंतु राजा, ज्येष्ठ सभा किंवा कनिष्ठ सभा, यांपैकीं कोणाही एकाचे मर्जीवर ब्रिटिश राज्यव्यवस्था अवलंबून नाहीं, तर प्रत्येक राजकीय गोष्टींत प्रत्येकास कमीअधिक अधिकार आहेत; शब्दपर्यायानें, राजा, ज्येष्ठ सभा किंवा कनिष्ठ सभा ह्यांपैकीं कोणीच पूर्ण स्वतंत्र नाहीं, तर परस्परांवर परस्परांचा योग्य व गुणावह दाब आहे, हें ध्यानांत ठेविलें ह्मणजे वरच्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें हें तेव्हांच कळून येईल. त्या विशेष राष्ट्राशीं युद्ध करणें तें कां हें दोन्ही सभांस व त्यांतही विशेषेंकरून कनिष्ठ सभेस पूर्वीं स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. त्यांची संमत असल्यास

राजास आपल्या उद्देशानुरूप वागतां येईल; परंतु जर कां ह्यांचे अनुमोदन त्यास मिळालें नाहीं, तर त्यास आपला उद्देश मनच्या मनांतच ठेविला पाहिजे. यदाकदाचित् त्यांस न जुमानतां स्वतःच्याच जोरावर व जोखिमेवर राजानें युद्ध सुरू केलेंच तर तें पैशाचे मदतीचे अभावीं फार दिवस चालवयाचें नाहीं, व उलटें त्यासच तोंडघशीं पडण्याची पाळी यावयाची हें उघड आहे. ह्मणून या बाबतींत राजास पूर्ण स्वातंत्र्य नसून त्यास लोकांच्याच इच्छेप्रमाणें वागलें पाहिजे, आणि जरी राजाचा अन्य राष्ट्रांशीं युद्ध किंवा तह करण्याचा अधिकार अक्षरशः खरा आहे, तरी तो पूर्वी स्पष्ट करून सांगितलेल्या इतर अधिकारांप्रमाणेंच केवळ पोकळ होय, त्यांत कांहीं राम नाहीं हें निर्विवाद आहे.

येथें एक शंका उत्पन्न होते. ती अशी. राजास ज्येष्ठ व कनिष्ठ सभांची मुळीं जरूरच काय? त्या सभा भरविण्याचें व विसर्जन करण्याचें त्याचे हातीं आहे. ह्या सभा त्यानें मुदलीं भरविल्याच नाहींत, ह्मणजे मग त्यास आपल्या आज्ञाधारक मंत्रिमंडळाचे सल्ल्यानें वाटेल तशी राज्यव्यवस्था करण्यास काय प्रत्यवाय आहे? या शंकेचें उत्तर अंशतः पूर्वी आलेंच आहे. सार्वजनिक पैसा कनिष्ठ सभेच्या हातांतील त्याच आहे व त्याची व्यवस्था तिच्याच विश्वासावर व प्रामाणिकपणावर सोंपविलेली आहे; त्या कामीं दुसऱ्या कोणास कांहीं अधिकार नाहीं. फार तर काय तो कसा वसूल करावा, हें ठरविण्याचाही अधिकार दुसऱ्या कोणास नाहीं, ह्यामुळें ती सभा भरविणें राजास अवश्य आहे. दुसरें कारण असें कीं, सैन्याची व्यवस्था व खर्च हीं ‘ म्युटिनि आक्ट ’ नांवाचा कायदा दरवर्षी पसार झाल्याशिवाय मंजुर होत नाहींत. ह्मणून निदान हा ‘ म्युटिनि ॲक्ट ’ पसार करण्यासाठीं तरी राजास दोन्ही सभा दरवर्षी भरवाव्या लागतात. आतां ह्या दोन्ही सभांस अगदींच न जुमानतां जर इंग्लंडचा राजा आमच्या इकडील राजांप्रमाणेंच सर्व गोष्टी स्वतंत्रपणें करण्याचें मनांत आणील, ह्मणजे कायदे करणें, त्यांची वाटेल तशी अंमलबजावणी करणें, कर बसविणें, ते जुलमानें वसूल करणें व त्या

पैशाची चाहेल तशी व्यवस्था करणें ह्या गोष्टी जर तो स्वतःच करूं लागेल, तर देशांतील लोक त्याचे विरुद्ध उठून राजा व प्रजा ह्यांत, अथवा राजाचे पक्षासही कांहीं प्रजा असतेंच, तिचे दृष्टीनें प्रजेंत २ पक्ष होऊन त्यांत आपआपसांत युद्ध सुरूं होईल. व अखेरीस लोकांचा पक्ष राजाचे पक्षापेक्षां प्रबल असल्यामुळें त्यास जय मिळून राजाचा व त्याचे पक्षाचा पराभव होईल. असें झालें ह्मणजे मग राजाची, गुन्हेगार ह्मणून ज्येष्ठ सभेपुढें लोकपक्षाचे वतीनें चौकशी होऊन त्याची कायद्या-प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. ह्मणजे अखेरीस राजास कदाचित् गादीसही मुकावें लागेल; अथवा कधीं देहान्त प्रायश्चित्तही भोगावें लागेल. ह्या गोष्टी ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या तत्वांपासूनच शुद्ध अनु-मानानें निघतात. व ह्मणूनच त्या अपरिहार्य आहेत. तरी पण अशा गोष्टी कधीं घडतच नसतील, व राजास गादीस मुकण्याची किंवा देहांत प्रायश्चित्त भोगण्याची पाळी कधींही येत नसेल असें मात्र कोणी समजूं नये. असे प्रसंग अनेकवार आले आहेत. अनेक राजांनीं प्रमुखप्रजेच्या सभेस गुंडाळून ठेवून राज्यव्यवस्था मनःपूत चालविण्याचा प्रयत्न केला आहे; लोकांनींही त्या त्या वेळीं आपल्या तर्फे त्यास प्रति-बंध करण्यास कमी केलें नाहीं; इतकेंच नव्हे तर, कधीं कधीं युद्ध प्रसंगही केला आहे; व त्यांतील बहुतेकांस त्यांनीं अखेरीस पदच्युत करून व एकास तर प्रत्यक्ष देहांत प्रायश्चित्तही देऊन गादीवर राजघ-राण्यांतील दुसऱ्या लोकांस बसविलें आहे, ह्या गोष्टी इतिहास प्रसिद्ध आहेत. सारांश, येथपर्यंत राज्यव्यवस्थेचे नियम सांगून, त्यांचें उल्लंघन झालें असतां अमुक अमुक परिणाम घडतात किंवा घडतील ह्मणून, जें वर सांगितले आहे, तें केवळ कल्पनासृष्टींतील तरगांतर्गत नसून त्यास इतिहासाचा पूर्ण आधार आहे, हें वाचकांनीं विसरतां कामा नये. ते आधार जाणण्याची ज्यास इच्छा असेल त्यानें इंग्लंडच्या इतिहासाचाच लक्षपूर्वक अभ्यास केला पाहिजे. ते ह्या उपोद्घातांत देणें योग्य नाहीं, व देतांही यावयाचें नाहींत. त्याकरितां स्वतंत्र इतिहासच लिहिला पाहिजे.

आतां ब्रिटिश राज्यव्यवस्थेचें स्वारस्य काय या मुद्याकडे वळतों. वरील हकीकतीवरून वाचकांच्या हें ध्यानांत आलेंच असेल कीं, या राज्यव्य-

वस्थेतील अवयवांचा परस्परांवर गुणावह दाब आहे. एकाच्या हातून कोणतीच गोष्ट कायदेशीर रीतीनें होत नाहीं. त्यास सर्वांची संमति असावी लागते. ह्यामुळें जर त्यांपैकीं कोणाच्याही मनांत एखादी आपमतलबाची अथवा परहानिकारक गोष्ट करण्याचें आलें किंवा एखादी सर्वांस घातक अशी गोष्ट अविचारानें करण्यास कोणी तयार झाला, तर इतरांचें अनुमोदन त्यास मिळालें नाहीं ह्मणजे झालें. त्याचें पुढें कांहीं चालत नाहीं. सारांश, इतरांच्या मदतीशिवाय प्रत्येक अवयव पंगु आहे. यामुळें त्यांचे हातून एखादी वाईट गोष्ट सहसा घडावयाची नाहीं. सर्वांचीच दृष्टी चकली तर त्यास इलाज नाहीं. पण अशी गोष्ट एकाएकीं व्हावयाची नाहीं. जर कनिष्ठसभा केवळ आपल्याच तोऱ्यानें वागावयास लागेल, तर त्यांस प्रतिबंध करण्याचा ज्येष्ठ सभेस व राजास अधिकार आहे; आणि जर राजा आपल्याच लहरी प्रमाणें राज्य करूं ह्मणेल तर त्यास कनिष्ठ सभेकडून पैशाची मदत मिळणार नाहीं. ह्याप्रमाणें सर्व अवयवांचे संमतीनें होणारी गोष्ट बहुजनसमाजास अहितकारक घडत नाहीं. पण अशा गोष्टी ह्मणजे कायदे; आणि कायदे चांगले असल्यानेंच प्रजेस सुख होतें असें नाहीं. त्यांची अंमल बजावणीही चांगल्या रीतीनें झाली पाहिजे. ‘ प्रत्येक राज्यांत नियामक मंडळानुरूपच प्रधानमंडळ असलें पाहिजे; नाहीं तर वस्तुस्थिति भयंकर अव्यवस्थित, व अस्ताव्यस्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. ’ कायद्याची अंमलबजावणी जर नीट रीतीनें झाली नाहीं तर चांगला कायदा असून काय उपयोग? पण जे अंमलदार कायद्याची अंमल बजावणी नीट करणार नाहींत त्यांस योग्य शासन केलें ह्मणजे आपोआप कायद्याची बजावणी नीट होईल, असें वाटण्याचा कदाचित् संभव आहे. पण जरा सूक्ष्म विचार केला ह्मणजे तेव्हांच ध्यानांत येईल कीं, वरील ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण त्यांना शासन तरी कोणी करावयाचें? सरकारी अमलदारांनींच ना! तेव्हां हे तरी सरकारी अंमलदार चांगले असलेच पाहिजेत. आणि शिवाय जे अंमलदार कायद्याचा उद्देश तडीस नेणार नाहींत, त्यास शासन करणेंही सदोदित शक्य नाहीं.

कारण, बर्क ह्मणतो त्याप्रमाणें ते ‘ दुर्लक्षानें ’ अज्ञानानें, अथवा कावे-बाज मतलबानें राज्यव्यवस्थेचा कांहीं भाग तसाच पडूं देतील, दुसऱ्याचे उद्देश तडीस जाऊं देणार नाहींत, व देशास अत्यंत हितावह सर्व गोष्टी नष्ट होऊं देतील; व इतकें करूनही आपणावर फौजदारी खटला शेकला जाणार नाहीं, अशी त्यांस खबरदारी घेतां येईल. ’ ह्यावरून मंत्रिमंडळाची योजना व योग्यता किती खुबीदार आहे हें तेव्हांच लक्षांत येईल. कनिष्ठ सभेंत व ज्येष्ठ सभेंत जे कायदे पसार होऊन नंतर त्यांस राजाची संमति मिळते, ते कायदे बहुमतानें पसार होतात. ह्मणजे नियामक मंडळ वास्तविक या दोन सभांतील प्रबल पक्ष होय. तेव्हां प्रधानमंडळ ह्मणजे व्यवस्थापक प्रबल पक्षाचेच असणें योग्य आहे. त्यांतही ते कनिष्ठ सभेंतीलच प्रबल पक्षाचे असणें विशेष योग्य कां हें उघडच आहे. कारण, ज्येष्ठ सभेंतील सभासद लोकांनीं निवडलेले नसतात; तेव्हां त्यांजमधील पक्षांचें बलाबल केवळ नैमित्तिक होय; तें सर्व लोकां-मधील पक्षांचे बलाबलावर अवलंबून नसतें. पण कनिष्ठ सभेचे सभासद लोकप्रतिनिधी असल्यामुळें त्यांतील पक्ष लोकांतील पक्षांचें प्रतिबिंबच असतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ‘ हाउस–ऑफ–कामन्स ’चें सर्व बीज, तेज, आणि सत्व काय तें त्याचे राष्ट्रमनोविकार प्रतिबिंबित्वांतच आहे. ’

तेव्हां कायद्याची अंमलबजावणी बहुजनसमाजास किंवा एकंदर राष्ट्रास सुखकारक होण्याकरितां मंत्रिमंडळ कनिष्ठ सभेंतील प्रबलपक्षाच्याच अग्रे-सरांचें असणें किती योग्य व साहजिक आहे हें स्पष्टच आहे.

ह्याप्रमाणें कायदे करणें व कायद्याची अंमलबजावणी करणें ह्या दोन्ही राज्यव्यवस्थेंतील अत्यंत महत्वाच्या गोष्टी जर राजाचे हातांत नाहींत; जर त्या लोकांच्या अप्रत्यक्ष घेतलेल्या बहुमतानें ठरावयाच्या असतात, तर राजास कांहींच सत्ता नाहीं, व तो ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत केवळ कळसुत्री बाहुल्याप्रमाणेंच आहे असें ह्मणावयास काय प्रत्यवाय आहे? या प्रश्नाचें उत्तर आहे किंवा नाहीं ह्यापैकीं कांहींच एकाएकीं देतां यावयाचें नाहीं. तरी राजाचा प्रत्यक्ष अधिकार अगदीं थोडा आहे यांत संशय

नाहीं. पण त्यांजकडे राज्यव्यवस्थेंतील जीं गौण कामें सोंपविलेलीं आहेत, तीं उपयुक्त व अवश्य आहेत व त्याचा मान व त्याची योग्यता हीं प्रथमदर्शनीं जितकीं क्षुल्लक वाटतात तितकीं क्षुल्लक नसून तीं बरींच मोठीं आहेत. एकंदर जनसमाजांत त्यास श्रेष्ठ स्थान आहे, अन्य देशांतील राजांचा मानमरातब योग्य ठेवणें त्याजकडेच असतें; आणि एकंदर पृथ्वीवरील व विशेषेंकरून यूरोपांतील राजमंडळांत इंग्लंड देशाचें प्रतिनिधित्व त्यांजकडे आहे, या दृष्टीनें त्यास मोठमोठीं बहुमानाचीं व भूषणावह कामें करण्याचे अनेक प्रसंग येत असले पाहिजेत. शिवाय ज्या देशाभिमानावर राष्ट्राचें वैभव व राष्ट्राची उन्नति अवलंबून असते, तो देशाभिमान राष्ट्रांत उत्पन्न करून त्याचें तेज कायम राखण्यास राजाचा फारच उपयोग होतो. हा मुद्दा सकृद्दर्शनीं फारसा महत्वाचा वाटणार नाहीं. पण सूक्ष्म विचारांतीं त्याचें महत्व दृष्टीस पडेल. बहुजनसमाजावर इतर गोष्टींतल्याप्रमाणें राजकीय गोष्टींतही युक्तिवादाचा किंवा ज्ञानाचा ठसा फारसा उमटत नाहीं. त्याजवर कल्पनाशक्ति व सांप्रदाय यांचाच विशेष पगडा नेहमीं असतो. ह्मणून या बहुजनसमाजास राजनिष्ठेशिवाय देशाभिमानाचा अर्थ समजत नाहीं. आपल्या राजावर प्रीति करणें व त्याजवर संकट प्राप्त झालें असतां त्याजकरितां आपला प्राणही खर्ची घालण्यास तयार होणें, हाच देशाभिमान होय असा त्यांचा ग्रह असतो. सारांश त्यांच्या दृष्टीनें राजा देशाचीं केवळ प्रतिमाच होय. आणि अशी प्रतिमा पुढें असल्याशिवाय त्यांचे स्वदेशाविषयींचे मनोविकार कधींही तरतरीत रहावयाचे नाहींत. ह्या सामान्य नियमाचें विशेष स्पष्टीकरण करण्याकरितां आपण एक उदाहरण घेऊं. प्रत्येक धर्मांत ईश्वराची भक्ति मनुष्यास अवश्य आहे, असें सांगितलें आहे. मग तो ईश्वर साकार असो अथवा निराकार असो. आतां निर्गुण, निराकार परमेश्वराची भक्ति करणें ह्मणजे काय ह्याचा अर्थच बहुजनसमाजास समजणें अशक्य आहे. त्याजपुढें किंवा निदान त्यांच्या मनांत तरी कांहीं प्रतिमा किंवा मूर्ति असल्याशिवाय भक्ति, प्रीति, पूज्यबुद्धि इत्यादि मनोविकार उत्पन्न व्हावयाचे नाहींत.

आणि ह्यामुळेंच कोणत्याही धर्मांतील बहुजनसमाज हा नेहमी मूर्तिपूजकच रहावयाचा. मूर्तिपूजेचीं रूपें निरनिराळ्या धर्मांत निरनिराळीं दृष्टीस पडतील; व कांहीं धर्मांत तर सकृद्दर्शनीं तें रूप दृष्टीसही पडणार नाहीं, इतकें तें अंधुक असेल. पण मूर्तिपूजा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, स्पष्ट किंवा अस्पष्ट, कोणत्या तरी रूपानें प्रत्येक धर्माच्या बहुजनसमाजांत वास करीत असलीच पाहिजे. हिंदु धर्मस्थापकांचें ह्या गोष्टीकडे पूर्ण लक्ष गेलें होतें असें दिसतें. आणि ह्मणूनच त्यानीं बहुजनसमाजास ह्मणजे अज्ञान लोकांस व परब्रह्माचें ज्यांस ज्ञान झालें आहे अशा ज्ञानवृद्धांस ईश्वरभक्तीचे निरनिराळे मार्ग दाखवून दिले आहेत. असो, हें विषयांतर झालें असें वाटण्याचा संभव आहे. पण वरील सामान्य नियमाचे स्पष्टीकरणास त्यापासून बराच उपयोग होईल असें जाणून तें केलें आहे. सारांश, स्वदेशाविषयींची प्रीति, भक्ति, व अभिमान एकंदर राष्ट्रांत जागृत करण्यासाठीं राजाची मूर्ति फारच उपयुक्त आहे. नुकत्याच झालेल्या 'डायमंड ज्युबिली'चें खरें महत्व व रहस्य ज्यास कळलें आहे, त्यास वरील विधानाची अधिक फोड करून सांगण्याची जरूर नाहीं. शिवाय एक मंत्रिमंडळ मोडून दुसरें मंत्रिमंडळ सत्तारूढ होण्याचे वेळीं राजा असल्यामुळें राज्यव्यवस्थेस राजक्रांतीचें स्वरूप येत नाहीं. हें मंत्रिमंडळांतर इंग्लंडांत अति सौम्यपणें घडून येतें; त्यामुळें देशांत अस्वस्थता किंवा दंगा होण्याचा मुदलींच संभव नाहीं. पण जर राजा गादीवर नसेल ह्मणजे इंग्लंडांत जर राजाची गादी नष्ट होऊन जाईल तर मंत्रिमंडळांतरास—पण त्यावेळीं मंत्रिमंडळ हें नांवच रहाणार नाहीं—राजक्रांतीचें स्वरूप येईल. सध्या ह्या अंतराकडे बहुजनसमाजाचें फारसें लक्ष जात नाहीं. राजा गादीवर असला व त्यांचा नित्यक्रम पूर्वीप्रमाणें यथास्थित चालला ह्मणजे त्याचें कार्य झालें. राज्य कारभार कोणाच्या हातीं आहे ह्या व असल्या इतर गोष्टींकडे त्यांचें फारसें लक्ष नसतें. शिवाय देशांतील पक्ष जेव्हां साधारणपणें समसमान असतात; जेव्हां कोणत्याही पक्षाचें प्रबलत्व निश्चयात्मक नसतें, त्यावेळीं राजा वाटेल त्या पक्षाचें मंत्रिमंडळ

नेमूं शकतो. व ह्यामुळें एक भयंकर प्रसंग वटावतो. अशा वेळीं जर मंत्रिमंडळाची नेमणूक करण्यास राजा नसेल तर निरनिराळ्या पक्षांत कलहाग्नि पेटून त्याचा काय परिणाम होईल हें सांगणें अशक्य आहे. तसेंच मंत्रिमंडळांत ह्याप्रमाणें जो वारंवार बदल होतो, त्यामुळें राज्यकारभाराचे प्रवाहास अडथळा होण्याचा फार संभव असतो. पण ह्या सर्व बदलांत राजा कायम असल्यामुळें त्या प्रवाहाची गति तशीच अप्रतिबद्ध रहाते. ह्याप्रमाणें राजाचा राज्यव्यवस्थेंत फारच उपयोग होतो. त्याजकडे मोठासा अधिकार नाहीं. व त्याला कारभारांतही फारसा हात घालतां येत नाहीं. बहुतेक सर्व कारभार प्रधानांचेच हातीं असतो. ‘ राजाचे हातून कधींही अन्याय व्हावयाचा नाहीं. ’ असें जें एक ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतील सर्वप्रसिद्ध तत्व आहे, त्याचा तरी अर्थ हाच आहे. प्रधानांचेच हातीं सर्व कारभार असल्यामुळें सर्व जबाबदारीही त्यांजवरच आहे. कारभारांत जो काय न्यायान्याय होईल, त्याशीं राजाचा प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं, तर त्याचें सर्व यशापयश व सर्व जबाबदारी प्रधानांचेच शिरावर आहे असा त्या तत्वाचा अर्थ आहे. तात्पर्य, इंग्लंड देशांत प्रजासत्ताकच राज्यपद्धति आहे व त्या पद्धतींतील ढोबळ दोष राजाचे उपयुक्त अस्तित्वानें बरेच नाहींसे झाले आहेत, असें ह्मटलें असतां चालेल. इंग्लंडास प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा सर्व फायदा मिळत असून, त्या पद्धतीपासून उत्पन्न होणारें नुकसानही त्यास सोसावें लागत नाहीं; तें नुकसान, राजाकडे जीं कामें सोंपविलीं आहेत, तीं त्यानें योग्यपणें बजाविलीं ह्मणजे, टाळलें जातें. ही कामें करण्याबद्दल राजास मोठा मान आहे, व त्यास त्याच्या खर्चाचे मानानें कनिष्ठ सभेनें ह्मणजे लोकांनींही एक वर्षासन करून दिलें आहे.

आतां तिसऱ्या जॉर्ज राजाचे कारकीर्दीपूर्वी इंग्लंडांतील राज्यव्यवस्थेची काय स्थिति होती, व तींत कोणकोणता व कसकसा फरक पडत गेल्यामुळें ‘ आधुनिक असंतोष’ उत्पन्न झाला हें थोडक्यांत सांगतों.

दुसऱ्या जेम्स् राजानें ( १६८५-१६८८ ) प्रमुख प्रजेच्या सभेचें अनुमोदनास गुंडाळून ठेऊन राज्यकारभार चालविल्यामुळें, व विशेषें-करून, इंग्लंडांत जी धर्मक्रांति झाली होती ह्मणजे रोमनक्याथलिक हा ख्रिस्तिधर्माचा पंथ मागें पडून त्याचे जागीं जो प्रॉटेस्टंट पंथ बळावला होता, त्या पंथाचे विरुद्ध जुन्या रोमनक्याथलिक पंथासच राजाश्रय देऊन, त्याचें मंडन करण्याचा त्यानें प्रयत्न केल्यामुळें तो लोकांस फारच अप्रिय झाला. त्यामुळें व्हिग् पक्षाच्या पुढाऱ्यांनीं त्यास पदच्युत करण्याची खटपट चालविली. अशी खटपट चालली आहे, असें त्यास कळल्याबरोबर, आपली येथें आतां धडगत नाहीं असें जाणून तो इंग्लंड सोडून युरोपांत निघून गेला. त्याच्या ह्या कृत्याचा 'त्यानें इंग्लंडच्या गादीचा त्याग केला;' असा व्हिग् पक्षानें अर्थ केला; व त्यास प्रमुख सभेची ( पार्लमेंटची ) संमति मिळवून, त्यांनीं इंग्लंडची गादी राजघराण्यांतील दुसऱ्या एका पुरुषास दिली. हा तिसरा विइल्यम् होय. हा दुसऱ्या जेम्सचा एकीकडून भाचा होता; व दुसरी कडून जांवई होता. तो हालंडांतील एक संस्थानिक होता. जेम्सला जरी रोमनक्याथलिक पंथ प्रिय होता, तरी तरी त्याच्या मुली मेरी व अॅन् ह्या नवीन प्राटेस्टंट् पंथाच्याच भक्त होत्या. ह्यांपैकीं वडील मुलगीही विइल्यम्ला दिलेली होती. ह्यामुळें व्हिग् लोकांनीं विल्यम् व मेरी ह्यांस हालंडांतून बोलावून आणून त्यांच्या नांवानें राज्यकारभार सुरूं केला. हा सर्व प्रकार कसा घडून आला व विल्यमनें कोणत्या अटींवर गादीचा स्वीकार केला हें सांगण्याचा या उपोद्घाताचा उद्देश नाहीं, व त्याची त्यास जरूरही नाही. जेम्सला काढून व्हिग् लोकांनीं विल्यमला गादी दिली, ही गोष्ट इंग्लंडच्या इतिहासांत 'राज्यक्रांति' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या वेळचा दुसरा पक्ष टोरी. हा जेम्स राजाच्या वतीचा होता. त्याला ही 'राज्यक्रांति' मुदलींच पसंत नव्हती. पण व्हिग् पक्ष प्रबल पडल्यामुळें त्यापुढें टोरी पक्षाचें कांहीं चाललें नाहीं. विल्यम् व मेरी ह्यांचेनंतर अॅनूला गादी मिळाली ( १७०२-१४ ) अॅनूचे नंतर राजघराण्यांत गादीस वारसदार

नाहींसा झाला. ह्मणून दुसऱ्या जेम्सचा आजा पहिला जेम्स ह्याची नात सोफाया, जी जर्मनींतील हॅनोव्हरचे इलेक्टरला दिलेली होती, तिचा मुलगा जॉर्ज ह्याला आणून त्यास प्रमुख सभेनें ( पार्लमेंटानें ) गादीवर बसविलें! हा इतिहासांत पहिला जॉर्ज ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यानें सन १७१४पासून १७२७ पर्यंत गादीचा उपभोग घेतला. नंतर ह्याचा मुलगा दुसरा जॉर्ज हा गादीवर आला. हे दोन्ही राजे विदेशी असल्यामुळें त्यांस इंग्लंडची राज्यव्यवस्था अगदींच नवीन होती, ह्मणून ते केवळ गादीचेच मालक होऊन राहिले होते. बहुतेक सर्व सत्ता व्हिग् पक्षाचेच कारभाऱ्यांचे हातांत आली होती. हे राजे अगदींच परके असल्यामुळें इंग्लंडांतील कांहीं लोकांचें लक्ष दुसऱ्या जेम्स राजाची जी संतति युरोपांत होती, तिजकडे वळलें होतें. ह्या संततीस गादी मिळावी असें ह्या लोकांस वाटत असे, व त्याकरितां ते खटपटही करीत असत. हे लोक इतिहासांत ‘ जाको—बाईट्स ’ ह्या नावानें प्रसिद्ध आहेत. टोरी पक्षास पूर्वीची ‘ राज्यक्रांति ’ पसंत नव्हती, व शिवाय पहिला व दुसरा जॉर्ज हे राजेही अगदींच परकी होते, त्यांचा इंग्लंडच्या गादीशीं बहुतेक बादरायणसंबंधच होता, आणि दुसऱ्या जेम्स राजाचा मुलगा व नातु हे युरोपांतच जिवंत होते, तेच गादीचे खरे वारस होत, असें टोरी पक्षास वाटत होतें; शिवाय ‘ राजक्रांती ’पासून राज्यकारभार व्हिग् पक्षाचेच हातीं होता, टोरी पक्षास राज्यकारभारांतून अजीच फांटा मिळाला होता; ह्या सर्व गोष्टींमुळें टोरी पक्षाचें ‘ जाकोबाईट्स ’नां बरेंच पाठबळ असणें अगदीं साहाजिक होतें. ह्यामुळें पहिला व दुसरा जॉर्ज ह्याचे कारकीर्दींत ‘ जाकोबाईट्स ’ लोकांनीं दोन तीन वेळां बरीच उचल केली; पण त्यांचे प्रयत्नास यश येणें कठिण होतें. अखेरीस सन १७४५ त त्यांचा अगदीं बीमोड झाला. ह्याप्रमाणें १६८८पासून १७६० पर्यंत ह्मणजे सरासरी पाऊणशें वर्षे व्हिग् लोकांच्याच हातीं सर्व राज्यसत्ता होती; टोरी पक्षानें अनेक प्रयत्न केले; पण या मुदतींत त्यास आपलें डोकें वर काढितां आलें नाहीं. सन १७६० त दुसरा जॉर्ज परलोकवासी झाला, व त्याचा मुलगा आधींच वारला असल्यामुळें,

त्याचा नातु तिसरा जॉर्ज हा गादीवर आला. तेव्हांपासून वस्तुस्थिति बदलण्यास एकदम आरंभ झाला.

राजक्रांतीनंतर जरी व्हिग् पक्षाच्या मंत्रिमंडळाचेच हातांत राज्यकाराचीं बहुतेक सूत्रें आलीं होतीं तरी विल्यम् व ॲन् यांच्या हातांतून ती समूळ गेलीं नव्हतीं. परंतु पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज हे इतके परदेशीय होते कीं त्यांचा स्वभाव, त्यांच्या रीतिभाती, त्यांची भाषा, त्याचे स्नेही सर्व कांहीं जर्मनच होतें ह्मणावयास हरकत नाहीं. ह्यामुळें राज्यशकटाचीं सर्व सूत्रें मंत्रिमंडळाचे हातांत आलीं. तिसरा जॉर्ज ह्यांची गोष्ट त्याचा आजा व पणजा ह्याच्या गोष्टीपेक्षां फार निराळी होती. तो इंग्लंडांतील लोकांस स्वकीय वाटूं लागला होता. त्याच्या रीतिभाती, त्यांची भाषा, हीं इंग्रजीच बनल्यामुळें त्याचें परकीयत्व बरेंच नाहींसें झालें होतें. शिवाय तो गादीवर आल्याबरोबर त्यानें प्रथम जीं कृत्यें केलीं, तीं लोकांस फारच पसंत पडल्यामुळें व्हिग् व टोरी ह्या दोन्ही पक्षांच्या लोकांस तो बराच प्रिय झाला. तरी पुढें जसजसा तो राज्यकारभारांत आपला हात शिरकवूं लागला, तसतसें त्याच्या स्वभावाचें खरें स्वरूप लोकांच्या नजरेस येऊं लागलें. त्याचा बाप लहानपणींच वारल्यामुळें त्याचें पालनपोषण व शिक्षण हें त्याच्या आईकडेच आलें. हिचा नवरा वाईट होता, व हिचा आजे-सासरा दुसरा जॉर्ज हाही हिचा द्वेष करीत असे; ह्यामुळें तिचा स्वभाव आधींच तापट झाला होता. तशांत जर्मनींतील दरबारच्या उदाहरणानें तिचें मन संकुचित झालें होतें; तिला सत्ता फारच प्रिय होती. पण पतीच्या अकालिक मृत्यूनें तिची अगदींच निराशा झाली. तेव्हां ती पहिल्यापासूनच आपल्या मुलास 'जॉर्ज, तूं राजा हो व आपली सत्ता गाजीव' हा मंत्र नेहमीं शिकवीत असे. शिवाय त्याचे गुरूही राजसत्तावादीच पडल्यामुळें, व युरोपांतील इतर देशांतील प्रबळ राजांचीं उदाहरणें त्याजपुढें असल्यामुळें, राज्यकारभार आपल्या हातांत आणण्याची त्यास इच्छा होणें अगदीं सहाजिक होतें. आणि आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास त्यास बऱ्याच गोष्टी अनुकूल होत्या. 'राजघराण्यांतील पिढीनें चवथे, व राजानुक्रमानें तिसरे पुरुष

असल्यामुळें कुलक्रमागतत्व वाद्यांसही आपल्या समजुतीप्रमाणें ह्या राजांचे ठिकाणीं कांहीं गोष्टी समाधानकारक दिसूं लागल्या ; व आपल्या मतांत कांहीं एक फरक न करितां त्यांजविषयीं आपली राजनिष्ठा दाखविण्यास त्यांस कांहींच हरकत दिसेनाशी झाली. तोतया व त्याचा पक्ष हीं निंदास्पद झालीं होतीं इ० ' जाकोबाइट लोकांचा बीमोड झाला होता; व टोरी पक्ष राजनिष्ठ होत चालला होता. पाद्री लोक व कायदेपंडित यांचीं मतेंही राजसत्तेस अनुकूळच होतीं. ह्यामुळें राजसत्तावादी लोकांची एक लहानशी मंडळी लवकरच राजाभोंवतीं जमा झाली. आणि त्यांच्या सल्ल्यानें, ज्या व्हिग्पक्षानें पाऊणशें वर्षें राजसत्तेचा यथेच्छ उपभोग घेतला होता, त्याची दाणादाण उडविण्यास तिसऱ्या जॉर्जनें आरंभ केला.

बर्कनें ' आधुनिक असंतोषांत ' व्हिग् लोकांची फारच स्तुति केली आहे. ' व्हिग् लोकांचें नांव देशभर पसरलें होतें ' ' व्हिग् हें लोकप्रिय नांव इ. ' ती थोडी फाजील आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या हातीं राजसत्ता जी इतकें वर्षें ठेविली होती, ती लबाडीच्याच मार्गाचें अवलंबन करून होय. नियोजनाचे वेळीं आपलें वजन व पैसा खर्च करून आपलेच लोक निवडले जावे, अशी ते खबरदारी घेत असत; व पार्लमेंटांत ते ज्या ज्या सूचना आणीत, त्या त्या पास करण्याकरितां ते उघडपणानें लांच देऊन अन्य पक्षाच्या प्रतिनिधींचीं मतें विकत घेत असत. तिजोरी, धर्मखातें व इतर गोष्टी ज्या वास्तविक राजाचे हातीं असावयाच्या त्या सर्व त्यांचे ताब्यांत आल्यामुळें, त्यांस आपली सत्ता कायम राखण्यास सुलभ जात असे. पण तिसऱ्या जॉर्जनें ह्या सर्व गोष्टी आपल्या ताब्यांत घेतल्या. टोरी पक्षाचे लोक त्याचे भोंवतीं तेव्हांच गोळा झाले व त्यांनीं आपणांस ' राजमित्र ' हें नांव धारण केलें. ह्या लोकांच्या व राजाच्या मनांत व्हिग् लोकांचा पाडाव करावयाचा असल्यामुळें त्यांनीं मंत्रिमंडळांत निरनिराळ्या पक्षांचे लोक नेमण्याचें मनांत आणिलें. एकाच पक्षाचे हातीं राज्यकारभार देण्याची पद्धति रद्द करणें, नियोजनांतील लबाडी व लांच यांचा नाश करणें, व प्रधानांचें गुलामगिरींतून राजाची मुक्तता करणें हा आपला उद्देश त्यांनीं लोकांत प्रसिद्ध

केला. आपला उद्देश तडीस नेण्याकरितां व्हिग् लोकांच्याच साधनांनीं पार्लमेंटांत राजास अनुकूल असा पक्ष त्यांनीं स्थापित केला; व मंत्रिमंडळांत निरनिराळ्या पक्षांतील लोकांची योजना केली. वरील पक्षाचे साहाय्यानें राजास प्रतिकूल अशा मंत्रिमंडळास 'राजमिलांस' तेव्हांच ह्मणून पाडतां येऊं लागलें. या वेळीं व्हिग लोकांतही फाटाफूट झाली होती. त्यांच्यांत निदान चारपंथ झाले होते; त्यांचे, बेड्फर्ड, ग्रेनव्हिल्, पिट् व रॉकिंग्हम् हे नायक होते. अशा स्थितींत व्हिग् लोकांपैकीं कांहीं लोक राजपक्षास मिळणें अगदीं साहजिक होतें. त्याप्रमाणें बेड्फर्ड व ग्रेनव्हिल्प्रभृति व्हिग् लोक राजास जाऊन मिळालेच. बाकी पिट् व राकिंग्हम् व्हिग्स् हेच शिल्लक राहिले. व्हिग लोकांची पूर्वींची राज्यपद्धति पिट्ला मान्य नव्हती. तो फारच वजनदार व लोकप्रिय होता. त्याचे मनांतही निरनिराळ्या पक्षांतील लोकांचें मंत्रिमंडळ तयार करावयाचें होतें. त्याप्रमाणें त्यानें राजाज्ञेवरून तसें मंत्रिमंडळ तयार केलें. पण वास्तविक सत्ता त्याचे हातीं राहिली नाहीं. जाकोबाइट्स पक्षाचे व टोरी पक्षाचे जे लोक राजाभोंवतीं जमले होते, त्यांच्याच सल्यानें राज्यकारभार सुरू झाला. त्यांत अर्ल ब्यूट हा स्कॉचमन मुख्य होता. या राजपक्षास बर्कनें 'कोर्ट' ह्मणजे दरबार, किंवा दरबारी मंडळ, अन्तर्गत प्रधानमंडळ, सूत्रधार व विशेषेंकरून 'जन्टो' ह्मणजे चौकडी हीं नांवें ठिकठिकाणीं दिलीं आहेत. ह्याप्रमाणें पिट् नांवाचाच प्रधान होत चालला होता व चौकडी व ब्यूट हेच खरे पडद्यांतील सूत्रधार बनत चालले होते. शिवाय पिट्ची इतर प्रधानांशीं वर्तणूक अगदींच अरेरावीपणाची होती. ह्यामुळें त्याचें आपआपसांत पटेनासें झालें ह्मणून अखेरीस पिट्ला आपल्या कामाचा राजीनामा देणें भाग पडलें. त्याचे मागून ब्यूट हाच मुख्य प्रधान झाला. परंतु ब्यूट स्कॉच् होता; इंग्लिश लोक स्कॉच् लोकांचा आधींच द्वेष करित असत; आणि त्यांतही ब्यूट्चा राजाचे आईशीं कांहीं गुप्त संबंध आहे अशी किंवदन्ती लोकांत पसरली होती ह्यामुळें तर तो फारच अप्रिय झाला. ह्मणून त्यानेंही अखेरीस राजीनामा दिला. नंतर ग्रेनव्हिल् प्रधानपदारूढ झाला. हीं सर्व प्रधान-

मंडळें ऐक्यहीनच होतीं; व बर्कच्या ह्मणण्याप्रमाणें नामधारीच होतीं. अशा प्रकारचीं प्रधानमंडळें नेमून राजास आपल्या इच्छेप्रमाणें राज्यकारभार करितां येत होता. याचें कारण असें कीं, 'राजाच्या हातून अपराध होत नाहीं; सर्व राजकीय गोष्टींची जबाबदारी प्रधानांवर आहे' इत्यादि राज्यव्यवस्थेंतील मुख्य तत्वें जीं वर दिलीं आहेत, तीं त्यावेळीं पूर्णपणें स्थापित झालीं नव्हतीं. असो. ग्रेनव्हिल् प्रधानपदारूढ झाल्यावर जें राजभाषण झालें, त्याजवर नॉर्थ ब्रिटन नांवाच्या पत्राचे ४५ वे अंकांत **वुइल्कीस** नांवाचे मनुष्यानें फारच कडक टीका केली. राजभाषण मुख्य प्रधानानें तयार करून, त्यानेंच राजाचे नांवानें वाचावयाचें अशी हल्लींप्रमाणें त्यावेळींही चाल पडत चालली होती. ह्मणून ह्या राजभाषणावर ह्मणजे मुख्य प्रधानाचे भाषणावर वाटेल ती टीका करण्यास कांहीं हरकत नाहीं; पण त्या वेळीं प्रजेचा हा हक्क पूर्णपणें स्थापित झाला नव्हता. राजानें ह्या पत्राचे कर्त्यास कैद करावें असें नांवगांवाशिवाय सामान्य वारंट काढिलें व वुइल्कीस यास पकडिलें. पण हें वारंट अन्यायाचें ठरलें. वुइल्कीसला सैन्यांत नोकरी होती; त्या नोकरीवरून त्यास दूर करण्यांत आलें. व त्याजवर बेअब्रू केल्याचा आरोप ठेवण्यांत आला. त्याच्या स्नेह्यांसही त्याजबद्दल थोडथोडें प्रायश्चित्त भोगावें लागलें. त्याचा पत्रव्यवहारसुद्धां फोडून पाहण्यांत येऊं लागला. अखेरीस त्याचे सर्व खासगी कागदपत्र जप्त करण्यांत आले. त्यानें पोप् कवीच्या 'एसे ऑन् म्यॉन्' ह्या काव्याची थट्टा करण्या करितां 'एसे ऑन् वूमन' नांवाचें एक अश्लील काव्य लिहून खासगी स्नेही मंडळीकरितां तें छापून त्याच्या कांहीं प्रती काढिल्या होत्या. त्या आश्लील काव्याची प्रत त्याचे कागदपत्रांत सांपडली. हें अश्लील काव्य लिहिल्याचा त्याजवर दुसरा आरोप ठेवण्यांत आला. पार्लमेंटानेंही त्याजवर हे आरोप ठेऊन त्याची चौकशी करण्यास कांहीं हरकत नाहीं असें ठरविलें. पुढें त्याची चौकशी होऊन त्याला हद्दपार करण्यांत आलें. पण त्याचे पूर्वींच तो फ्रान्सांत निघून गेला होता. ह्या सर्व प्रकरणांत मिडल्सेक्स् या काउन्टीमधील लोकांचें वुइल्कीस

ह्यास विशेष पाठबळ होतें. हें पाठबळ त्यास खासगी नात्यानें नव्हतें. कारण त्याचें नीतिवर्तन वाईट होतें. व त्यामुळें तो लोकांस फारसा प्रिय नव्हता. पण राजपक्षानें जो त्याचा सारखा पाठलाग चालविला होता, तो अन्याय्य असल्यामुळें लोकांनीं त्याला मदत करण्याचें मनांत आणिलें होतें. पण अखेरीस राजपक्षाचा जय झाला. ह्यामुळें देशांत जिकडे तिकडे दंगे होऊं लागले. राजा, त्याची आई, व मंत्रिमंडळ यांजवर जिकडे तिकडे उघडपणें कडक टीका होऊं लागल्या. व त्या सर्वांस सरकारांतून प्रायश्चित मिळूं लागलें. सन १७६४ त एका वर्षांत दोनशें प्रकाशकांची थोडथोडी पाठवणी झाली. त्याच्या मागल्या वर्षांतही इतक्या असामींची बोळवण झाली नव्हती. ह्यामुळें तर लोकांचीं मनें अधिकाधिक वितुष्ट होत चाललीं. सरकार लोकांस अप्रिय होण्यास आणखीही कांहीं कारणें झालीं. त्यांत म्यानिलाबद्दल स्पेननें खंडणी देण्याचें नाकारिलें तें इंग्लंडांतील सरकारनें निमूटपणें ऐकून घेतलें हें एक होय. आतां राजपक्षानें लोकनायकांस एका मागून एक कसें दूर केलें तें पहा. शेलबून हा प्रथम ग्रेन्व्हिल्च्या मंत्रिमंडळांत शिरला तो ब्यूटच्याच शिफारशीनें होय. व त्याला मंत्रिमंडळांत घालण्याचा ब्यूटचा उद्देश असा होता कीं, मंत्रिमंडळांत आपल्या पक्षाचे कांहीं लोक असावे. ह्याप्रमाणें प्रथम ब्यूट व शेलबून ह्यांचें सख्य होतें. पण पुढें त्यांचें कसें फाटलें हें संदिग्ध आहे. शेलबूनला ब्यूट जवळचें आपलें वजन कमी कमी होत चाललें असें वाटलें ह्मणा किंवा त्याला राजपक्षाचें वुइल्कीस प्रकरणांतील वर्तन आवडलें नाहीं ह्मणा, त्यानें लौकरच राजीनामा दिला. बेडफर्डही ह्या ग्रेन्व्हिल् मंत्रिमंडळास आपल्या अनुयायांसह येऊन मिळाला होता. व त्यामुळें ह्या मंत्रिमंडळास बराच जीव आला होता. परंतु ब्यूट व राजपक्ष यांच्या कारस्थानांपुढें त्याचें कांहीं चालेनासें झालें. ग्रेन्व्हिल् यानें राजास साफ सांगून पाठविलें कीं, ब्यूटची सल्लामसलत महाराजांनीं घेतां कामा नये व याच्या भावाला कामावरून दूर करावा. त्याचप्रमाणें, महाराजांचें वर्तन दुटप्पी असतें तें ठीक नाहीं, असेंही त्यानें राजास

सांगितलें. राजानेंही प्रतिपक्षास आपली संमति आहे व त्याजवर आपला विश्वास आहे, हें झांकून ठेविलें नाहीं. एखादी जागा रिकामी झाल्यास त्या जागेवर तो प्रधानांची सल्लामसलत घेतल्याशिवाय वाटेल त्यांस नेमूं लागला. बेडफर्डनें राजाची एकांतांत भेट घेऊन त्यास असें दूषण दिलें कीं, महाराजांचा प्रधानावर विश्वास नाहीं, व त्यांचे विरुद्ध महाराज वाटेल त्या गोष्टी करितात, हें न्याय्य नाहीं. ह्यानें एकंदर प्रकरण विकोपास जाऊन ग्रेन्व्हिल व बेडफर्ड यांस राजीनामा देणें भाग पडलें. पिट् प्रधान होण्यास तयार होता, पण त्याचा आप्त टेंपल तयार नव्हता ह्मणून पिट्नें नाकारिलें. ग्रेन्व्हिलला प्रधान करणें आतां अशक्यच होतें. अशा प्रकारें सरासरी २ महिने झोटिंगपादशाहीच झाल्यावर राकिंग्हॅमचें प्रधानमंडळ सत्तारूढ झालें. लार्ड राकिंगहॅमचा बर्क प्रथम खानगीकडील चिटणीस ‘ प्रायव्हेट् सेक्रेटरी ’ होता; व त्याचेच वजनानें बर्क लोकप्रतिनिधि निवडला गेला. या गोष्टींनीं बर्कच्या मनांत राकिंगहॅमविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न होणें साहाजिक होतें. व त्यामुळेंच त्याच्या हातून त्याची व त्याच्या प्रधानमंडळाची जरा फाजील स्तुति झाली असली पाहिजे. राकिंगहॅम जो व्हिग् पक्षांतील एका टोळीचा नायक झाला होता, तो त्याच्या अंगीं तशीच योग्यता होती ह्मणून नव्हे, तर हें नायकत्व केवळ त्याच्या कुलीनत्वानें व श्रीमंतीनेंच प्राप्त झालें होतें. शिवाय त्याचें खासगी आचरण व लोकांशीं वर्तनही निर्मळ होतें. तरी त्याचें अनुयायिमंडळ जेमतेमच असल्यामुळें त्याचें प्रधानमंडळ अशक्तच होतें. एका इतिहासकारानें या प्रधानमंडळाची कमानीशीं तुलना केली आहे. तो ह्मणतो कीं, कमान जशी बरोबर मध्यावरील दगडाचे आभावीं कोंसळल्याशिवाय राहणार नाहीं, त्याचप्रमाणें या प्रधानमंडळाचा मुख्य आधार जो पिट् तो त्यांत नसल्यामुळें तें फार दिवस अस्तित्वांत राहिलें नाहीं. ह्याप्रमाणें जरी हें प्रधानमंडळ निःसत्व होतें तरी त्यानें बऱ्याच चांगल्या गोष्टी केल्या. नांवगांवाशिवाय काढिलेलीं सामान्य वारंटें कायदेशीर नाहींत, असा त्यांनीं ठराव केला. सायडर टॅक्स नांवाच्या निंद्य कराचें

स्वरूप जरा बदलिलें; व अमेरिकेंत ज्याच्या योगानें दंगे होत होते तो स्टांप ॲक्ट रद्द केला. ह्यामुळें पुढें जें अमेरिकेशीं युद्ध झालें व ज्यांत अमेरिकेस जय मिळून ती स्वतंत्र झाली, तें युद्ध त्या वेळीं टळलें. या व इतर गोष्टी ज्या त्यांनीं केल्या, त्या राजास व त्याचे चौकडीस मुद्लीच रुचल्या नाहींत. ह्या मंत्रिमंडळानें केलेल्या गोष्टी आपणास पसंत नाहींत. असें त्यानें लोकांत आपल्या ' मित्रां ' कडून प्रसिद्ध करविलें. व त्यांपैकीं जे पार्लमेंटचे साभासद होते, त्यास, सर्व गोष्टींत मंत्रिमंडळास अडथळा करण्याचा हुकूम सोडिला. त्या हुकुमाप्रमाणें, जेव्हां ते प्रधानांचे आड येऊं लागले व तुमचें करणें राजास पसंत नाहीं, स्टांपाचे कायद्याचे निवृत्तीस तो प्रतिकूल होता, इत्यादि गोष्टी जेव्हां ते त्यास सांगूं लागले, तेव्हां राकिंगहॅमनें राजाचा लेख आणून त्यांस दाखविला, कीं त्यास राजाची संमति आहे. पण ' राजमित्रांची ' ह्या तऱ्हेनें खात्री होणें अशक्य होतें. त्यांस पडद्यांतील खरी स्थिति पक्की माहित होती, व प्रधानांचे विरुद्ध वागण्याचाच त्यास इशारा मिळाला होता. ह्यामुळें अखेरीस प्रधानमंडळाचा एका वेळीं पराभव होऊन, त्यास आपलें काम सोडून द्यावें लागलें. नंतर पिट्चे प्रधानमंडळ झालें. पण ह्यापुढील हकीकतीची, आमच्या प्रस्तुतचे विषयास जरूर नसल्यामुळें, वाचकांनीं आपली जिज्ञासा, अन्यत्रच तृप्त करून घेतली पाहिजे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं, पिट्, राकिंगहॅमचे पक्षास मिळणें जरी इष्ट होतें, तरी तो मिळाला नाहीं, याचें कारण असें कीं, त्या दोघांत राजकीय बाबतींत कांहीं मतभेद होता. तरी पिट्नें आपल्या पक्षास मिळावें ह्मणून राकिंगहॅमच्या पक्षानें बराच प्रयत्न केला. त्यानें पिट्च्या मताप्रमाणें बऱ्याच गोष्टी घडवून आणिल्या व पिट्नेंही त्यास त्या व इतर कांहीं गोष्टींत आपलें पाठबळ दिलें. तरी तो त्याच्या पक्षास पूर्णपणें मिळाला नाहीं. तो ह्मणे कीं, ' वृद्ध व अनुभविक मनुष्याचे ठायीं विश्वास उत्पन्न होऊन तो वाढण्यास फार वेळ लागतो; पण तरुणांचे ठायीं तो तेव्हांच उत्पन्न होतो, व हां हां ह्मणतां वाढतो. ' तरी ज्या न्युकॅसलला पूर्वीपासून तो धिक्कारीत असे तो राकिंगहॅम्नें पक्षास मिळाल्यामुळें व टेंपलचें मत ह्या संमेलनास अनुकूल

नसल्यामुळें या दोन टोळ्यांचा मेळ बसला नाहीं असें दिसतें. जर ह्या दोन टोळ्या एक झाल्या असत्या तर व्हिग् पक्ष प्रबल होऊन राजा व ' राजमित्र ' नांवाच्या स्वार्थसाधु मंडळीचें त्यापुढें कांहीं एक चाललें नसतें; व देशांतील असमाधान लयास जाऊन जिकडे तिकडे शांतता झाली असती. पण पिट् व राकिंगहॅम यामध्यें आणखी एक महत्वाचा मतभेद होता ' राजकीय पक्ष ' व त्यांच्या मध्यस्थीनें होणारी राज्यव्यवस्था हीं राकिंगहॅमप्रमाणें पिट्ला पसंत नव्हती, त्यामुळें त्यांच्या टोळ्यांचें एक्य झालें नाहीं. राकिंगहॅम पक्षाचें मत बर्कनें ' आधुनिक असंतोषांत ' स्पष्टपणें सांगितलेंच आहे. असे पक्ष होणें व त्यांनीं आपल्या मताप्रमाणें राज्यव्यवस्था करणें साहजिक व योग्य आहे असें त्यानें लिहिलें आहे. ' कोणताही पक्ष न स्वीकारितां लोक कसे वागतात, व त्यांचें कसें चालतें ह्याची मला तरी कल्पना करितां येत नाहीं.................... ज्या मनुष्यास पार्लमेंटांत............... कांहींकांचा स्वभाव, आचरण, व गुण पाहून त्यांच्याशीं आपण स्नेह करावा, सार्वजनिक कामांत एकमेकांस मदत करावी असें वाटत नाहीं, तो मनुष्य कोणत्या अवयवांचा घडला गेला असेल बरें! व त्याचा स्वभाव तरी कोणत्या अवयवांचा बनला असला पाहिजे बरें! ' आपल्या राजनीतितत्वांस राज्यकारभारांत जागा मिळविण्याचे उपाय योजण्यास जो मनुष्य तयार होत नाहीं, त्याचा त्या तत्वांवर कांहीं विश्वास आहे किंवा तीं त्यास कांहीं महत्वाचीं वाटत आहेत, अशी कल्पना निदान मला तरी करवत नाहीं. राज्यव्यवस्थेचे योग्य हेतु कोणते हें सांगण्याचें काम तत्वैकदिदृक्षूचें किंवा केवळ तत्ववेत्त्याचें होय; त्या हेतूंची योग्य साधनें कोणतीं हें ठरविण्याचें व तीं यथायोग्य अमलांत आणण्याचें काम कृत्यैकदिदृक्षु ह्मणजे व्यवहारपटु जो मुत्सद्दी त्याचें होय. ह्मणून आपल्या मतांप्रमाणें ज्यांचीं मतें आहेत त्या मनुष्यास आपले विचार राज्याधिकाराच्या व राजसत्तेच्या पूर्ण आश्रयानें अंमलांत आणितां येण्यासाठीं, अवश्य ती स्थिति प्राप्त करून देण्याकरितां, प्रामाणिकपणें हरप्रयत्न करून सोडण्याचें प्रत्येक खऱ्या पक्षाचें ब्रीद झालें पाहिजे. आणि ज्या अर्थी

हा अधिकार व ही सत्ता कांहीं विशेष जागा मिळविल्यानेंच प्राप्त होते, त्या अर्थी त्याच जागा मिळविण्याचा यत्न करणें त्यांचें कर्तव्य आहे. इतरांचे हक्क न बुडवितां आपल्या पक्षाचे लोकांस सर्व गोष्टींत पुढें करणें, तसेंच सर्व पक्षांचा ज्यांत अन्तर्भाव होत नाहीं, त्या जागा स्वार्थैक-दृष्टीनें कधींही न पतकरणें, आणि स्वपक्षाचीं मुख्य तत्वें व सर्व सत्पक्षास संमत अशीं जीं साधारण तत्वें त्यांस झुगारून देणाऱ्या लोकांचें अधि-काराचे नात्यानें किंवा प्रतिनिधीचे नात्यानें कांहीं एक ऐकावयाचें नाहीं किंवा त्यांचा पगडा आपल्यावर बसूं द्यावयाचा नाहीं, किंवा त्यांची सरशी होऊं द्यावयाची नाहीं, ह्या उद्देशानें झटून प्रयत्न करणें हा त्यांचा धर्म होय? पण पिट्चें मत फारच भिन्न होतें. राजकीय पक्षाचे हातीं राज्यव्यवस्था गेल्यापासून अनेक अनिष्ट परिणाम घडून येतात. अशा तऱ्हेनें जूट करून रहाणें हें केवळ कृत्रिम आहे. पक्षाभिमानानें कोणत्याही सूचनेचा योग्य विचार होत नाहीं. सूच-नेची योग्यायोग्यता संकुचित दृष्टीनेंच अनेकवार ठरण्याचा संभव फार असतो; व पक्षहित तेंच राष्ट्रहित असें अनेक लोकांस अनेक प्रसंगीं वाटूं लागतें. आणि असें झालें ह्मणजे राष्ट्रहित बाजूसच रहातें. शिवाय ह्या पक्षांच्या पद्धतीनें अन्य राष्ट्रांबरोबरच्या संबंधांत अनेक घोंटाळे उत्पन्न होतात. आणखी कोणत्याही एका पक्षाचे हातीं राज्य-व्यवस्था असण्यापेक्षां ती जर देशांतील विद्वान्, राजनीतिकोविदांचे—मग ते कोणत्याही पक्षाचे असोत—हातीं असणें राष्ट्रास फारच हितावह होईल हें निर्विवाद आहे. सत्ताधारी पक्षानें कोणत्याही विषयाची एक बाजू घेतली कीं प्रतिपक्षानें दुसरी बाजू उचललीच. ह्याप्रमाणें ह्या पद्धतीनें मतभेद व कलह होणें हें अपरिहार्य आहे. शिवाय ह्यापासून प्रतिपक्षाच्या लोकांतील प्रामाणिकपणा व विचारस्वातंत्र्य लयास जातें. दुसरी एक अडचण अशी असते कीं, प्रतिपक्षास सत्ता प्राप्त झाली ह्मणजे, त्यानें पूर्वी आपलीं जीं मतें प्रकट केलीं असतात, त्याचप्रमाणें राज्यव्यवस्था त्यांस नेहमीं करितां येते असें नाहीं; किंवा नेहमीं त्याच्या मनांत तसें असतें असेंही नाहीं; किंवा त्यांनीं नेहमीं तसें करणेंही योग्य होणार नाहीं.

राज्यव्यवस्थेचें स्वरूप नेहमीं एक राखणें व तिचा प्रवाह ज्या दिशेनें वहात आला असेल त्याच दिशेनें तो चालू ठेवण्याचा प्रयत्न करणें; पक्षहित बाजूस ठेवून राष्ट्राच्या हिताहिताच्याच विचारांनीं राज्यव्यवस्था करणें; व राष्ट्राच्या आवश्यकतेकडे पूर्ण नजर देऊन, त्याप्रमाणें सर्व राजकीय संस्थांना वळण लावणें हेंच प्रधानांचें मुख्य कर्तव्य होय; पण पक्षाभिमानास पेटून जाऊन अनेक वेळां प्रामाणिकपणें त्यांस आपल्या कर्तव्यास जागतां येत नाहीं. शिवाय त्या वेळच्या पक्षपद्धतींत वरील अनिष्ट परिणाम बरेच दृग्गोचर होत असल्यामुळें, पिट्चे मनांत राजाचे मदतीनें निरानिराळ्या पक्षांतील योग्य मनुष्यांची सहाय ह्मणजे मदतगार प्रधानांचे जागीं नेमणूक करून, मंत्रिमंडळ तयार करून राज्यव्यवस्था करावी असें फार होतें. ह्यामुळें रॉकिंगहॅमचें व त्याचें जुळलें नाहीं. राजाचेही विचार स्वार्थदृष्टीनें अशा प्रकारचेच होते व त्यामुळें त्यास पिट्चा बराच उपयोग झाला ह्मणावयाचा.

असो; राजकीय पक्षांपासून असे जरी अनिष्ट परिणाम घडतात तरी स्वतंत्र राष्ट्रांत, सार्वजनिक संस्थांत, व प्रतिनिधिनिक्षिप्त राजसत्तेंत असे पक्ष उत्पन्न होणें साहजिक आहे व अवश्यही आहे, ह्याविषयीं बर्केचे विचार वर दिलेच आहेत. शिवाय हाच मुद्दा खालील गोष्टी मनांत आणिल्यानें स्पष्ट होईल. राज्यव्यवस्थेच्या पद्धति अमुक असाव्या असें सदोदित लोकांस वाटत असतें; व त्यांपासूनच पक्ष उत्पन्न होतात. शिवाय जर प्रत्येक प्रतिनिधि वाटेल त्यावेळीं वाटेल तसें मत देण्यास मोकळा असेल, तर नियोजकांचा त्याजवर कांहींच दाब राहणार नाहीं आणि नियोजनाचे उद्देशही सफल होणार नाहींत. त्यामुळें अप्रामाणिकपणाही वाढल्यावांचून राहणार नाहीं. शिवाय प्रधानांस प्रत्येक गोष्ट प्रतिनिधींच्या अनुमोदनानें करावयाची असल्यामुळें, जर प्रत्येक प्रतिनिधि मनःपूत मत देण्यास लागेल, ह्मणजे प्रतिनिधींचें बहुमत अमुक बाजूचें होईल असा जर त्यांस मुदलींच अंदाज करितां येणार नाहीं, तर त्यांस राज्यव्यवस्था योग्यपणें करितां येणार नाहीं. कारण त्यांस प्रतिनिधींच्या मदतीची खात्री नसल्यामुळें, त्यांस

कोणतेंही काम जोरानें व नेटानें करण्याची धमक राहणार नाहीं; व राज्यव्यवस्थेंतील स्थैर्य समूळ अन्तर्धान पावेल. ह्या मुद्याचें महत्व परराष्ट्रांबरोबरीच्या संबंधांत फारच मोठें आहे हें उघड आहे. शिवाय, कनिष्ठ सभेंतील प्रतिनिधी सर्वच सर्व गोष्टींत शहाणे असतात व सर्वांसच राजनीतीचीं तत्वें पूर्णपणें अवगत असतात असें नाहीं, हेंही विसरतां कामा नये. एवढ्या मोठ्या सभेंत खरोखर राजनीतिनिपुणांची संख्या बोटांवर मोजण्यासारखीच असते. शिवाय सरासरी पाउणशें, शंभर लोक असे असतात कीं, त्यांस कनिष्ठ सभा, राज्यव्यवस्था, शहरव्यवस्था इत्यादिकांचा बराच अनुभव असल्यामुळें, त्यांस निरनिराळ्या खात्यांची योग्य व्यवस्था करितां येते व आपल्या कृत्यांचें यथायोग्य समर्थनही करितां येतें. शिवाय आणखी कांहीं थोडेसे लोक असे असतात कीं, त्यांस शेतकी, सैन्य, व्यापार, चलनी नाणें, वसाहती, हिंदुस्थान, इत्यादि विशेष प्रश्नांची माहिती चांगली असते. त्यांचा त्या त्या प्रश्नांचे वेळीं फार उपयोग होतो. पण राजनीतींत त्यांची गति तितपतच असते. इतकी मंडळी वजा केली ह्मणजे, बाकीची मंडळी अथवा अर्धे अधिक प्रतिनिधी कनिष्ठ सभेस शोभा आणण्याच्याच कामाचे असतात. मोठमोठे जमिनदार, त्यांचे मुलगे, श्रीमंत व्यापारी, व इतर सुखवस्तु लोक कनिष्ठ सभेंतील सभासदाचा मान मिळविण्याचेच हेतूनें, नियोजकांस आपल्या पैशानें किंवा गोड भाषणांनीं भुलथाप देऊन त्यांचें प्रतिनिधित्व पतकरून सभेंतील खुर्च्या अडवून टाकितात. सभेपुढील प्रश्नाचा वादविवाद चालला असतां, हे लोक ‘ स्मोकिंग रूम्स ’ मध्यें झुरके किंवा झोंपा घेत असावयाचे. मत देण्याचे वेळेस मात्र सभेंत येऊन बसावयाचे. अशा लोकांस जर स्वपक्ष-नायक मार्गदर्शक मिळणार नाहींत तर त्यांची स्थिति फार शोचनीय होईल, हें तर खरेंच; पण त्यांच्या चंचल लहरींनीं राजकीय समुद्र अगदीं क्षुब्ध होऊन जाऊन राजव्यवस्थेच्या तारवाची धडगत लागणार नाहीं. या चंचल लहरींस पक्षतैलानें स्थैर्य प्राप्त होऊन, प्रधाननाविकास राज्यव्यवस्थेचें तारूं पैलतीरास सुखरूप लावितां येतें.

येथपर्यंत सांगितलेल्या इतिहासाच्या माहितीनें ' आधुनिक असंतोष ' समजण्यास जरा सुलभ जाईल अशी आशा आहे. या पुस्तकांत तिसरा जॉर्ज् व त्याचे ' राजमित्र ' ह्मणजे दरबारीमंडळ, स्वार्थ. साधुपक्ष, किंवा जंटो ह्मणजे चौकडी यांच्या कारस्थानाचें बर्कनें जें वर्णन केलें आहे, तें बऱ्याच अंशीं खरें आहे. पण वरील माहितीवरून तेव्हांच असें कळून येईल कीं, त्यांत बर्कनें त्या कारस्थानाचा जो पद्धतवार तपशील सांगितला आहे, तो जरासा गौरवानें लिहिला आहे. असो, ह्या ठिकाणीं वास्तविक उपोद्घात संपला ह्मणावयाचा. तरी आणखी एका अत्यंत महत्वाच्या मुद्यासंबंधानें थोडेंबहुत लिहिल्यावांचून लेखणीस विश्रांति देणें योग्य वाटत नाहीं. बर्कच्या ग्रंथांचें पर्यालोचन निदान अंशतः तरी कोणी केलें नाहीं असा मनुष्य आज काल इंग्लंडांत सांपडणें विरळा. त्यांतही जे लोक राजकीय व सार्वजनिक कार्यांत पडतात किंवा त्या कामांत पडण्याची ज्यांची इच्छा असते, ते त्याचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचतात इतकेंच नव्हे, तर ते वाचणें त्यांस अगदीं अवश्य आहे. त्याच्या ग्रंथांचें अज्ञान केवळ अक्षम्य झालें आहे. तात्पर्य, त्याचीं व्याख्यानें व लेख जरी इतर सर्व मुत्सद्यांच्या व्याख्यानांप्रमाणें व लेखांप्रमाणें, तत्कालीन राजकीय गोष्टींसंबंधाचेच आहेत, तरी त्यांत राजनीतीचीं तत्वें इतक्या कांहीं चतुरस्रपणें गुंफिलेलीं आहेत कीं, त्यांची माला आपल्या कंठोद्गत करणें, हें अलीकडील लहान मोठ्या प्रत्येक राजकीय मनुष्यास अवश्य व भूषणावह वाटत आहे. ह्मणून या ग्रंथांत कोणतीं मनोहारी तत्वपुष्पें गुंफिलीं आहेत, हें सांगणें अवश्य आहे.

प्रथम, लोकांचें कर्तव्यकर्म. बहुतेक सर्व लोक समाजासंबंधानें व आपल्या राष्ट्रासंबंधानें केवळ उदासीन असतात. समाजांत व राष्ट्रांत प्रत्येक मनुष्यास दोन नात्यांनीं वागावयाचें असतें; ह्मणजे त्यास दोन ' पार्ट् ' करावयाचे असतात--एक व्यक्तिविषयक ह्मणजे स्वतःसंबंधाचा खासगी व दुसरा समाजविषयक किंवा राष्ट्रविषयक ह्मणजे सार्वजनिक--हें थोड्यांसच कळत असतें. प्रत्येक मनुष्य साधारणपणें

आपणां स्वत:पुरतेंच पहात असतो. समाज व राष्ट्र ह्मणून त्यांतील व्यक्तींपासून कांहीं भिन्न आहे व आपल्या कुटुंबाचे संबंधानें जशीं आपणांस कांहीं कृत्यें करणें अवश्य असतें, तशींच सामाजासंबंधानें व राष्ट्रासंबंधानेंही आपलीं कांहीं कर्तव्यकर्में आहेत, ही गोष्ट जरी कांहीं लोकांस समजली असली, तरी फारच थोड्यांस उमजली असते यांत शंका नाहीं. विशेषेंकरून आमच्यांत तर हें अज्ञान फारच शोचनीय आहे. आमची दृष्टि अद्याप कुटुंबापलीकडे गेली नाहीं. 'पदरचें खाऊन बाजारच्या भाकरी भाजण्यास तुह्मांस सांगितलें आहे.' असे उद्गार, कोणी वर्तमानपत्रें वाचित असला तर त्याचे संबंधानें व वर्तमानपत्रकारांचे संबंधानें व दुसऱ्या कांहीं समाजाग्रणींचें संबंधानें निघालेले वारंवार ऐकूं येतात. हिंदुमुसलमानांचे दंगे, सोन्यारुप्याचे परस्पर किंमतींत फरक पडल्यामुळें व्यापाराचें नुकसान, व ह्यामुळेंच सरकारचा खर्च वाढल्यामुळें लोकांवर बसणारे नवीन कर इत्यादि अनेक सार्वजनिक व राजकीय विषय इतक्या महत्वाचे आहेत कीं, केवळ सरकारी अंमलदारांसच त्यांचा योग्य निकाल लावितां यावयाचा नाहीं, व येत नाहीं व त्यांचा योग्य निकाल लागल्याशिवाय राष्ट्रास स्वस्थता मिळावयाची नाहीं, हें अनुभवानें सिद्ध झालें आहे. 'जेव्हां राष्ट्रव्यवस्था अस्ताव्यस्त होते तेव्हां खासगी लोकांस नित्यकर्तव्यमर्यादेबाहेर एक दोन पावलें जाण्यास त्या कायद्याच्या (आमच्या कायद्याच्या) अन्तःस्वरूपान्वयें परवानगी आहे. स्वदेशदुर्दशेच्या संबंधानें दुःख करीत बसण्यापेक्षां, त्यांचा हक्क अधिक जबाबदारीचा व अधिक उपयुक्ततेचा आहे. ते सूक्ष्म दृष्टीनें तिचें निरीक्षण करूं शकतील; तत्संबंधीं स्वतंत्रपणें वादविवाद करूं शकतील; आणि सुदैवानें त्यांना तिचा उगम कळून जर ते ती दूर करण्याचा एखादा सुयुक्तिक मार्ग दाखवितील तर, जरी त्यांनीं तत्कालीन अधिकाऱ्यांस नाखुष केलें तरीही, ते राज्याच्या फार उपयोगीं पडतील'. बर्कनें हें तत्कालीन स्वदेशीयांस उद्देशून लिहिलें आहे. तरी तें कोणत्याही लोकांस कोणत्याही काळीं सारखेंच लागू आहे, आणि आह्मांस तर तें

फारच लागू पडतें. कारण, आमचे कायदेही इंग्लिश लोकांनींच घालून दिलेले असल्यामुळें, आह्मांसही ' नित्यकर्तव्याचे बाहेर एक दोन पावलें जाण्यास ' त्यांच्या ' अंतःस्वरूपान्वयें ' परवानगी आहे, हेंही आपण विसरतां कामा नये. शिवाय ' जरी त्यांनीं तत्कालीन अधिकाऱ्यांस नाखुष केलें तरीही ' आपल्या मतानें स्वदेशहितास जें अवश्य आहे तें स्पष्टपणें सांगण्यास आमच्या लोकांनीं भिण्याचें कारण नाहीं; पण लांगूलचालन व सत्तेस फाजिल मान ह्या गोष्टींचा प्रसार आमच्यांत फार असल्यामुळें, लोकांचे समाजविषयक व राष्ट्रविषयक कर्तव्याकडे असावें तितकें लक्ष नाहीं. दिवसेंदिवस ही स्थिति हळू हळू बदलत चालली आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे, तरी हीं कर्तव्यें यथाशक्ति बजाविण्याकडे लोकांचें लक्ष विशेष लागणें अवश्य आहे. या व यापुढील सर्व मुद्यांवर स्वतंत्र निबंधच लिहितां येतील; पण ते मुद्दे फक्त लोकांच्या नजरेस आणण्याचाच या लेखाचा उद्देश असल्यामुळें या ठिकाणीं त्यांचा सविस्तर ऊहापोह अप्रस्तुतच होय.

दुसरा मुद्दा, जुलूम ह्मणजे प्रजापीडन होय. ह्यासंबंधाचेही बर्कचे उद्गार फार महत्वाचे आहेत. ' आमच्यावर वर्तमानकाळीं होत असलेला जुलूम भूतकालीन जुलमासारखा नाहीं, ह्मणून आमच्यावर काहीं जुलूमच होत नाहीं, या ह्मणण्यांत कांहींच तथ्य नाहीं. ' हें इतकें स्पष्ट असतां आमच्यांतील कांहीं ' राजमित्र ' व इंग्रज अधिकारी यांस तें कळूं नये हें आश्चर्य आहे; पण आश्चर्य तरी कसचें. कारण, ' जेव्हां प्रजेचें पाऊल वांकडें पडतें, तेव्हां तें पापमूलक नसून अज्ञानमूलकच असतें, हें जरी खरें आहे, तरी राज्यांतील सत्ताधारी पक्षाची गोष्ट वेगळी आहे, तें दुर्लक्षानें व मुद्दामही दुराचरण करूं शकतील यांत संशय नाहीं. ' आह्मांस मोंगलाईंत, मराठेशाहींत, किंवा पेशवाईंत जो त्रास होत होता, तो इंग्रजींत होत नाहीं, हें खरें. तरी जुलमाचें स्वरूप बदलत जातें हेंही निर्विवाद आहे. ' कारण, महत्वाकांक्षेचा साधारण उद्देश जरी एकच असतो, तरी ती तृप्त करण्याचीं साधनें व वस्तुविशेष कालपरत्वें भिन्न भिन्न असतात. प्रजापीडनाचीं बहुतेक प्राचीन यंत्रें

निरुपयोगीं झालीं आहेत, व बाकीचीं व्यवहारांतून अगदींच अन्तर्धान पावलीं आहेत. शिवाय आपले पूर्वज ज्या जाळ्यांत सांपडून गतप्राण झाले, त्याच जाळ्यांत स्वकृतीनेंच आपला पाय अडकवून घेण्याजोगे अडमुठ्ये मंत्री फारच थोडे सांपडतील'. अलिबाग तालुक्यांतील अबकारी खातें, देवगड तालुक्यांतील खोती, सरव्हेखातें, उन्मत्त व खुनशी गोरकायांचा न्यायासनासमोरील चौकशीचा फार्स, लष्करी खात्याचा अवाढव्य खर्च, एक्श्चेंज कॉंपेन्सेशन अलावन्स, जंगलाचा कायदा इत्यादि गोष्टींच्या हल्लींच्या स्वरूपानें प्रजेस पीडा होत नाहीं असें कोण ह्मणेल?

तिसरा मुद्दा फारच महत्वाचा आहे. साधारण लोकांची स्वातंत्र्याची कल्पना फारच संदिग्ध असते. मनःपूत आचरण करण्याची मुभा असा स्वातंत्र्याचा पुष्कळ लोक अर्थ समजतात. अशा अर्थानें कोणतेच लोक जगांत स्वतंत्र नाहींत; व त्याप्रमाणें ते स्वतंत्र असणेंही अशक्यच आहे. ह्मणजे सर्वांवर कायद्याचा अंमल आहे व असणेंही अवश्य आहे. तर मग स्वतंत्र कोणास ह्मणावें? कायदे करणें, कर बसविणें, प्रधानांच्या ह्मणजे राज्यव्यवस्था करणाऱ्या कारभाऱ्यांच्या नेमणुका करणें, व न्यायाधीश नेमणें, ह्या चार गोष्टी ज्या लोकांच्या इच्छेविरुद्ध होत नाहींत, त्यांस स्वतंत्र ह्मणतात. या चार गोष्टींपैकीं पहिलीचा व तिसरीचा फारच निकट संबंध आहे. 'प्रत्येक राज्यांत नियामक मंडळानुरूपच प्रधानमंडळ असलें पाहिजे. नाहींतर वस्तुस्थिति भयंकर, अव्यवस्थित, व अस्ताव्यस्त झाल्यावांचून राहणार नाहीं.' हीच गोष्ट बर्कनें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या शब्दांनीं सांगितली आहे. 'कायद्याची सर्व उपयुक्तता व शक्ति काय ती प्रधानांवर अवलंबून आहे.........प्रधानलोक दुर्लक्षानें, अज्ञानानें, अथवा कावेबाज मतलबानें राज्यव्यवस्थेचा कांहीं भाग तसाच पडूं देतील, दुसऱ्याचे उद्देश तडीस जाऊं देणार नाहींत, व देशास अत्यंत हितावह सर्व गोष्टी नष्ट होऊं देतील; व इतकें करूनही आपणावर फौजदारी खटला कोणत्याही तऱ्हेनें शेकला जाणार नाहीं अशी त्यांस खबरदारी घेतां येईल'. तात्पर्य कायदे कोणत्या तऱ्हेचे आहेत इतकेंच पहाणें अवश्य नाहीं, त्यांची अंमलबजावणीही कशी होत

आहे ह्याकडे लक्ष देणें फारच अवश्य आहे; नाहींतर कायदे चांगले असूनही अंमलदारांचे मूर्खपणानें अथवा काव्यानें प्रजेस पीडा झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या तत्वाचें महत्व कोणाच्याही तेव्हांच ध्यानांत येण्यासारखें आहे. ह्मणूनच एका गव्हरनर जनरलामागून दुसरा कोण येतो, एका गव्हरनराचे मागें दुसऱ्या कोणाची नेमणूक होते, फार तर काय एक कलेक्टर व मामलेदार गेल्यानंतर दुसरा कोण येतो ह्याकडे लोकांचे डोळे नेहमीं लागलेले असतात. इंग्रजी राज्याची जी खुबी आहे ती सर्व ह्यांतच आहे. कायदे बहुतकरून इतके कांहीं सुरेख असतात कीं, त्यांचे विरुद्ध कोणासही फारशी तक्रार करितां येऊं नये; पण अंमलदारांची अंमलबजावणी कायती लोकांस त्रासदायक असते. ह्यामुळें अनेक प्रसंगीं प्रजेस ‘ तोंड बांधून बुक्यांचा मार ’ सोसावा लागतो. सर्व रयतेस एका प्रकारानेंच वागविलें जाईल, सर्वांस सारखा न्याय दिला जाईल, कोणत्याही जागा भरण्याचे वेळीं, मनुष्याचे योग्यतेचाच विचार केला जाईल, इत्यादि मनोहर तत्वें जरी कायद्यांचे पुस्तकांत जिकडे तिकडे झळकत आहेत, तरी त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याची व्यवस्था कितपत होत आहे, हें कोणाच्यांही तेव्हांच लक्षांत येईल. ह्याप्रमाणें चांगले कायदे असणें व त्यांची अंमलबजावणी चांगली होणें ह्या दोन्ही गोष्टी प्रजेच्या हितास अत्यंत अवश्य आहेत. त्यापैकीं एक नसणें कोणतीच नसण्याप्रमाणें आहे हें उघड आहे; धूर्त राज्यकर्ते अशी व्यवस्था ठेवितात. त्यामुळें रयतेच्या तक्रारींस, त्यांस वाटेल त्यावेळीं आपल्या निर्मळ कायद्यांकडे बोट दाखवून गुळमुळित उत्तर देऊन वेळ मारून नेतां येते. आमच्या राज्यकर्त्यांनीं जी गोष्ट आपल्या हातांत ठेविली आहे, ती पहिली–पेक्षांही ज्यास्त महत्वाची आहे. कारण, कायदे सातसातदां बदलितां येत नाहींत. पण अम्मलदारांची नेहमीं बदल होत असतेच. ह्यामुळें त्यांना आपल्या राजनीतींत कायद्याचें स्वरूप बदलिल्याशिवाय वाटेल त्या वेळीं वाटेल तो बदल करितां येतो. ह्या पद्धतीनें कायदे न बदलितां राज्यपद्धति गुपचुप कशी बदलते ही गोष्ट फार विचार करण्यासारखी आहे. स्वातंत्र्याच्या दुसऱ्या

ता. ३९

दोन गोष्टी ज्या कर बसविणें व न्यायाधीश नेमणें ह्या संबंधानेंही 'आधुनिक असंतोषांत' जें थोडेंसें लिहिलें आहे, तेंही महत्वाचें आहे. वरील विवेचनावरून 'स्वतंत्र राज्याच्या संस्था व स्वेच्छाचारी राजाचे उद्देश ह्यांत ह्मणण्याजोगें वैमनस्य नाहीं,' असें लौकरच लोकांचे नजरेस आल्यावांचून रहाणार नाहीं.

चौथा मुद्दा प्रतिनिधींच्या अंगीं लागणारे अवश्य गुण. हे बर्कनें पुढील वाक्यांत सांगितले आहेत. 'बेकायदा सत्ता स्थापित करणाऱ्या प्रत्येक प्रयत्नास अडथळा करण्याची धमक; कांहीं अंशानें अमर्याद असेंही तीक्ष्ण स्वातंत्र्यतेज, व सरकारची प्रत्येक भ्रष्टता व चुकी उमगून काढण्याची शोधकबुद्धि व ती उघडकीस आणण्याचें धैर्य; हे गुण हाउस ऑफ कॉमन्समध्यें जागा मिळण्यास सरळ, निष्कपट व सार्व लौकिक नियोजनांत उपयोगीं पडतात.' अलीकडे आह्मांसही शहर व्यवस्थेकरितां, व कायदे कॉउन्सिलांकरितां कांहीं प्रतिनिधि निवडून पाठवावे लागत आहेत. तेव्हां प्रतिनिधींच्या अंगीं कोणते गुण असणें अवश्य आहे, हें नियोजकांस कळणें फारच इष्ट आहे. ह्मणून वरील गुण त्यांच्या दृष्टीस पडल्याशिवाय त्यांनीं कोणासही आपला प्रतिनिधि निवडू नये. निदान 'आळशी, व अति नम्र असा स्वभाव; सत्ताधाऱ्यांची सर्व कृति सौम्यपणें पाहून उदार मनानें त्यांतील गुणच ग्रहण करण्याची व त्यांची मर्जी संपादन करण्याची प्रवृत्ति; व लोकांचें कोणतेंही अमर्याद वर्तन सहन न करितां, सत्तेच्याच कडकपणास अनुमोदन देण्याचा कल' हे गुण तरी भावी प्रतिनिधींच्या ठिकाणीं नाहींत, अशी त्यांनीं खात्री करून घेण्यास चुकूं नये. शिवाय 'आपण जें प्रतिनिधींकडे काम सोंपविलें आहे, त्यांत मनुष्याकडे किंवा सूचनेकडे पाहून प्रतिनिधींच्या मनांत काय काय व कसकसा फेर बदल होतो, हेंही लोकांनीं अगदीं डोळ्यांत तेल घालून पाहिलें पाहिजे'.

पांचवा मुद्दा प्रतिनिधींचें कर्तव्यकर्म. हें बर्कनें एका वाक्यांत फारच खुबीनें ग्रथित केलें आहे. 'हाउस् ऑफ् कॉमन्सचें सर्व बीज, तेज, आणि सत्व काय तें त्याच्या राष्ट्रमनोविकार प्रतिबिम्बित्वांतच आहे.........

विधायक सत्तेवर व न्यायाधीशांवर दक्षतेनें व हेव्यानें लक्ष ठेवणें, सार्वजनिक पैशाची आस्थापूर्वक काळजी बाळगणें, व सार्वजनिक गाऱ्हाणीं ऐकण्यास नेहमीं सावधान चित्तानें तयार असणें, हीं हाउस् ऑफ् कॉमन्सचीं खरीं लक्षणें होत '. ह्या सर्वच गोष्टी करण्याचा अधिकार आमच्या प्रतिनिधींस आहे, व त्या त्यांस करितां येतील, अशी हल्लींची वस्तुस्थिति नाहीं. तरी हल्लींच्या स्थितींत वरच्यापैकीं ज्या गोष्टी करण्यास साधतील, त्या करणें प्रतिनिधींचें कर्तव्य आहे. निदान लोक सरकारचे विरुद्ध अर्जावर अर्ज पाठवीत असतां, सरकारचे स्तुतिपाठ गाणें; लोक निराश झाले असतांही सरकारावर विश्वास ठेवणें; लोकांस अत्यंत तिरस्कारास्पद झालेल्या अम्मलदारांचे गळ्यांत गळा घालणें; व त्यांचीं स्मारकें करणें; दोषी ह्मणून ज्यांची चौकशी व्हावी असें लोकमत ओरडत आहे, त्यांचे आभार मानणें; लोक व अम्मलदार यांचे सर्व कलहांत लोकांचे विरुद्ध हटकून जाणें; लोकांतील अस्वस्थतांचे कारणांचा बिलकुल विचार न करितां त्यांस शासन करण्यास संमति दाखविणें; ह्या गोष्टी तरी त्यांस शोभत नाहींत, हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

याशिवायही ' आधुनिक असंतोषांत ' लहान मोठीं शेकडों राजकीयतत्वें वाचकांच्या नजरेस आल्यावांचून राहणार नाहींत. फार तर काय, अशा प्रकारचें एखाद दुसरें तत्व दृष्टीस पडल्याशिवाय त्यांस त्याचें एकही पान कदाचित् उलटतां येणार नाहीं; पण तीं सर्व येथें सांगत बसणें ह्मणजे बर्कच्या या लेखावर, संस्कृत कवींच्या काव्यांप्रमाणेंच ' मिया मूठभर, तर दाढी हातभर ' अशी लांबच लांब टीका लिहिण्यासारखें आहे. नाहीं नाहीं ह्मणतां ह्मणतां आधींच उपोद्घात फार लांबला आहे, व त्याजवर वरील आक्षेप येऊं पहात आहे. अशा स्थितींत वर सांगितल्याप्रमाणें टीका लिहिणें जरी कितीही मनोहर असलें तरी तें बाजूस ठेवणें भाग आहे; तथापि ही पंचपुष्पांचीच चिमुकली माला जरी माझ्या देशबांधवांनीं कंठीं धारण करून आपणांस व आपल्या देशास सुशोभित करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचा मी फारच आभारी होईन.

मेमा ३ १/३०

# आधुनिक असंतोष.

"हें गुप्त व अन्तःस्थित अरिष्ट, आम्हांस काडीभरही मागमूस लागण्यापूर्वी उघडकीस येत नाहीं, इतकेंच नव्हे तर तें आपणास त्यापूर्वीच चहूं बाजूंनीं एकाएकीं घेरून सोडीत आहे."—सीझर.

सार्वजानिक अव्यवस्थांच्या कारणांचें आविष्करण करण्याचें काम बरेंच नाजुक आहे. जर ह्या कामीं मनुष्याला दुर्दैवानें यश मिळालें नाहीं, तर त्याला कोत्या दृष्टीचा व काल्पनिक अशीं विशेषणें मिळतील. जर तो खरें कारण दाखवील तर त्याचा बड्याबड्या व हुद्देदार लोकांशीं संबंध येण्याचें बरेंच भय आहे, कारण हे लोक आपल्या चुका दुरुस्त करण्याची संधि त्यांस दिल्याबद्दल आभार मानण्याचें एकीकडेच ठेवून केवळ दोषाविष्करणानेंच कोपाविष्ट होतील. जर लोकप्रिय व्यक्तींस दोष लावण्याचें त्याच्या वांट्यास आलें तर त्याला खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान होणाऱ्या भ्रमराची उपमा मिळेल. जर तो सत्ताधाऱ्यांस नांवें ठेवील तर तो स्वार्थसाधुपक्षांत गणिला जाईल. पण सर्व कर्तव्यसंपादनांत असें कांहींना कांहीं तरी धोक्याचें असावयाचेंच. बंडाव्याचे व अव्यवस्थेचे वेळीं आमच्या कायद्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला न्यायाधीशाचा थोडासा तरी अधिकार पोंहोंचतो. जेव्हां राष्ट्रव्यवस्था अस्ताव्यस्त होते, तेव्हां खासगी लोकांस नित्यकर्तव्यमर्यादेबाहेर एकदोन पावलें जाण्यास त्या कायद्याचे अंतःस्वरूपान्वयें परवानगी आहे. स्वदेशदुर्दशेच्या संबंधानें दुःख करीत बसण्यापेक्षां त्यांचा हक्क अधिक भारदस्ततेचा व अधिक उपयुक्ततेचा आहे. ते सूक्ष्मदृष्टीनें तिचें निरीक्षण करूं शकतील, तत्संबंधीं स्वतंत्रपणें वादविवाद करूं शकतील, आणि सुदैवानें त्यांना तिचा उगम कळून, जर ते ती दूर करण्याचा एखादा सयुक्तिक मार्ग दाखवितील तर, जरी त्यांनीं तत्कालीन अधिकाऱ्यांस नाखुष केलें तरीही ते राज्याच्या फार उप-

योगीं पडतील. क्षणिक त्रासदायक सुद्धां प्रत्येक गोष्ट जर ती अंतीं प्रजाजनमनांस शांत्युत्पादक व राज्यनिष्ठाजनक असेल, तर राज्यास फार हितावह आहे. प्रजेच्या शब्दाची वस्तुतः काय किंमत आहे याचा मी या स्थलीं ऊहापोह करीत बसत नाहीं. पण मानधन हें जेथपर्यंत सर्वधनप्रधान गणिलें जात आहे आणि लोकमत जेथपर्यंत राज्याचा मुख्याधारस्तंभ आहे, तेथपर्यंत तो व्यक्तिमात्रास किंवा राज्यास कवडी-मोल कधींच होणार नाहीं. राष्ट्रावर कायद्याचा अंमल मुख्य नव्हे; तर बलाचा कसा होईल? बल व कायदा यांच्या नैसर्गिक तेजाबद्दल लोकांच्या कल्पना कांहीं असोत, वस्तुस्थित्या दोहोंचाही उपयोग केवळ गौण आहे. अधिकारहीन व्यक्ति स्वसमान व्यक्तींवर अथवा श्रेष्ठ व्यक्तींवर ज्या प्रकारांनीं व ज्या तत्त्वांनीं पुष्कळ वेळां अंमल चालविते तेच प्रकार व तींच तत्त्वें राष्ट्रावरील अंमलांतही दृष्टीस पडतात. तीं तत्त्वें—त्यांच्या स्वभावाचें पूर्ण ज्ञान व त्याची समर्पक योजना—हीं होत. अर्थात् राज्यांत न्यायाधीश व लोक यांच्यांत नित्य कलह चालला आहे व त्या कलहांत कधीं एक व कधीं दुसरा पक्ष प्रबळ होत आहे व दोन्हीही क्रमानें क्षुल्लक जयापजयाचे वेळीं डोकें वर-खालीं करीत आहेत अशा वेळीं नव्हे, तर सार्वजनिक कामें ज्या वेळीं सुरळीत व शांततेनें चाललीं आहेत अशाच वेळीं वरील सिद्धांत लागू आहे हें उघड आहे. ह्मणूनच स्वप्रजाजनस्वभाव राजमंत्र्याचा मुख्य अभ्यासविषय होऊन बसला पाहिजे. आणि जर ह्या विषयाचें अज्ञान त्यास हितावह नसेल तर तत्संबंधीं ज्ञान संपादणेंही त्यास बिलकुल अशक्य नाहीं.

आधुनिक कालास दोष देणें, वर्तमान सत्ताधाऱ्यांस नांवें ठेविणें, गतकालाचा शोक करणें, भविष्यकालाविषयीं अमर्याद आशा बाळगणें हा सर्वसाधारण मानवी स्वभावच आहे. साधारण लोकांच्या लघुत्वाचा व अज्ञानाचा हा अपरिहार्य परिणाम होय. हीं गाऱ्हाणीं व ह्या वृत्ती सर्व कालांत दृष्टीस पडल्या आहेत; तरी ज्या अर्थीं सर्व काल सर्वस्वी सारखे नाहींत त्या अर्थीं कोणतीं गाऱ्हाणीं मानवी स्वभावांतील

न्यूनत्व दाखविणारीं आहेत व कोणतीं वर्तमानकालांतील राष्ट्रव्याधि-विशेषाचीं लक्षणें आहेत हेंच ठरविण्यांत मंत्र्याची खरी हुषारी व्यक्त होते.

हल्लींच्या प्रसंगांत कांहीं तरी विशेष भीत्युत्पादक आहे असें मीं ह्मटलें तर 'हा आवेशाचे भरांत किंवा निराशेच्या फेऱ्यांत कांहीं तरी बरळतो आहे' असें मला कोणीही ह्मणणार नाहीं अशी माझी खात्री आहे. खासगी व अधिकारी लोकांत सुद्धां इतर शब्द विरळाच कानीं पडतात. लोक सरकारी अंमलाला एकसमयावच्छेदेंकरून भितात व तुच्छही मानितात; कायद्याचा मान्य व गुणावह दरारा नाहींसा झाला आहे; त्याची शिथिलता हास्यास्पद झाली आहे, व त्याचा उपयोग तिरस्कारास्पद झाला आहे; दरजा, हुद्दा, पदवी, व तसेंच जगांतील सर्व पूज्य वस्तु, यांचा सर्व गुण व मान अस्तास गेला आहे; अन्य राष्ट्रांशी असलेला आमचा संबंध तसेंच आमची स्वराज्यव्यवस्था हीं अस्ताव्यस्त झालीं आहेत; आमच्या सामंतांची राज्यनिष्ठा व आज्ञाधारकता शिथिल झाली आहे; हार कसें जावें किंवा अधिकार कसा गाजवावा हें आह्मांस कळत नाहीं; वरपासून खालपर्यंत देशांत किंवा देशाबाहेर निर्दोष व पूर्ण असें कांहीं एक उरलें नाहीं; पण निरनिराळ्या हुद्यांतील, पक्षांतील, घराण्यांतील, पार्लमेंटांतील, व राष्ट्रांतील वैमनस्यें व घोटाळे पूर्वींच्या कोणत्याही अव्यवस्थेस मागें टाकीत आहेत. वस्तुस्थिति अशी आहे हें सर्वांस माहीत आहे, व तिजबद्दल त्यांस दुःखही होत आहे.

राज्यांतील पूर्वींच्या यादवीस व क्षुब्धतेस कारण झालेले मोठमोठे पक्ष सध्या पंचत्वास पोंहोंचले आहेत असा विचार मनांत आला ह्मणजे तर वरील वस्तुस्थितीचें फारच आश्चर्य वाटतें. कालचक्राच्या कोणत्याही भयंकर फेऱ्यांत—दुष्काळांत अथवा महामारींत—आमचें राष्ट्र नवथर सांपडलेलें नाहीं; आमच्यावर सध्या कोणत्याही बेकायदेशीर अथवा नवीन करांचें ओझें लादलेलें नाहीं. बरें आमच्यावर दुर्घट प्रसंग आल्याकारणानें आमच्या बुद्धीस भ्रंश झाला आहे व राष्ट्रीय वैभवाच्या

नाशानें ग्रस्त झालेल्या आमच्या मनास विधीची प्रत्येक करणी मांत्रिमंडलाच्या गुन्ह्यासारखी भासत आहे असें ह्मणावें, तर आह्मी कोणत्या निष्फळ युद्धांतही गुंतलेलों नाहीं.

ह्या विलक्षण व्याधीच्या कारणांविषयीं कोठेंही वादविवाद न होणें अशक्य आहे. तत्संबंधानें आमच्या राज्यव्यवस्थापकांचे विचार काय आहेत तें प्रथम पाहूं. कारण हा मान त्यांस देणें योग्य आहे, व तो मी त्यांस खुषीनें देतों. आमचे मुत्सद्दी ह्मणतात आमच्या कलाकौशल्याचे व व्यापाराचे उन्नतीमुळें व तसेंच वसाहतींनीं व बाहुबलानें आमचें राज्य प्रसरण पावत असल्यामुळें कांहीं लोकांची संपत्ति अतोनात वाढली आहे; आणि ती पुनः लोकांत पसरल्यामुळें लोक एकजात गर्विष्ठ, उग्र व बेबंद झाले आहेत; तसेंच अमर्याद संपत्तीपासून उत्पन्न झालेलें कांहींचें औद्धत्य, व सद्धर्मनिवृत्तिकारक दारिद्र्यापासून उत्पन्न झालेली कांहींची विवेकशून्यता, ह्यांच्या मदतीनें ते मोठमोठीं घोर कर्में करण्यास योग्य झाले आहेत; अशा रीतीनें शिरजोर झालेल्या ह्या लोकांनीं स्वतंत्र राज्याचे निःशस्त्र कायद्यास बेलाशक गुंडाळून ठेविलें आहे. सारांश आमच्यासारख्या भयंकर व बेताल लोकांचे त्वेषापुढें असल्या कायद्याचें तें तेज काय पडणार? त्यांच्या मतें ह्या फैलावलेल्या असंतोषास कांहींच योग्य कारण झालें नाहीं, कारण आमच्या राज्याची व्यवस्था अवलपासून अखेरपर्यंत विलक्षण शांततेनें व पूर्ण वाकब्गारीनें झालेली आहे. त्यांच्या समजुतीप्रमाणें कांहीं अप्रयोजक लेखकांच्या निंद्य प्रयत्नांनीं व कांहीं थोड्याशा निराशाग्रस्त मतलबी लोकांच्या कारस्थानांनींच राष्ट्रांत ही अश्रुतपूर्व गडबड होऊन राहिली आहे.

वरील ह्मणण्यांत जर कांहीं सत्यता असेल तर ह्या देशाच्या वर्तमान संकीर्ण स्थितीहून जास्त विलक्षण खरोखर कांहींच नसेल. त्यांचे ह्मणण्यास माझें अनुमोदन फारच नाखुषीनें मिळेल व तें सुद्धां स्पष्ट व सबळ पुराव्यानंतर नाइलाजास्तव द्यावें लागेल ह्यांत संशय नाहीं. कारण त्यांच्या ह्मणण्याचें सार एका विषादजनक वाक्यांत थोडक्यांत असें आणतां येईल—'आह्मी फार योग्य मुत्सद्दी आहों, पण काय करावें आमचे लोकच फार वाईट.'

आह्मी फार निमकहराम आहोंत; आणि ज्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता केवळ देशांत शांतता राखण्यांत व जनहित संपादण्यांतच आहे त्या थोर पुरुषांचे इच्छेविरुद्ध जाण्यास व कृतघ्नपणें त्यांची नालस्ती करण्यास कधींही चुकत नाहीं. ह्या मुत्सद्यांचे मताप्रमाणें गुणहीन, कलाहीन व कीर्तिहीन स्वार्थसाधु कारस्थान्यांच्या मुठींतील थोड्याशा क्षुद्र लेखकांच्या लेखांनींच जर ही अस्वस्थता उत्पन्न झाली असेल तर ह्या साधनांचे द्वारें अस्वस्थ होणारे लोक फारच कुटिल असले पाहिजेत. त्यांचें निदान गृहीत घेऊन चाललें तर ही अस्वस्थता केवळ असाध्य वाटते; व ह्या विचारानें तर आमचें सामाजिक दुर्दैव पुरतेंच ओढवल्यासारखें दिसतें. जर राष्ट्राची संपत्ति या अव्यवस्थेस कारणीभूत असेल तर शांतता राखण्यासाठीं दारिद्र्यरूपी जमादार नोकरीस ठेवण्याची सूचना न येवो ह्मणजे झालें. जर आमच्या राज्याचे छायेखालीं असणारे इतर देश बंडाच्या अमर्याद फैलाव्यास परिपोषक झाले असतील तर त्याचा नाश करण्यासाठीं ते देश सोडून देण्याचें कोणाचे मनांत न येवो ह्मणजे झालें. जर आमच्या स्वातंत्र्यानें विधायक सत्ता क्षीण झाली असेल तर कायद्याची उणीव भरून काढण्याकरितां जुलमाची मदत मागण्याचा विचार न घाटो, अशी माझी इच्छा आहे. त्यांच्या मनांत कांहीं असो, एवढी संतोष मानण्यासारखी गोष्ट आहे कीं, वरील विचार अद्यापि प्रकट झाले नाहींत. एकंदरींत आमची स्थिति फारच शोचनीय झाली आहे; कारण ह्या द्वीपांतील लोक ज्या द्रव्याचे घडवावे अशी ईश्वराची लहर लागली त्याशिवाय अन्य साधन ह्या कामीं आमच्याजवळ नाहीं. हेच जर जन्मापासून प्रकृतीनें दुर्वृत्त असतील तर ज्यांच्या नशीबीं अशा शिरजोर लोकांचा राज्यकारभार चालविण्याचें आलें आहे ते लोक फारच दुर्दैवी असले पाहिजेत, इतकेंच काय तें ह्मणतां येईल. हल्लींचीच राज्यपद्धति जर तशीच नेटानें चालू ठेविली व तिला अडथळा करणारास कडक शिक्षा केली, तर कालगतीनें ह्या अस्वस्थतेस खचित गुण पडल्यावांचून रहाणार नाहीं असे विचार घाटत असल्याचें कधीं कधीं कानावर येतें. परंतु ह्या ह्म-

णण्यांत आमच्या वर्तमान स्वभावाचें निरीक्षण आणि मनुष्यजातीच्या साधारण प्रकृतीचें ज्ञान लेशमात्रही दृग्गोचर होत नाहीं. ह्या लोकांचे म्हणण्याप्रमाणें जर आमच्या राष्ट्राची प्रकृति इतकी संक्षोभशील असेल, तर जोंपर्यंत असमाधान, प्रत्यपकार, व महत्वाकांक्षा यांस जगांत थारा मिळत आहे तोंपर्यंत तीस उत्तेजन मिळण्यास कधींही कमतरता पडणार नाहीं. विशेष शासनें राज्यांतील आकस्मिक अस्वस्थतांवर रामबाण आहेत; पण राज्यकारभारांतील नियत अव्यवस्थेपासून किंवा प्रजाजनांच्या नैसर्गिक दुर्वृत्तीपासून उत्पन्न झालेल्या ज्वरांवर त्यांचा परिणाम विकृतिकारक होतो. कडक उपायांचे योजनेंत चुका न करणें फारच महत्वाचें आहे; आणि ह्मणूनच संपूर्ण ज्ञानानें युक्त जें स्थैर्य तेंच कायतें गुणांत मोडलें जाईल. सारांश मौर्ख्य व अज्ञान यांजवर चांचल्य एक प्रकारचा नैसर्गिक उपायच आहे असें ह्मटलें पाहिजे.

लोक कधींच चुकत नाहींत ह्या मताचा पुढाकारी मी नाहीं. आजपर्यंत त्यांनीं ह्या व अन्य देशांतही अनेक व ढोबळ चुक्या केल्या आहेत. पण राजा व प्रजा ह्यांमधील सर्व कलहांत प्रजा निदान राजाइतकी तरी समंजस असतेच असें धरून चालण्यास कांहीं प्रत्यवाय आहे असें मला वाटत नाहीं. इतिहासाचे साहाय्यानें यापलीकडेही कदाचित् जातां येईल. ज्या ज्या वेळीं सार्वजनिक वितुष्टें फारच फैलावलीं होतीं, त्या त्या वेळीं तत्कालीन राजनीतींत अथवा तत्कालीन राज्यपद्धतींत कांहींना कांहीं तरी गोम होती असें सबळ पुराव्यानिशीं सहज प्रतिपादन करितां येईल. अव्यवस्थेंत प्रजेचें कांहीं एक हित नाहीं. जेव्हां तिचें पाऊल वांकडें पडतें, तेव्हां तें पापमूलक नसतें; तर केवळ अज्ञानमूलकच असतें. परंतु राज्यांतील सत्ताधारी पक्षाची गोष्ट वेगळी आहे. ते दुर्लक्षानें व मुद्दामही दुराचरण करूं शकतील, यांत संशय नाहीं. ‘ मोठमोठ्या राष्ट्रांत ज्या उलाढाली होतात त्या आकस्मिक कधींच नसतात; किंवा प्रजेच्या लहरींपासूनही कधींच उत्पन्न होत नाहींत. क्षीण व अव्यवस्थित राज्यपद्धतीनें देशांतील प्रमुख महाजनांस जितकें

वाईट वाटतें तितकें दुसऱ्या कशानेंही वाटत नाहीं; आणि साधारण लोकांविषयीं ह्मणाल तर ते जेव्हां बंड करितात तेव्हां केवळ सरकारचे विरुद्ध उठण्याचे इच्छेनें ते कधींच करीत नाहींत, तर जेव्हां त्यांचीं दुःखें असह्य होतात तेव्हांच ते त्या मार्गास लागतात,' असें एका थोर व राजसत्तावादी मुत्सद्याचें मत आहे. फ्रान्स देशांतील तिसऱ्या हेन्रीच्या दोस्तशाही राज्यपद्धतीस व तिच्या परिणामांस अनुलक्षून त्यानें हें म्हटलें आहे. राज्यक्रांतीच्या संबंधाचीही त्याची उक्ति मोठमोठ्या सर्व अस्वस्थतांसही लागू आहे. सत्ताधाऱ्यांचे विरुद्ध प्रजेच्या वर्तीचें हें ह्मणणें खरें असण्याचा जरी विशेष संभव नसला, तरी हें जास्त समाधानकारक आहे असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील यांत संदेह नाहीं; कारण प्रजाजनांची प्रकृति सुधारण्यापेक्षां मंत्रिमंडल बदलणें फारच सोपें आहे.

या विषयाचे ऊहापोहारंभीं दोनही पक्ष सारख्याच योग्यतेचे व समंजस आहेत असें गृहीत धेऊन चाललें ह्मणजे कोणाही मनुष्यास निःपक्षपातानें त्याचा विचार करण्यास हरकत नाहीं, मात्र आधुनिक असमाधानाचा परिच्छेद करण्याची त्याची रीति थोर लोकांच्या सोप्या व सभ्य रीतीहून भिन्न असली पाहिजे. आमच्यावर वर्तमानकाळीं होत असलेला जुलूम भूतकालीन जुलुमासारखा नाहीं—ह्मणजे टुडर राजांचे कारकीर्दीतील जुलुमासारखा किंवा ज्याकरितां स्टुअर्टराजांना प्रायश्चित्त मिळालें त्यासारखा नाहीं—ह्मणून आमच्यावर कांहीं जुलूमच होत नाहीं ह्या ह्मणण्यांत कांहींच तथ्य नाहीं. या देशाचे राज्यव्यवस्थेंत फारच फरक पडला आहे. कारण देशांत जरी स्वस्थता होती तरी सार्वजनिक घडामोडींचे क्षुब्धतेनें राष्ट्राचे व राज्यव्यवस्थेचे स्वरूपांत जितक्या महत्वाचे फेरबदल स्पष्टपणें घडून येतात तितक्याच महत्वाचे फरक त्यावेळींही घडून आले आहेत.

सार्वजनिक अव्यवस्थेसंबंधीं लोकांचे मनोविकार चुकीचे असण्याचा जितका संभव कमी तितकाच तिच्या कारणांविषयीं त्यांचे विचार बरो-

बर असण्याचाही संभव कमीच आहे. बहुतेक लोक स्वदेशाच्या राजनीतीसंबंधानें कमींत कमी पन्नास वर्षें तरी मागें असतात असें माझ्या प्रत्यहीं अनुभवास आलें आहे. आपल्या डोळ्यांदेखत निरनिराळ्या प्रसंगीं घडत असणाऱ्या सर्व गोष्टींचें मनन व तुलना करून त्यांची पूर्ण सांगड घालून देणारे लोक फारच थोडे; परंतु विशेष श्रम केल्याशिवाय किंवा विशेष बुद्धि खर्च केल्याशिवाय त्यांना पुस्तकांत मागल्या सर्व गोष्टी आयत्या व्यवस्थित सांपडतात. बरेच लोक विचारशक्ति व आत्मनिरपेक्षता यांचा गंधही नसतां, वर्तमानकाळाशिवाय इतर काळाची योग्य वासलात लावण्यांत शाहाणे व कुशल दिसतात ह्याचें कारण हेंच. भूतकाळच्या घडामोडींचा आह्मांस फार निःपक्षपातानें व बऱ्याच सुशिक्षितपणानें विचार करितां येतो; कारण तेथें मनोविकारांनीं बुद्धीस भ्रम पडत नाहीं आणि अति क्षुल्लक कारणापासून तों मोठ्या कार्यापर्यंत एकून एक सर्व प्रसंग आमच्या समोर क्रमानें व व्यवस्थित रीतीनें मांडलेले असतात. मागील जुलुमाचा पक्ष घेणारे लोक थोडेच; आणि एका शतकापूर्वीच्या गोष्टींसंबंधानें व्हिग लोकांचे विचार प्रकट करणें व सध्या दास्यापासूनही आपली तुंबडी भरून घेणें ह्यांत त्यांस कांहींच असंबद्धता दिसत नाहीं. हें प्राचीन पांडित्य व हा ऐतिहासिक देशाभिमान हीं अत्यंत सोयकर आहेत; व त्यांच्या योगानें विचार व कृति यांचें पुरातन वैमनस्य स्तुत्य रीतीनें मिटवितां येतें. ग्रीस देशांतील प्रजासत्ताक राज्यांचे व साक्सन राज्यपद्धतीचे स्तुतिपाठ गाण्यांत ज्यांस समाधान वाटतें व जॉन व जेम्स राजांवर जे आपला क्रोधाग्नि पूर्ण न्यायानें बिनदिक्कत पाखडतात अशा पुष्कळ प्रजासत्ताभिमान्यांस स्वकालीन अतिनीच व ग्राम्य स्थितींतसुद्धां पूर्ण समाधान मानण्यास कांहींच वाईट वाटत नाहीं. गेल्या जेम्स राजाचे मुठींतील लोकांत आपणास आठव्या हेन्रीचा स्तुतिपाठक ह्मणवून घेणारा कोणीच नसेल; किंवा आठव्या हेन्रीचे दरबारांतही दुसऱ्या रिचर्डच्या गळ्यांतील ताइतास वाखाणणारा एकही मनुष्य सांपडला नसता हें निर्विवाद आहे.

आमचें दरबारी मंडळ कितीही सुशील असलें व आमचा काल

रामराज्यास कितीही सदृश असला तरी आमचें सार्वजनिक स्वातंत्र्य, पूर्वीप्रमाणें कोणाच्याही डोळ्यांत सलणार नाहीं व आमच्या राज्यपद्धतीस अपायकारक फेरबदल करण्याचे प्रयत्न करण्यास कोणास कधींही संधी मिळणार नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. ह्या प्रयत्नांचे स्वरूपांत कालदेशवर्तमानाप्रमाणें फरक पडणें साहजिक आहे. कारण महत्वाकांक्षेचा साधारण उद्देश जरी एकच असतो तरी ती तृप्त करण्याचीं साधनें वस्तुविशेषकालपरत्वें भिन्न भिन्न असतात. प्रजापीडनाचीं बहुतेक प्राचीन यन्त्रें निरुपयोगी झालीं आहेत व बाकीचीं व्यवहारांतून अगदींच अंतर्धान पावलीं आहेत. शिवाय आपले पूर्वज ज्या जाळ्यांत सांपडून गतप्राण झाले त्याच जाळ्यांत स्वकृतीनेंच आपला पाय अडकवून घेण्याजोगे मूर्ख व अडमुठे मंत्री फारच थोडे सांपडतील. जेव्हां लोकांवर एखादा बेकायदा कर लादण्याचा प्रसंग येईल त्यावेळीं त्याचें नांव ‘ नौकाकर ’ असें निःसंशय कधींही ठेविलें जाणार नाहीं. लोकांस छळण्याकरितां जंगलच्या कायद्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती निघण्याचें ह्या कालीं तरी भय नाहीं. आणि ज्यावेळीं व्यक्तिमात्राचे हक्कास धक्का पोचविणारें मुत्सद्यांच्या अतितृष्णेचें उदाहरण आमच्या श्रुतिपथांत येईल त्यावेळीं ते सभ्य स्त्रियांस स्वभर्तृगमनाचा परवाना देण्यासाठीं त्यांजपासून दोनशें पुलेट्स् उकळण्याचें कधींही असणार नाहीं.

प्रत्येक काळाच्या रीतिभाति वेगळ्या असतात, आणि त्यांवर अवलंबून असणारी राजनीतिही भिन्न असते, आणि राज्यपद्धतीचा बाल्यावस्थेंतच नाश करण्यासाठीं किंवा तिची वाढ खुंटविण्यासाठीं जे प्रयत्न करण्यांत येतात तेच प्रयत्न एकदां ती पूर्णपणें स्थापित झाली म्हणजे तिच्या यौवनभरांत तिच्या विरुद्ध योजिले जाणार नाहींत.

राज्यक्रांतीपासून पार्लमेंटचे विरुद्ध कांहींएक कारस्थानें उपस्थित झालीं नाहींत ही एक समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे. मुत्सद्दी व प्रजा ह्यांमध्यें अन्य मंडळाची स्थापना करण्यांत दरबारी मंडळाचें

बरेंच हित आहे हें कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. हें अंतःस्थित मंडळ अस्तित्वांत राखणें हाउस-ऑफ्-कामन्स्‌मधील गृहस्थांचेही तितकेंच पथ्यावर पडतें. ते आपलें मनस्वातंत्र्य कसेंही भाड्यानें लावोत, तें ते विकून समूळ गमावून कधींच बसणार नाहींत. आणि म्हणूनच जे लोक दरबारचे इच्छेप्रमाणें व मर्जीप्रमाणें पाणी पिणारे म्हणून प्रख्यात आहेत तेच कामन्स सभेंत आपल्या श्रेष्ठ हक्कांचें मंडन करण्यांत पुढाकार घेतात. ह्या लोकांस ज्यावेळीं त्या हक्कांचा कोणाकडून व कसा उपयोग होणार आहे हें समजलें, त्यावेळीं आपल्या हातून त्यांचा मर्यादातिक्रम कधींच होणार नाहीं असें त्यांस वाटलें. जी कामन्ससभा आपल्यावर अवलंबून आहे तिच्याच मर्जीवर अवलंबून प्रजाजनांचेही हक्क असावेत अशी प्रत्येक स्वेच्छाचारी मुत्सद्याची इच्छा सदोदित असलीच पाहिजे. स्वतंत्र राज्याच्या संस्था व स्वेच्छाचारी राजाचे उद्देश ह्यांत म्हणण्याजोगा विसंवाद नाहीं असें लौकरच लोकांचे नजरेस आलें.

राजाचें अधिकारबल मृतप्राय व निःसत्व झाल्यामुळें त्यानें हल्लीं दृढतर व कमी अप्रिय अशा नामतेजानेंच त्याचें काम भागविण्याचें योजिलें आहे. ह्या नामप्रभावानें राजाचें काम शांततेनें व गोडीगुलाबीनें चालविलें आहे; व त्यानें प्रतिपक्षांससुद्धां हस्तगत करून सोडिलें आहे; ह्यांत जोमाचा व परिपोषक अंकुर सदोदित होता; व देशाच्या वैभवानें व दारिद्र्यानेंही तो पुष्ट होणारा असल्यामुळें जुन्या निंद्य अधिकारबलाचीं सर्व कामें योग्य बजावीत होता. ह्या प्रकारें मूलारंभींच ह्यांत स्वहानिकारक व स्वविघाटक बीज प्रादुर्भूत झालें होतें. प्रजाजनांचे अज्ञानावर राज्यपद्धतीची इमारत फार दिवस उभी रहाणार नाहीं; पण तीच राज्यांतील उद्योगी लोकांचे कल्याणावर उभारिली असतां चिरकाल जशीच्या तशीच राहील. तरी पण कांहीं गोष्टी अशा घडून आल्या कीं त्यांचे योगानें या नामप्रभावाचे भयंकर परिणाम विस्तृत होतील असें बरेच दिवस दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं इतकें कबूल करणें भाग आहे राज्यव्यवस्था जरी सुदृढ व उन्नत

होती तरी ह्या सत्तानिधीपासून दरबारी मंडळास अपेक्षित फायदा झाला नाहीं.

राज्यक्रांतीचे समयीं तदनुरोधानेंच राजाचे बरेच हक्क कमी झाल्यामुळें तत्कालीन नूतन व अस्थिर अमलांत साहजिक होणाऱ्या सर्व बखेड्यांचें निर्मूलन त्याच्या हातून झालें नाहीं. ह्मणून राज्यास स्थैर्य आणून तें कायम राखूं शकणाऱ्या हितेच्छु व विश्वासु लोकांचे स्वाधीन आपल्या सत्तेचा कांहीं भाग करणें राजाचे वांट्यास आलें. सार्वजनिक संरक्षणाचे कामीं फारच मोठें अनुयायी मंडल जमविण्यास हे लोक समर्थ होते. आरंभीं अवश्य असणारें हें राजप्रजासंमेलन उपयुक्ततेबाहेर गेलें तरी अस्तित्वांत होतेंच; आणि जर त्याची योग्य व्यवस्था लागली असती तर तें कोणत्याही स्थितींत राज्यास हितावह झालें असतें. तसेंच वजनदार व सदाचारसंपन्न व्यक्तींच्या मध्यस्थीनें लोकांसही राज्यांतील आपल्या योग्य महत्वासंबंधानें निर्भय रहातां येत असे. परंतु पुष्कळ वर्षांच्या वहिवाटीनें राजाचें वजन प्रत्यहीं वाढत जाऊन त्याची सत्ता दृढतर झाल्यामुळें हें संमेलन कांहीं विशेष लोकांस त्रासदायक वाटूं लागलें आहे. कारण हे तेजस्वी राज्यव्यवस्थापक लोक कधीं कधीं आपल्या नैसर्गिक व संपादिलेल्या हिमतीचा जोर असल्यानें, व कधीं कधीं मित्रांचें मन दुखविण्याचे भीतीनें, व दरबारी मंडळाबाहेरील आपल्या लोकप्रियतेस कारणीभूत झालेलें आपलें वजन गमावून बसण्याचे भीतीनें, राजानुग्रहास पात्र झालेल्या लोकांच्या ओंजळीनें पाणी पिण्याइतके लीन नसत. दरबारास जसे आह्मावर तसे आह्मासही दरबारावर उपकार करितां येतील ह्या समजुतीनें हे व्यवस्थापक वागत असत. ह्याप्रमाणें दरबार व भिन्न भिन्न पक्षांचे पुढारी यांत बाह्यतः जरी राज्यलक्ष्मी विभागली होती तरी बहुतेक प्रसंगीं तिच्या वजनानें राजपक्षाचे पेक्षां प्रजापक्षाचेंच पारडें खालीं बसत असे. आणि ह्या सत्तेंतील प्रजेच्या भागाचें अनन्यहार्य किंवा अपरिच्छेद्य स्वामित्व कोणासही मिळत नसे, तर तो भाग स्वोत्पत्तिस्थलीं परत येऊन प्रजाजनरूपी घटकावयवांत मिळून जात असे. ह्मणूनच ज्यांकडे लोकाग्रणीत्व साहजिक येत आहे

किंवा ज्यांनीं स्वोद्योगानें लोकप्रियता संपादन केली आहे अशा अशा मनुष्यांचे हातीं गेलेली राज्यव्यवस्था अप्रतिबंध राजसत्तेच्या कट्या पुरस्कर्त्यांच्या डोळ्यांत सलूं लागली. स्वानुग्रहसंपादनाशिवाय अन्य उपायांनीं मिळविलेल्या सत्तेचा द्वेष करणें व अमर्याद आत्मस्वातंत्र्य व पूर्ण प्रजापारतंत्र्य ह्यांमधील सर्व स्थितींचा समूळ नाश करणें हा अप्रतिबंध राजसत्तेचा स्वभावच आहे.

ह्या मध्यगत स्वतंत्र सत्तेस उखडून लावण्याचा व दरबारास आपल्या वजनाचा 'मनःपूत' अमर्याद व अप्रतिबंध उपयोग मिळवून देण्याचा राजनीतिविशारदांचा कांहीं वर्षांपासून मुख्य उद्देश आहे. हा उद्देश जर सिद्धीस गेला असता तर दरबारी मंडळाचा कट्टा अभिमान बाळगणाऱ्या आचार्यांच्या तृष्णातिशयानुरूप सर्व कांहीं राजसत्तेनें घडून आलें असतें. अशा वेळीं थोर लोकांच्या योग्यतेकडे किंवा जरा कमी दरजाच्या लोकांच्या प्रीतीकडे मुळींच लक्ष न देतां म्हणजे प्रजासंमतीस गुंडाळून ठेवून, राज्यव्यवस्था करण्यांत आली असती. ह्मणून ब्रन्सविक घराण्याचे कारकीर्दीपासून सुरू असलेल्या मंत्रिमंडलाचे रचनापद्धतीहून सर्वस्वीं भिन्न अशा नूतन व्यूहरचनेचा कांहीं आपमतलबी लोकांनीं घाट घातला. ही व्यूहरचना फ्रेड्रिक्–प्रिन्स–आफ्–वेल्सच्या दरबारच्या कांहीं मंडळीचे मनांत प्रथम आली असें ऐकिवांत आहे.

ह्या व्यूहरचनेंतील प्रथम प्रयत्न ह्मटला ह्मणजे एखाद्या खरोखर कुलीन व गर्भश्रीमंत परंतु प्रस्तुतच्या आकस्मिक उदयकालापर्यंत अप्रसिद्ध असून ज्यास लोकांत विशेष मान मिळत नव्हता अशा मनुष्यास मुख्य प्रधान करणें हा होय. सर्व राष्ट्रानें एकदम अनन्यभावानें ह्याचे आज्ञेप्रमाणें वागलें पाहिजे होतें. परंतु आरंभींच उत्पन्न होणाऱ्या विघ्नांविरुद्ध टिकाव धरण्यास अवश्य लागणाऱ्या दृढतेच्या अभावामुळें ह्मणा, किंवा वस्तुस्थितीच्या अपक्वतेमुळें ह्मणा किंवा ही पद्धति इष्ट न वाटल्यामुळें ह्मणा, ती कल्पना तशीच राहिली. व मुख्य उद्देशानुरूप सर्व गोष्टी हळूहळू व नेटानें घडवून आणण्याकरितां कालमानाप्रमाणें त्या व्यूहरचनेच्या साधनांत थोडासा फरक करण्यांत आला.

ह्या नवीन योजनेप्रमाणें दरबारी मंडल व मंत्रिमंडल हीं परस्परांपासून भिन्न करण्यांत आलीं. येथपर्यंत दोनही शब्द एक वस्तुवाचकच समजले जात असत; परंतु यापुढें दरबार व मंत्रिमंडल भिन्नवस्तुवाचक समजले पाहिजेत. ह्या व्यवस्थेनें मंत्रिमंडळाच्या दोन संस्था अस्तित्वांत आल्या; एक विश्वासापन्न होऊन गूढमंत्र देणारी; व दुसरी राज्यशकटवहनाचा कार्यभाग उरकणारी ह्मणजे विधायक सत्तेचीं कामें करणारी केवळ नामधारी होय. हें दुसरें प्रधानमंडळच काय तें जबाबदार असावयाचें. व वास्तविक सत्ता धारण करणारे सूत्रधार जे गूढमंत्री ते निर्भय स्थानाचा आश्रय घेऊन स्वस्थ पडावयाचे.

दुसरें—मंत्रिमंडळाविरुद्ध दरबारचे कृपादृष्टींत असणारा असा ह्या अग्रेसरानुयायांचा एक पक्ष स्थापित व्हावयाचा; ह्या पक्षास राज्यांतील बहुतेक देणग्या मिळावयाच्या व त्या त्यांजकडे तशाच चालावयाच्या. ह्या सर्व गोष्टींत नामधारी मंत्रिमंडळाची आवडनिवड पाहण्याची जरूर नाहीं.

तिसरें—पार्लमेंटाची या व्यूहरचनेस संमति मिळविणें. ( ह्याच कलमावर त्यांचा सर्व जयापजय अवलंबून होता. ) याकरितां राजाचे प्रधान कोण आहेत, व त्यांचा दरजा, त्यांचें वजन, त्यांचें सामर्थ्य, त्यांचा पक्ष, त्यांचा स्वभाव, काय आहे ह्याविषयीं पूर्णपणें अलिप्त रहाण्यास पार्लमेंटास पढवावयाचें होतें. ( एका प्रकारच्या अनुशासनानें तें कोणतें हें पुढें येणार आहे. ) ह्या सभेची प्रकृति परस्परविरोधी पक्षांस व विपरीत राजनीतीस अनुकूल अशी बनवावयाची होती. प्रजाजनांतील सर्व प्रकारचे पक्ष व सर्व प्रकारचें ऐक्य पूर्णपणें लयास पोंहोंचवावयाचें होतें. आजपर्यंत लोकांची प्रीति संपादन करण्याचें व त्यांच्यांत विश्वास उत्पन्न करण्याचें सर्व काम व्हिग व टोरी पक्षांचे पुढाऱ्यांचे हातून होत असे, पण आतां ही रीति बदलावयाची होती; व लोकांच्या आदरास व विश्वासास आपण पात्र आहों असें स्वकृतीनें ज्यांनीं दाखविलें नाहीं अशा लोकांचे स्वाधीन राज्यकार्यधुरीणत्व करावयाचें होतें. लोकाप्रसिद्धतेनेंच तन्निक्षिप्त सत्तेवरील त्यांचा हक्क स्थापित व्हा-

वयाचा होता. पार्लमेंटचे सभासदांस स्वाभिमान व स्वकर्तव्य ह्यांविषयीं केवळ अंध करून सोडावयाचें होतें. हे स्वातंत्र्याधारभूत असणारे उदात्त व प्रगल्भ मनोविकार हळूहळू रसातळास मिळवून टाकावयाचे होते. टर्किश लष्कराप्रमाणेंच पार्लमेंटाच्या शिष्टाचारांतीलही मानास व श्रेष्ठत्वास रजा मिळावयाची होती. राजास स्वतःच्या अथवा कोणाच्याही खासगी शिपायांस मुख्य प्रधान करितां येईल; व सर्व लोकांनीं ह्या प्रधानास राष्ट्रांतील अत्यंत कुलीन व ज्ञानवृद्ध अशा मनुष्याप्रमाणें मान देणें योग्य आहे व तो त्यांनीं त्यास दिला पाहिजे हें राजनीतितत्त्व स्थापित करावयाचें होतें. व राष्ट्रीय प्रधानमंडळाचे स्थानीं एका गुप्त व अंतःस्थित चौकडीची योजना व्हावयाची होती; व वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पार्लमेंटास पूर्ण औदासिन्य धारण करावयास लावावयाचें होतें.

पार्लमेंटची अशी वृत्ति बनल्यावर दरबारच्या कोणत्याही म्हणण्यास कोणतीही आडकाठी उरली नसती असें म्हटलें असतां चालेल. त्याचे सर्व मुख्य उद्देश तडीस गेले असते व निरंकुश सत्तेचीं सर्व समाधानकारक अंगें त्यास मनमुराद मिळालीं असतीं. देशांतील प्रत्येक वस्तु स्वाश्रयापासून विगलित होऊन राजाच्या लहरीवर व मर्जीवर अवलंबून राहिली असती. ह्याप्रमाणें सत्तासंपादनास व तद्धारणास राजानुग्रह हाच एक मार्ग झाला असता. ह्याप्रमाणें सर्व लोकांचे डोळे अन्यस्थळापासून निवृत्त होऊन दरबाराकडे वळले असते; ह्मणजे मग अर्थात्च मनुष्यमात्राच्या आशांस ज्या दिशेचें वळण लागेल तदनुरूप त्याचें आचरण झालेंच पाहिजे. ह्या नियमानें देशांत कसेही कायदे असोत किंवा कशाही संस्था असोत, तीं मरणोन्मुख झालीं असतीं व दास्य तेव्हांच विश्वव्यापी होऊन बसलें असतें.

राज्यपद्धतीस असें वळण देण्यास कोणत्याही मनुष्यानें प्रवृत्त होणें हें सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटेल. पण ह्या प्रकारचे प्रयत्नांस योग्य असे अत्यंत मनोवेधक प्रसंग आले आहेत हें निर्विवाद आहे; व ह्या कारस्थानाकडे लोकांचें लक्ष लागण्यास शोभतील अशीं कारणेंही

मुळींच नव्हतीं असें नाहीं. हे प्रसंग व हीं कारणें, दोहोंचाही आजपर्यंतचा उपयोग, ही नूतन पद्धति स्थापण्याकरितां योजलेल्या युक्त्या, व त्या पद्धतीचे परिणाम ह्या गोष्टी माझ्या मतें शांतपणें विचार करण्यासारख्या आहेत.

हल्लींचे महाराज गादीवर बसले त्यावेळीं, राज्यक्रांतीनंतरच्या त्यांच्या पूर्वजांपेक्षां त्यांस बऱ्याच गोष्टी अनुकूल होत्या. राजघराण्यांतील पिढीनें चवथे व राजानुक्रमानें तिसरे पुरुष असल्यामुळें कुलक्रमागतत्ववाद्यांसही आपल्या समजुतीप्रमाणें महाराजांचे ठिकाणीं कांहीं गोष्टी समाधानकारक दिसूं लागल्या; व आपल्या मतांत कांहीं एक फरक न करितां यांजविषयीं आपली राजनिष्ठा दाखविण्यास त्यांस कांहींच हरकत दिसेनाशी झाली. स्वतः तोतया व त्याचा पक्ष निंदास्पद झाला होता. सर्व यूरोपभर त्याचा हक्क नाकारिला जात होता व त्याचें अनुयायीमंडलही इंग्लंडांत विल्हेवाटीस लागलें होतें. महाराज तक्तावर बसले त्यावेळीं एक महायुद्ध सुरू होतें हें खरें; तरी पण भूगोलावरील प्रत्येक भागांत ते यशस्वी होत गेल्यामुळें तहाच्या अटी स्वीकारिण्याचें नव्हे तर त्या घालून देण्याचें सदोदित त्यांचेकडे होतें. अन्यदेशीय चालीरीति व अन्यदेशीय ओढा आपल्या पूर्वजांप्रमाणें त्यांचे ठिकाणीं नसल्यामुळें ह्या देशांत आपली सत्ता वृद्धिंगत करण्यास त्यांस कांहीं एक अडचणी आल्या नाहींत. खासगीकडील त्यांचें उत्पन्न जरी तत्कालीन समजुतीप्रमाणें नियमित होतें तरी विपुल होतें; केवळ क्षुल्लक नव्हतें. बाहुबलानें राज्यविस्तार झाल्यामुळें कर्जांत दिवसेंदिवस भर पडत चालल्यामुळें, आणि लष्कर व आरमार यांच्या उर्जित दशेमुळें त्यांचें वजन दृढ होऊन फारच वाढलें. व यौवनभरांतच त्यांस राजपदप्राप्ति झाल्यामुळें त्यांच्या विरुद्ध जाणें राजनिष्ठेमुळें जितकें अप्रिय होतें तितकेंच त्यांच्या दराऱ्यामुळें भयप्रद असे. कारण त्यांच्या कोपापुढें पूर्ववंशीय राजाच्या पुनरागमनाशेचा टिकाव मुदलींच लागला नसता.

स्ववैभवजनक स्वातंत्र्यतेज राष्ट्रांत तसेंच कायम राखावें अशी ह्या

अनुकूल गोष्टींनीं महाराजांस उत्कट इच्छा उत्पन्न झाली. पण इतरांस त्याचे योगानें फारच भिन्न विचार सुचले. हे एका प्रकारचे मुत्सद्दी होत. हे लौकरच रंगभूमीवर प्रवेश करून आपल्या उद्योगास लागले. त्यांस असें वाटलें कीं दरबारांतील स्वार्थसाधु पक्षाचे मदतीनें आपणांस इतकी सत्ता संपादन करण्याची संधि येऊन ठेपली आहे कीं तितकी प्रामाणिकपणें सेवा करून किंवा साहजिक वैभवप्राप्तीनें संपादन करण्याची आशा बाळगणें नलगे; व जोंपर्यंत राज्यव्यवस्था पूर्वीच्या आधारस्तंभांवर अवलंबून आहे तोंपर्यंत तितकी मिळाल्यास तिचें रक्षण करणेंही अशक्य आहे. आपले उद्देश सुलभ रीतीनें तडीस नेतां यावे म्हणून राज्यव्यवस्थेंत बरीच उलथापालथ करणें व तत्कालीन बहुतेक समाजसूत्रधारांच्या आचारविचारांत व पक्षांतही विलक्षण फेरबदल करणें त्यांस अवश्य होतें.

प्रथम त्यांनीं प्रत्यक्ष दरबारचे मर्जीशिवाय अन्य उपायांनीं परिपोषित असलेल्या प्रत्येक वस्तूची शक्ति हरण करण्यास क्रमाक्रमानें पण जरा घाईनें सुरवात केली. त्यावेळीं ड्यूक् ऑफ न्यूकॅसल व मि० पिट् हे फार लोकप्रिय होते, व त्यांचें अनुयायीमंडलही मोठें होतें. त्यांचें वजन दरबारच्या ह्मणण्याप्रमाणें नूतन स्थित्यंतरावर अवलंबून नव्हतें; ह्मणून ह्या स्थित्यंतरानुरूप काम करण्यास ते योग्य वाटले नाहींत.. नवीन पद्धतीच्या सुदैवानें असें घडून आलें कीं जुलमाच्या रामरामानें स्थापित झालेल्या मंत्रिमंडळांत आपसांत बरेंच वैमनस्य व वितुष्ट वाढलें. मि० पिट्वर प्रथम धाड आली. त्यास पदच्युत करूनच ते संतुष्ट झाले नाहींत; तर हरतऱ्हेनें त्याची बेअब्रू करण्यासही ते चुकले नाहींत. अशा त्रासदायक पुढाऱ्याचे कचाट्यांतून सुटल्यामुळें विरुद्ध पक्षास फार आनंद झाला; पण त्याच्या अधःपातानें आपल्या अधःपाताचा मार्ग खुला झाला व त्यांतच आपलाही अधःपात आहे असें त्यांच्या स्वप्नींही आलें नाहीं. दुसऱ्या पुष्कळ कारणांनीं त्यांस आपली वस्तुस्थिति प्रत्यक्ष पहाण्यास मिळाली नाहीं. कुलीन व्हिग् लोकांस ब्रन्सविक घराण्यांतील राजाचे विरुद्ध जाणें फारच••

अप्रिय व असंभाव्य वाटेल. मंत्रिमंडलाचे ह्या विचारसरणींत लौकरच फरक पडेल ह्या आशेनें त्यांनीं बरेच दिवस बुचकळ्यांत व कांकूं करण्यांत घालविले; व चौकडीचें प्रत्येक कृत्य लहरीनेंच होत नाहीं तर तिची कृति कारस्थानमूलक आहे या गोष्टीवर त्यांचा भरंसा कांहीं केल्या बसेना. मि० पिट्‌चा नाश करण्यापेक्षां, जंगी व्हिग पक्षासच रसातळास नेऊन पोंहोचविणें दरबारांतील नवीन स्वार्थसाधु पक्षास जास्त हितावह होतें हें उघड आहे. त्या गृहस्थाचें वजन खरोखरच फार मोठें व योग्य होतें; पण तें केवळ व्यक्तिविषयक असल्यामुळें क्षणभंगुर होतें. व्हिग लोकांचें नांव देशभर पसरलें होतें. कारण लोकप्रियता त्यांचे वांट्यास जरी कमीच आली होती तरी गर्भश्रीमंत बड्या लोकांत त्यांचें वजन फारच मोठें होतें. बऱ्याच वर्षांची राज्यसत्ता, विपुल संपत्ति, केलेले व करून घेतलेले उपकार, सत्ताधारण, आप्तसंबंध, सख्य, मैत्री, (त्यावेळीं समजलेल्या महत्वाच्या गोष्टी)व्हिग हें लोकप्रिय नांव, राजघराण्यांसंबंधीं आरंभींच उत्पन्न होऊन, अव्याहत चाललेली प्रीति, ह्या सर्व गोष्टी राष्ट्रांतील तेजोनिधिद्योतक असल्यामुळें अपराधी व दंडनीय होऊन बसल्या होत्या. दरबारास दुसऱ्या कोणाच्याही मदतीची जरूर नाहीं व ती कोणापासूनही मागण्याचा प्रयत्न करणें त्यास अपमानकारक आहे हें जगास विदित करणें हा चौकडीचा मुख्य उद्देश होता. हा सर्वगामी उद्देश त्यांच्या भिन्न भिन्न तऱ्हेच्या सर्व कृत्यांचें केवळ जीवित होऊन राहिला होता व त्यामुळें त्यांचें एकीकरण होत असे. ह्मणून अग्रणींस पदच्युत केल्यानंतर ‘मूले कुठार’ करण्यासाठीं सर्व पक्षासच बहिष्कृत करण्यांत आलें. हा बहिष्कार इतका सर्वसाधारण व कडक होता कीं त्या पक्षाच्या कनिष्ठ नोकरापासून एकूणएक लोकांस उद्योग करूनही पोटापुरती जाडीभरडी भाकर मिळविणें कठीण झालें. हा प्रकार मोठमोठ्या राज्यक्रांतींचे वेळींही अश्रुतपूर्वच होता. पण दरबाराव्यतिरिक्त कोणताही आधार नामशेष करणें, व नूतन पद्धतीचे पुरस्कर्त्यांचा दृढनिश्चय व स्थिरता अनुकरणीय आहेत असें जगजाहीर करणें अवश्य आहे असें मानिलें जात असे.

चालू राजघराण्याच्या राजपदप्राप्तीचे समयीं व्हिग अग्रेसरांनीं केलेली राजसेवा, व नुकत्याच झालेल्या युद्धाचे समयीं पिट्नें केलेली राष्ट्रसेवा केवळ गुंडाळून ठेवून, दोघांसही चौकडीनें धुळीस मिळवून टाकिलें; ह्याप्रमाणें, प्रजाजनस्वातंत्र्याचे जे दोन आश्रय—लोकप्रीतीनें प्राप्त होणारा अधिकार व एकीनें प्राप्त होणारा अधिकार-ते दोन्हींही रसातळास मिळाले. पक्षविषयक व व्यक्तिप्रीतिविषयक सर्व निंद्य तत्त्वांपासून आह्मी पूर्णपणें निवृत्त झालों आहों अशी ज्यांनीं शपथ वाहिली ते थोडे लोक मधून मधून दृष्टीस पडत असत; व त्यांपैकीं बहुतेक सर्व शपथेस जागले असें ह्मणणें भाग आहे. तथापि राज्यास जंगी धक्का पोंहोंचल्याशिवाय हें स्थित्यंतर मुदलींच तडीस गेलेलें नाहीं हें उघड आहे.

ह्या सर्व उलाढालींस प्रजाजनाची संमति मिळविण्यासाठीं तदनुरूप विचार त्यांसमोर मोठ्या जारीनें प्रतिपादिले जात असत. चौकडीनें मोठ्या विलक्षण नैतिक गंभीरतेनें आपल्या कामास सुरवात केली हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. जे कांहीं महिन्यांनंतर अनीतीच्या अगाध अमंगळ डबक्यांत गटंगळ्या खाऊं लागले तेच पार्लमेंटच्या नियोजनांत व व्यवस्थेंत पूर्वी चालू असलेल्या अप्रत्यक्ष निंद्य प्रकाराविरुद्ध ओरड करीत सुटले. हा दरबारनें दाखविलेला व्यक्तिप्रभावाचा अप्रतिम द्वेष देशभर केवळ भाषणानेंच नव्हे तर एका छोटेखानी पुस्तकाच्या द्वारें, दुसऱ्या अनेक इतर गोष्टींसह, मोठ्या थाटानें लोकांस विदित करण्यांत आला. ह्या पुस्तकास एखाद्या जंगी उद्योगाचे आरंभीं छापलेल्या प्रसिद्धिपत्रकाचें स्वरूप होतें. ह्यांत पूर्वीच्या कारकीर्दींतलि राजनीतींवर सभ्यतेनें व बेताबातानें पण कडक टीका केली होती. ह्या पुस्तकावरून लेखकाची कुशलता व भाषासरणी हीं चांगलीं व्यक्त होतील यांत संशय नाहीं.

ह्या लेखांत नवीन पद्धतीचा रोंख प्रथम दृष्टोत्पत्तीस आला; दरबार व मंत्रिमंडळ भिन्न भिन्न करण्याची, प्रत्येक गोष्टीचा व राष्ट्राचा संबंध तोडून एका व्यक्तीचेच मर्जीवर तीस अवलंबित करण्याची, व यासाठीं..

एक ' राजमित्र ' नांवाची स्वतंत्र मंडळी स्थापन करण्याची ( त्यावेळीं केवळ विचारांतर्गत असलेली ) कल्पना प्रथम चमकूं लागली.

नवीन पद्धतीची शिफारस करण्याकरितां यांत दाखविलेला दरबारचा एक सुंदर, भव्य, चकचकीत, व हुबेहूब देखावा पाहून सर्व लोक चकित झाले. तट व त्याचे वाईट परिणाम यांस पूर्ण फांटा द्यावयाचा होता. ज्याप्रमाणें स्वर्गांतून एट्ला कडेलोट केलें त्याचप्रमाणें दरबारांतून अनीतीस कडेलोट करावयाचें होतें. यापुढें देशाभिमान काय तो सत्तेंतच वास करून रहाणार होता; आणि सर्व पातकांचें व अनीतीचें क्षालन करून पवित्र झालेल्या दरबारांत दुर्दैवानें ज्यांची पत रहाणार नाहीं त्यांशिवाय कोणावरही कपटाचा अंमल बसावयाचा नव्हता. अशा प्रकारें प्लेटोच्या काल्पनिक प्रजासत्ताक राज्यांतही जें पूर्णत्व संपादन करणें अशक्य आहे तें राजसत्ताक राज्यांत संपादन व्हावयाचें होतें. हा सर्व देखावा, ज्यांचा भोळेपणा लबाड मुत्सद्यांस अमूल्य धनसंचयाप्रमाणें उपयोगीं पडतो, त्या साधु लोकांस चकित करण्यासारखा तयार केला होता. जे अमानुष सदाचाराचे भपकेदार भाषणांनीं भुलून जात नाहींत व ज्यांस अशा भाषणांची खरी किंमत समजते ह्मणजे ज्यांस त्यांचे उद्देश व त्यांचे परिणाम समजतात अशा थोड्याशा लोकांशिवाय प्रत्येकास भ्रम पाडणारें त्यांत बरेंच होतें, यांत संशय नाहीं. जन्मभर गद्यांतच बोलून ज्यांस गद्य ह्मणजे काय हें माहीत नाहीं अशा बऱ्याच भाबड्या लोकांस आपल्या आंगचे गुण दिसूं लागले; व आपल्या गुणांचें चीज करण्याची दरबारची इच्छा असूनही तसें करण्याची पक्षप्रभावामुळें व प्रतिनिधिनिक्षिप्त राजसत्तेमुळें दरबारास संधि मिळाली नाहीं व यामुळेंच आह्मी जे कैक वर्षांपूर्वीच तिजोरीचे किंवा व्यापाराचे लाटसाहेब व्हावयाचे ते तसेच राहिलों असें त्यांस वाटूं लागलें. दुष्ट बुद्धीमुळें आजपर्यंत जिचा लाभ कांहीं विशेष लोकांसच मिळत होता व जिचा खर्चही हात राखूनच होत असे, त्या राजाच्या औदार्याचे भांडाराचे मोहोरबंद दरवाजे खुले करण्याचा व तिचा महाप्रवाह सर्व लोकांवर वाहूं देण्याचा तोच काल

होता, व राजपदास मूळ वैभवास नेऊन पोंहोंचविण्याचा काळही समीपच येऊन ठेपला होता. ‘ राजा अद्यापि अज्ञान नाहीं ’ हा संज्ञावाचक शब्द होऊन बसला होता. व राज्यव्यवस्थेचा कांटा एका बाजूस शिरजोर लोकांच्या वजनानें व दुसऱ्या बाजूस स्वार्थसाधु बऱ्या लोकांच्या वजनानें कधींही कलूं न देण्यांत—महाराजांचे आजे साहेब ज्यांतून पिळून निघाले होते त्या मंत्री लोकांच्या चक्रांतून राजास पूर्णपणें मोकळें करून स्वतंत्र करणें—ह्याशिवाय दुसरा उपाय नाहीं हे शब्द दरबारच्या शिपायांचे तोंडींही सदोदित खेळूं लागले.

मंत्रिमंडळांतील लोकांत जी मोटी सुधारणा करण्यांत आली व त्यापेक्षांही जी मोठी सुधारणा राज्यव्यवस्थेंत उघडपणें करण्यांत आली त्यास लोकांची संमत्ति मिळविण्यासाठीं ज्या युक्त्या योजण्यांत आल्या त्यांपैकीं कांहीं ह्या होत. व्यक्तिमात्रासंबंधानें निराळीच व्यवस्था करण्यांत आली होती; त्यायोगें प्रत्येक पक्षांत व प्रत्येक कुटुंबांत सुद्धां यादवी माजल्यामुळें कोणालाही त्यानंतर एकीनें, व्यवस्थेनें, व नेटानें दरबारचे विरुद्ध जातां आलें नाहीं. ज्याचा लोकांशीं कांहींएक संबंध नाहीं व ज्यांतील लोकांचाही आपापसांत अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं अशा प्रधानमंडळाचे हातीं राज्यव्यवस्था प्रथम देण्यांत आली. ह्यापासून सामाजिक अथवा व्यक्तिमात्राचे नीतीवर, महाराजांचे सुखावर व कल्याणावर, तसेंच राज्यव्यवस्थेच्या सुदृढतेवर कोणते चांगले परिणाम घडून आले आहेत हें आह्मां सर्वांस माहीत आहेच. परंतु ज्या अर्थीं त्यावेळीं नवीन पद्धतीचे आवश्यकतेवर इतका जोर देण्यांत आला होता, त्या अर्थीं ज्या शोचनीय दास्यांत व दुःखांत माजी महाराजांची सर्व कारकीर्द गेली व ज्यास ह्या कारकीर्दींत मोठ्या दक्षतेनें हद्दपार करावयाचें होतें त्या दास्याचे व दुःखाचे परिणाम काय झाले आहेत हें पहाणें केवळ अप्रासंगिक होणार नाहीं. ते परिणाम असे.

आपण व आपलें घराणें अशाश्वत व भयंकर स्थितींत सांपडलें असतां दुसऱ्या जॉर्जनें तीस वर्षेपर्यंत राजवैभवास व प्रजास्वातंत्र्यास धक्का..

पोंहोंचूं दिला नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांस त्यानें वृद्धिंगत करून सोडिलें. त्यानें भरराज्यांत उत्पन्न झालेलें व परकीय बळानें प्रबळ झालेलें एक भयंकर बंड मोडिलें; व त्यायोगें त्याच कारणानें पुढें होऊं शंकणाऱ्या सर्व बंडांचें बीज नाहींसें करून टाकिलें. त्यानें इंग्लंडचें वैभव, शक्ति व व्यापार हीं इतक्या उच्चतेस नेऊन पोंहोंचविली कीं तितकी उच्चता पूर्वीच्या महोन्नतींचे वेळींही ह्या राष्ट्रास कधींच प्राप्त झालेली नव्हती. राष्ट्रवैभवाचा व राजवैभवाचा वास्तविक आधार जो स्वप्रजाजनप्रीति, जगद्विख्यात कीर्ति, मित्रविश्वास, व शत्रुकंप त्यावर त्यानें आपल्या गादीची स्थापना केली होती. तत्कालीन स्थिति तशीच अव्याहत पुढें चालो, ह्यापेक्षां ग्रेटब्रिटनास ज्यास्त सुखकर वर कोणासही कट्टया देशाभिमान्यास मागतां यावयाचा नाहीं. आणि जरी आह्मीं राजनिष्ठेच्या कामीं अहमिहमिकेनें वागत आहों तरी—ह्यांच्या विख्यात पूर्वजांप्रमाणेंच यांचें आयुष्य व यांची कारकीर्द होवो व ह्यांचा काळही नेमिल्या वेळीं तसाच होवो ह्यापेक्षां चांगला आशीर्वाद, आमच्या महाराजांचें सदाचरण, सुख, व मान यांस उचित असा मिळविण्याकरितां ईश्वराचें स्तोत्र कसें रचावें हें आह्मांपैकीं कोणासही नीट कळत नाहीं.

लोककल्याण करण्याकरितां राजास स्वतःच्या इच्छा कधीं कधीं गुंडाळून ठेवाव्या लागतील. शहाण्या राजास हा दाब दास्यद्योतक कधींही वाटणार नाहीं; आणि खरोखर माजी महाराजांची स्थिति या प्रकारचीच होती. व तिचे परिणाम जर आह्मीं वर्णन केल्याप्रमाणेंच झाले असतील, तर आमच्या व महाराजांचेही हिताकरितां सबळ व खात्रीलायक प्रमाणें ऐकिल्याशिवाय आह्मांस माजी कारकीर्दीचे नियमांपासून ढळतां कामा नये व नुकत्याच मिळालेल्या महत्वाचे अनुभवास गुंडाळून ठेवितां कामा नये.

कारस्थानी लोकांच्या भाषणांत त्यावेळीं व त्यानंतरही येणारा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे ‘ राजाच्या हक्कांस व राज्यव्यवस्थेच्या समतोलपणास अपायकारक जें बडे लोकांचें सत्ताधिक्य त्याची भीति ’ हा होय. हाउस् ऑफ् कॉमन्स्, हाउस् ऑफ् लॉर्ड्स् किंवा राजा यांपैकीं

कोणीही व कसाही नवीन हक्क बळकाविला असतां तो जागृत व दक्ष अशा स्वतंत्र लोकांचे मत्सरास कारण झालाच पाहिजे. कायदे करणारांचें कोणतेंही कृत्य सकृद्दर्शनींच अकारण, नूतन, व अपूर्व असें भासल्यास त्यापासूनही योग्य रीतीनें अस्वस्थता उत्पन्न होऊं शकेल. प्रजाजनांच्या न्याय्य हक्कांस कमीपणा आणणारा कांहीं प्रकार हाउस् ऑफ् लॉर्ड्स्मध्यें मुळींच घडला नाहीं असें मी ह्मणणार नाहीं. जर असा कांहीं प्रकार घडून आला असेल तर तो केवळ बडे लोकांच्या सत्तेनेंच घडून आला नाहीं, हाउस् ऑफ् कॉमन्स्मध्यें तसा प्रकार ज्या कारणांनीं घडून आला असें लोक ह्मणतात त्याच कारणांनीं तोही घडून आला आहे. पण जर हाउस् ऑफ् कॉमन्स् व तदनुयायी हे मोहबद्ध होऊन आपापसांत भांडूं लागले व स्वतःच जर तशा दोषास पात्र होऊं लागले तर त्यांस इतरांच्या दोषाचें निराकरण करण्यास शक्ति रहाणार नाहीं व बुद्धीही होणार नाहीं. हाउस् ऑफ् कॉमन्स्मध्यें मिड्ल्सेक्स् काउन्टीच्या संबंधानें घडलेल्या प्रकारास ज्या अर्थानें 'लोककृति' असें ह्मणतां येईल त्याच अर्थानें हाउस् ऑफ् लॉर्डस्मधील वरील प्रकारास 'बडे लोकांची कृति' असें ह्मणतां येईल.

राज्यांत व सर्व प्रकारचे सामाजिक कृत्यांत बडे लोकांचें वजन मोठें आहे यांत शंका नाहीं व जोंपर्यंत ते धनाढ्य आहेत तोंपर्यंत तें नाहींसें करणेंही अशक्य आहे. ज्या साधनांनीं धनाचे नैसर्गिक परिणाम बंद करितां येतील त्याच साधनांनीं केवळ वरील प्रकार बंद करितां येणार आहेत. पण धन ही सत्ता आहे तोंपर्यंत वरील साधनें दुर्लभ आहेत. आणि स्वातंत्र्यतेजाचे परिणाम ज्या रीतींनीं घडून येतात व ज्या साधनांनीं त्यांचें रक्षण होतें त्या रीतीची व त्या साधनांची जोंपर्यंत लोकांस थोडीशी तरी कल्पना करितां येत आहे तोंपर्यंत प्रकृत साधनांची इच्छाही करणें नलगे. जर कांहीं बडे लोक आपल्या सरळ, नेकीच्या, व कायदेशीर वर्तनानें आणि खासगी व सामाजिक सदाचरणानें देशांत वजनदार झाले असतील तर ज्या लोकांचे प्रीतीवर तें वजन अवलंबून आहे व ज्यांपासूनच त्याची उत्पत्ति झाली आहे ते लोक

'बडे लोकांचें वजन व मोठेपणा हा एक उमरावी जुलुमच आहे' असें मूर्खपणानें कधींही ह्मणणार नाहींत. कारण आपल्याच महत्वापासून तें उत्पन्न झालें असून त्याच्याच योगानें त्याचें रक्षण होत आहे असें त्यांस पक्कें मांहीत आहे व अनुभवासही येत आहे.

उमरावीचा लोक हल्लीं बहुतकरून जो अर्थ समजतात त्या अर्थानें मी तिचा पक्षपाती नाहीं. जर राज्यव्यवस्थेच्या काल्पनिक नाशाविषयीं विचार करण्याची संवय वाईट नसती तर मी खुषीनें असें ह्मटलें असतें कीं जर आमची राज्यव्यवस्था मृत्युमुखीं पडावयाचीच असेल तर तिच्या नंतर उमरावीच्या कठोर व उद्धत अधिकारपद्धतीवाचून दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा अंमल तिच्या जागीं स्थापित होणें बरें. परंतु माझी आवडनावड कशीही असो, माझी भीति तद्विषयक नाहीं. दरबारच्या व बडे लोकांच्या अमलांपैकीं कोणता इष्ट आहे असा प्रकृत प्रश्न नाहीं; तर त्यांपैकीं हल्लीं कोणाची भीति उत्पन्न झाली आहे हा आहे. बहुतेक बडे लोक स्वतंत्रतेनें व आपल्या योग्यतेनुरूप वागत नाहींत, पण बहुतकरून आपला मोठेपणा विसरून जाऊन एकदम नीच दास्याचाच स्वीकार करीत आहेत हें ज्यांस दिसत नाहीं त्यांस निरीक्षक हें नांव शोभत नाहीं. आमच्या बडे लोकांचा दुर्गुण फाजील तेजस्विता हा असावा अशी माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे. ज्यांचें वजन राजाच्या नियत महत्वाचाच भाग आहे व जे दरबारानुयायी मंडळांत नित्य असतात त्या उमरावांच्या सत्तेविषयीं हे उमरावद्वेष्टे कांहींच ब्र सुद्धां काढीत नाहींत ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. हें सर्व यथास्थित व ठीकच आहे; पण जर कांहीं बडे लोक ( असे लोक पाहिजेत तितके नाहींत ही फार दुःखाची गोष्ट आहे ) बड्या व साधारण लोकांच्या मोठमोठ्या कृत्यांत गुप्त सत्तेचे व पड्यांतील चालकांचे विरुद्ध जातील तर मात्र भीतीस आरंभ होतो; व त्यावेळीं उमरावी राज्यपद्धति स्थापन होण्याचें फार भय असतें.

दरबारच्या ह्या मुद्यावर मीं इतका वेळ घालविला याचें कारण असें कीं नूतन पद्धति सुरू करतेवेळीं यावर फारच जोर देण्यांत आला हो-

ता; व त्यानंतर आजपर्यंत ही बरेच वेळां तन्मताभिमानी लोकांनीं हा मुद्दा काढिला होता. कारण ज्यावेळीं ते बड्या व श्रीमंत लोकांस कनिष्ठ लोकसत्तेचें भय घालीत त्याचवेळीं दुसऱ्या व्यवस्थापकांचे वतीनें ते बडे लोकांच्या जुलुमाचा बाऊ करून लोकांस भेवडाविण्याचा प्रयत्न करीत. ( हे प्रयत्न आजपर्यंत निष्फलच झाले. ) हें सर्व त्यांच्या मूलतत्त्वास अनुसरूनच आहे. कारण, राज्यांतील निरनिराळे दरजाचे लोकांत द्वेषाचें बीजारोपण करून राज्याच्या नैसर्गिक बळकटीची वाताहात करावयाची; ह्मणजे मग राजसत्ता बळकावून बसलेल्या नीच लोकांच्या अधम कृत्यांस कांहीं एक अडथळा होऊं नये हें त्यांचें तत्त्व होय.

येथपर्यंत नूतन पद्धतीची तारीफ करण्यासाठीं दरबारी मंडळीनें योजिलेल्या युक्त्यांविषयीं लिहिलें. तिनें आपल्या मदतीसाठीं जमविलेल्या पक्षाच्या प्रकृतीविषयीं सविस्तर विचार करणें आवश्यक आहे. ह्या पक्षाचे मदतीशिवाय त्यांची पद्धति हॅरिंग्टन्च्या ‘ चक्र ’ नामक राजकीय क्लबाप्रमाणेंच केवळ काल्पनिक होऊन बसली असती; व राष्ट्राला तिजकडे ढुंकूनही पहाण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण तो पक्ष बराच प्रबल असल्यामुळें व नवीन तत्त्वांस अनुरूपच त्याची रचना करण्यांत आली असल्यामुळें बराच मनोवेधक व विचारार्ह झाला आहे.

येथें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं राज्यक्रांतीपासून आजमितीपर्यंत राजाचें वजन व्यवस्थापक मंत्र्यांस मदत करण्यांत व त्यांच्या मताप्रमाणें राज्यकारभार चालविण्यांत खर्च होत असे. परंतु प्रकृत पक्ष फारच निराळ्या उद्देशानें स्थापन करण्यांत आला. त्यायोगें राजाची मर्जी, पाठबळ व विश्वास ह्यांचा मंत्र्याकडे जो प्रवाह वहात असे त्यास अडथळा यावयाचा होता; तो त्यांच्या पार्लमेंटांतील वजनास आड येणार होता; तो त्यांचें साहजिक व संपादित महत्व त्यांजपासून हिरावून घेणार होता; व तसेंच तो मंत्रिमंडळास मदत करण्याचें एकीकडेच ठेवून उलट त्याजवर आपला पगडा बसविणार होता. ह्या पद्धतिरूपी यंत्राची गति फार घोंटाळ्याची आहे व तिचीं तत्त्वेंही खोटीं

आहेत. राजा व्यवस्थापक मंडळाचे बाहेर आहे; व त्या मंडळाचें निःसत्वतेनें व अपकीर्तीनें त्याचा मान व त्याचें वैभव हीं वाढणार आहेत; ह्या समजुतीवर तिचा पाया रचिला आहे. व्यवस्थापक मंडळाची सत्ता हाणून पाडण्याचे उद्देशानें केवळ तिची योजना केली आहे. दरबारास प्रबळ करण्याकरितां राष्ट्रास निःसत्वतेस पोंहोंचविण्याचे उद्देशानें ती अस्तित्वांत आली आहे. हें कारस्थान, मुख्यतः अविश्वास, मतचांचल्य, ऐक्याभाव, व सर्व अवयवांचें एकजात दौर्बल्य ह्यांवर अवलंबून आहे; ह्यापासून कोणत्याही प्रकारची खरी शक्ति उत्पन्न होणें अगदीं अशक्य आहे.

आपल्या पद्धतीस बळकटी आणण्याकरितां चौकडीनें दरबारची व्यवस्था एका प्रकारच्या ‘ चक्रा ’ सारखी केली आहे. ह्या व्यवस्थेनें सर्व पक्षांच्या लोकांचा प्रधानमंडळांत प्रवेश होतो; पण अपकीर्ति संपादिल्यावांचून फारच थोड्यांस सुदैवानें बाहेर निघतां येतें. व जाडे चटके बसल्यावांचून कोणीच सुटत नाहीं. प्रधानमंडल निवडण्याचे वेळीं पुढारी लोकांस एकत्र जमविण्याकरितां साहाय्याच्या व विश्वासाच्या आशीर्वचनांची बिलकुल उणीव नसते. पण एकदां प्रधानमंडलसत्तेस व वैभवास पोंहोंचलें, त्यांनीं आपलीं सर्व शिडें वातावरणांत पसरिलीं, व राजानुग्रहाच्या शानदार व जोरदार झुळकेनें तीं फुगलीं ह्मणजे लौकरच त्यांच्या असें नजरेस पडतें कीं त्यांस नकळत एक प्रतिकूल प्रवाह सुरू होतो, त्यामुळें त्यांची गति खुंटते व कधीं कधीं तर त्यांस मागें हटावें लागतें. या स्थितींत रहाणें त्यांस फारच लज्जास्पद व अपमानकारक वाटतें, व सत्ताधीश असल्यामुळें तर आपली क्षुद्रता त्यांस फारच व्यक्त होते. त्यांना एक तर आपल्याहून कमी योग्यतेच्या लोकांचा हुकूम पाळावा लागतो, नाहीं तर आपल्या हाताखालील लोकांचा प्रतिबंध सहन करावा लागतो. त्यांचा मोठेपणा व त्यांची शांति एकदमच लयास जातात. चौकडीस ते स्वतः त्रास देऊं लागतात. पण चौकडी त्यांस अनुकूल असो अथवा प्रतिकूल असो तिच्या योगानें त्यांचे वांट्यास अपकीर्ति व लघुत्व हीं यावयाचीं-

च. लौकरच असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं फक्त प्रमुख प्रधान पदच्युत केले पाहिजेत. प्रत्येक पक्षांत सदोदित मेषपात्रें असावयाचींच; यामुळें आपल्या अग्रणींशिवाय नोकरीवर रहाण्याकरितां त्यांचीं मनें वळविण्यास फारसे प्रयास पडत नाहींत. ह्याप्रमाणें प्रत्येक पक्ष प्रयाणसमयीं पूर्वींपेक्षां बराच विरळ होतो; व क्षणिक सत्ताधारणानें तो केवळ अशक्त होतो. शिवाय जर त्यांस पूर्वींची शक्ति अकस्मात् अथवा कालांतरानें प्राप्त झाली तर वर सांगितलेल्या जिवंत मुडद्यांच्या केलेल्या मोर्चेबंदीचा चौकडीच्या मंडळीस आश्रय सांपडतो. ह्या मेषपात्रांस त्यांच्या जुन्या पक्षांतील लोक निंदास्पद व द्वेषास्पद समजतील हें तीस पक्कें माहीत असतें.

नामधारी प्रधानमंडळांत निदान दोन पक्ष स्थापित करण्याची ते खबरदारी घेतात. हे पक्ष आपणांस चौकडीचें प्रेम व साहाय्य संपादन करितां यावें ह्मणून भांडतां भांडतां एकमेकांस फाडून खातात; व त्यांच्या चढाओढीनें गुप्त सूत्रधारांस प्रत्येक गोष्ट हळूहळू आपल्या ताब्यांत घेण्यास फावतें.

एखादा मुख्य प्रधान कधीं कधीं आपल्या मदतनिसांपासून अगदीं अलिप्त रहातो; त्यांच्यांत मतभेद पडतो; व तो त्यांस खासगी रीतीनें जुमानीत नाहीं व उघडपणें त्यांच्याविरुद्धही जातो. तरी सुद्धां त्याला आपल्या अधिकारावर रहातां येतें. त्यास दरबारी मंडळांत रोषचिन्हें मुदलींच दिसत नाहींत. इतकेंच नव्हे तर उलट मुबलक देणग्यांनीं व शाबासक्यांनीं त्याची प्रतिष्ठा करण्यांत येते; कारण तो इष्ट गोष्टी तडीस नेतो, व हुद्यावरील मनुष्यानें करावें असें वाटतें तें सर्व कांहीं करितो. तो कोणतें तरी एक प्रधानमंडल अस्तित्वांत राखितो व त्यास होईल तितकें स्नेहहीन व निर्बल करून सोडितो.

तथापि अशा मुत्सद्यांचे विरुद्धपणांत जीव आहे असें आपण समजणें चुकीचें होईल. त्यांच्या योगानें मंत्रिमंडळाचें निर्जीवत्व स्पष्ट झाल्यावर आपलेंही निःसत्व त्यांस लौकरच समजून यावयाचें असतें. एखाद्या गोष्टींत ते विरुद्ध असल्यास त्यांस यश कधींच यावयाचें नाहीं.

अधिकार, सत्ता, धन, योग्यता, वक्तृत्व, मंत्र, चातुर्य, व एकी ह्यां-पैकीं कशासच कांहीं महत्व रहात नाहीं; पण केवळ दरबारच्या वजनानें कोणाच्याही मदतीशिवाय व कांहीं एक व्यवस्थेशिवाय राजकार्य पूर्णपणें पार पडतें असें त्यांस व सर्व जगास लौकरच विदित व्हावयाचें असतें.

जेव्हां एखाद्या प्रतिपक्षाचा नाश करावयाचा असेल तेव्हां चौकडी त्या कृत्यांत बहुतकरून स्वतः पडत नाहीं. त्या पक्षाचें मत ज्याच्या-विषयीं फार चांगलें असतें अशा एखाद्या मनुष्यास ते निवाडितात. ह्या मनुष्यास ते निरनिराळ्या थापा देऊन फसवितात. त्याचा आपल्या मित्रावरील भरंसा ते प्रथम उडवितात व नंतर त्यांच्यांत कलह उत्पन्न करितात; शिवाय त्याच कपटप्रयोगानें त्यांच्यांत त्या मनुष्याविषयीं ते तसाच अविश्वास उत्पन्न करितात. अशा रीतीनें घडून आलेल्या स्थित्यंतरांत परस्परभीतीमुळें व अन्योन्य अविश्वासानें तो दुसऱ्याचे हातां-तील शस्त्र होण्यास तयार होतो. नंतर त्याचा भरंसा ज्यावर बसला असेल व जो त्याच्या अनुयायी मंडळापैकीं बरेच लोकांस आपणाकडे ओढून घेऊं शकेल त्यास त्याचे जागीं नेमून त्याचाही क्रमाक्रमानें नाश करण्यास ते चुकत नाहींत.

ह्या रीतीनें तो आपल्या पक्षास अंतरला ह्मणजे त्यांतील कोणा एकाचे विरुद्ध अन्याय्य व वैमनस्योत्पादक एखादी भयंकर गोष्ट उघड उघड करण्याचें त्यास लौकरच भाग पडतें. उदाहरणार्थ एखाद्या मित्राची जिनगी खालसा करणें. असें झालें ह्मणजे त्या पक्षांत समेट कधींच होऊं नये अशी अवस्था करण्याची चौकडीस उमेद येते. तात्पर्य, त्यांनीं वस्तुमात्रास असें कांहीं स्वरूप दिलें आहे कीं त्यायोगें प्रधान सूत्रधारापेक्षां गौण बाहुल्यांचाच लोक अधिक द्वेष करितात.

ज्याप्रमाणें प्रतिपक्षांचा नाश करण्याचे कामीं ते प्रत्यक्ष आपल्या पक्षांतील लोकांचा उपयोग कधींच करीत नाहींत त्याचप्रमाणें आपल्या मित्रास उदयास आणण्याचे कामींही ते तसेच वागतात. त्यां-पैकीं कोणास एखादा मोठा हुद्दा मिळवून द्यावयाचा असेल किंवा

दुसरी कांहीं प्राप्ति करून द्यावयाची असेल तर नामधारी प्रधानमंडळाचे हातूनच त्याची शिफारस करविण्याची ते तजवीज करितात. पण अशी शिफारस मंत्रिमंडळाच्या मोठेपणाचें चिन्ह व शक्तिविस्ताराचें साधन होय असें जगास वाटेल; तर हा भ्रम दूर करण्यासाठीं ह्या उदयास पावलेल्या लोकांस सर्व समाजांत हरतऱ्हेनें असें प्रसिद्ध करण्याची सूचना पोंहोंचली असतें कीं आह्मांवर प्रधानमंडळाचे कांहींच उपकार नाहींत; आम्हांस आमचा हुद्दा निराळ्याच ठिकाणाहून मिळाला आहे; व आह्मी पूर्णपणें मोकळे व स्वतंत्र आहों.

जेव्हां या स्वार्थसाधु लोकांस आपलें कांहीं हित साधावयाचें असतें अथवा कोणाचा सूड घ्यावयाचा असतो त्यावेळची त्यांची रीति अशी आहे. ज्या लोकांच्या मित्रांवरून, त्यांच्या वर्तनावरून, त्यांच्या तत्त्वांवरून व त्यांच्या भाषणांवरून त्यांच्या हातून अशीं कृत्यें कधींच घडावयाचीं नाहींत अशी लोकांची खात्री असते त्याच लोकांकडून ते तीं कृत्यें करवून घेतात. ह्या रीतीनें ते लोक अप्रिय झाले ह्मणजे लागलेच परतंत्र होतात; व खासगी मैत्रीच्या अथवा सामाजिक तत्त्वांच्या लक्षणांवर लोक भरंसा कधींच ठेवीनातसे होतात.

जर प्रधानमंडळ कधीं कधीं शिथिलतेनें व कधीं कधीं अप्रियतेच्या भीतीनें लोकांच्या अमर्याद वर्तनास शिक्षा करणार नाहीं तर चौकडी तत्क्षणींच आपला एक मनुष्य पुढें करून त्याजकरवीं, सरकारची निर्लज्जपणें मानहानि केल्याबद्दल, मंत्र्याविरुद्ध ओरड करवितात. नंतर प्रधानमंडळाचे फजितीस कारण झालेल्या ह्या मनुष्यावर बक्षिसें व मान यांचा वर्षाव करण्यास चौकडी प्रधानमंडळासच भाग पाडिते; व नीच लोकांच्या बेताल वर्तनासंबंधानें कायदा शिथिल केल्याबद्दल प्रथम उच्च प्रतीचे लोकांत त्यांची मानखंडना केल्यानंतर ( जणूं काय पूर्वींचे स्तुतीसाठींच प्रायश्चित्त भोगण्याकरितां ) त्यांजवर एकादें घोर व जुलुमाचें कृत्य करण्याचा ती प्रसंग आणिते, त्यामुळें तर ते लोकांत अगदींच अप्रिय होऊन जातात. मिड्ल्सेक्सच्या निवडणुकीचे वेळीं झालेलीं बंडें, चालू पार्लमेंटाची सुरवात व सेन्ट् जार्ज फील्ड्चे

संबंधानें झालेल्या घडामोडी यांची ज्यांस आठवण असेल त्यांस वरील विधानांचीं उदाहरणें मिळविण्यास कठिण पडणार नाहीं.

आपल्या संस्थेचे उद्देश सफल करण्याचें आपल्यास सामर्थ्य यावें म्हणून ह्या पक्षाचे लोक राज्यांतील उच्च व जबाबदारीच्या जागा पटकाविण्याकडे कधींही लक्ष ठेवीत नाहींत. ते गौण पण महत्वाचे खात्यांतील व तसेंच राजघराण्याचे खासगी तैनातीच्या सर्व जागा मोठ्या हिकमतीनें व हुशारीनें मिळवितात. ह्या रीतीनें राजदर्शनाचे सर्व मार्ग ते आपल्या ताब्यांत घेतात; व आपल्या हिताहिताप्रमाणें कोणत्याही सूचनेस मदत देतात किंवा तीस हाणून पाडितात. कारण भरपूर पगाराच्या सभ्य हुद्यांचेमुळें कां होईना त्यांस जें वजन व जें पाठबळ मिळतें त्यायोगें त्यांस मुख्य मुख्य हुद्यांचें सर्व महत्व प्राप्त होतें; व ते प्रत्येक कामांत उघडपणें व कधीं कधीं तर मोठेपणाचे डौलानेंही हुकूम फर्मावीत असतात. जेव्हां जेव्हां त्यांचा व नामधारी पुढाऱ्यांचा मतभेद होतो ( असे प्रसंग बरेच येतात ) व नामधारी प्रधान आपली स्थिति ध्यानांत आणून आपण होऊनच वेळेवर आपलीं मतें सोडून देत नाहींत तेव्हां तेव्हां कवाईत शिकून तयार झालेले लोक इशारत मिळाल्याबरोबर लागलेच त्यांस येऊन मिळावयाचेच. अशी गोष्ट पुष्कळदां घडते. चौकडीस ह्या मुख्य हुद्देदारांस निंदास्पद व हास्यास्पद करून काय आनंद होतो याची अपरिचित मनुष्यास मुदलींच कल्पना करितां यावयाची नाहीं. ज्यावेळीं नामधारी प्रधानमंडळाची अशी स्थिति होते त्यावेळीं चौकडीस पूर्ण पाठबळ मिळण्याचा फारच संभव असतो.

राज्यांतील अशाश्वत उच्च जागा न मिळाल्यामुळें दरबारी पक्षाच्या लोकांचें कांहींच नुकसान होत नाहीं; कारण प्रत्येक कामांत त्यांस मुखत्यारी मिळते इतकेंच नव्हे, तर त्यांस जरा अप्रसिद्ध पण फायदेशीर जागा पूर्ण निर्भयतेनें उपभोगितां येतात. त्यांच्या सर्व जागा आमरण चालावयाच्या असतात असें स्पष्टपणें कायद्यानें ठरलेलें असतें अथवा तसें तें घडावयाचें असतें. राज्यांतील अत्युच्च व सभ्य लोक ज्यावेळीं टेनिस् क्रीडेंतील कंदुकाप्रमाणें अंध व उद्धत लोकांचे तरंगानुसार इक-

डून तिकडे व तिकडून इकडे फेंकिले जातात त्यावेळीं वरील पक्षांतील अति क्षुद्र प्राण्याकडे सुद्धां कोणत्याही मंत्र्याच्यानें वांकड्या दृष्टीनें पहावत नाहीं. ह्या पक्षांतील कोणाचे विरुद्ध जर कांहीं करण्यांत आलें तर तो लागलाच देवालयांत शिरतो व आपणास कोणाचाही धक्का पोहोंचूं नये ह्मणून आपणास मिळालेल्या अनुल्लंघनीय वचनांचा गीतापाठ सुरू करितो. तो ज्या विशेष जागेवर काम करीत असेल त्या जागेवरून सार्वजनिक व्यवस्थेच्या सोईकरितांही त्यास कोणाच्यानें दूर करितां येत नाहीं. आणि कोणी प्रबल प्रधानानें एखाद्याविरुद्ध कधीं प्रयत्न केलाच तर तो निःसंशय त्याच्या स्वतःचेच नाशाचा उपोद्घात होतो.

आपण स्वतंत्र आहों असें त्यांस पक्कें माहीत असल्यामुळें ते रंगभूमीवरील मंत्र्यांजवळ आढ्यतेच्या तोऱ्यानें वागतात. भाडोत्री स्विस् शिपायांप्रमाणें ( जानिसारिस्प्रमाणें ) दास्यापासूनच त्यांस एका प्रकारची स्वतंत्रता प्राप्त होते. आपल्या संस्थेचा मुख्य मुद्दा ते विसरले नाहींत ह्मणजे झालें; मग त्यांस मनःपूत आचरण करण्याची मुभा असते. ह्मणून ज्या पक्षांत मनुष्यास अतिशय मनोवेधक व बाह्यात्कारी अति विसंगत अशा गोष्टी प्राप्त करून घेऊन त्यांची सांगड घालितां येते ह्मणजे ज्या पक्षांत मनुष्यास स्वातंत्र्यतेज आंगीं खेळल्यानें होणारा आनंद व दास्यानें प्राप्त होणारें मोठें डबोलें व लठ्ठ लठ्ठ बक्षिसें ह्या गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून मिळवितां येतात त्या पक्षास जाऊन मिळण्याची मनुष्यमात्रास उत्कट इच्छा व्हावी यांत कांहींच नवल नाहीं.

येथपर्यंत या नवीन व सनदी दरबारी मंडळीच्या व्यवस्थेचें, कार्याचें, व कारस्थानाचें थोडक्यांत पृथक्करण झालें. स्वतःच धारण केलेल्या ‘ राजसेवक ’ अथवा ‘ राजमित्र ’ या नांवानें हे लोक आपणांस प्रसिद्धीस आणीत आहेत; व ह्याप्रमाणें महाराजांचे इतर सर्व राजनिष्ठ व ममताळू प्रजेस दुष्टपणें त्या वर्गांतून बाहेर ढकलूं पहात आहेत. हीं बहिर्गत व अंतर्गत प्रधानमंडळें मिळून सर्व पद्धतीस

दरबारी भाषेंत बहुतकरून Double Cabinet डबल कॅबिनेट् असें ह्मणण्याचा प्रघात आहे.

वरील प्रकार एखाद्या माथेफिरूच्या डोक्यांतून निघालेला आहे, अथवा दुष्टबुद्धीनें रचिलेला आहे, अथवा देशांतील स्वार्थसाधुमंडळाचें अस्तित्वद्योतक आहे हें मांगील आठ वर्षांच्या वस्तुस्थितीवरून ठरविलें पाहिजे. वरील ह्मणण्याच्या सत्यतेस पुष्टता आणणारें असें जो कधींच बोलला नाहीं असा सरकारी अथवा खासगी सार्वजनिक मनुष्य एकही मिळणार नाहीं अशी माझी खात्री आहे. विशेषेंकरून हल्लींच्या वेषधारी प्रधानमंडळांतील लोकांचें भाषण फारच कडक आहे व त्यांच्या अश्राव्य तक्रारी फारच जोरदार आहेत. कारण त्यांच्या कारकीर्दींत स्वार्थसाधुपक्षाची सत्ता वाढून तो इतका उद्धत झाला आहे कीं त्यामुळें प्रधानमंडळाचा कदाचित् शेवटीं नाश होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे.

सुमारें चार वर्षांपूर्वी मार्किस् ऑफ् रॉकिंगहॅम्च्या मंत्रिमंडळाचे वेळीं त्या दरबारी पक्षाचे संमतीवांचून राज्यव्यवस्था चालविण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता, हें खरें; तथापि तें केवळ क्षणिक अवडंबर होतें; त्यामुळें तो पक्ष क्षणभरच अदृश्य झाला होता; आणि कांहीं वेळानंतर जेव्हां तें मंत्रिमंडळ वाताहत झालें तेव्हां त्या पक्षाचा तारा जास्त तेजानें व फारच मोठ्या महत्वानें चमकूं लागला. त्याच वेळीं वरील मंत्रिमंडळानें ( पण ' मूले कूठार ' करण्याकडे त्यांचें लक्ष नव्हतें. ) त्या पक्षाचे सेनेची धुळधाण करण्याचा, त्यांच्या तत्त्वांस खो देण्याचा, निराळ्या मंडळ्या पुनरपि स्थापित करण्याचा, व्हिग् लोकांच्या विचाराचें व राजनीतीचें ग्रहण करण्याचा, व मंत्रिमंडळाच्या आश्रयानें स्वातंत्र्यदेवतेच्या पक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचा एक प्रयत्न केला; व सत्ता नसतांना ह्मणजे सत्ताधारी प्रधानांस अडथळा करितांना प्रकट केलेल्या सर्व मतांस अनुसरणारे मंत्री प्रथम त्याचवेळीं दृष्टीस पडले. अशा मंत्र्यांचा दरबारी कटानें तिरस्कार केला, व त्यास भयंकर अडथळे आणिले, आणि अशी पद्धति केवळ क्षणभरच टिकली यांत कांहीं संशय नाहीं.

ह्या अद्वितीय पक्षाचे वर्णनांत तदग्रेसर जो अर्ल् ऑफ् ब्यूट् त्याचें मी नामसंकीर्तनही करूं नये हें कदाचित् मतलबीपणाचें दिसेल. पण यांत कांहीं मतलब साधावयाचा नाहीं किंवा निष्काळजीपणाही प्रदर्शित करावयाचा नाहीं, व्यक्तिमात्रास अनुलक्षून लिहिण्याचें टाळवेल तितकें टाळण्याचा मीं प्रयत्न केला आहे. ज्या प्रकारांनीं या कुलीन मनुष्यास काळिमा येऊं पहात आहे त्यांतील बहुतेक भाग अन्याय्य व क्षुल्लक आहे. फार तर त्या प्रकारांनीं असें मात्र घडून येण्याचा रंग दिसत आहे कीं, ह्या बिकट प्रसंगींच्या द्वेषास भलतीच दिशा मिळून, सामाजिक संकटास कदाचित् व्यक्तिविषयक हलकट भांडणाचें अथवा भयंकर राष्ट्रकलहाचें स्वरूप प्राप्त होईल. ज्या ठिकाणीं अनेक कृत्यें नित्य नियमानें होत आहेत त्या ठिकाणीं त्यांत गुंतलेला कोणी विशेष मनुष्य भयंकर आहे असें नाहीं तर ती पद्धतिच खरोखर फार भयंकर असते. ही पद्धति लॉर्ड् ब्यूट्च्या महत्त्वाकांक्षेंतून उदय पावली नाहीं तर अनुकूल परिस्थितीपासून व आमच्या बडे लोकांत कांहीं दिवसांपासून वाढत असलेल्या राज्यव्यवस्थेच्या बेपर्वाईपासून ती उत्पन्न झाली आहे. अर्ल् ऑफ् ब्यूट्चा जरी या जगावर अवतार झाला नसता तरी सुद्धां यांस तिचें सुख भोगावें लागलें असतें, आणि अर्ल् ऑफ् ब्यूट्चें देहावसान झाल्यावरही तीस कारस्थानी डोक्याची किंवा उद्योगी लोकांची उणीव मुळींच भासणार नाहीं. म्हणून लॉर्ड् ब्यूट्वर ताशेरा झाडण्यापेक्षां जर दरबारी पक्षाचे व त्याच्या कृतींचे विरुद्ध आपण दृढनिश्चयानें व एकदिलानें खटपट केली तरच वर्तमान स्थितींतून पार पडण्याची आम्हांस कांहीं तरी आशा बाळगितां येईल.

ह्या स्थळीं लॉर्ड ब्यूट्चा व्यक्तिविषयक विचार मुदलींच न करण्यांत माझा आणखी एक उद्देश आहे. राज्यव्यवस्थांतर्गत आमच्या बहुतेक लोकांशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध क्वचित्च आहे. अशा रीतीनें वागण्याची त्याची वहिवाटच पडून राहिली आहे. त्या लोकांच्या सभोवतीं आपल्या लोकांची भरती झाली ह्मणजे त्यास पुरे आहे. यामुळें आपला लॉर्ड ब्यूट्शीं प्रत्यक्ष संबंध आला नाहीं ह्मणजे झालें.

आपणास त्या पक्षाचें कोणतेंही काम करण्यास कांहीं हरकत नाहीं असें पुष्कळांस वाटतें. जो कोणी परस्परविलग्न, विश्वासहीन, बंधहीन, व मतैक्यहीन अशा लोकांच्या प्रधानमंडळांत अथवा राष्ट्रांतील कोणत्याही पक्षाचें पाठबळ नसल्यामुळें जात्याच दुर्बल अशा प्रधानमंडळांत शिरतो; आणि जो कोणी लोकांतील निरनिराळ्या पक्षांचा व परस्पर विश्वासाचा नाश करण्यास, अथवा मंत्रिमंडळाची रचना व्यक्तिमात्राचे इच्छेवर व मर्जीवर सोंपवून देण्यास कोणत्याही रीतीनें साहाय्य करितो त्याचा व लॉर्ड आफ् ब्यूट्चा अर्थाअर्थीं कांहीं संबंध येण्याचा संभव नसेल. तो लॉर्ड आफ् ब्यूट्चा शत्रु असो किंवा मित्र असो (त्याचा या प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं.) तो कोणी कां असेना, तो आपल्या देशास धुळीस मिळविण्यास उद्युक्त झालेल्या स्वार्थसाधुपक्षास भर देतो यांत शंका नाहीं. तो स्वदेशस्वातंत्र्याचे पायास धक्का पोंहोंचवितो, देशांतील शांतता लयास दवडितो, खालसा देशांतील आमचा अंमल शिथिल करितो, व यूरोपांतील राष्ट्रपद्धतींत आमचें महत्व कमी करितो असेंच ह्मटलें पाहिजे.

ही "दोस्तशाही," जात्याच बहुतेक लोकनियुक्त अशा राज्यव्यवस्थेंत विलक्षण रीतीनें घुसल्यामुळें राष्ट्रांतील हल्लींचा घोटाळा उत्पन्न झाला आहे. त्याचा तात्विकदृष्ट्या विचार करण्याचे श्रम न घेतां लोकांस त्याचे परिणाम स्पष्ट दिसतील. ते, जबर जुलुम, आगन्तुक सुधारणेची उठाठेव, व राज्यव्यवस्थेच्या सर्व कामांत साधारण अव्यवस्था हे होत. ह्या पद्धतीकडेच माझें सारें लक्ष आहे. तज्जन्य गोष्टींचें वर्णन मी जेव्हां जेव्हां करीन तेव्हां तेव्हां ते मुख्य पद्धतीच्या स्पष्टीकरणापुरतेंच असेल. आमचीं पोटें फुगून जाईपर्यंत निरनिराळ्या शेंकडों नव्यांचें जें आह्मी पाणी प्यालों तें सर्व ह्याच झऱ्याचें होय. प्रधानमंडळाच्या रचनेच्यासंबंधांत राजाचे सारासार विचारावर सोंपविलेल्या सत्तेचा दुष्ट व अप्रबुद्ध लोकांनीं असा दुरुपयोग केल्यामुळें ही पद्धति उत्पन्न झाली आहे. तिनें कोणत्याही कायद्याच्या शब्दाचें प्रत्यक्ष उल्लंघन होत नाहीं तरी तिचीं सर्व कृत्यें राज्यव्यवस्थेच्या उद्देशांस अपायकारक आहेत.

विधायक सत्ता नेमण्याचे कामीं दोस्तशाहीचें अवलंबन करणें हें आमच्या नियामक सत्तेच्या रचनेविरुद्ध आहे. आमच्यासारख्या मिश्र सत्तेचा ह्मणजे राजा, उच्च लोक व कनिष्ठ लोक, यांनीं बनविलेल्या राजसत्तेचा मुख्य उद्देश राजास कायद्याचें उल्लंघन करितां येऊं नये हा होय. हें फारच उपयुक्त व मूलाधारभूत आहे. पण हाही अकरणरूपी फायदा आहे, ह्मणजे याचा उपयोग लढाईत केवळ संरक्षक चिलखताप्रमाणेंच आहे हें उघड आहे. ह्मणून त्यापुढचा व तितक्याच महत्वाचा खालील मुद्दा होय. राजाच्या सारासार विचारावर सोंपविलेल्या सत्तेचा—मग ती कायदे बजाविण्याची असो, किंवा मोठमोठ्या नेमणुका करण्याची असो, अथवा युद्धाची व शांततेची व्यवस्था करण्याची असो, अथवा वसूल गोळा करण्याची कां होईना—लोककल्याणाकरितां व राज्यहिताकरितांच उपयोग झाला पाहिजे; तिचा दरबारच्या आवडनावडीप्रमाणें, किंवा मतलबाप्रमाणें, किंवा कारस्थानानुरूप उपयोग होतां कामा नये. कायद्याबरहुकूम राज्यव्यवस्था होणें जितक्या महत्वाचें आहे तितक्याच महत्वाची वरील गोष्ट होय. कायद्याची धांव केवळ कुंपणापर्यंत असते. राज्यव्यवस्था वाटेल तशी असो, तिचा फारच मोठा भाग, प्रधानांच्या हुशारीवर व प्रामाणिकपणावर सोंपविलेल्या सत्तेच्या उपयोगावर अवश्य अवलंबून आहे. कायद्याची सर्व उपयुक्तता व शक्ति कायती प्रधानांवर अवलंबून आहे. त्याशिवाय तुमची प्रजासत्ता केवळ कागदावरील घोडा होय; ती सजीव, चपल व उपयुक्त देहांत वास करणारी नव्हे. प्रधान लोक दुर्लक्षानें, अज्ञानानें, अथवा कावेबाज मतलबानें राज्यव्यवस्थेचा कांहीं भाग तसाच पडूं देतील; दुसऱ्याचे उद्देश तडीस जाऊं देणार नाहींत; व देशास अत्यंत हितावह सर्व गोष्टी नष्ट होऊं देतील; व इतकें करूनही आपणावर फौजदारी खटला कोणत्याही तऱ्हेनें शेकला जाणार नाहीं अशी त्यांस खबरदारी घेतां येईल. ह्मणून राज्यांतील विधायक सत्तेच्या जागांची योग्य व्यवस्था करणें शहाण्या सरकारचे कर्तव्यमर्यादेबाहेरील नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांतच आपली

इतिकर्तव्यता आहे असें त्यानें मोठ्या प्रेमानें समजलें पाहिजे. ह्मणून जेव्हां नवीन पद्धतीचे पुरस्कर्ते आह्मांस असें सांगतात कीं ' आह्मांत व आमच्या प्रतिपक्षांत केवळ सत्ताविषयक कलह आहे व ह्मणून तुमचें त्यांत कांहीं एक हिताहित नाहीं;' तेव्हां या शब्दांनीं आमची बेअदबी करणाऱ्या त्या उद्धत लोकांस आह्मीं असें प्रत्युत्तर केलें पाहिजे कीं, ' आह्मांस जीव कीं प्राण असणाऱ्या प्रत्येक गोष्टीची व्यवस्था लावणारे लोक कोण व कोणत्या प्रकृतीचे आहेत याविषयीं आह्मांसच अवश्य आस्था बाळगिली पाहिजे. ' एक तर आह्मी पूर्ण निराश झाल्याशिवाय, नाहींतर ' असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी ' असें ह्मणून स्वस्थ बसणाऱ्या मूर्ख लोकांप्रमाणें स्वस्थ बसल्याशिवाय, या कामीं राष्ट्रास औदासिन्य प्राप्त व्हावयाचें नाहीं. सर्व लोक सदाचारी आहेत असें ह्मणण्यास, ज्यांच्या ओंठावरचा जारही अजून वाळला नाहीं, अशा लहान बालकांपेक्षांही लहान बालकांचा भोळेपणा आह्मांस स्वीकारिला पाहिजे. त्याचप्रमाणें सर्व जग एक जात दुष्ट व दुराचारी आहे असें समजण्यास आह्मांस निःसंशय असुरी कौटिल्य पतकरिलें पाहिजे. मनुष्यें खासगी व्यवहारांतल्याप्रमाणें सामाजिक कामांतही कांहीं चांगलीं व कांहीं वाईट असतात. चांगल्यास उदयास आणण्याचा व वाईटास अस्तास दवडण्याचा खऱ्या राजनीतीचा मुख्य उद्देश असला पाहिजे. परंतु ज्या राज्यपद्धतींतील प्रत्यक्ष संस्थांनीं अथवा त्यांच्या प्रत्यक्ष प्रवृत्तींनीं राज्यव्यवस्था अत्यंत विश्वासु लोकांच्या हातांत पडण्याची तजवीज झालेली नसते, पण सर्व विधायक पद्धति एका व्यक्तीच्या, मग ती कितीही अप्रतिम व सदाचारी असो, अप्रतिबंध इच्छेनुरूप व्हावयाची असते त्या राज्यव्यवस्थेचा तोच भाग सदोष असतो इतकेंच नव्हे तर तिचा प्रत्येक भाग त्यायोगें अशुद्ध होतो.

जुलमी राज्यांत नियामक सत्तेच्या रचनेनुरूप प्रधानमंडळाची रचना असते. कायदा व न्यायाधीश दोन्हीही कळसूत्री बाहुलीं असतात. हें यथास्थितच आहे. ह्या गोष्टीचा जेमतेम विचार केला तरी सुद्धां

असें स्पष्ट दिसून येईल कीं, प्रत्येक राज्यांत नियामकमंडळानुरूपच प्रधानमंडळ असलें पाहिजे. नाहींतर वस्तुस्थिति भयंकर, अव्यवस्थित, व अस्ताव्यस्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. स्वतंत्र राज्यांतील ज्या लोकांनीं सामान्य संमतीवांचून कायदा होऊं द्यावयाचा नाहीं अशी काळजी घेतली आहे ते लोक, ज्यावर आपला भरंसा नाहीं आणि राज्यप्राणरक्षक सत्ता धारण करण्याची ज्यांची योग्यता लोकप्रियतेनें व लोकविश्वासानें स्थापित झाली नाहीं, अशा लोकांचे हातीं विधायक सत्ता सोंपविण्याइतके मूर्ख कधींही असणार नाहींत.

न्यायाधीशांची नेमणूक सर्वसंमत होणें व बक्षिसांची व पदव्यांची वांटणीही लोकमताप्रमाणें होणें हा स्वतंत्र राज्याचा मुख्य फायदा होय. त्याशिवाय अथवा तशाच दुसऱ्या बाबींशिवाय कदाचित् लोकांस खरें स्वातंत्र्य चिरकाल उपभोगावयास मिळावयाचें नाहीं; उत्तम राज्यव्यवस्थेचें पाणीदार तेज तर त्यांच्या तोंडावर कधींच दिसावयाचें नाहीं. आमच्या राज्यव्यवस्थेच्या रचनेप्रमाणें अशी निवड प्रत्यक्ष होणें दुरापास्तच आहे. तरी पण आमची राज्यव्यवस्था या बाबतींत कोणत्याही प्रजासत्ताक राज्यांतील मतस्वातंत्र्याच्या विस्ताराइतकीच व ( तिचें अंतरंग सुरक्षित होतें तोंपर्यंत ) किंबहुना त्याहूनही जास्त गुणावह आहे. जोंपर्यंत लोकाप्रिय व्यक्तींचे हातांत सत्ता नाहीं व जोंपर्यंत दरबारांत स्वार्थसाधनपटुत्व वास करीत आहे व त्यावर राष्ट्राचा भरंवसा नाहीं तोंपर्यंत सरकारास मदत करावयाची नाहीं हें पार्लमेंट्चें पहिलें कर्तव्यकर्म आहे असें कालपर्यंत समजलें जात होतें. ह्याप्रमाणें नित्य कारस्थानांपासून उत्पन्न होणाऱ्या, अरिष्टावांचून व प्रत्येक जागेकरितां लोकमतानें निवड करण्याचे कामीं देशभर उघड उघड होणाऱ्या घोंटाळ्यावांचून आह्मांस लोकसंमत नियोजनाचे सर्व फायदे प्राप्त होत होते. हा आमच्या राज्यव्यवस्थेचा उत्तम व शुद्ध भाग होता. लोकांस आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत व बडे लोकांचे मार्फत कायदे करण्यांत विचारस्वातंत्र्य मिळत असे; व राजास नकारस्वातंत्र्य असे. राजास वाटतील ते लोक हुद्यावर नेमण्याचा अधिकार असे; व लोकांस

पार्लमेंट्च्या मुखानें पैशाची मदत नाकारितां येत असे. प्रधानांस पूर्वी जो पार्लमेंट्चा दरारा वाटत असे व पार्लमेंट्ही पूर्वी जें लोकांस सन्माननीय वाटत असे त्याचें कारण हाच नियंत्रणाधिकार होय. जर प्रधानमंडळाच्या रचनेविषयीं व त्यांतील लोकांविषयीं हा नियंत्रणाधिकार उपयोगांतून गेला तर पार्लमेंट् व सर्व कांहीं नष्ट झालें ह्मणून समजावें. जर एखादें पार्लमेंट्, दुष्ट लोकांची एकवार परीक्षा पाहण्याचे मिषानें, आणि सत्ताधारणानें ते सुधारतात किंवा नाहींत व त्यांचीं कृत्यें त्यांच्या नीतीपेक्षां चांगलीं आहेत किंवा नाहींत हें ठरविण्याचे आशेनें, देशांतील प्रत्येक भक्कम किल्ला त्यांस स्वस्थपणें हस्तगत करूं देईल व तेथें सर्व सामग्री मिळवून तटबंदी करण्याचा त्यास अवकाश देईल तर त्या पार्लमेंट्चे प्रसिद्ध केलेले उद्देश कांहींही असोत ते त्यांच्या कृतींस एकजात अनुमोदन देण्यास चुकणार नाहीं हें आपण पक्कें समजावें.

प्रत्येक चांगल्या राजकीय संस्थेचे प्रतिबंधक व प्रतिकारक असे दोन प्रकारचे प्रयत्न असले पाहिजेत. वाईट लोक सरकारांतून घालविण्याचा व राज्याचे कुशलतेकरितां केवळ भावि शासनांवर अवलंबून न राहण्याचा तिचा नैसर्गिकच कल असला पाहिजे. कारण शासन हें सदोदित मंद व अनिश्चित असतें; व जेव्हां सत्ता वाईट लोकांच्या हातीं जाते तेव्हां तें कदाचित् अपराधी मनुष्यापेक्षां पीडित मनुष्यासच भोगावें लागण्याचा विशेष संभव असतो.

राज्यांतील मोठमोठ्या जोखिमेचीं कामें व्यक्तिमात्रांचे हवालीं करण्यांत येण्यापूर्वी त्यांनीं आपल्या कृतीनें इतकी लोकप्रियता संपादन केलेली पाहिजे कीं तीवरून ह्यांच्या हातून कामाचा बिघाड तरी व्हावयाचा नाहीं अशी लोकांस थोडी तरी खात्री वाटली पाहिजे. जर मनुष्याचे वर्तनाच्या साधारण धोरणावरून आपल्या नागरिक लोकांची प्रीति, शाबासकी, व विश्वास संपादन करण्याचा त्याचा मुख्य उद्देश आहे असें दिसून येत असेल; आणि नित्य लोकनिंदेस अथवा प्रसंगविशेषीं लोकप्रियतेसही पात्र न होतां जर त्यानें आपली वर्तमान सत्ता

व संपत्ति क्रमाक्रमानें मिळविली असेल तर तो, आपल्या सत्तेचा सदुपयोग करील असें खात्रीनें सांगतां येईल.

ज्या मनुष्यास सत्ता प्राप्त होण्यापूर्वीं मित्र नव्हते, अथवा ज्यास सत्ता प्राप्त झाल्यावर आपल्या मित्रांस सोडणें भाग पडलें, अथवा सत्ता गेल्यावर होणाऱ्या दुःखाचे वांटेकरी होण्यास मित्र नाहींत, ज्याचें कोणत्याही श्रीमंत अथवा व्यापारी लोकांत वजन मुळींच नाहीं, पण ज्याचे वजनास सत्तेबरोबरच आरंभ झाला आहे व तिच्याबरोबरच ज्याचे वजनाचा अंत खात्रीनें होणार आहे; त्या मनुष्यास जोखिमेच्या जागीं नेमिल्यामुळें आमच्या राज्यव्यवस्थेचीं प्रधानसूत्रें त्याजकडे गेलेलीं पाहून नियामक पार्लमेंट्च्या पायांची आग मस्तकास जाऊन पोंहोंचली पाहिजे; कारण अशा मनुष्याचा लोकहिताशीं मुदलींच संबंध नसतो.

तसेंच आपला एकीकृत दुष्टपणा जास्त किमतीस विकण्यास जे बोलूनचालून कांहीं एक सामाजिक तत्त्वाशिवाय एकत्र जमले आहेत व ह्मणूनच सार्वजनिक द्वेषास प्राप्त झाले त्या लोकांचे कंपू अथवा चौकड्या राज्यांत कधींही प्रबल होऊं देतां कामा नये; कारण त्यांचा लोकांच्या मनोविकारांशीं व विचारांशीं मुदलींच संबंध नसतो.

ह्या विचारांवरून माझ्या मतें, स्वतंत्र देशांत व स्वतंत्र पार्लमेंटांत प्रधानांस पाठबळ देण्यास, ते राजनियुक्त आहेत ह्या स्वल्प कारणापेक्षां जास्त सबळ कारण असणें अवश्य आहे हें स्पष्ट आहे. तेवढेंच कारण बस्स आहे असें ह्मणण्यांत कांहीं दरबारी संभावितपणा आहे. परंतु आमच्यासारख्या राज्यव्यवस्थेंत पुढारी लोकांचे डोळे देशावरून काढून दरबाराकडे वळविण्याच्या दुष्ट उद्देशाचें वरील तत्त्व साधन असल्यामुळें तें अपकारकच होय. ज्या मार्गानें सत्ता संपादन करितां येते त्याच मार्गांत लोकांची दाटी असावयाची. जर सत्ता अथवा मान संपादन करण्याचे कामीं लोकप्रियता अगदीं निरुपयोगी ठरेल तर ती ज्या गुणांनीं बहुतकरून प्राप्त होते त्या गुणांचें बीजारोपण पुढें कधींही होणार नाहीं. आणि राज्यव्यवस्थेच्या कामीं सत्तातृष्णेस लोकप्रियतेची जरूर नाहींशी करणें, व राजे, प्रधान व सार्वजनिक

लोक याच्या निर्मल नीतिव्यापारावरच सर्व गोष्टींचा हवाला देऊन बसणें आमच्यासारख्या लोकनियुक्त राज्यांत योग्य आहे कीं काय याचा विचार करणें इंग्लंडांतील लोकांच्या अकलेवर व शहाणपणावरच सोंपविलें पाहिजे.

धूर्त लोक या ठिकाणीं बहुशः पुढें सरून वरील मुद्याचें प्रत्यक्ष खंडन न करितां असें प्रतिपादन करितील कीं प्रजेचा अस्सल शब्द व तिचे विचार तद्भ्रांत्युपादक स्वार्थसाधुपक्षाचे ध्वनींतून ओळखून काढणें राजास फार कठीण पडतें. ते म्हणतात--राष्ट्रांत सर्वथैव असंमेल्य विचारांचे व मनोविकारांचे बहुतकरून सदोदित बरेच पक्ष असतात. जर त्यांपैकीं एकाचे स्वाधीन राजा आपली व्यवस्था करील तर तें बाकीच्यांस खात्रीनें रुचणार नाहीं; जर तो सर्व पक्षांतील कांहीं लोक निवडून काढील तर सर्वच पक्षांशीं कडु होण्याचें त्यास भय आहे. जे वगळले जातील ते पूर्वीं कितीही विभिन्न असले तरी एकदम एकत्र जमून एक जंगी प्रतिपक्ष तयार करितील; अशा रीतीनें पुष्कळ वितुष्टें एकाच केंद्रांत जमल्यामुळें तो पक्ष बराच कडक व प्रबल होईल. स्वार्थसाधुपक्षांच्या आरोळ्यांचा प्रतिध्वनि राष्ट्रभर पसरेल व सर्वच गजबजून गेल्यासारखें दिसेल; व ज्या शांतपणानें राज्यापासून होणारें सुख उपभोगावें अशी सदाचारामुळें व समवृत्तीनें सज्जनांची प्रवृत्ति होते तोच शांतपणा धारण केल्यामुळें पुष्कळ चांगले लोक देशांतून नाहींसेच झाल्यासारखें वाटेल. शिवाय अगदीं खालच्या प्रतीचे लोक अज्ञान व अस्थिर असल्यामुळें केवळ त्यांच्याच मताप्रमाणें राज्यव्यवस्था करणें त्यांसही अपायकारकच आहे. कारण आज जर तुह्मी त्यांची एखादी इच्छा तृप्त कराल तर ती तृप्तिच त्यांच्या अन्य असमाधानास कारण होईल. आतां ज्या अर्थी हे लोकमताचे सर्व नियम गोळा करणें फार मुष्किलीचें काम आहे व त्यांचा उपयोग गुणावहही होणें तितकेंच संशयात्मक आहे त्या अर्थीं जेव्हां आपण लोकांचें अहित चिंतीत नाहीं, तेव्हां आपण आपल्या स्वतःचे मताप्रमाणें व इच्छेप्रमाणें ज्या नेमणुका कायम करूं किंवा बदलूं त्यांस लोकांचें अनु-

मोदन मिळेल—अशा समजुतीनें, ज्यांचीं मतें व ज्यांचें धोरण आपल्यासारखें आहे, ज्यांस गर्व व आत्माभिलाष यांचा गंधही नाहीं, व आपल्या विचारांस व आपल्या कृत्यांस आड येणाऱ्या सार्वजनिक लहरींनीं ज्यांची वृत्ति चंचल होत नाहीं त्यांस कामावर नेमणें यापलीकडे इंग्लंडच्या राजाचें काय कर्तव्य राहिलें? आणि जर तो स्वार्थसाधुपक्षाचे भुलथापांस भुलून त्याच्या हस्तगत झाला नसेल, तर अशा वेळीं आपल्या खऱ्या महत्वाचा व वजनाचा त्यास चांगलाच उपयोग करून घेतां येईल.

ह्या तऱ्हेचें प्रतिपादन अगदींच पोकळ आहे असें मी ह्मणूं इच्छित नाहीं. कारण राज्यव्यवस्थेची कला मुदलींच कठीण नाहीं असें मी ह्मणत नाहीं. उत्तम प्रधानमंडळास बराच प्रतिबंध सोसावा लागेल व अत्यंत वाईटासही वाजवीपेक्षां फाजील मदत मिळेल यांत शंका नाहीं. ज्यास आपणांस फसवून घेण्याचीच इच्छा आहे त्यास योग्य आभासांची उणीव कधींच पडणार नाहीं. प्रत्येक गोष्टींतील संकटें किती महत्वाचीं आहेत व त्यांचे परिणाम काय आहेत याचा नीट विचार केल्याशिवाय त्या संकटावरच जोर देत बसण्याचें कुटिल तर्कशास्त्र, वस्तुभिन्नत्व गुंडाळून ठेवून, योग्यायोग्य-संकर करण्याचीच ज्यांची इच्छा असते ते लोक नेहमीं उपयोगांत आणितात. राज्यांतील पूर्ण असमाधान किंवा पूर्ण संतोष याविषयीं प्रकृत् प्रश्न नाहीं. त्यांपैकीं कोणतेंही कोणत्याही पद्धतींत शुद्ध व अमिश्रित कधींच मिळावयाचें नाहीं. लोकांत समाधान किती अंशानें उत्पन्न करितां येईल व तें किती अंशानें अपेक्षणीय आहे ह्याविषयीं वादविवाद आहे. कांहीं मुत्सद्दी श्रेष्ठकनिष्ठ लोकांतील सूक्ष्मदृष्टीनें भेद पाहून व स्वार्थसाधु लोकांच्या कारस्थानांत व प्रजाजनांचे प्रयत्नांत मर्यादा ठरवून प्रत्येक मनुष्य आपणांस प्रतिकूल आहे कीं काय हें जों ठरविण्याची वाट पहात आहेत तोंच त्यांचे शहाणे विचार चालले असतां, ज्या राज्याविषयीं ते इतक्या सूक्ष्मदृष्टीनें विचार करीत आहेत, भेद पहात आहेत व मर्यादा ठरवीत आहेत, तें राज्यच कदाचित् ढांसळून जमिनदोस्त व्हावयाचें. राज्यसंरक्षणासारख्या किंवा राष्ट्रस्वस्थतेसारख्या महत्वाचे गोष्टीवर प्रसंग येऊन गुजरला असतां राज्यास-

च कदाचित् घातक होणाऱ्या विचाराचे भरीस सुज्ञ लोक कधींच पडणार नाहींत. ज्यांस राजकीय आकाशाचें निरीक्षण करितां येतें त्यांस क्षितीजाचे कडेवर असलेला एक हातभर मेघ पाहूनही वादळ होण्याचा प्रसंग ताडितां येईल आणि ते जवळच्या पहिल्याच बंदरांत नांगर टाकितील. सामाजिक अथवा राजकीय पांडित्याचे कांहींच नियम घालून देतां येणार नाहींत. त्या विषयांची बिनचुक व्याख्या करणें अशक्य आहे. परंतु जरी रात्र व दिवस यांचे आद्यंतांत कोणासही नेमकी मर्यादा ठरवितां येणार नाहीं, तरी अंधार व प्रकाश एकंदरीनें बरेच भिन्न आहेत. तसेंच राज्यव्यवस्था व प्रधान यांचा कोणता योग उत्तम, पूर्ण व सर्वस्वी योग्य आहे, ह्या गहन प्रश्नाचा उलगडा केल्याशिवाय, कोणती राज्यपद्धति व कोणते व्यवस्थापक प्रजेस विशेष सुखकारक होतील हें ठरविणें राजास अशक्य नाहीं. पण जर तो त्याच चमत्कारिक शोधांत चिंताग्रस्त होऊन जाईल तर साधारण शांततेचीं अनायासानें प्राप्त होणारीं साधनें तो वायां दवडील यांत शंका नाहीं.

आपल्या राज्यांत शांतता ठेवण्याचा यत्न करणें राजाचें केवळ कर्तव्यकर्म आहे इतकेंच नव्हे तर तें त्यास हितावहही आहे. पण त्यास सल्लामसलत देणाऱ्यांस अव्यवस्था व अस्ताव्यस्तता हितावह असेल. लोकमत जर त्यांस प्रतिकूल असेल तर तें प्रबळ होऊं नये अशी त्यांची साहजिकच इच्छा होईल. आपली किंमत आपणांस माहीत आहे असें लोकांनीं दाखविण्याची हीच वेळ होय. आरंभीं त्यांचें सर्व महत्व व नंतर त्यांचें सर्व स्वातंत्र्य मोठ्या पेंचांत पडल्यासारखें झालें आहे. त्यांचें स्वातंत्र्य त्यांच्या महत्वानंतर फार दिवस टिकावयाचें नाहीं. ह्याचवेळीं देशांतील नैसर्गिक तेजानें ह्मणजे बड्या लोकांनीं, प्रमुख वजनदारांनीं, श्रीमंत व्यापाऱ्यांनीं, धंदेवाल्यांनीं, व ठळक शेतकऱ्यांनीं, आपल्या राजास, आपणांस, व आपल्या संततीस संकटांतून मुक्त करण्याकरिता मध्यें पडलें पाहिजे.

सध्यां ह्या मुद्याविषयींच वादविवाद आहे. ह्या वादविवादासंबंधानें आह्मी मोठ्या संकटांत पडलों आहों; व जो मनुष्य ज्या पक्षाचें

अवलंबन करील त्या पक्षावरून त्याचा स्वभाव व त्याचीं मतें सहज व्यक्त होतील. ह्या मुद्याचा निकाल लागेपर्यंत देशांतील हल्लींची अस्वस्थता तशीच रहावयाची; कारण जोंपर्यंत लोकविचारास अत्यंत प्रतिकूल व राज्यव्यवस्थेच्या स्वरूपास अननुरूप अशी प्रधानमंडळाची योजना करण्यांत येत आहे, तोंपर्यंत कांहीं वेळ तरी प्रत्येक गोष्ट अस्ताव्यस्त झालीच पाहिजे; नंतर अखेरीस एक तर ही योजना राज्यव्यवस्थेच्या नाशास कारण होईल, नाहीं तर राज्यव्यवस्था तरी या योजनेहून प्रबलतर ठरेल.

या राजकीय क्षुब्धतेंत असलेलें दुष्टत्व व वैमनस्य अश्रुतपूर्व किंवा अवाचितपूर्व आहे असें मला वाटतें. प्राचीनकाळीं अप्रतिबंध राजसत्तेचा घाट घालणाऱ्यांनीं स्वदेशस्वातंत्र्यावरच हल्ला केला; हें कारस्थान अत्यंत उद्दाम महत्वाकांक्षेस संतुष्ट करण्यास पुरेसें अपायकारक होतें यांत शंका नाहीं. परंतु स्वातंत्र्यविघातकपद्धति सुद्धां अशी बनवितां येईल कीं त्यायोगें राज्यवैभव बरेंच वाढेल. आणि लोकांच्या मूल्यवान् हक्कांचें वाटोळें झालें असतांही त्या वैभवाचे शोभेंत व अभिमानांत समाधान मानण्यास त्यांस जागा राहील. ह्याचकरितां कावेबाज लोकांनीं सार्वजनिक स्वातंत्र्यास संक्षेप देण्याचे उद्देशानें राज्यप्रबलतेच्या विस्ताराचें कपटजाल अनेक वेळां पसरिलें आहे. पण जुटीच्या प्रकृत पद्धतीनें आमच्या स्वतंत्र राज्यव्यवस्थेच्या प्रत्येक स्नायूस पक्षघातानें घेरिलें आहे इतकेंच नव्हे तर आमची सर्व विधायक सत्ता तितक्याच अंशानें बधिर व मंद झाली आहे. सरकारचे सर्व जंगी व्यापार म्लान, संशययुक्त व निर्बळ झाले आहेत; आणि प्रधान, देशांतील व्यवस्थेंत किंवा अन्यराष्ट्रांजवळच्या ह्या देशाचे व्यवहारांत कोणतेही उपयुक्त कार्य करण्यास भिऊं लागले आहेत व अयोग्य झाले आहेत. ही पद्धति स्वतंत्र राज्याचे संरक्षणास गुणावह नाहीं किंवा अमर्याद राजसत्तेसही प्रबलता आणणारी नाहीं. ह्मणून ह्या दरबारावरील चौकडीरूपी गंडाची अलौकिक वाढ ज्या प्रमाणानें वाढत आहे त्याच प्रमाणानें राजसत्ता क्षीण होत जात आहे.

लोकांच्या प्रीतीची काय किंमत आहे हें युद्धाचे प्रसंगीं पुरतें स्पष्ट होतें ही गोष्ट अन्तःस्थित प्रधानमंडळास ह्मणजे खऱ्या सूत्रधारांस समजत आहे व उमजतही आहे. आणि ‘ वारा आला पाऊस गेला ’ या न्यायानें लोकमहत्वास सुरुवात झाली ह्मणजे त्यांच्या महत्वास उतरती कळा लागलीच हें त्यांस पक्कें माहीत आहे. ह्मणून ज्या कोणत्याही गोष्टीनें युद्धप्रसंग प्राप्त होण्याचा संभव आहे त्या गोष्टीविषयीं त्यांची भीति सर्व प्रसंगीं व्यक्त होते. युद्धासारख्या संशयात्मक प्रयोगावर स्वदेशसंरक्षण सोंपविण्याचें मागें घेण्यांत ते एका तऱ्हेची स्वदेशमातृप्रीत्यर्थ योग्य भीति दाखवितात असें मला वाटत नाहीं. ज्या अर्थीं अशा तऱ्हेची भीति सद्गुणी व कोमल मनोभावमूलक आहे व विचारशक्तीनेंच ती उत्पन्न व नियमित होते त्या अर्थीं ती संकटांस तुच्छ मानूनच त्यांचें निराकरण करणाऱ्या समयोचित धैर्यांतही पुष्कळ वेळ दृष्टीस पडते. त्यांच्या भीतीचें खरें कारण व खरा उद्देश सकृद्दर्शनींच उघड होतो. ह्यांच्या स्वभावाच्या पूर्ण ज्ञानानें इतर राजेही अत्यंत सन्माननीय तहांचें उल्लंघन करण्यास आणि त्यांस गुंडाळून ठेवून भर शांततेच्या वेळींही मध्ययूरोपांत देश जिंकण्यास मागें पुढें पहात नाहींत. उदाहरणार्थ, मानवी स्वातंत्र्यद्वेष्ट्यांनीं पूर्वींच्या रक्षकांस ( आह्मांस ) न जुमानतां कॉर्सिका खालसा केलें. त्या राजांवर आमचेही हक्क आहेत; फ्रान्स व स्पेन ह्यांजवर अत्यंत दुःखकारक प्रसंग गुजरला असतां त्यांस आह्मीं दाखविलेल्या सौम्यतेपासून व उदारपणापासून त्यांची उत्पत्ति झाली असल्यामुळें ते त्यांस व आह्मांस सारखेच सन्माननीय असले पाहिजेत. मॅनिलाचे खंडणीचे वेळीं व ईस्ट इंडियाचे कैदी बंधमुक्त करण्याची मागणी फ्रान्सकडे करण्यांत आली त्यावेळीं वरील प्रकार घडून आला असें मला वाटतें. त्या राजांनीं ‘ डबल कॅबिनेट ’ वर ठेविलेला भरंसा योग्य होता. ह्या मागण्या ( त्यांपैकीं निदान एक तरी ) मुदतीबाहेर जाऊन शून्य होण्याची वेळ क्षणोंक्षणीं भरत चालली आहे. पूर्वींचीं आमचीं शूरपणाचीं सर्व कृत्यें विस्मृतिजालांत सांपडून तडफड

करण्याचे बेतांत आहेत. आमच्या व्यापाराच्या अत्यंत मौल्यवान् कांहीं शाखा ह्याच व्याधीनें मरणोन्मुख झाल्या आहेत. ज्यांस माव्याचे जतनेवांचून फळें येतात त्या शाखांस उद्देशून मी लिहीत नाहीं; तहांच्या चातुर्यानें संपादन केलेल्या शाखांसच उद्देशून मी लिहीत आहें. पोर्टुगाल देशाच्या आमच्या व्यापाराकडे लोकांचें लक्ष वळविण्याचा माझा उद्देश आहे. त्याचा नाश व चौकडीची सत्ता ह्या एककालीनच आहेत.

जर एखादे प्रसंगीं कदाचित् रंगभूमीवरील प्रधानांनीं कांहीं पाणी दाखविलें किंवा ओढून ताणून आणिलेंच तर त्याचा कांहीं एक उपयोग होत नाहीं. अन्यदेशीय दरबारांस व प्रधानांस 'डबल कॅबिनेट' च्या नवीन शोधाचा तलास व फायदा प्रथम झाल्यामुळें ते त्यांच्या ह्मणण्याकडे मुदलींच लक्ष देईनासे झाले. ह्या प्रधानप्रतिमांचे हातीं कायमची व्यवस्था करणें बिलकुल नाहीं हें त्यांस पक्कें माहीत झालें आहे. नामधारी प्रधानमंडळांत मत्सर व शत्रुत्व मोठ्या प्रयत्नानें पुष्ट करण्यांत येत आहेत; व त्या मंडळाची रचना त्याजवर अवलंबून आहे असें समजलें जात आहे. ह्यामुळें अन्यदेशीय दरबारांची अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, ह्या राष्ट्रांत एकमतानें कांहींच व्हावयाचें नाहीं. ह्यांपैकीं जर एखाद्या प्रधानानें बाण्यानें कांहीं काम करण्याचें मनांत आणिलें तर त्यायोगें केवळ बाकीच्यांचा क्षुद्रपणा व सर्वांचा बेबनाव चांगला स्पष्ट होतो. त्याचे मदतनीस त्यास हुसकावून लावण्यास व त्याचें सर्व करणें नापसंत करण्यास उतावळे होतात. लॉर्ड शेलबूर्नपासून प्रत्यक्ष अधिकार मिळाल्यामुळें लॉर्ड रॉच्फोर्डनें कॉर्सिकाचे हल्याविरुद्ध फ्रान्सचे विरुद्ध जें बोलणें काढिलें त्या प्रसंगीं घडलेला विस्मयोत्पादक व्यवहार ह्याच प्रकारचा होता. ह्या बोलण्याची फ्रेंच प्रधानानें तिरस्कारपूर्वक जी बोळवण केली ती योग्यच होती; कारण आमच्या दरबारांतील त्यांचे वकिलानें त्यांस असें कळविलें कीं, लॉर्ड शेलबूर्नच्या म्हणण्यास ( ब्रिटिश असें म्हणण्यास मला आनंद झाला असता ) प्रधानमंडळाचें अनुमोदन नाहीं. लॉर्ड रॉच्फोर्ड बाणे-

दार मनुष्य असल्यामुळें त्याच्यानें ही स्थिति सहन करवली नाहीं. तथापि ह्याचे परिणाम चमत्कारिक झाले. तो पारीस शहराहून रागावून परत आला. लॉर्ड शेलबूर्ननें तो अधिकार दिला असल्यामुळें त्यास कामाचा राजीनामा देणें भाग पडलें. लॉर्ड रॉच्फोर्ड् हुकमाप्रमाणें वागल्यामुळें प्रधानमंडळांत त्याचीच भरती झाली. तथापि आपण एका सरकारी नात्यानें ज्या गोष्टीच्या विरुद्ध बोलणें केलें तीसच दुसऱ्या सरकारी नात्यानें अनुमोदन देण्याची पाळी आपणांवर येऊं नये म्हणून तो निराळ्याच शाखेंत शिरला. पारीसमध्यें लॉर्ड चॉइसल्ला ही व्यवस्था निजस्तुतीपर भासली; लॉर्ड रॉच्फोर्ड्च्या नाजुक मनोविकाराकडे लक्ष देऊन ही व्यवस्था करण्यांत आली आहे असें ह्या देशांत वाटलें. पण ती कोणास कां अनुलक्षून केलेली असेना ती ह्या राष्ट्रास सारखीच होती. ह्या सर्व व्यवहारानें आमच्या दरबारची स्थिति पूर्णपणें उघडकीस आली. आमच्या सरकारी पत्रव्यवहारांत प्रमाण व सत्यता मिळून कांहींच राहिलें नाहीं. आमच्या सर्व व्यवहारांत चमकणाऱ्या न्यायाची, दृढतेची व निष्कपटपणाची खात्री पटल्यामुळें जीं राष्ट्रें कांहीं कालापूर्वीं आमच्या बाहुबलाच्या नामसंकीर्तनानेंच कंपायमान होत असत, तींच राष्ट्रें आतां ब्रिटिश राजनीतीकडे पाहून हंसूं लागलीं आहेत. ज्या दृष्टीनें सर्व जग ह्या गोष्टीकडे पहात आहे त्याच दृष्टीनें मी तिचें वर्णन करीत आहें.

'डबल कॅबिनेट' च्या अमलांत आमच्या इतर राष्ट्रांशीं होणाऱ्या व्यवहाराची अशी व्यवस्था होऊन चुकली आहे. दरबारच्या अशा प्रकारच्या रचनेच्या वेळीं ती अन्यथा होणें अशक्य आहे. तसेंच आमच्यावर अवलंबून असणाऱ्या राष्ट्रांची राज्यव्यवस्था आमच्या राजनीतीचा मुख्य, प्रिय व नाजुक विषय होता त्यावरही दरबारच्या रचनेचा चांगला परिणाम होणें अशक्य आहे. प्रधानमंडळ दरबारापासून भिन्न आहे, त्याच्यांत एकी नाहीं, व आमचें राष्ट्रही त्याचा तिरस्कारच करितें ह्या गोष्टी आमच्या वसाहतीस माहीत आहेत. 'डबल कॅबिनेट'

च्या दोन्ही भागांचें वर्तन त्यांजपाशीं अत्यंत दुष्टपणाचें झालें आहे, तरी पण तिच्या हातून त्यांचें काडीभरही नुकसान झालें नाहीं.

कोणतेंही सौम्य किंवा कडक कृत्य एकसारखें किंवा दृढनिश्चयानें त्यांच्या हातून कधींच घडावयाचें नाहीं. अशी पूर्ण अनुभवावरून त्यांची खात्री झाली आहे. म्हणूनच ज्या ग्रेटब्रिटनच्या स्नेहावर त्यांस अवलंबून रहातां येत नाहीं किंवा ज्याच्या शत्रुत्वास भिण्याची त्यांस गरज उरली नाहीं त्या ग्रेटब्रिटन देशास त्या वसाहती दिवसेंदिवस पूर्णपणें दृष्टिआड टाकूं लागल्या आहेत. त्यांची दृष्टि स्वतःकडे व स्वतःच्या व्यवस्थाकडे वळली आहे. त्यांचा ह्या देशाशीं द्वैतभाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आणि ते ह्या राज्यापासून विलग होत आहेत इतकेंच नव्हे तर 'ते स्वतंत्र झाले तरी आमच्याशीं स्नेहानेंच वागतील' असेंही समाधान आह्मांस मानितां येत नाहीं. जगाच्या त्या भागांतील आमच्या कारभाराचे व्यवस्थेंतील निष्फलतेची, निःसत्वतेची, अविचाराची, भित्रेपणाची, व नित्य विसंगततेची कमालच होऊन राहिली आहे. या उदास विषयावर एक मोठें पुस्तकच लिहितां येईल; परंतु ह्या स्थलीं त्याचा योग्य व सविस्तर ऊहापोह करण्यापेक्षां तो वाचकांच्या विचारशक्तीवरच पूर्णपणें सोंपविणें बरें दिसतें.

ह्या पद्धतीचे कारकीर्दींत देशांतील अर्थशास्त्राची काय हालहवाल आहे याचें स्पष्टीकरण करण्याची गरज नाहीं. याविषयीं चौकडीच्याच तक्रारी पुढें येत आहेत.

दरबारी लोक प्रत्येक गोष्टीचें खापर स्वार्थसाधु पक्षाचे बोडक्यावर फोडितात. याच विषयावर पूर्वी थोडेंसें लिहिलें असल्यामुळें मी येथें इतकेंच सांगतों कीं, जेव्हां ते स्वार्थसाधु पक्षाच्या प्रबलतेचें असें वर्णन करितात तेव्हां आमच्या स्वतःच्या राज्यव्यवस्थेवर लोकांचा भरंवसा आहे असें सुंदर चित्र त्यांस काढितां येत नाहीं. राज्याचा मुख्य व एकच पाया जो लोकविश्वास त्याचे ऐवजीं दुसऱ्या कांहीं गोष्टीची स्थापना करणाऱ्या निरनिराळ्या कारस्थानांत ते कितीही आनंद मानोत, त्यांचा त्या दिशेचा प्रत्येक प्रयत्न त्यांच्या अधिक वाइटासच

कारण होईल असें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें. जेव्हां आपलें अन्न विषाचें आच्छादन आहे असें लोकांस वाटतें आणि जेव्हां तें वाढणाऱ्या मनुष्यावरही त्यांची प्रीति नसते व भरंवसाही नसतो, तेव्हां इंग्लंडच्या प्राचीन पक्षानांच्या नामसंकीर्तनानेंच ते पानावर बसून त्याचा स्वीकार करण्यास कधींही तयार होणार नाहींत. जेव्हां कायदे, न्यायासनें, व सार्वजनिक सभा हीं आपल्या मुख्य उद्देशापासून भ्रष्ट झाल्या आहेत असें लोक समजतात तेव्हां त्या अपभ्रष्ट संस्थांचीं तीं नावेंच त्यांच्या असमाधानास पुनरपि कारणीभूत होतात. जीं संस्थाशरीरें सजीव व सुंदर असतां त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत होतीं व त्यांस सुख व समाधान देत होतीं तींच निर्जीव व दुर्गंधयुक्त झालीं ह्मणजे पुराण प्रेमपाशाच्या स्मरणानें केवळ अधिकच ओंगळ भासूं लागतात. निस्तेज औदासिन्य व प्रचंड अस्वस्थता क्रमाक्रमानें प्रबल होतात; व शांतता व समृद्धि यांविषयीं राष्ट्राची अभिरुचि कमी होते. पहिल्या चार्लस् राजाचे कारकीर्दीतील उन्नतीनंतर आमच्यावर जें नष्टचर्य ओढवलें त्यावेळीं असेंच झालें होतें. ज्यांस स्वस्थतेची स्थिति अज्ञातवासाचे शिक्षेप्रमाणें वाटते अशा लोकांचा एक वर्ग अस्वस्थताजन्य उष्णतेनें वाढत जाऊन भयंकर होतो; आणि स्वमहत्वजनक अस्वस्थतांचें ते पितृभक्तीनें कुटिलपणें पोषण करितात हें ठीकच आहे. सार्वजनिक अस्वस्थतांचें हे लोक कारण होत असें बाह्यदृष्टीस वाटेल, पण ते त्यांचें कार्य होत. हा अस्ताव्यस्त देखावा पाहून सत्पुरुषांस वाईट वाटतें, व त्यांच्या पायाची आग मस्तकास जाते. त्यांचे हातच बांधले जातात. जिच्या योगें राज्याची बळकटी व लोकांचे हक्क यांची त्यांस सांगड घालून देतां येण्यासारखी असते ती त्यांची शक्ति सर्वथा क्षीण होते. ते मोठ्या दुःखकारक कचाट्यांत सांपडतात. पण अनिष्ट गोष्टींत निवड करण्याची त्यांस पाळी आली ह्मणजे नियत दास्यापेक्षां क्षणिक अव्यवस्थेपासून अधिक चांगल्या गोष्टी घडतील अशी त्यांस आशा उत्पन्न होते. कायद्यास तर कोणीच जुमानीत नाहीं. भयंकर बेबंदशाईनें कडक अंमलबजावणी सुरू होते. लष्करी शक्तीवरच शेवटीं कायती

भिस्त येऊन पडते; मग राज्यव्यवस्थेस काय वाटेल तें नांव द्या, तलवारच अंमल गाजविते. इतरांप्रमाणेंच जी राजसत्ता आपणाहून बलवत्तर मित्राची मदत मागते ती तेथून प्राप्त झालेल्या साहाय्यानेंच नाश पावते. परंतु आमच्या राज्यव्यवस्थेचा सांप्रतचा व्यूह रचणारे केवळ लष्करी सत्तेवरच अवलंबून नाहींत, कारण ते फार धूर्त आहेत. त्यांचा स्वभाव अस्वस्थ व कुटिल पडल्यामुळें ते सर्व तऱ्हेच्या अमंगळ उपायांची योजना करितात. सर्व समाजावर पगडा बसविण्यास असमर्थ असल्यामुळें तें त्यांत निरनिराळे पक्ष उत्पन्न करण्याचा यत्न करितात. एका बंडखोर मंडळीचा नाश करण्यासाठीं ते दुसरीला लांच देतात. ह्या रीतीनें रयतेच्या धाष्टर्यास जोर मिळतो व तिचें असमाधानही योग्यच वाढतें. दंग्याचे रचनेंत आणि अव्यवस्थेच्या कवाइतींत पटाईत असल्याबद्दल लोकांस सरकारांतून पेनशन मिळूं लागतें. ज्या तऱ्हेचा उच्छृंखळपणा ह्मणून पाडण्यासाठीं पूर्वी कायद्याचें उल्लंघन करावें लागलें असेल त्याच तऱ्हेच्या उच्छृंखलपणास कायद्याचे कडक कचाट्यांतून सोडविण्याचें लज्जास्पद कृत्य करणें सरकारास भाग पडतें. प्रत्येक गोष्टींत मूर्तिमंत अव्यवस्था दृष्टीस पडते. झोटिंगपादशाही सुरू होऊनही स्वातंत्र्य नष्ट होतें; आणि दास्य प्राप्त झालें तरी आज्ञाधारकता व नम्रपणा दृष्टीस पडत नाहींत. हेच अपरिहार्य परिणाम आमच्या स्वस्थतेवर घडून आले आहेत. जिच्या योगें विधायक सरकार तिरस्कारार्ह व शक्तिहीन झालें आहे; आणि जिच्यामुळें पार्लमेंट्चा प्रधानमंडळावरील कायदेशीर व गुणावह दाब नाहींसा झाला आहे आणि त्या ऐवजीं राज्यव्यवस्थेस अपरिचित असा अन्तःस्थित मंडळाचा नवीनच दाब उत्पन्न करण्यांत आल्यामुळें एकंदर राज्यव्यवस्थेस घोंटाळा उत्पन्न होऊन ती तिरस्कारार्ह झाली आहे, ती चौकडीची नवीन पद्धति वरील गोष्टींस कारणीभूत आहे.

ह्या पद्धतीचे राष्ट्रांजवळच्या व्यवहारांवर, आमच्या वसाहतींसंबंधाच्या राजनीतीवर व आमच्या अर्थशास्त्रावर झालेले परिणाम येथपर्यंत होईल तितक्या संक्षेपानें सांगितले. आतां ही पद्धति प्रथम दरबारी-

परराष्ट्राशीं जे आमचे व्यवहार घडतात त्यावर, आमच्या अंकित असलेल्या प्रदेशाशीं होणाऱ्या वर्तनावर व आमच्या खुद्द स्वदेशांतील आंतर राज्यव्यवस्थेवर ह्या पद्धतीचे परिणाम कसकसे घडले, हें येथपर्यंत होईल तितक्या संक्षेपानें सांगितलें. आतां ही पद्धति दरबारी मंडळीस कोणत्या महा तत्वावर पसंत पडली त्या तत्वासंबंधीं चार शब्द लिहावयाचे इतकेंच कार्यतें राहिलें आहे. राजानें एका स्वार्थसाधु फळीचा गुलाम होऊन राहूं नये ह्मणजे आपल्या खोलींतल्या खोलींत केवळ कैदी राहूं नये असा पहिला बहाणा होतो. आह्मीं ह्मणतों सर्व सरकारव्यवस्था घोंटाळ्यांत पडली, पडो बिचारी; पण त्याच्याबद्दल निदान खुद्द राजाला आपल्या व्यक्तिसंबंधापुरती तरी अधिक स्वतंत्रता मिळून ह्या राजमित्रपद्धतीचा आदि हेतु सिद्धीस जावयाचा होता. परंतु खरोखर हा हेतु सिद्धीस गेला आहे काय? जर गेला असता तर प्रत्येक प्रेमळ प्रजाजनास इतका तरी आनंद झाला असता कीं, या पद्धतीपासून जीं संकटें सोसावीं लागत आहेत, त्याबद्दल आपल्या राजाला सुख होत आहे.

या गोष्टींत सत्य किती आहे याचा छडा काढावयाचा ह्मणजे तिचा जरा सूक्ष्म दृष्टीनें विचार करणें अगत्याचें आहे. मी येथें **राजा**विषयीं विचार करीत आहें, **गादी**विषयीं करीत नाहीं. गादीच्या सामान्य हिताहिताविषयीं पूर्वीच विचार करण्यांत आला आहे. सर्व राष्ट्राची जी इभ्रत तिचा राजा दर्शक आहे, एवढ्या एका गोष्टीनें त्यास जी थोरवी आहे त्याशिवाय आणखी कांहीं बाबतींत त्याचा व्यक्तिसंबंध येतोः—द्रव्यसंचय; दिमाखासाठीं, सुखप्राप्तीसाठीं व परोपकारार्थप्रीत्यर्थ केलेला द्रव्याचा व्यय; व्यक्तिदृष्ट्या मिळणारा मान व आदर; आणि सर्वांहून अधिक महत्वाचें ह्मटलें ह्मणजे स्वतःचें समाधान व मनाचें स्वास्थ्य. अमका एक गृहस्थ सुसंपन्न स्थितींत आहे असें ह्मटलें ह्मणजे त्यास लाधणाऱ्या सुखांच्या गोष्टींची यादी केली तर ती यादी वरील गोष्टींचीच करावी लागेल; मग तो सुसंपन्न गृहस्थ राजा असो किंवा प्रजा-

जनांपैकीं असो. या सुखाच्या गोष्टींच्या उपभोगाचें मान कमीअधिक प्रमाणानें होईल ही गोष्ट अलाहिदा आहे. पण सुखाच्या बाबी ह्याच, यांत कांहीं संदेह नाहीं.

आतां कल्पना करा कीं, आह्मी एक सवाल घातला. काय हो ही प्रियपात्रपद्धति अमलांत आल्यापासून द्रव्यसंचयाच्या दृष्टीनें आपल्या पूर्वजापेक्षां हल्लीं राजाची स्थिति बरी आहे काय? मला वाटते राजाच्या दारिद्र्याचें चित्र चालू सालापर्यंत जें लोकांच्या दृष्टीस पडत आहे, तें खरो-खर मानखंडना करणारें आहे. या ओंगळ दुःस्थितीपासून सुटका होण्यास योजलेलीं साधनें झालीं तरी अशींच आहेत कीं, त्यांच्यायोगानें दरबाराबद्दल लोकांचें प्रेम नष्ट व्हावें व पार्लमेंटवरील त्यांचा विश्वास उडावा. सरकारी खजिन्यांतील पैशाचा चुराडा उगीच दिमाखांत व डामडौलांतच उडाला असता, तर सांप्रतची दुःस्थिति कां आली, या प्रश्नाचा उलगडा तरी झाला असता आणि कांहीं अंशीं ही दुःस्थिति आली ती बरोबर आली असेंही वाटलें असतें. गादीचें तेज रक्षण कर-ण्यासाठीं पैसा खर्च करावयाचा, त्याचा हिशेब अगदीं क्षुद्र व धारवाडी कांट्यानें ठेवणें यासारखी या राष्ट्रास कमीपणा आणणारी दुसरी गोष्टच नाहीं. आणि खरें ह्मटलें तर असल्या अनुदार प्रकाराकडे ज्यांची प्रवृत्ति आहे, असे लोक मला क्वचित्च आढळले आहेत. परंतु दर-बारच्या गरजा व दरबाराकडून झालेला खर्च या दोहोंची तुलना करून पाहिल्यावर मात्र सामान्य जनांच्या चित्तास बरीच मानहानि वाटते, हें मात्र स्पष्ट सांगणें भाग आहे. राजाच्या परिवारांतील कोणत्याही भागांत हल्लींच्या दुःस्थितीचें कारण त्यांच्या दृष्टोत्पतीस येत नाहीं. त्या सर्वांत त्यांना काटकसरीचाच व्यापार दिसतो आणि इकडे पहावें तों परिणाम मात्र उधळपट्टी करून जे व्हावेत तेच दत्त करून पुढें उभे आहेत. खर्च तर कांहीं नाहीं, शिलक मात्र पूज्य. या गोष्टीचा त्यांना आचंबा वाटत होता. पण जेव्हां त्यानें कळलें कीं, राजाच्या खासगीकडे ठरविलेला तनखा सालीना ८,००००० पौंड आहे तो

आहेच आणि शिवाय त्यांत पुढील बाबींची आणखी भर आहेः— आयर्लंडमधील पेनशनखात्याचे सालीना ९०००० पौंड; लँकस्टरच्या डचीचें उत्पन्न (अलीकडे सुधारणा झाली आहे असें कळतें.); कार्नवालचे डचीचा वसूल; अमेरिकन क्विट्रेन्ट्स्; व लीवर्ड् बेटांतील शेंकडा ४ प्रमाणें कराचें उत्पन्न; ह्या शेवटल्या बाबीचें उत्पन्न खरोखर प्रतिवर्षी ४०००० पौंडांपेक्षां फारच अधिक आहे; एकंदर उत्पन्न दर वर्षास दहा लक्षांत फारसें कमी भरणार नाहीं. महाराजांचे उत्पन्नाचीही माहिती मिळाली ह्मणजे तर आश्चर्याची परमावधि झाल्यावांचून रहात नाहीं.

हें उत्पन्न आमच्या पार्लमेंटाचे माहितींतील आहे. महाराजांचे जर्मनींतील प्रांतांचें व ऑस्नॅब्रगच्या वृत्तीचें उत्पन्न काय आहे, याची चौकशी करण्याचा आह्मांस प्रत्यक्ष कांहींएक हक्क नाहीं हें निर्विवाद खरें आहे. परंतु तें जरी पार्लमेंटाचे अधिकारांत नाहीं, तरी प्रत्येक मनुष्याच्या विचारमर्यादेच्या बाहेर नाहीं. जर अन्य देशीय राजा आमच्यांत येऊन राहील, तर त्याच्या उत्पन्नाची हालहवाल काय आहे हा आमच्या विचाराचा विषय झाल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. आमच्या महाराजांचे हिताहिताची आह्मी काळजीपूर्वक आस्था बाळगीत असल्यामुळें, त्यांस प्राप्त झालेल्या शोचनीय स्थितीचा विचार करीत असतां, आह्मी या मुद्यास पूर्णपणें फांटा देणें अशक्य आहे. सर्व खर्चवेंच वजा जातांही हें उत्पन्न कांहीं लहान नाहीं असें सर्वांचें मत आहे. या उत्पन्नाचा संचय झाला आहे, असें लोकांस वाटत नाहीं, किंवा खर्च झालेला दिसत नाहीं. राष्ट्रास दुःख देणाऱ्या व महाराजांचे हातीं सर्वथैव करटी देणाऱ्या स्वार्थसाधु पक्षाचे भक्ष्यस्थानीं ही सर्व रकम पडत आहे; ह्या कल्पनेवांचून दुसऱ्या कोणत्याही कल्पनेनें तिचें स्पष्टीकरण होत नाहीं. मी पुनरपि वाचकांस असें सांगतों कीं, मी अन्य देशांतील उत्पन्नास उद्देशून ह्या मुद्यावर जोर देत नाहीं. त्याचे खर्चाविषयीं वादविवाद करण्याचा आह्मांस अधिकार आहे असें मी

समजलों असें कोणी गृहीत घेऊन चालेल. त्याच्या नामोच्चारणानें महाराजांस स्वतःही दोस्तशाही पद्धति किती हितावह झाली आहे हें स्पष्टपणें दाखविण्याचा माझा उद्देश आहे. तिच्या योगानें कांहींएक श्रीमंती थाटमाटाशिवाय महाराजांस, सृष्टिक्रमाविरुद्ध, दारिद्र्यानें ग्रासिलें आहे. सृष्टिक्रमाविरुद्ध ह्मणण्याचें कारण असें कीं, ह्या व अन्य देशांतील विपुल उत्पन्नानें श्रीमंत होण्याचीं सर्व साधनें त्यांचे स्वाधीन असतां तें त्यांस प्राप्त झालें आहे.

राजास आपल्या निर्मळ व उच्च नांवास उचित असें वर्तन करितां येण्याची विशेष तजवीज ह्या पद्धतीनें केली आहे काय? आणि स्वतःस अप्रिय अशा लोकांस कामावर नेमण्याच्या तिरस्कारार्ह आवश्यकतेपासून त्याची मुक्तता झाली आहे काय? ह्या मुद्याविषयीं मौन धारण करण्याची कांहीं विशेष कारणांमुळें माझी इच्छा होती; परंतु ह्या अस्वस्थतोत्पादक स्थितींतून राजाची मुक्तता करणें ह्याच मुद्यावर दरबारी पक्षाची सर्व इमारत रचिलेली आहे; तथापि असें घडून आलें आहे कीं, मी जरी कोणता तरी लाजिरवाणा व दोषार्ह मुद्दा घेण्याचें मनांत आणिलें, तरी राजाचा व्यक्तिविषयक मान कमी करण्याची, त्यास शेंकडों वेळां विसंगत आचरण करावयास लावण्याची व त्याची फजिती करण्याची ह्या पद्धतीची प्रवृत्ति, हाच मुद्दा घेण्यास, तिच्या परिणामांवरून कांहीं हरकत दिसत नाहीं. राजवैभवाचे पुरस्कर्त्यांनीं आपलीं भपकेदार वचनें कोणत्या रीतीनें पाळिलीं आहेत हें स्पष्ट करून दाखविण्याची जरूर दिसत नाहीं. ह्या कारकीर्दींतील सर्व गोष्टी माझ्या ह्मणण्याच्या सत्यतेची कमीअधिक प्रमाणानें साक्ष देतील. त्या येथें कलमवार सांगत न बसतां, बहिर्गत प्रधानमंडळांतील हल्लींच्या बहुतेक लोकांविषयीं कांहीं वर्षांमागें दरबारचें काय ह्मणणें होतें, याचाच आपण विचार करूं. हल्लींच्या व्यवस्थेंतील कोणत्याही भागापेक्षां अथवा मनुष्यापेक्षां मानभंगाचें व मानापकर्षाचें तीक्ष्णतर शस्त्र महाराजांचे खासगी हाडवैऱ्यास तरी सांपडेल काय? लोकमत व लोकेच्छा यांस निखालस विरुद्ध अशा

गोष्टींस अनुमोदन देण्याची जी नवीन पद्धति सुरू झाली आहे, तिजपेक्षां लोकमतास अनुमोदन दिल्यानें कोणत्या तरी राजास आपल्या मनोविकारांस व आपल्या आवडानावडीस जास्त गुंडाळून ठेवावें लागलें असें आमच्या इतिहासांत कोठेंच दिसंत नाहीं.

राष्ट्राच्या विनंतीस ज्या गोष्टींत मान मिळाला नाहीं, त्याचप्रकारच्या कांहीं गोष्टींत व्यक्तिमात्राच्या विनंतीस मान देण्याची राजास एक दोनदां सल्ला मिळाली होती असें ऐकिवांत आहे. कारण, ह्या कारस्थानांतील अत्यंत क्षुद्र व अत्यंत परतंत्र अशा बाहुल्यांसही माहीत आहे कीं, त्य कारस्थानाचें जीवित कांहीं प्रसंगीं आपले मर्जीवर अवलंबून आहे. आणि ह्मणूनच तो त्या प्रसंगीं त्याजपासून आपला फायदा करून घेतो. आपल्या उद्देशास ज्या मनुष्याची जरूर आहे, तो कोणत्या तरी रीतीनें कधींना कधीं तरी निःसंशय आपल्या डोक्यावर चढल्याशिवाय रहात नाहीं असा एक सृष्टिनियम आहे. तथापि हें सर्व सहन करावयाचें तें केवळ लोकमतानुरूप राज्यव्यवस्था करण्याचें राक्षसी अरिष्ट टाळण्यासाठीं होय. कारण असा एक सिद्धांत ठरल्यासारखा दिसतो कीं, प्रजाजनांस अस्वस्थ करण्यांत राजाचें कांहीं तरी हित आहे; त्यांस जे प्रिय ते अर्थात् राजाला अप्रिय असतात. आणि दरबारांत द्वेषयोग्य मानलेले मनुष्य लोकांस द्वेषयोग्य वाटूं लागले ह्मणजे सर्व प्रकारच्या देणग्यांची व मानांची त्यांवर वृष्टि करण्यास ते योग्य होतात. लोकाचें अप्रिय करण्याची जे सल्लामसलत देतील, त्यांशिवाय अन्य कोणीही राजहितचिंतक समजला जात नाहीं; व आत्मसंरक्षणासाठीं ज्यांस प्रतिक्षणीं राजसत्तेची मदत मागावी लागते, त्यांशिवाय अन्य कोणासही राजसेवा योग्यरीतीनें करितां येत नाहीं. आत्मभयनिराकरणार्थ ज्या लोकांस राजमंदिरांत जावें लागतें त्यांशिवाय अन्य कोणासही मंदिरांतील उपाध्यायाचें काम करितां यावयाचें नाहीं असें ठरतें. असा ह्या सुशिक्षित कारस्थानाचा परिणाम आहे. सद्सद्विवेकाच्या दास्यापासून व आपल्या असंदिग्ध हितानुरूप कार-

भाराची व्यवस्था करण्याच्या आवश्यकतेपासून मनुष्यांची सुटका करण्यासाठीं ज्या ज्या युक्त्या योजण्यांत आल्या आहेत, त्या सर्वांचा नेहमीं असाच परिणाम होतो. जे निर्बंध पाळल्यापासून मनुष्यांस आपलें हित करून घेतां येईल, त्या निर्बंधांच्या काल्पनिक कचाट्यांतून सुटण्यासाठीं योजिलेल्या युक्त्यांनीं ते प्रत्यक्ष घातक दास्यांत जाऊन पडतात.

आपणास अप्रिय असे लोक कामावर नेमण्याच्या आवश्यकतेपासून राजाची मुक्तता करण्याचा ह्या पद्धतीचा मोठा दिखाऊ उद्देश जर शेवटास गेला नाहीं, तर त्यास खासगी नात्यानें शांतता व स्वस्थता देण्याचा तरी उद्देश निदान सफल झाला आहे काय? खरोखरच नाहीं. कुटुंबाची अशी अस्ताव्यस्त स्थिति झाली असतां, प्रजेच्या पित्यास स्वस्थता मिळणें अशक्य आहे. तर मग ह्या चातुर्यगुंफित पद्धतीपासून गादीस अथवा राजास तो काय फायदा झाला? तो ह्या सर्व खटाटोपींनीं व युक्त्यांनीं अधिक श्रीमंत, अधिक भव्य व अधिक शक्तिमान् अथवा अधिक सुखी झाला आहे काय? त्या लोकांनीं त्याचा खजिना लुटला नाहीं काय? त्याच्या दरबारची शोभा घालविली नाहीं काय? त्याची मानखंडना केली नाहीं काय? त्याचें मन दुखविलें नाहीं काय? त्याच्या खासगी जीविताचें सर्व स्वास्थ्य व सुख लयास पोंचविलें नाहीं काय?

ह्या स्वार्थसाधु पक्षानें राजाचें कोणत्या रीतीनें हित केलें आहे हें सांगणें फारच कठिण आहे असें मला वाटतें. असें असतां ते आपणांस मोठ्या धृष्टपणानें ‘ राजमित्र ’ असें ह्मणवूं इच्छितात.

महाराजांच्या सहवासाच्या असाधारण प्रतिष्ठेनें ते जर विशेष लोकप्रिय होऊन बसले असते, आणि त्याच्या सुखोपभोगाचे भागीदार झाल्यामुळें त्यांस त्याच्या सत्वशीलतेच्या रक्षणापेक्षां त्याच्या इच्छाच तृप्त करणें जास्त महत्वाचें वाटलें असतें, तर एक असो. परंतु मजा काय आहे पहा. ह्या ‘ राजमित्रांस ’ ती पदवी धारण करण्याचा कंबरलंड अथवा कॉर्नवॉलमधील जमिनदारापेक्षां जास्त हक्क मुळींच पोंचत नाहीं. आपल्या उदार प्रकृतीस फसवून, हुद्दे, वर्षासनें व देणग्या मिळविण्यासाठीं यांनीं

आपल्या हातांचें चुंबन केलें आहे, ह्या पलीकडे महाराजांस त्यांची ओळख नाहीं. ज्यायोगें त्यांची प्रीति कसोटीस लागेल व दंगेधोपे, घोर संकटें, व दुखें यांनीं राजाचा कडू पण पथ्यकर मित्र, व दरबारांतील क्षणिक खुशामती ह्यांमधील वास्तविक अंतर सिद्ध होईल, असा दुर्घट प्रसंग कधींही न येवो इतकेंच आह्मीं चिंतितों.

येथपर्यंत विधायक सरकारावर, लोकप्रीतीवर व राजसुखावर दरबारी पद्धतीचा काय परिणाम झाला याचा विचार झाला. तिचा पार्लमेंटावर काय परिणाम झाला आहे याचाच विचार होण्याचें राहिलें आहे.

पार्लमेंट तर त्यांच्या कारस्थानांचा मुख्य विषय होता; त्यांचा नेम त्याजवरच होता; व तीं कारस्थानें घडवून आणण्याचें साधनही पार्लमेंटच होतें. परंतु ज्या पद्धतीच्या योगानें पार्लमेंटचा राष्ट्रीय सभेचा मान घालवून, तीस केवळ दरबारचाच एक अवयव बनवावयाचें होतें, त्या पद्धतीस अनुरूप अशी घटना करण्यापूर्वीं तिचें मूळ स्वरूप जाऊन तें फारच भिन्न व्हावयास पाहिजे होतें.

ह्या सभेविषयीं बोलतांना माझें मुख्य लक्ष हाउस ऑफ् कॉमन्सूकडे आहे. ह्या मंडळीच्या स्वरूपाचें व प्रकृतीचें थोडेसें वर्णन करण्याची मोकळीक मी घेतों; तिच्या कायदेशीर रचनेचा व सत्तेचा मला विचार कर्तव्य नाहीं, पण तिच्या वास्तविक स्वरूपाचा, व तिच्या राज्यव्यवस्थेंतील अपेक्षित कार्याचा मी थोडासा विचार करित आहें.

हाउस ऑफ् कॉमन्स् हे या देशाच्या स्थायिक सरकारचा भाग नव्हे, असें आरंभीं समजलें जात होतें. लोकांपासून प्रत्यक्ष उत्पन्न होणारा हा दाब आहे आणि ज्या समूहापासून त्याची उत्पत्ति झाली त्याचेच प्रकृतींत तो लगेच मिळून जावयाचा असें मानिलें जात होतें. ह्या दृष्टीनें सरकारच्या कनिष्ठ भागांत जशी पंचायत (जूरी) तसें उच्च भागांत हाउस् ऑफ् कॉमन्स् आहे. न्यायाधीशानें नातें क्षणिक

व नागरिकांचें नातें चिरायु असल्यामुळें, चिरस्थायी राजसत्ता व लोक ह्यांमधीलच नव्हे, तर लोक व हाउस् ऑफ् कॉमन्सची क्षणिक सत्ता ह्यांमधील सुद्धां सर्व कलहांत दुसरें नातें प्रबल होईल असें वाटत होतें. सरकार व रयत यांच्या मधील त्यांची प्रकृति असल्यामुळें, नियामक सत्तेचा दुसऱ्या लांबच्या व स्थाईक भागांपेक्षां कॉमन्स लोकांस रयतेच्या संबंधाच्या प्रत्येक गोष्टींत निकट संबंधाची जास्त आस्थापूर्वक कळकळ वाटेल अशी उमेद होती.

कालांतरानें व राजसत्तेच्या अपरिहार्य स्थित्यंतरानें जें काय भिन्नत्व प्राप्त झालें असेल तें असो; एकंदर लोकांच्या वास्तविक प्रकृतीची हाउस् ऑफ् कॉमन्सवर छाया पडल्याशिवाय त्याचें वरील स्वरूप कायम रहावयाचें नाहीं. हाउस् ऑफ् कॉमन्सला देशांतील लोकांच्या मतांचा व मनोविकारांचा कोणत्याही गोष्टींत मुळींच स्पर्श होऊं नये, यांपेक्षां लोकांच्या वेडाच्या प्रत्येक सांथीनें त्यास वेड लागावें हें सार्वजनिक नष्टचर्यांत जास्त सह्य व जास्त स्वाभाविक अरिष्ट आहे. कारण ह्यामुळें त्यांच्यांत व नियोजकांत कांहीं आप्तविषयक संबंध व सादृश्य आहे असें दृष्टीस पडतें. ह्या सादृश्याच्या अभावानें त्याचें हाउस् ऑफ् कॉमन्स हें नांव अन्वर्थक होणार नाहीं; कारण, त्याची सत्ता केवळ लोकांपासून उत्पन्न झाली आहे, ह्मणून त्यास विशेष अर्थानें त्याचें प्रतिनिधित्व प्राप्त होत नाहीं. राजा लोकांचा प्रतिनिधि आहे; त्याचप्रमाणें बडे लोकही आहेत; व कॉमन्सप्रमाणेंच ते सर्व लोकांच्या हक्कांचे जिमेदार आहेत. कारण, कोणतीही सत्ता धारकाच्या उपभोगार्थ दिलेली नसते; शिवाय सरकार ही जरी इश्वरी संस्था आहे, तरी तिचें स्वरूप व तिचे व्यवस्थापक हीं सर्व लोकांतूनच उत्पन्न होतात.

ह्मणून लोकेप्रतिनिधित्वाचा लोकोत्पत्ति हा लक्षणगुण कधीं ही होणार नाहीं. हा गुण राज्यव्यवस्थेच्या कोणत्याही स्वरूपांत कोणत्याही भागांत सारखाच दृष्टीस पडतो. हाउस् ऑफ् कॉमन्स्चें सर्व बीज,

तेज, आणि सत्व काय तें त्याचें राष्ट्रमनोविकारप्रतिबिंबित्वांतच आहे. अत्यंत अपकारक प्रवृत्तीच्या मतानुरूप त्यास नुकतीच दीक्षा मिळाली आहे. ह्याप्रमाणें **लोकांवरील दाब** ह्मणून त्याची स्थापना करण्यांत आली नव्हती. **लोकांच्या तर्फे** दाब ह्मणून त्याची योजना झाली होती. सार्वजनिक अमर्याद वर्तनांचा उच्छेद करण्याकरितां दुसऱ्या संस्था स्थापिलेल्या आहेत; आणि त्या माझ्या मतें आपलें काम बजाविण्यास पूर्णपणें योग्य आहेत. जर योग्य नसतील तर त्यांस योग्य केलें पाहिजे. शांतता व आज्ञाधारकता हीं उत्पन्न करण्यासाठीं हाउस् ऑफ् कॉमन्सची स्थापना करण्यांत आली नसल्यामुळें, वेत्रदंडाहून प्रबल शस्त्र त्याचे हातीं नसल्यामुळें व हवालदारापेक्षां मोठ्या दरजाचा शिपाईही त्याच्या प्रत्यक्ष हाताखालीं नसल्यामुळें, त्या कामीं त्याची योजना फारच अप्रयोजक आहे. विधायक सत्तेवर व न्यायाधीशांवर दक्षतेनें व हेव्यानें लक्ष ठेवणें, सार्वजनिक पैशाची आस्थापूर्वक काळजी बाळगणें व सार्वजानिक गाऱ्हाणीं ऐकण्यास नेहमीं सावधान चित्तानें तयार असणें, ही हाउस् ऑफ् कॉमन्सचीं खरीं लक्षणें होत; परंतु राष्ट्र अर्जदार असतां सरकारचा स्तुतिपाठ गाणारें; लोक निराश झाले असतां आबादानी आहे असा विश्वास ठेवणारें; लोकांस अत्यंत तिरस्कारास्पद झालेल्या प्रधानांचे गळ्यांत गळा घालणारें; दोषी ह्मणून ज्यांची चौकशी व्हावी असें लोकमत ओरडत आहे, त्यांचे आभार मानणारें; लोक व प्रधानमंडल यांमधील सर्व भांडणांत लोकांच्या विरुद्ध हटकून जाणारें; लोकमत खर्चाचा तपशिल मागतें त्यावेळीं पैशाची मदत करण्यास तयार असणारें; लोकांतील अस्वस्थतांच्या कारणांचा बिलकुल विचार न करितां त्यांसच शासन देणारें; असें हाउस् ऑफ् कॉमन्स असणें ही आमच्या राज्यव्यवस्थेंतील अपूर्व व असुरी अशीच एक गोष्ट होय. अशा सभेस एक मोठें भव्य सीनेट ह्मणतां येईल; पण तीस रूढार्थानें हाउस् ऑफ् कॉमन्स कधींही ह्मणतां येणार नाहीं. मुखत्यारीची व प्रतिनिधित्वाची प्रत्यक्ष स्थिति जाऊन स्वतंत्र सत्तेप्रमाणें वागण्याची स्थिति येणें हा रूपांतर होऊन जगांतील सर्व सार्वजनिक सत्ताधारी संस्था आपल्या

मुख्य उद्देशापासून भ्रष्ट होण्याचा मार्ग होय. हा भ्रष्टपणा कधीं कधीं भयंकर व असाध्य होतो. कारण, प्रत्यक्ष मूलतत्वांचाच भ्रष्टपणा व ज्यायोगें कांहीं विशेष गोष्टीच अविचारानें घडतात तो भ्रष्टपणा, ह्यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. हा दुसरा भ्रष्टपणा मानवी शहाणपणानें निवारण होण्यासारखा नाहीं व ह्मणूनच जरा कमी महत्वाचा आहे; पण पहिल्यानें होणारें अरिष्ट आकस्मिक नसून नियत आहे, व तज्जन्य अस्वस्थता हळू हळू सहाजिक हाडीं खिळून जाते.

माझ्या स्वतःविषयीं ह्मणाल तर, माझ्या दृष्टीस दोन चिन्हें पडलीं ह्मणजे पार्लमेंटचें तत्व पूर्णपणें भ्रष्ट झालें आहे व ह्मणूनच त्याचे सर्व उद्देश निष्फल होत आहेत असें मला ह्मणावें लागेल. पहिलें—सर्व प्रकारच्या प्रधानांस तारतम्य विचार न करितां एकजात मदत करण्याचा परिपाठ; कारण ह्यामुळें पार्लमेंटचा मुख्य उद्देश जो दाब तो नष्ट होतो व झोटिंगपादशाहीस सर्वसाधारण असें आगाऊच अनुमोदन मिळतें. व दुसरें—स्वतंत्र नियोजनाचे हक्कास अपायकारक असा दुसरा कोणताही हक्क स्थापित होणें; कारण ह्यामुळें ज्यापासून हाउस् ऑफ् कॉमन्सला आपली सत्ता प्राप्त होते, तो कायदाच अजिबात नाहींसा होतो.

राज्यक्रांतीपासून गादीच्या पुष्कळ घातक हक्कांबरोबर चांगल्याही पुष्कळ हक्कांचें निर्मूलन झालें आहे हें मला माहीत आहे. नियामक सत्तेचा रस्ता पुष्कळ वेळीं धरणें अगत्याचें झालें आहे. पार्लमेंट दरवर्षास व तेंही सर्व वर्षभर भरावें लागतें. वारंवार होणाऱ्या योजनाच्या भयंकर अव्यवस्था टाळण्यासाठीं पार्लमेंटची तीन वर्षांचे ऐवजीं सात वर्षांची मुदत करण्यांत आली आहे. ह्या गोष्टीमुळें—नित्य सत्ताधारणानें व योजनांचे विरलतेनें—हाउस ऑफ् कॉमन्सला स्थायिक सीनेटचें स्वरूप हळू हळू येत चाललें आहे. ही अव्यवस्था मोठमोठ्या अव्यवस्थांचे परिहारानें उत्पन्न झाली आहे; राजसत्ताक राज्याखालीं प्रजास्वातंत्र्य, राष्ट्रबल, व अन्तःस्वस्थता यांची सांगड घालण्याच्या अत्यंत दुर्घटतेपासून हिची उत्पत्ति झाली आहे.

ह्या जंगी अडचणींतून पूर्णपणें आपली मुक्तता करून घेणें अशक्य आहे हें उघड आहे. परंतु एखादें अरिष्ट टाळतां येत नाहीं ह्मणून त्यास वाढूं देतां उपयोगीं नाहीं; आणि हाउस ऑफ् कॉमन्सला प्रत्येक गोष्टींत त्याच्या मुख्य तत्वांप्रमाणें राखण्याचें हातीं नाहीं ह्मणून त्यास त्या तत्वांवर पूर्णपणें पाणी सोडूं द्यावें असें मी कधींही ह्मणणार नाहीं. आमच्या काळांत तर हें एक सत्तेचें मोठें कारस्थानच होऊन बसलें आहे. ज्यांना लोकहितानुरूप आपलें वर्तन ठेवितां येत नाहीं, व ज्यांस राजाचे हक्कांचेंही पाठबळ मिळत नाहीं त्यांनीं एक नवीनच शकल काढिली आहे. त्यांनीं राजाच्या हक्कांचा जीर्ण व निरुपयोगी किल्ला अजिबात सोडून देऊन खुद्द पार्लमेंटच्याच दुर्गांत वसति केली आहे. त्यांचें जर कांहीं कार्य साधावयाचें असलें आणि जर त्यास साधारण कायद्याची शक्ति पुरेशी झाली नाहीं, तर ते तें पार्लमेंटांत आणितात. पार्लमेंटांत अथपासून इतिपर्यंत सर्व व्यवस्था नीट करण्यांत येते. पार्लमेंटांत आपलें कार्य साधण्याची त्यांची सत्ता अमर्याद आहे; कृतींत सुरक्षितपणा पूर्ण आहे; नियमांची कांहीं आडकाठी नाहीं कीं कांहीं भावी परिणामांची धास्ती नाहीं. आपण साहाय्य केलेल्या कृत्यांबद्दल इतरांस पार्लमेंटाच्यानें भलेपणास अनुसरून शिक्षा करितां येत नाहीं. ह्याप्रमाणें विधायक सत्तेवरील पार्लमेंटांचा दाब नष्ट झाला आहे; कारण सरकारच्या प्रत्येक महत्वाचे कामांत त्यास मदत करावी लागत आहे. राज्यव्यवस्थेचा शुद्धपणा कायम राखणारा जो प्रधानाभियोगाचा अधिकार त्याचा ऱ्हास होत होत अखेरीस तो नामशेष होण्याची भीति उत्पन्न झाली आहे.

ह्या रीतीनें चौकडीचे बरेच मोठमोठे हेतु तडीस गेले. तिच्या विद्यमानें झालेलें सरकारचें प्रकृत कृत्य, पार्लमेंट स्वावलंबी झालें ह्मणजे, शहाजोग ठरतें; परंतु तें कृत्य जर इतकें तिरस्कारार्ह असलें, कीं पार्लमेंटची सर्व शक्ति तिची शिफारस करण्यास असमर्थ आहे, तर खुद्द पार्लमेंटाचेंच नांवास डाग लागतो; आणि हा डाग

जसा जसा वाढत जातो, तसें तसें राज्यव्यवस्थेविषयीं लोकांचें औदासिन्य वाढत जातें, व पार्लमेंटच्या सत्तेच्या दुरुपयोगानें तें औदासिन्य लोकांत सर्वसाधारण करण्याचा तर आमच्या राज्यव्यवस्थाद्वेष्ट्यांचा नित्य उद्देश आहे. राज्यांतील 'प्रवर्तकसत्तांस वळण देणारी एक सभा या नात्यानें पार्लमेंटचे ठायीं लोकांचा जो विश्वास, जी प्रीति व जी पूज्यबुद्धि होती, तो विश्वास, ती प्रीति, व ती पुज्यबुद्धि, तें विधायक सत्तेचीं कामें करण्यास तयार होईल त्यावेळीं त्याजवरून निखालस उडून जाईल. पार्लमेंटचें कर्तव्यभ्रष्टतामूलक वर्तन यद्यपि कांहींसें न्यायाचें व माफक असलें, तथापि वरील परिणाम घडावयाचाच; पण तें जर अन्याय्य, भयंकर, आवेशी व आपमतलबी असेल तर त्याची गणना जुलमाच्या अत्यंत दुःसह प्रकारांत झाल्यावांचून राहणार नाहीं.

प्रतिनिधि व नियोजक यांमधील हें औदासिन्य बरेंच दिवस हळू हळू वाढत चाललें होतें, व त्यांचा पूर्ण विघाड करणारे लोक जर आपल्या कारस्थानाच्या महत्वाप्रमाणें अत्यंत शांत व वाकबगार असते, तर त्यांस कामांत निःसंशय यश प्राप्त झालें असतें; परंतु त्यांच्या विचारशून्यत्वानें सर्व कांहीं उघडकीस आलें आहे, व राष्ट्रास धास्ती पडली आहे; ही गोष्ट तदुत्पादकांस मुळींच रुचत नाहीं, व ह्मणूनच परवांचे सेशनांत राजमित्र नांवाचे टोळीनें खुद्द निवडणुकीचेच हक्कांत फेरबदल करण्याचा एक भगीरथ प्रयत्न केला. त्यायोगें आपणास अप्रिय अशा मनुष्यास पार्लमेंटांत बसण्यास अयोग्य ठरविण्याचा हाउस् ऑफ् कॉमन्सला हक्क द्यावयाचा होता; व तो केवळ त्याच्या मर्जीवरच सोंपवावयाचा होता; अयोग्यता कांहीं प्रकारच्या मनुष्यांस साधारणपणें व कांहीं व्यक्तीस विशेषें करून लागू करावयाची होती; आणि जे लोक कायदेशीर नियोजकांचे बहुमतानें अथवा अस्तित्वांतील कोणत्याही कायद्याचे कलमान्वयें निवडले गेले नाहींत हें स्पष्ट आहे, त्यांचाच पार्लमेंटांत शिरकाव करून द्यावयाचा होता.

ज्या प्रमाणांवर ह्या मुद्याचा पाया रचिला होता, व त्याचें समर्थन करण्यांत आलें होतें, त्यांचा या स्थलीं विचार करण्याचें माझें कर्तव्य

नाहीं. ह्या विषयाचा वादविवाद जितक्या विस्तारानें व जितक्या शहाणपणानें झाला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याच विषयाचा झाला नसेल. तो एका पक्षाकडून जितका समाधानकारक झाला आहे तितका दुसरा कोणताही झाला नसेल. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखांनीं ज्यांची खात्री झाली नसेल, त्यांची खात्री आकाशांतून जरी कोणी उतरला तरी व्हावयाची नाहीं.

मीही या विषयाचा विचार केला आहे; परंतु या स्थलीं माझें कर्तव्य —तो राजकीय कारस्थानाचा एक प्रिय भाग ह्मणून त्याचा विचार करणें, व त्याचे राजनीतिदृष्ट्या परिणाम पहाणें—इतकेंच आहे.

मि० विल्कूसूच्या शासनाकरितां झालेला भयंकर क्रोधावेश ह्या सर्वांचें निमित्त होय. हा गृहस्थ दरबारचौकडीचा हाडवैरी बनल्यामुळें तिच्या तिरस्कारास व लोकप्रियतेस तो एकसमयावच्छेदेंकरून पात्र झाला. दरबारी पक्षानें त्याचा एकसारखा द्वेषानें पाठलाग केल्यामुळें व लोकाश्रयानें त्याचें रक्षण केल्यामुळें त्या एका मनुष्याविषयीं सर्व मुद्दा नाहींसा होऊन विरुद्ध पक्षांच्याच प्रबलतेची परीक्षा होण्याचा समय येऊन ठेपला. या विशेष कलहांतील जयाचा फायदा मिळविणें हा त्या वेळचा उद्देश होता; पण तो मुख्य व एकच उद्देश नव्हता. हाउस् ऑफ् कॉमन्सचे प्रकृतीवरील त्याचा परिणाम हा अपेक्षित मुख्य मुद्दा होय. चौकडीला ही गोष्ट साधावयाची होती. सार्वजनिक मान संपादण्यास व सार्वजनिक कामांत धुरीणत्व मिळविण्याससुद्धां लोकप्रियतेपेक्षां दरबारप्रियता सुगमतर मार्ग आहे असें सिद्ध करणारा एक प्रति कायदाच त्यांस स्थापावयाचा होता. बेकायदा सत्ता स्थापित करणाऱ्या प्रत्येक प्रयत्नास अडथळा करण्याची धमक, कांहीं अंशांनीं अमर्याद असेंही तीक्ष्ण स्वातंत्र्यतेज, व सरकारची प्रत्येक भ्रष्टता व चुकी उमगून काढण्याची शोधकबुद्धि व ती उघडकीस आणण्याचें धैर्य, हे गुण हाउस् ऑफ् कॉमन्समध्यें जागा मिळविण्यास सरळ व निवळ सार्वलौकिक नियोजनांत उपयोगीं पडतात. आळशी व अति नम्र

असा स्वभाव, सत्ताधाऱ्यांची सर्व कृति सौम्यपणें पाहून उदार मनानें त्यांतील गुणच ग्रहण करण्याचा व त्यांची मर्जी संपादन करण्याचा स्वभाव, व लोकांचें कोणतेंही अमर्याद वर्तन सहन न करितां सत्तेच्याच कडकपणास अनुमोदन देण्याची प्रवृत्ति; हे गुण पार्लमेंटचा सभासद होऊं इच्छिणारास सार्वजनिक नियोजनांत आड येतात.

पहिल्याच गुणांची निवड करणाऱ्या लोकांच्या प्रवृत्तीस सदसद्विवेकाचें पाठबळ आहे; कारण ह्या गुणांचें आधिक्यही ज्याचे ठायीं वसत आहे, तो मनुष्य आपणाकडे सोंपविलेल्या कामाचे उद्देशाविरुद्ध सहसा जात नाहीं, दुसऱ्या गुणांचा मनुष्य, जरी ते गुण त्याच्यांत परमावधीस पोंचले नसले तरी आपल्या कामाची व्यवस्था फारच असमाधानकारक-रीतीनें करितो. पण जर ते गुण जरा फाजिल मानानें त्याचे ठायीं असतील, तर सरकारावर दाब ठेवण्याचा उद्देश पूर्णपणें फसणारच. परंतु हाउस् ऑफ् कॉमन्स्च्या नवीन रचनेच्या वेळीं ह्या तत्वांत फेरबदलच व्हावयाचा नव्हता तर त्यास अजीच फांटा मिळावयाचा होता. इकडे सत्तेच्या वतीनें केलेला कोणताही गुन्हा जरी कायद्याचे मर्यादेबाहेर न्यावयाचा नव्हता, तरी त्यासंबंधानें कायद्याचा अनुकूल अर्थ करावयाचा होता, त्याचा कडकपणा नाहींसा करावयाचा होता, किंवा त्या गुन्ह्यास पूर्ण माफी मिळावयाची होती; तिकडे स्वातंत्र्याचे वतीनें, किंवा लोकप्रियतेच्या उद्योगांत, अथवा सार्वजनिक हक्कांचे व अधिकारांचे रक्षणासाठीं, झालेल्या सर्व अमर्याद वर्तनांस अत्यंत कडक कायद्यानें शासन करावयाचें होतें इतकेंच नव्हे, तर मोठ्या हुषारीनें त्याची यथायोग्य बोळवण करावयाची होती; व ह्या रीतीनें खुद्द सार्वजनिक नियोजनाचा नाश होणार होता. लोकप्रियता जरी शिक्षेस प्रत्यक्ष पात्र होणार नव्हती, तरी फारच धोक्याची व्हावयाची होती. लोकांची प्रीति कदाचित् त्यांचें प्रतिनिधित्व धारण करण्यास आड येणार होती. व त्यांची अप्रीति, इष्टार्थदायक कांडीचे दोन तीन प्रयोगांनीं त्यांच्या सर्वस्वाचे जिमेदार होण्यास कदाचित् साधन होणार होती. याचें नांव गुन्ह्याबद्दल

गुन्हेगारास शिक्षा होणें. ह्या कालपर्यंत लोकमत, बऱ्याच अंशीं सर्वसंमत राष्ट्रसभेच्या जोरावर राजाचे ताब्यांतील मोठमोठे मानपान व देणग्या मिळवून देत असे. आतां तो मनु बदलला आहे; आणि जे मान लोकांच्याच मताप्रमाणें देण्यांत आले पाहिजेत ते मान संपादन करण्यास व राखण्यास दरबारच्या प्रीतीशिवाय दुसरें उत्तम साधन उरलें नाहीं.

ही सर्व हकीकत कांहींतरी लटपट करून कशी खोडून काढितां येईल हा प्रश्न वेगळा आहे. सार्वजनिक व्यवहारांतील सबळ प्रमाण जें उदाहरण तें माझ्या ह्मणण्याची सत्यता सिद्ध करित आहे. सत्तेच्या वर्तीनें केलेल्या मूर्खपणाबद्दल व भयंकर व अमर्याद श्रवृतीबद्दल पार्लमेंटांत बसण्यास अयोग्य ठरलेला मनुष्य माझ्या दृष्टीस पडेपर्यंत ह्या उदाहरणाचे घातक प्रवृत्तीसंबंधीं माझें मत कशानेंही बदलणार नाहीं. कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं, लोकप्रियगुणरूपी दोषाचे अतिरेकानें व सार्वजनिक हक्कांचे ( वाटेल तर अव्यवस्थित ) मंडणानें वरील प्रकारची अयोग्यता उत्पन्न झाली आहे. त्याचे उलट दोषास अत्यल्पही शिक्षा झालेली नाहीं. सत्तेस प्रतिबंध केल्यानें हाउस् ऑफ् कॉमन्सचे दरवाजे एका मनुष्यास बंद झाले आहेत; लुब्रेपणानें व दास्यानें तसा प्रसंग कोणावरही आलेला नाहीं.

लोकप्रिय दंग्यांस किंवा कोणत्याही दंग्यांस उत्तेजन देण्याचा माझा इरादा नाहीं. परंतु ह्या सर्व गुन्ह्यांच्या शिक्षेची इयत्ता व प्रमाण ठरविण्याचें कायद्याकडे सोंपवावें अशी माझी इच्छा आहे. ह्या देशांतील कायदे शहाणपणानें असे तयार केलेले आहेत कीं, ते राज्यव्यवस्थेचे सर्व उद्देश तडीस नेतात. ते विशेष प्रकारचें स्वातंत्र्य रक्षण करण्याचे उद्देशानें बनविलेले नाहींत. ह्मणून सार्वजनिक न्यास किंवा ठेव धारण करणारांशिवाय अन्य लोकांनीं, अथवा त्याच लोकांनीं अन्य नात्यानें, स्वातंत्र्यरक्षणार्थ केलेलीं सर्व कृत्यें कायद्याचे साधारण मर्यादेबाहेर कमी अधिक प्रमाणानें पडतील; व अत्यंत कडकपणानें त्यांचें पारिपत्य करण्यास कायदा समर्थ आहे. पंचायतीचे निकालानें त्यास जें काय

सौम्यरूप मिळेल तें मिळो; एरवीं आमचा पाडाव करण्याचे कामीं त्या तीक्ष्ण कायद्याचा हात कोणाच्यानेंही धरवणार नाहीं. पण कायद्याचें उल्लंघन करण्याची, न्यायपद्धतीस गुंडाळून ठेवण्याची व खरे गुन्हे नियामक मंडळ्यांत नेण्याची--ह्या मंडळ्या मग लॉर्ड बेकननें स्टार चेंबरचें वर्णन केल्याप्रमाणें न्यायाचे पासंग लागणारे धारवाडी कांटे हातांत घेऊन बसणाऱ्या कचेऱ्या बनावयाच्या--रीति एकदां प्रबळ झाली ह्मणजे स्टार-चेंबरचीं सर्व अरिष्टें पुनरपि जन्मास येतील. गुन्हे ठरविण्याविषयींचा उदारपणा व सढळपणा व शिक्षा करण्यांत अमर्याद अक्कल हुषारी हें त्या कांट्याचें पासंग होय. हा कायद्याचे शास्त्रांत एक उत्पातच समजला पाहिजे. ह्यासाठीं स्थापिलेली कचेरी कमिटी ऑफ् काउन्सिल् असो, हाउस् ऑफ् कॉमन्स् असो, अथवा हाउस् ऑफ् लॉर्डस् असो, त्याचें विशेष महत्व नाहीं; ती कांहीं कां असेना, प्रजाजन-स्वातंत्र्य नष्ट हें व्हावयाचेंच. तसेंच पार्लमेंटांतील जें हाउस् हा कांटा हातीं धरील त्याचेही खरे उद्देश व आशय त्यायोगें नष्ट व्हावयाचे.

मि० विल्कस्ला त्याचे बीभत्स लेखांबद्दल व त्याचे घरीं सांपडलेल्या अमंगल कागदांबद्दल शिक्षा करण्यांत आली या विधानावर कोणीही भरंवसा ठेवीत नाहीं व मीही ठेवणार नाहीं. जर इतर निंदक व असभ्य लेखकांचे कत्तलींत त्याची कत्तल उडाली असती, तर केलेल्या बतावणी पलीकडे त्यांत कांहीं नाहीं असें मी खुशाल कबूल केलें असतें. पण तितक्याच बीभत्स आणि धर्मास, नीतीस, व शांततेस कदाचित् जास्त अपायकारक अशा लेखांस कांहींच शिक्षा झालेली नाहीं, किंवा त्यांच्या लेखकांची कांहींच बेअब्रु झालेली नाहीं; तसेंच कायदा, स्वातंत्र्य, व देशांतील राज्यव्यवस्था ह्यां विरुद्ध लिहिलेल्या अत्यंत राजद्रोही व निंद्य लेखांस मुळींच टपका ठेवण्यांत आला नाहीं; अशा गोष्टी वर्षानुवर्ष घडतांना प्रत्यक्ष पाहिल्या ह्मणजे वरील हकीकत खरी नसून निर्लज्जपणें केलेलें भयंकर ढोंग आहे असें ह्मणणें भाग आहे. धार्मिक, व्यावहारिक, सार्वजनिक, अथवा खासगी प्रत्येक गोष्टीच्या विरुद्ध ही विषारी व बीभत्स

भाषा इतकी त्वेषयुक्त व उच्छृंखल होऊन स्वेच्छाचारानें राज्यांत कधींच संचार करूं लागली नव्हती! आणि एका निंद्य लेखकाचें पारिपत्य करण्यासाठीं व प्रजेचा एक लाल तिजपासून हिरावून घेण्यासाठीं राष्ट्रांतील स्वस्थतेस धक्काच पोंचविणें भाग आहे. त्याशिवाय निर्वाह नाहीं.

बरें दुर्गुण अशा नीच व क्षुद्ररीतीनें सुटून जातो इतक्यानेंच होत नाहीं. तर ज्या मनुष्यांचें आयुष्य साधारणपणें गालिप्रदानांतच गेलें आहे एवढेंच नव्हे तर ज्यांनीं आपल्या सहवासानें, आपल्या उपदेशानें, आपल्या उदाहरणानें, व आपल्या उत्तेजनानें ह्या मनुष्यास चौकडीनें मांडलेल्या त्याच्या छलास निमित्त झालेल्या दुर्गुणांचे पाशांत ओढून घेतलें, त्याच मनुष्यांवर दरबारचे हातांतील सर्व मानपान व प्रतिष्ठा लादलेली पाहून लोकांच्या तळपायांची आग मस्तकास जात नाहीं काय? बाकीच्या सर्व अपराधांत दास्याचा अपराध मिळविला ह्मणजे जो अपराधसंकर होतो तो लागलाच सद्गुणमय होऊन बक्षिसास व मानास सत्पात्र होतो. ह्मणून बक्षिसें व शिक्षा देण्याची चौकडीची ही रीति मनांत आणिली ह्मणजे मि० विल्कस जो छळास पात्र झाला आहे तो बक्षिसास पात्र झालेल्या इतर लोकांप्रमाणेंच जें कांहीं त्याचें आचरण झालें त्याजबद्दल नव्हे तर त्यांच्यापैकीं पुष्कळांत व त्याच्यांत जो फरक आहे त्याजबद्दल होय; आणि दुर्गुणांशीं मिळून असलेल्या त्याच्या पाणिदार स्वभावामुळें—त्याच्या अजिंक्य निग्रहामुळें व त्यानें निश्चयपूर्वक, जुलमास अश्रांत व अव्याहत प्रतिबंधक केल्यामुळें—त्याचा हा पाठलाग होत आहे असें अनुमान करणें भाग आहे.

ह्मणून ह्या प्रसंगीं व्यक्तिमात्रास शिक्षा करण्याचा किंवा त्याच्या दुर्गुणांचें पारिपत्य करण्याचा मुद्दा नव्हता. सत्तेच्या कृतीस केलेल्या प्रतिरोधास एका तऱ्हेचा व्यावहारिक बहिष्कार घालावयाचा होता. ह्या प्रतिरोधापासून उत्पन्न होणारी लोकप्रियता स्वसंरक्षण करण्यास असमर्थ आहे असें प्रदर्शित करावयाचें होतें. लोकांची प्रीति संपादन करणाऱ्या गुणांनीं प्रत्येक दोष प्रायश्चित्तहीन व प्रत्येक चुकी सुधार-

ण्यास मार्ग होणार नसावयाचाच; पण सत्तेची मर्जी संपादन करणारे गुण, प्रत्येक छिद्रावर झांकण घालून त्यास पवित्र करणार होते. हाउस् ऑफ् कॉमन्समध्यें प्रामाणिकपणें चिरस्थायी जागा मिळविणाऱ्या मनुष्यानें लोकप्रिय गुण संपादन करण्याचें धाडस करितांना सांभाळूनच राहिलें पाहिजे; नाहींतर लोकप्रियता दुःखास व अकालमृत्यूस कारण होते असें त्यांच्या अनुभवास यावयाचें. ह्मणून जर श्ववृत्तीपेक्षां लोकप्रियतेच्या उद्योगानेंच मनुष्यमात्रावर घोरतर प्रसंग येऊं लागतील, तर सार्वजनिक नियोजनांचें जीवनतत्व राज्यव्यवस्थेंतून नष्टच होऊन जाईल.

या गोष्टींच्या तडाक्याखालीं हाउस् ऑफ् कॉमन्सची रचना कोणत्या प्रकारचे थरावर अवश्यमेव जाईल याचा विचार करणें इंग्लंडांतील लोकांस उचित आहे. सर्व मान, हुद्दे व बक्षिसें यांचें साहाय्य दरबारास मिळेल; व्यक्तिमात्राचा लोभ व वृथाभिमान सर्वांशीं संतुष्ट होतील आणि बहुतेक लोकांस जें महत्वाचें वाटत असतें तें हें कीं, शेंकडों वेळा व्यक्तिमात्राचे थोडें थोडें उपयोगी पडल्यानें आपलें वजन देशांत अधिकाधिक करण्याचीं साधनें आपणांस प्राप्त होतील. आतां उलट पक्षीं, दरबाराशीं ज्याचा संबंध नाहीं इतकेंच नव्हे तर जो दरबाराच्या पद्धतीस प्रतिकूल आहे अशा एका मनुष्याची आपण कल्पना करूंया. त्याचे स्वतःजवळ कांहीं हुद्दा नाहीं, कीं बक्षिस नाहीं, कीं सत्ता नाहीं अथवा कोणतीही धार्मिक अगर व्यावहारिक, लष्करी अगर आरमारी बढतीची जागा आपल्या मुलांस, बंधूंस किंवा आप्तांस त्यास मिळवून देतां यावयाची नाहीं. मेअरच्या, आल्डरमनूच्या, किंवा ठळक ठळक नागरिक लोकांच्या मुलांकरितां हुद्दे किंवा लहानसहान वृत्ति मागण्याची बरो-मधील प्रतिनिधीची विनंति निष्फल होते. त्याच्या दरबारी प्रतिपक्ष्यास तीं सर्व मिळतात. त्याला उदारतेचीं, परोपकाराचीं, व लोकहिताचींही शेंकडों कृत्यें करितां येतात. लष्करी लोकांस आपल्या घरीं बिऱ्हाडास जागा देण्याच्या सक्तीपासून त्यास लोकांची सुटका करितां येते. त्यास व्यापाराच्या सोई मिळवितां येतात. त्याला हजारों

रीतींनीं आपल्या लोकांचें कल्याण करितां येतें, व हजारों अरिष्टें पळवून लावितां येतात. त्यानें जरी महत्तर राज्यहितास धाब्यावर बसवून ठेविलें, तरी त्यास आपल्या बरोबरा हितकर्ता, आश्रयदाता, पिता व अधिदेवता होऊन बसतां येतें. दुर्दैवी स्वतंत्र मनुष्यास कटु नकार, कांहीं तरी केंविलवाणी सबब अथवा निराश मंडळींचें निस्तेज प्रतिनिधित्व या पलीकडे कांहींही पुढें करितां यावयाचें नाहीं. एखादा सद्गुण दाखविण्याचें किंवा कोणाजवळ तरी मैत्री करण्याचें आपल्या खासगी संपत्तीशिवाय—पण हींतही त्याचा दरबारी प्रतिपक्षी त्यास मागें टाकितो किंवा निदान त्याची बरोबरी तरी सहज करितो—त्याजवळ अन्य साधन नाहीं. हाउस् ऑफ् कॉमन्स-मध्यें त्याच्या मताचे लोक सदोदित थोडेच असतात. जर तो बोलण्यास उभा राहिला तर दरवाजे बंद करण्यांत येतात, व बड्या बड्या हुद्दे-दारांची एक मंडळी बाहेर येऊन जगास असें विदित करिते कीं, त्याचा सर्व मुद्दा हुद्दा मिळविण्याचा आहे. जर त्याला कांहीं भाषणशैली नसेल—व ह्या सभेमधील त्याच्या इतक्या विद्वान् व बहुश्रुत पुष्कळ लोकांची हीच स्थिति असते—तर वरील संकटें त्यास प्राप्त व्हावयाचीं तीं व्हाव-याचींच; पण माफक वक्तृत्वशक्तीचे प्रभावानें मिळणाऱ्या नांवासही तो अंतरतो. दुसऱ्या कोणत्याही स्थितीपेक्षां ह्या स्थितींत कर्तव्यकर्मास जागणें फारच धैर्य खर्चविणारें आहे. त्याचें लोकप्रियतेचें अल्प बक्षीस काढून घ्या, लोकहिताचे संरक्षणार्थ केलेल्या अमर्याद वर्तनानें कायद्या-व्यतिरिक्त व आपल्या लहरीप्रमाणें हाउस् ऑफ् कॉमन्सचा सभासद होण्यास मनुष्य नालायक ठरतो व त्याचा मताधिकारही काढून त्याची सर्वप्रकारें मानखंडना करितां येते असें हाउस् ऑफ् कॉमन्सला बहुमतानें ठरवूं द्या कीं, सर्व आटपलें. मग ह्या देशांतील लोकांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, कोणीही मनुष्य निश्चयानें व प्रामाणिकपणें देशसेवा करण्यास तयार होणार नाहीं. कोणी तयार होणें हेंच मानवी स्वभावाचे व सृष्टीचे विरुद्ध आहे, व लोकांनीं तशी आशा करणें हें तितक्याच धाष्टर्याचें व मूर्खपणाचें होईल. आपलें कर्तव्यकर्म पाणिदारपणें बजावित

असतां प्रत्येक प्रतिनिधींचें रक्षण करण्यास लोकसत्ता कायद्याचे मर्यादेचें उल्लंघन न करितां समर्थ असली पाहिजे. नाहीं तर तें कर्तव्य कोणाच्यानेंही होणार नाहीं. नियोजकांचा हाउस् ऑफ् कॉमन्सवर दाब असल्याशिवाय व आपला प्रतिनिधि निवडण्याचा हक्क त्या सभेच्या सत्तेचे मर्यादेबाहेर असल्याशिवाय हाउस् ऑफ् कॉमन्सचा सरकारच्या इतर भागांवर दाब कधींही राहणार नाहीं. जर अयोग्यता ठरविण्याची त्या सभेची स्वेच्छाचारी सत्ता लोक कायम राहूं देतील तर त्यांनीं त्या सभेची इतर सर्व सत्ता भ्रष्ट झाली ह्मणून समजावें. नुकता झालेला प्रकार बेकायदा आहे असें मी ह्मणत नाहीं. तो बेकायदा असलाच पाहिजे. कारण, अपेक्षित अधिकार सरकारचे कोणत्याही नियमित भागांत असली तरी कायदेशीर होणें अशक्य आहे.

ह्या अपेक्षित अधिकाराच्या उपयोगास आपल्या स्वतःच्या तारतम्याशिवाय दुसरा कोणताही नियम नाहीं, हें जर त्यांनीं आपलें मुख्य तत्व ह्मणून स्थापित केलें नसतें, तर ही अयोग्यता ठरविण्याची अपेक्षित सत्ता शेवटच्या न्यायासनाचे सत्तेच्या पलीकडे गेली नसती. ह्या कारस्थान्यांपैकीं एकानेंही या अयोग्यतेचा नियम ठरविण्याचें, हाउस् ऑफ् कॉमन्स ज्या दोषामुळें एकाद्यावर बहिष्कार घालणार त्या दोषाची जात व प्रत ठरविण्याचें अथवा त्याच्या चौकशीची रीति कोणती व तो शाबित करण्यास पुरावा कोणत्या प्रकारचा पाहिजे हें सांगण्याचें अंगावर घेतलें नाहीं. ह्याचा प्रत्यक्ष परिणाम असा होत आहे कीं, पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या कोणत्याही नियमाप्रमाणें ज्याचा न्याय्य पुरावा व्हावयाचा नाहीं, अशा कोणत्या तरी मनःकल्पित दोषाबद्दल इंग्रज प्रजेचा पहिला हक्क व इतर हक्कांचा आधारस्तंभ असा हक्क हिसकाविला जात आहे. हें आमच्या राज्यव्यवस्थेशीं अगदीं विसंगत आहे. इतकें कीं प्रजेचा कोणताही अत्यंत क्षुल्लक हक्क अशा रीतीनें कधींही हिसकावून घेण्यांत आला नव्हता व येणेंही शक्य नाहीं असें मी आग्रहानें प्रतिपादण्याचें धाडस करतों.

चौकडीनें केलेला सत्तेचा सर्व अपहार खालील विचारसरणीवर स्थापिला आहे. आह्मी कायदे करीत नाहीं. नको, आह्मांस त्या सत्तेची जरूर नाहीं. आह्मी कायद्याचा अर्थ करितों; आणि ज्याअर्थी आह्मांस योग्य व श्रेष्ठ न्यायासनाचा अधिकार पोंचतो, त्याअर्थी आमचा शब्द, पूर्वी तसा कायदा नसला तरी, कायदा होऊन बसतो. ह्याप्रमाणें 'त्यांच्या न्यायावर अपील नाहीं' ह्या गोष्टीचा त्यांच्या न्यायास नियमच नाहीं असा अर्थ होऊं लागला आहे. त्यांच्या मतास कायद्याचे अनुमोदनानें बळकटी येत नाहीं; तर उलट, कायद्यास त्यांच्या मतास अनुसरावें लागत आहे. हाउस् आफ् कॉमन्स्च्या तत्कालीन लहरीशिवाय त्यांच्या मतास दुसरा नियम नाहीं. अनियमित तारतम्यज्ञान अग्रस्थानापन्न झालें आहे व कायदा अनुचर बनला आहे. ह्यावरून हल्लींच्या कायद्याचा मासला व त्याचें स्वरूप हीं तेंव्हांच कळून येतील.

त्यांचा हा अधिकार केवळ शुष्क व काल्पनिक नव्हता. त्याचा अंमल पूर्ण गाजून सुटला आहे; आणि भयंकर विचारांपासून तत्सदृश आचरणाची उत्पत्ति झाली आहे. दोन्ही पक्षांनीं व्यवस्थितपणें आपला आवेश दाखविला आहे. ज्या मनुष्यास हाउस् आफ् कॉमन्स्नें अयोग्य ठरविलें त्याच मनुष्यास मिड्ल् सेक्स्च्या नियोजकांनीं निवडिलें; व ज्या मनुष्यास मिड्ल् सेक्स्च्या नियोजकांनीं निवडिलें नव्हतें अशा एका मनुष्यास हाउस् आफ् कॉमन्सनें सभासद केलें आहे. लोकांची वास्तविक कायदेशीर संमति त्यावेळीं लघुमतासच होती, आणि अयोग्यतेच्या ठरावास प्रतिबंध झाल्यास कोणत्याही वेळीं लघुमतासच असूं शकेल असें त्यांनीं स्वतःस्वीकारिलेल्या नियामक सत्तेच्या जोरावर प्रसिद्ध केलें.

जेंव्हां एखादा कायदा एखाद्या हक्काच्या संरक्षणार्थ करण्यांत आला असतो, आणि त्याच हक्काच्या अंतःस्वरूपास प्रतिकूल असा त्या कायद्याचा अर्थ करण्यांत येतो, तेंव्हां ती अर्थपद्धति दूषित असते. आह्मांस जें नियोजन पाहिजे आहे, तें केवळ संस्कारयुक्त, ठराविकरीत्या, अथवा

नामधारी, किंवा काल्पनिक कायद्या बरहुकूम झालेलें नको आहे. तें यथार्थ व वस्तुस्थित्या होणें फार महत्वाचें आहे. नियोजनाचा हक्क शास्त्रीय विचारांचे कांहीं पद्धतीस किंवा नियमास अनुसरून एक संस्कारविशेष ह्मणून स्थापित झाला नव्हता; मुद्दाम निवडलेल्या मनुष्याचे जागीं एखादा टिटिअस्, किंवा मेव्हिअस्, एखादा जॉन् किंवा रिचर्ड रो ह्या तत्वान्वयें नेमितां यावयाचा नाहीं; अथवा ह्या किंवा त्या कोणत्या तरी एका मनुष्याचे नेमणुकीनें त्याची सार्थकता होणार नाहीं. या हक्काचा असा उपयोग आहे कीं, दुसऱ्यांनीं ठरविलेल्या लोकमतानें नव्हे, तर लोकांनीं वास्तविक दिलेल्या मतानें ज्या मनुष्याची आह्मांस माहिती आहे, ज्याची आह्मीं वाखाणणी करितों, व ज्यावर आह्मीं प्रीति करितों व विश्वास ठेवितों, ह्मणून त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे, तो मनुष्य व फक्त तोच मनुष्य त्यांस हा मान मिळावा. हा हक्क लोकांच्या विचारशक्तीचे आटोक्यांत आहे इतकेंच नव्हे, तर तो त्यांस दृग्गोचरही होत आहे. त्याचें अस्तित्व केवळ मानससृष्टींत किंवा कायद्याचे पुस्तकांतच नाहीं; आणि यथार्थ नियोजनाचे जागीं तदन्याची योजना करण्याच्या ज्या क्लृप्ति निघाल्या आहेत, त्यांनीं त्याचा कार्यभाग कधींच उरकावयाचा नाहीं.

न्यायासनांनीं अशा रीतीनें दूरान्वित अर्थरचना अन्य स्थलीं केली आहे हें मला माहित आहे. कॉमन् रिकव्हरिज् (साधारण पुनराप्ति) या कायद्यांत अशी रचना होती. एखाद्याचे मरणानंतर ज्यास त्याचा इमला मिळावयाचा असे, त्यास त्याबद्दल कचेरीचा द्वारपाल, चोपदार, अथवा झाडू अथवा दुसरा एखादा क्षुद्र प्राणी ज्याजवळ कांहीं माया नाहीं, किंवा ज्यास कांहीं मान नाहीं असा जामीन मिळे. वरील कायद्यांतील ही अर्थरचनापद्धति केवळ जाडाभरडा न्यायाभास होय. तथापि हा न्यायाभास किंवा हा काल्पनिक कायदा सर्व राज्यास मान्य होता. कारण वतनदारी स्थापणाऱ्या स्टॅच्यू ऑफ् वेस्टमिन्स्टर नांवाच्या जुन्या कायद्यास टाळणारा हा आभास त्या कायद्यापेक्षां जास्त

समंजस व उपयुक्त होता, व ह्मणूनच तो पुष्कळ वर्षेपर्यंत देशांत टिकला. परंतु ‘ काल्पनिक दंड ’ व ‘ काल्पनिक पुनराप्ति ’ या कायद्यांप्रमाणें नियोजनाचे हक्काचा फार्स व उपहास करण्याचा प्रकृत प्रयत्न निराळ्याच थरास जाईल अशी माझी आशा आहे ; कारण ह्या हक्काचे कायदे आह्मांस अत्यंत प्रिय आहेत व त्याचें वैपरीत्य अत्यंत तिरस्कारार्ह आहे.

ज्यांवर तुमचा पूर्ण विश्वास असेल व ज्यांच्या हातून तुह्मांस अपायकारक अशा रीतीनें तिचा दुरुपयोग कधींच व्हावयाचा नाहीं, अशा लोकांच्या हातींही तारतम्यानें अयोग्यता ठरविण्याची सत्ता दिलेली आहे असें लोकांस विदित करण्यांत आलें आहे हें खरें. पण जुलमाच्या प्रत्येक गोष्टीचें ज्या मुद्यावर मंडन होत असतें त्यांत व ह्या ह्मणण्यांत कांहीं भेद आहे असें दिसल्याशिवाय त्यास विशेष मान द्यावा असें मला कधींही वाटणार नाहीं. आपल्या हक्कांचे उपयोगासंबंधानें स्वत:वरच विश्वासून रहाणें बरें अशी लोकांची खात्री झाली आहे. व तें ओझें हलकें करण्यासाठीं हाउस ऑफ् कॉमन्सूची ह्या प्रकारची आगन्तुक मध्यस्थी त्यांस नको आहे. आणि त्यांचा समज बरोबर आहे. त्यांनीं हाउस ऑफ् कॉमन्स्‌ला आपल्या नियोजनाचे हक्कांवर अधिकार देऊन कधींच स्वस्थ बसतां कामा नये ; कारण ज्या राज्यव्यवस्थेंत त्याच्या बरोबरीच्या दुसऱ्या दोन संस्थांचा त्याजवर अधिकार आहे त्या राज्यव्यवस्थेचा त्याजवर अशा तऱ्हेचा कांहींच विश्वास नाहीं. खुद्द नियामक मंडळीपुढें जितकें नम्र होणें योग्य आहे तितकें, नियामक सत्तेचा कडक व निंद्य भाग आपल्याच ताब्यांत आणूं पहाणाऱ्या हाउस् ऑफ् कॉमन्स्‌ला नम्र होणें, व कायद्याचा ज्या ठिकाणीं विश्वास नाहीं त्या ठिकाणीं पूर्ण विश्वास ठेवणें इतक्या मूर्खपणाचें आहे कीं त्यास दास्याचीच शिक्षा योग्य आहे.

जेव्हां हाउस् ऑफ् कॉमन्सनें आपल्याच फायद्यासाठीं राज्यांतील इतर सत्तांस नागवून नवीन हक्क मिळविण्याचे कामीं आडदांडपणा

केला, तेव्हां नियोजकांनीं त्यांच्या कृतीकडे कानाडोळा करणें जरी न्याय्य नव्हतें, तरी निदान साहजिक होतें; कारण त्यांचा फायदा शेवटीं त्यांसच मिळावयाचा असतो. आह्मी व आमचे मुखत्यार ह्यांमधील कलहांत, आणि ज्याठिकाणीं आमच्या पारड्यांतून काढि-ल्याशिवाय त्यांच्या पारड्यांत भर टाकितां यावयाची नाहीं, त्या ठिकाणीं ज्याअर्थी वरील नम्रपणा धारण करण्याची आह्मांस शिफारस करण्यांत येत आहे, आणि ज्याअर्थी ते आह्मांस असें सांगतात कीं— आह्मी तुमचे प्रतिनिधी आहों, तुह्मी आह्मी एकच रक्तमांसाचे पिंड आहों, आणि आह्मीं जे तुह्मांस फटके मारीत आहों ते तुमच्याच हिताकरितां आहेत—त्याअर्थी त्यांस आह्मीं बोल्यानें दूध पिणारीं बाळें आहों असें वाटत असलें पाहिजे. आह्मी त्यांजवर विश्वास ठेवावा अशी जी त्यांची अन्याय्य इच्छा आहे, तिजवरूनच ते त्याविश्वासास अयोग्य आहेत असें ठरतें. ते त्याचा दुरुपयोग करितील यांत काडीमात्रही संशय नाहीं; कारण आपल्याच मंडळीचें हित करण्यास व वैभव वाढविण्यास साधनीभूत होणारी स्वतःच्याच तारतम्यावर सोंपविलेली अमर्याद सत्ता ज्या ज्या मनुष्यांचे हातीं होती त्या सर्वांनीं तिचा दुरुपयोग केलेला आढळतो. आणि जिच्या अद्भुत प्रभावानें सृष्टिक्रमाचेंही उल्लंघन होणें संभवनीय आहे, अशी कांहीं अलौकिक पवित्रताही विद्यमान काळांत दृष्टीस पडत नाहीं.

ही सर्व उलाढाल हाउस् ऑफ् कॉमन्स् व नियोजक यांमधीलच कलहापासून उत्पन्न झाली आहे असें जर आह्मांस वाटत असेल, तर आह्मांस डोळसआंधळेच ह्मटलें पाहिजे. वास्तविक खरा कलह राजा व प्रजा यांमध्यें आहे. राजा आपल्या ताब्यांत आलेल्या हाउस् ऑफ् कॉमन्सचे साहाय्यानें काम करीत आहे. राजाचे मंत्री स्वतःवर अवलंबून असलेल्या हाउस् ऑफ् कॉमन्सचे मदतीनें, अथवा त्याचे मुखानें, अथवा परतंत्र झालेल्या किंग्सूबेंच नांवाच्या कचेरीचे मदतीनें अयोग्यता ठरवोत. फल एकच आहे. आपलें राजकीय जीवित

लोकांचे प्रीतीवर अथवा मतावर अवलंबून नाहीं. अशी एकदां पार्लमेंटच्या सभासदांची व्यावहारिक रीत्या खात्री झाली ह्मणजे ते निःशंकपणें दरबारचे पक्षास जाऊन मिळतील.

लोकांपासून विलग्न असलेल्या प्रधानमंडळास पार्लमेंटही तशाच प्रकारचें असणें अवश्यक आहे यांत नवल नाहीं; आणि ह्मणून या कामीं अन्तर्गत प्रधानमंडळानें कोणकोणतीं महत्संकटें सहन केलीं, व बहिर्गत प्रधानमंडळाची कशी ओढाताण झाली हें ज्यास माहित आहे, त्यास प्रासंगिक व व्यक्तिविषयक अयोग्यतेचें हें तत्व राजमित्र नांवाच्या नवीन टोळीस आपल्या एकंदर कामास किती मोठ्या महत्वाचें वाटत होतें, ह्याची कल्पना सहज करितां येईल.

प्रतिनिधी हे आपल्या नियोजकांचे धनी आहेत, अशी एकदां प्रतिनिधींची खात्री करून दिल्यावर त्यांस त्यापुढें प्रत्येक गोष्टींत लोकमताचे विरुद्ध वाटेल तितकें जाण्यास लावण्यास दरबारास एकाच गोष्टीची उणीव होती; ती ही कीं, वाटेल तसा खर्च करण्यास पुरेसें अगाध भाण्डार.

सभोंवतील राजसत्तांस अनुरूप असें आपल्या दरबारचें स्थिर्त्यंकरण्याचा व्यूह पुरा करण्याकरितां, राजसत्तेस आळा घालणाऱ्या इतर कायद्यांप्रमाणेंच, राजसंपत्तीस मर्यादित करणारी वसुलाची इयत्ता दूर करणें अवश्य होतें. इकडे राजखर्चखात्याचें कर्ज १७६९ त ५,१३,००० पौंडापर्यंत वाढलें होतें. हें कर्ज फेडण्याकरितां पार्लमेंटाकडे पैशाची मागणी झाली, त्यावेळीं वरील गोष्ट घडवून आणण्याची संधि त्यास मिळाली. अशी मागणी भूतकाळीं कांहीं प्रसंगीं करण्यांत आली होती; परंतु त्याच रीतीनें ती करण्यांत प्रकृत मतलब साधून आला नसता.

ज्या ज्या वेळीं राजखर्च खात्याचें कर्ज फेडण्याकरितां राजा कामन्सकडे मदतीची विनंति करी, त्या त्या वेळीं ती खालील तीन अटींपैकीं कोणत्य तरी अटीवर मागण्यांत व देण्यांत येत असे व कधीं कधीं

तर तीनही अटी अमलांत येत असत. एक तर पार्लमेंटानें त्या पैशाचा व्यय दुसऱ्या कामाकडे केला असें दाखविणें, नाहीं तर त्या खात्याकडे दिलेल्या वसुलाच्या बाबींचें उत्पन्न पुरेसें नव्हतें व त्यामुळें नियामक सत्तेचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं, असें सिद्ध करणें, किंवा राजखर्च खात्यानें कर्ज फेडण्याकरितां दिलेली रकम त्याकडे दिलेल्या बाबींच्या उत्पन्नांतून वसूल करून घ्यावी असें राजानें क़बूल करणें; ह्या वरील अटी होत. ॲन् राणीचे कारकीर्दींत गादीस कर्ज झालें होतें. पार्लमेंटानें तिच्या उत्पन्नाचा भाग कमी केल्यामुळें व कांहीं इतर कामास लाविल्यामुळें तें कर्ज उत्पन्न झालें असें दाखविण्यांत आलें होतें; आणि तें फेडण्यास वरील कारण न्याय्य आहे ( व तें खरोखर न्याय्य होतें. ) असें प्रतिपादन करण्यांत आलें होतें. ज्या बाबी राजाकडे लावून दिल्या होत्या, त्यांचें निव्वळ उत्पन्न ६,८०,००० पौंडांवर होतें असें दिसत नाहीं; कारण तेंच ज्यावेळीं पहिल्या जॉर्जला देण्यांत आलें, त्यावेळीं वर्षाचें उत्पन्न ७,००,००० पौंड व्हावें ह्मणून वरील उत्पन्नास १,२०,००० पौंड मिळवावे लागले. तरी त्यावेळीं असें ह्मणण्यांत येत असे कीं, ( व तें निःसंशय खरें होतें असें मला वाटतें. ) बरींच वर्षें-पर्यंत निव्वळ उत्पन्न ६,५०,००० पौंडांवर गेलें नाहीं. शिवाय राणीचा उधळेपणाचा खर्चही फार जंगी होता; निदान हल्लीं जो आमच्या ऐकण्यांत येत आहे त्या मानानें तसें ह्मणण्यास हरकत नाहीं. पार्लमेंटाकडे केलेली विनंति बिनशर्तीवर पैसा मिळविण्याची नव्हती; तर राजखर्च खात्याच्याच नांवावर रकम उसनवार काढण्याची राणीस परवानगी मिळावी अशी होती.

पहिल्या जॉर्जचे कारकीर्दींत राजखर्च खात्याचें कर्ज दोन वेळ फेडण्यांत आलें होतें. या वेळींही ॲन राणीच्या कारकीर्दींतील व्यवस्थे-प्रमाणेंच पैशाची मदत झाली होती. त्या वेळीं राजखर्च खात्याचें उत्पन्न उसनवार रकमेकरितां गहाण ठेवण्यांत आलें; व स्वसंरक्षणार्थ उसनवार काढिलेल्या रकमेचें ओझें त्यासच वहावें लागलें.

दुसऱ्या जॉर्जेचे वेळीं राजखर्चखात्यास कायमची मदत मिळाली. दर वर्षास ८००००० पौंड वसूल होण्याकरितां कांहीं करांचें उत्पन्न तिकडे लावून देण्यांत आलें. त्यानें राजखर्च खात्याचें कर्ज फेडण्याची पार्लमेंटास विनंति केली, तेव्हां त्याचे कारकीर्दीस १९ वर्षे होऊन गेलीं होतीं, व शेवटचें बंडही मोडलें होतें. बंडाचे शांतीकरितां झालेल्या अवाढव्य खर्चामुळें राजाच्या गरजेची आवश्यकता स्पष्ट होत आहे. तथापि सरकारचा अवाढव्य खर्च हें विश्वसनीय कारण आहे असें त्यावेळीं वाटलें नाहीं. राजखर्चखात्याकडील बाबींच्या उत्पन्नास कांहीं वर्षे बूड आली हेंच पार्लमेंटाकडे विनंति करण्यास योग्य व मुख्य कारण आहे असें सांगण्यांत आलें. ह्यावेळीं त्या बाबींचें उत्पन्न बरेंच कमी झालें होतें; आणि त्या कारकीर्दींत सरासरीचे मानानेंही दर वर्षास त्याचे निवळ ८००००० पौंड खजिन्यांत आले नाहींत.

त्या राजानें नंतर चौदा वर्षे राज्य केलें; पुन्हा मागणी करण्यांत आली नाहीं इतकेंच नाहीं; तर त्याच्या वसुलाची व खर्चाची इतक्या टापटिपीनें व्यवस्था करण्यांत आली कीं, जरी हल्लींच्यापेक्षां त्यावेळीं दरबारचा खर्च बहुतेक गोष्टींत मोठा व सढळ हाताचा होता, तरी त्याचे मरणाचे वेळीं सरासरी १७०००० पौंडांची रकम शिल्लक होती. व ती सर्व हल्लींचे महाराजांचे राजखर्चखात्यास मिळाली. ह्मणजे या कारकीर्दीस जरी मोठ्या खर्चानें आरंभ झाला, तरी त्या सर्व अवाढव्य खर्चाची पूर्णपणें तरतूद होण्याइतकी, किंबहुना तरतूद होऊन कांहीं शिल्लक रहाण्याइतकी, ती रकम मोठी होती. मागल्या दोन कारकीर्दींत व विशेषेंकरून पहिल्या जॉर्जचे कारकीर्दींत राजखर्चखात्याचा खर्च मर्यादेबाहेर गेला यांत मुदलींच आश्चर्य नाहीं. त्याचें वर्षाचें उत्पन्न डोक्यावरून पाणी गेलें ह्मणजे केवळ ७००००० पौंड होतें. राजसंस्थेच्या खुद्द अस्तित्वावरच आलेल्या अवाढव्य व भयंकर प्रसंगामुळें, व तोतयाचे पक्षास बाहेरून जोराची मदत मिळाल्यामुळें देशांत व देशाबाहेर दोहींकडे मोठमोठ्या खर्चाच्या अनेक बाबी उत्पन्न झाल्या.

जंगी खटाटोप व जबर खर्च करणें आवश्यक होतें. परंतु विद्यमान महाराजांचे गादीचा पाया जितका अचल बसला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याच राजाचे गादीचा नव्हता.

राजखर्चखात्याचे रकमेबाहेर खर्च करणें व पार्लमेंटच्या विशेष हुकुमाशिवाय कर्ज काढणें हें सकृद्दर्शनींच फौजदारी गुन्ह्याचें वर्तन आहे. ह्मणूनच तें पार्लमेंटचे नजरेस येऊं देण्यापेक्षां तें त्याचे दृष्टिआड करणें मुत्सद्यांस साहजिक व योग्य होतें. खरोखर त्यांनीं स्वतःच ह्या धडधडीत अन्यायाच्या गोष्टींचें स्पष्टीकरण करणाऱ्या सर्व तऱ्हेच्या सबळ पुराव्यानिशीं सज्ज होऊन सरकारी नात्यानें पुढें आलें पाहिजे होतें. परंतु अलीकडे मुत्सद्यास हाउस् ऑफ् कॉमन्स्‌ची धास्ती लेशमात्रही उरली नाहीं.

तसेंच हाउस् ऑफ् कॉमन्स्‌नें सार्वजनिक पिशवीचे संरक्षक या नात्यानें पुढें येऊन प्रत्येक प्रकारचा सार्वजनिक जमाखर्च मोठ्या कळकळीनें व काळजीपूर्वक मागावयास पाहिजे होता व डोळ्यांत तेल घालून कडक बारकाईनें तपासावयास पाहिजे होता.

जमाखर्चाची सत्यता, त्याची सकारणता व खर्चाची फेड करण्याची योग्यता हीं सर्व फेडीचे पूर्वीं स्पष्ट व्हावीं हाच जमाखर्चाचा मुख्य उद्देश आहे. कोणीही मनुष्य प्रथम पैसे देऊन नंतर हिशेब विचारीत नाहीं; असें जर तो करील तर खरा व तपशिलवार हिशेब मिळविण्याचा मुख्य व रामबाण असा एकुलता एक उपाय त्याच्या हातांतून नाहींसा होईल. शिवाय राष्ट्रीय कामांत प्रत्येक हिशेब आधीं पहाण्याचें आणखी एक कारण आहे. सार्वजनिक पैशाचा अपव्यय व उधळपट्टीचा खर्च बंद करण्याचा तो एक, किंबहुना एकच मार्ग आहे. पैसा दिल्यानंतरचा हिशेब हा वास्तविक पहातां हिशेबच नव्हे. तथापि हाउस् ऑफ् कॉमन्स्‌ला हीं सर्व तत्वें निरुपयोगी वाटलीं. जी रकम मागणें दरबारास योग्य वाटलें ती देणें व कधीं काळीं जास्त फुरसुतीचे वेळीं हिशेब तपासणीचें शास्त्र करणें हाच स्वकार्य संपादण्याचा कायदेशीर मार्ग होय असें हाउस् ऑफ् कॉमन्स्‌ला वाटलें.

प्रधानांचेच अंदाजाप्रमाणें राजाच्या मानमरातबास पुरेइतकी ८०००० पौंडांची रकम राष्ट्रानें त्यास दिली होती. ज्यावेळीं प्रधान पार्लमेंटाकडे येऊन ह्मणाले कीं 'ती रकम त्या कामास पुरेशी झाली नाहीं ह्मणून आह्मीं ५०००० पौंड कर्ज काढिलें आहे' त्यावेळीं तुमच्या नांवानें काढून दिलेली रकम कां व कशी पुरली नाहीं असें त्यांस प्रथम विचारणें पार्लमेंटला साहाजिक नव्हतें काय? कोणत्या वेळीं कर्ज काढण्यांत आलें हें शोधून काढण्यासाठीं व गरज पडल्यास दोषास पात्र होणाऱ्या लोकांवर ताशेरा झाडण्यासाठीं, तें कर्ज प्रथम कोणत्या प्रधान मंडळीचे कारकीर्दीत काढलें गेलें ह्याची चौकशी केल्यानें पार्लमेंटची न्यायदृष्टि दिसून आली नसती काय? जो खर्च त्यांस अयोग्य अथवा अमर्याद वाटेल तो वेगळा काढून तशा तऱ्हेचा दुरुपयोग व उधळेपणा पुढें न होऊं देण्याची तजवीज करणें शहाणपणाचें झालें नसतें काय? ह्याशिवाय अन्य उद्देशांनीं मागितलेला हिशेब केवळ जिज्ञासाविषय होय, त्यांत पार्लमेंटाचा वास्तविक उद्देश कांहींच दिसत नाहीं. ज्या हिशेबापासून पार्लमेंटचा कांहीं उद्देश सफल होईल, असे सर्व हिशेब नाकारण्यांत आले किंवा 'पूर्व प्रश्नांनीं' लांबणीवर टाकण्यांत आले; आणि प्रतिरोधानें प्रधानांविषयीं भलताच संशय उत्पन्न होईल ह्मणून प्रतिरोधाच्या कल्पनेस अर्जीच बहिष्कार घालण्यांत आला.

मुद्याचे सर्व हिशेब देण्याचें नाकारिल्यांनतर दुसरे पुष्कळ हिशेब देण्यास मुदलीच कठिण गेलें नाहीं.

परंतु मोठ्या मोकळ्या मनानें पार्लमेंटास असें सांगण्यांत आलें कीं, त्यांपैकीं पुढील सेशनापर्यंत एखादाच तयार होईल, व कांहीं तर कदाचित् इतक्याही लौकर होणें कठिण; परंतु 'हिशेबापूर्वीच पैसा देणें' हा एक दाखलारूपी प्रतिकायदाच करण्यासाठीं व तो हाउस् ऑफ् कॉमन्सचा अक्षय्य नियम करण्यासाठीं सर्व शक्तिमान् पार्लमेंटचा कायदा हाच विघ्नहारक गणपति युक्तीनें रंगभूमीवर आणिला. राजाकडून ज्यावेळीं कांहीं मागणी करण्यांत येते, त्यावेळीं हाउस् ऑफ् कॉमन्सूनें एकदम 'साहाय्यसभेचें' रूप धारण केलें पाहिजे, हा एक पार्लमेंटचा

कायदाच आहे असें जाहीर करण्यांत आलें. त्या सभेंत हिशेब हजर करणें व त्यांची तपासणी करणें योग्य व न्याय्य आहे असें प्रथम कबूल करण्यांत आलें. त्याप्रमाणें, आपणांसमोर येण्याचा ज्या गोष्टींचा संभवच नाहीं, त्याची मोठ्या व्यवस्थितपणें तपासणी करण्याकरितां हिशेबाशिवायच लागलेंच हाउस् ऑफ् कॉमन्सचें वरील सभेंत रूपांतर व्हावें असें पसार झालें. ह्या व्यवस्थित व पार्लमेंटरी हास्यविनोदाचे मासलेवाईक चुटक्यानंतर हाउस् ऑफ् कॉमन्सची 'साहाय्यसभा' झाली, व उदारपणें पैशाची मदत देण्याचें ठरविण्यांत आलें.

त्यावेळच्या वादविवादांत जी एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, तिजकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे. राजखर्चखात्याचें हें कर्ज राष्ट्र-संमतीनें काढिलेलें राष्ट्रकर्जच आहे, व सार्वजनिक पत व मान राखण्या-साठींच पार्लमेंटाकडून त्याची फेड झाली पाहिजे असें प्रतिपादन करण्यांत आलें; आणि बहेड्यांत जेव्हां सर्व वर्षाचा हिशेब सांगण्यांत आला, त्यावेळीं तितकें सार्वजनिक कर्ज फेडल्याचें श्रेय प्रधानमंडळानें आपणांकडे घेतलें; जणूं काय त्यांनीं आरमारखात्याच्या किंवा तिजोरी-च्याच ९,००,००० पौंडांच्या बिलांची फेड केली; पण वास्तविक रीत्या पार्लमेंटच्या हुकुमाशिवाय काढिलेल्या कर्जाची 'तरणोपाय फंडांतून' त्यांनीं केलेली फेड तात्विकदृष्ट्या हिशेबांतीं तितकें नवीन कर्जच होय; पण सार्वजनिक पत व कर्जाची फेड यांचा हल्लीं अर्थच तसा झाला आहे. तेव्हां त्याचे परिणाम असे होतात यांतही नवल नाहीं.

भावी अव्यवस्थेचा दूरदृष्टीनें प्रतिबंध करण्याकडे व भूत अव्यवस्थेचें, सिंहावलोकनानें निराकरण करण्याकडे हाउस् ऑफ् कॉमन्सनें सारखेंच दुर्लक्ष केलें. त्या गोष्टीबद्दल प्रधानमंडळानें आपलें वचन, मग तें सार्वजनिक कामांत बहुतेक निरुपयोगी कां असेना, स्वतःचे कारकीर्दीपुरतें तरी द्यावयास पाहिजे होतें असें मला वाटतें. मि० पेलहॅमनें असें वचन दिलें होतें व पाळलेंही होतें. पण 'आह्मीं पार्लमेंटानें ठरविलेल्या मर्यादेचे आंत राजखर्चखात्याचा खर्च राखूं' असें वचन किंवा वचनस-

दश दुसरें कांहींही आमच्या प्रधानांपासून काढण्यास कांहींएक युक्ति चालेना. ‘ आम्हीं अन्यथा वर्तन करण्याचा निश्चय केला आहे ’ असा त्यांच्या मौनव्रताचा स्पष्ट अर्थ आहे असें मला वाटतें.

तथापि संशयाची निवृत्ति पूर्णपणें करण्याकरितां आणखी सांगतों. राजाच्या वतीनें केलेल्या भाषणांत उदारपणें मदत केल्याबद्दल पार्लमेंटचे आभार मानल्यानंतर हाउस् ऑफ् कॉमन्स व हाउस् ऑफ् लॉर्ड्स् यांस कारभारी असें सांगतात कीं, ‘ आम्हीं राजखर्चखात्याचा खर्च मर्यादेबाहेर न जाण्याचा प्रयत्न करूं ’ पण तुम्हांला ही मर्यादा कोणती असेलसें वाटतें? कायद्यानें घालून दिलेली होय? नव्हे! ती तर बिलकुल नव्हे! ‘ राजाच्या मानमरातबास जी मर्यादा घालणें योग्य आहे ती होय.’

ज्या मानमरातबाची पार्लमेंटानें व्याख्या करून त्याची कायदेशीर इयत्ता ठरविली होती, त्याच मानमरातबाची त्यांनीं ह्याप्रमाणें मनःपूत इयत्ता स्थापित केली. राजाच्या मानमरातबाच्या शिथिल व अनिश्चित नांवाखालीं सर्व तऱ्हेचा अमर्याद खर्च करण्याचें व पैशाचा वाटेल तसा दुरुपयोग करण्याचें त्यांनीं पूर्ण स्वातंत्र्य मिळविलें. ही मनःपूत इयत्ता हाउस् ऑफ कॉमन्स् व हाउस् ऑफ लॉर्डस् या दोन्ही सभांस सांगण्यास त्यांस कांहींच शंका वाटली नाहीं; यामुळें राजाच्या मानमरातबाचा अंदाज ८००००० पौंड करणारा व तितक्याच रकमेची त्याची इयत्ता ठरविणारा पार्लमेंटचा एक कायदा पंगु व निरुपयोगी झाला व रद्द झालेल्या कायद्यांत जाऊन पडला. त्यामुळें त्याचा पुस्तकसंग्रहालयांतील कपाटांचे खणास व्यर्थ भार वहावा लागत आहे.

इतकी मजल मारिल्यानंतरही ‘ राजास अमुक एक मोजकीच रक्कम मिळावी ’ असें ह्मणण्याइतका कोणी अज्ञान असेल असें मला वाटत नाहीं. कारण जर प्रधानमंडळास पूर्वींच्या कायद्याप्रमाणें ८,००,००० पौंड दर वर्षास मिळावयाचे, आणि पार्लमेंटच्या नवीन कायद्याप्रमाणें कांहींएक जमाखर्च दाखविल्याशिवाय यापलीकडे झालेल्या कर्जाची फेड करण्यास पैसा मिळावयाचा तर याचा अर्थ असा कीं, त्यांच्या उत्पन्नास

प्रजेचें सामर्थ्य व दरबारचा मितव्यय ह्याच सीमा आहते, असें ह्मटलें पाहिजे. ह्मणजे यूरोपांतील कोणत्याही स्वतंत्र राजाचे उत्पन्नाइतकें हें उत्पन्न झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एका मोठ्या विद्वान् गृहस्थानें वादविवादाचे वेळीं ह्मटल्याप्रमाणें हा ' तरणोपाय' फंडावर ' हुंडी देण्याचा अमर्याद हक्क आहे असें ह्मणावयाचें. राजाच्या सार्वजनिक पतीवर ह्याचे काय परिणाम झाले हें सांगण्याची जरूर नाहीं. कारण, जर राजखर्च खात्याचे नांवानें मनःपूत काढिलेल्या सर्व कर्जाची फेड करण्याकरितां साहाय्यसभेचे मध्यस्थीनें—आणि ही सभा तर केवळ कर्जाचे अस्तित्वाशिवाय दुसरा हिशेब न पाहतां मदत करण्याचें आपलें कायदेशीर कर्तव्यच आहे असें समजते—' तरणोपायफंडा 'कडे धांव घेण्याचें प्रधानमंडळाचे स्वाधीन राहील तर तो फंड बाकीच्या सर्वांचा मुख्याधार आहे हें ह्मणणें व्यर्थ आहे.

पांच लक्ष पौंड ही कांहीं लहान रकम नाहीं. परंतु ज्या बहुफलद तत्वावर ही रकम मागण्यांत आली, त्यापुढें हिची मातबरी विशेष नाहीं. त्या तत्वास ' चंचुप्रवेशान्मुसलप्रवेश ' असें ह्मणतां येईल. तसेंच ह्या कित्त्यानें सुरू झालेल्या व राजखर्च खात्याच्या कर्जाचे नुकत्याच केलेल्या फेडीच्या मुद्यानें तयार होणाऱ्या, अगाध अनीतिखानीपासून सार्वजनिक पतीस जो धक्का पोंचला आहे, तो सार्वजनिक नीतीस व राज्यसंरक्षणास पोंचलेल्या धक्क्यापेक्षां विशेष महत्वाचा नाहीं. पार्लमेंटच्या एका कायद्यानें आपल्या मर्जीप्रमाणें अयोग्यता ठरविण्याची सत्ता, आणि दुसऱ्या कायद्यानें राजखर्च खात्याचें सर्व कर्ज फेडण्याची आवश्यकता ह्या गोष्टींकडे जर दुर्लक्ष करण्यांत आलें तर त्यामुळें देणग्यांची व धमक्यांची रेलचेल उडेल; व पार्लमेंट स्वैरराजसत्तेस एकसमयावच्छेदानें आधार व आधेय होऊन बसेल; व ही रचना अशी कांहीं अपूर्व होईल कीं तशी कोणाही मनुष्याचे डोक्यांतून आजपर्यंत निघाली नसेल हें लोकांस समजूं लागलें आहे. लोक व प्रतिनिधि यांमधील भांडणास सुरवात झाली आहे, व दरबारी स्वार्थसाधुपक्षानें शेवटीं त्यांजवर गदा आणून ठेविली आहे.

अशा बिकट प्रसंगीं मोठा शहाणासुद्धां बुचकळ्यांत पडणें किंवा मोठा धीटही गर्भगळित होणें साहाजिक आहे. ही परिस्थिति पुष्कळच अंशांनीं नूतन आहे. पूर्वजांचे शहाणपणापासून आह्मांस मार्गदर्शक कांहींच साधन मिळत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. फार तर त्यांच्या कार्यमार्गाचें आह्मांस अन्य गोष्टींत अनुकरण करितां येईल. आमच्या सार्वजनिक अस्वस्थतांवरील माझे विचार किती मेहनतीनें लिहिलेले आहेत हें माझें मला माहीत आहे. ते ज्या उद्देशांनीं प्रसिद्ध केले आहेत, त्यांच्या निर्मलतेविषयीं माझी खात्री आहे. त्या अस्वस्थतांच्या समूळ निराकरणासाठीं अथवा त्यांस भविष्यकाळीं अपरिहार्य प्रतिबंध करण्यासाठीं सुचविलेल्या कोणत्याही युक्तीवर माझा तसाच भरंवसा नाहीं. ह्या विषयाचा लोकांत जास्त वादविवाद व्हावा असा माझा उद्देश आहे. त्याजवर इतरांची मति चालली पाहिजे. वैद्यशास्त्रांत ग्रंथ लिहिणारे लोक पुष्कळवेळा रोगांचा इतिहास फारच सूक्ष्मरीतीनें लिहितात; परंतु त्यांजवरील उपायांविषयीं त्यांस कांहींच सांगतां येत नाहीं हें सुप्रसिद्धच आहे.

पार्लमेंटच्या अव्यवस्थांचें निराकरण करण्यासाठीं साधारणपणें सकृद्दर्शनींच जे उपाय सुचतात ते हे:—पार्लमेंटची मुदत कमी करणें व सर्व अथवा बहुतेक अधिकारी लोकांस हाउस् ऑफ् कॉमन्समध्यें बसण्यास अयोग्य ठरविणें. हे उपाय कितीही रामबाण असले तरी विद्यमान परिस्थितींत त्यांचा उपयोग करणें अशक्य आहे असें मी खात्रीनें सांगतों. निष्प्रतिबंध नियोजनाचा हक्क पुनरपि स्थापित करणें ही प्रस्तावना अन्य सुधारणांस अवश्य जोडिली पाहिजे. राज्यपद्धतींत कोणते फरक केले पाहिजेत हा प्रश्न फारच गहन व बिकट आहे.

जर मी लोकांचें मनोरंजन करण्याकरितांच लिहित असतों, तर लोकांच्या विचारसृष्टींत प्रचलित असलेल्या ह्या उपायांची स्तुति करणें इतरांप्रमाणें मलाही मुदलींच कठीण गेलें नसतें; पण ते व्यवहार सृष्टींत आणण्याचा त्यांच्या स्तुतिपाठकाग्रणींनींही आजपर्यंत गंभीरपणें यत्न

केला नाहीं ; ह्मणून त्रैवार्षिक पार्लमेंटावर माझा मुळींच भरंवसा नाहीं असें मीं स्पष्ट सांगतों. पहिल्यासंबंधानें मला वाटतें कीं, त्यायोगें अभीष्ट उद्देश सफल होण्याचें एकीकडेच राहून उलट त्यांस अडथळा मात्र प्राप्त होईल. वारंवार होणाऱ्या नियोजनाचे वेळीं लोकांत जी भयंकर अव्यवस्था उत्पन्न होते ती बाजूसच ठेविली तरी, तीन तीन वर्षांनीं देशांतील स्वतंत्र सभ्य मनुष्यास तिजोरीशीं टक्कर मारण्यास लावण्याची मला भीति वाटते. ह्या प्रतिपक्ष्यांपैकीं कोणत्या पक्षाची प्रथम पाठ लागेल हें सांगणें फारसें कठीण नाहीं. आपले विचार स्वानुभवाचे पायावर उभारण्याचा प्रयत्न करण्यास लागणाऱ्या काळजीनें सार्वजनिक कामाचा ज्या मनुष्यानें विचार केला असेल त्याच्या असें लक्षांत येऊन चुकलेंच असेल कीं, पार्लमेंटच्या पहिल्या व शेवटच्या सेशनाचे दरम्यान प्रधानमंडळाची सत्ता फारशी नसते ; कारण त्यावेळीं आपली जागा विशेष सुरक्षित आहे असें प्रतिनिधींस वाटतें. परंतु त्या दोन सेशनांचे वेळीं प्रधानमंडळाची सत्ता अवाढव्य होते. पार्लमेंटचा ज्यांस विशेष अनुभव आहे, अशा ज्या ज्या लोकांशीं भाषण करण्याचा मला प्रसंग आला आहे, ते सर्व लोक नियोजन अनिश्चित झालें ह्मणजे किंवा तसेंच भिजत पडलें ह्मणजे त्याविषयींच्या प्रश्नांचे निकालाविषयीं अनुमान करितांना दरबारी पक्षाचे नांवानें यशाचा कांहींना कांहींतरी भाग वेगळा काढून ठेवितात. जर वर्तमान परिस्थितींत खरोखर कांहीं गोष्टी असमाधानकारक असतील, तर त्या त्रैवार्षिक पार्लमेंटानें क्वचितच दूर होतील ; कारण नियोजनांत भासणारें सरकारचें वजन पूर्णपणें निरस्त झाल्यावांचून तीं जितकीं जितकीं वारंवार होऊं लागतील, तितकें तितकें व्यक्तिस्वातंत्र्य जास्त धोक्यांत पडेल, तितके सरकारच्या नियत व व्यवस्थित पक्षास जाऊन मिळण्यास व राजखर्च खात्याच्या अमर्याद उत्पन्नाचा फायदा मिळविण्यास साधारणपणें लोक जास्त प्रवृत्त होतील. खरेंच, नियोजनांतील तें वजन कमी करण्याचे कांहीं उपाय करितां येतील व ते करण्यांतही आले पाहिजेत, व पार्लमेंटची मुदत कमीअधिक केली तरी ते सारखेच आवश्यक आहेत. परंतु ह्या कलहाची वारंवार

पुनरावृत्ति करण्याचें बंद करून संपत्तिस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांचे पायावर धोंड आणण्याचें जर आपण टाळिलें, तरच ती अस्वस्थता पूर्णपणें दूर होईल. या मुद्यावर मी आपलें मत फक्त प्रदर्शित करीत आहें; मी प्रतिपक्षाच्या वर्तानें मुद्दलींच प्रतिपादन करीत नाहीं; ह्मणून आणखी एक गोष्ट सांगितल्याबद्दल लोक माझ्यावर तोंडसुख घेणार नाहींत अशी मला आशा आहे. अल्पायुषी पार्लमेंट करणें आमच्या राज्यपद्धतींत खरी सुधारणा आहे असें, सार्वजनिक कार्यांतील ज्या ज्या नीतिविशारदांपाशीं मी या विषयावर संभाषण केलें आहे त्यांपैकीं, एकाचें तरी मत आहे असें मला स्मरत नाहीं. ह्या मनुष्यांचीं सर्व मतें अमंगल उद्देशांपासून उत्पन्न होतात असें ह्मणण्यास लोकपक्षाचे निस्सीम भक्त अगदीं तयार आहेत. परंतु सरकारी कार्यांचे परिचयानें जरी मन कांहीं अंशीं दूषित होत असलें; तरी त्यानें पुष्कळ माहिती मिळण्याचें साधन प्राप्त होतें यांत संशय नाहीं. या गृहस्थांचे ह्मणण्यास सदोदित कांहींना कांहींतरी मान मिळालाच पाहिजे. सरकारच्या कारभाराविषयीं जे लोक अनभिज्ञ असतात, त्यांच्या विचारांची तरी त्यांस बरोबरी करितां येईल. कारण ह्या दुसऱ्या लोकांचीं अन्तःकरणें जरी शुद्धतर असलीं, तरी मत देण्यास लागणारीं योग्य साधनें त्यांजपाशीं नसतात. शिवाय प्रत्येक मुत्सद्दी भ्रष्ट असलाच पाहिजे व राज्यपद्धतींतील प्रत्येक मुद्यावरील त्याचें मत कोणत्या तरी अपवित्र हेतूनेंच बनलेलें असावयाचें असें ह्मणण्यांत अज्ञान व पोरकट दुराग्रह दिसून येतो.

दुसरा आवडता उपाय 'अधिकार बिल' हा होय. दोहोंचेंही तत्व एकच आहे. सार्वजनिक अस्वस्थतांचें निराकरण करण्याचे कामीं कायदे व नियम रामबाण आहेत हें पुष्कळांचे डोक्यांत वेड शिरलें आहे. जसे पुष्कळ लोक अविचारानें निःशंक होतात, तसा मी विनाकारण संशयखोर नाहीं. तरी मी इतकेंच ह्मणतों कीं गहन व प्रौढ विचार करण्यास हा विषय फारच योग्य आहे. मुलकीकडील बहुतेक लोकांचा व लष्करी व आरमारी खात्यासारख्या प्रबल व जंगी खात्यां-

तील बहुतेक मंडळीचा पार्लमेंटाशीं बिघाड आणिल्यानें काय परिणाम होईल हें भविष्य सांगणें सोपें नाहीं. त्यांना राज्यपद्धतीच्या संस्थांविषयीं पूर्ण उदासीन करण्यापेक्षां त्यांच्या भ्रष्ट झालेल्याही बुद्धीस, त्यांविषयीं कांहीं आस्था लावणें कदाचित् हितावह होईल. वसुलाचे खात्यांतील अमुक एक प्रकारच्या कामदारांस पार्लमेंटचे सभासद होण्यास, अथवा सर्वप्रकारच्या कनिष्ठ कामदारांस नियोजनांत मत देण्यास नालायक ठरविण्याचाच हा प्रश्न नाहीं. पहिल्या व्यवस्थेनें फक्त थोड्यांसच हात लागावयाचा आहे; दुसरीनें फक्त क्षुल्लकांसच लागावयाचा आहे. परंतु एक मोठा कामगार लोकांचा, एक मोठा धंदेवाल्यांचा, एक मोठा लष्करी व आरमारी लोकांचा असे निरनिराळे पक्ष राज्यांत हळूहळू उत्पन्न झाले आहेत; व त्या सर्वांत मोठमोठ्या वजनाचे व योग्यतेचे श्रीमंत व पाणीदार असे पुष्कळ लोक आहेत. ह्या नवीन पक्षाचे कांहींतरी प्रतिनिधि असले पाहिजेत, नाहींतर ज्या संस्थांचे व्यवस्थेंत त्यांचा कांहींच हात नाहीं, त्या संस्थांचा नाश करण्यासही ते कदाचित् प्रवृत्त होतील. ही गोष्ट दुर्लक्ष करण्यासारखी नाहीं; किंवा तिला हात घालण्यास प्रत्येक प्रामाणिक मनुष्यही योग्य नाहीं. ह्यासंबंधानें दुसरेही गहन प्रश्न पुष्कळ उत्पन्न होतात. त्या सर्वांचा मीं येथें विचार करीत नाहीं. कारण त्यांचा प्रकृत विषयाशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं. राज्यपद्धतींत फेरफार केल्यानें काय संकटें प्राप्त होतात, याचा फक्त मासला वाचकांस दाखविण्याचा—आणि आपलें वजन खर्च करण्याचीं विपुल साधनें दरबाराजवळ असतांना त्यास त्या वजनाचा पार्लमेंटकडे उपयोग करितां न येऊं देण्याची तजवीज करणें किती संशयात्मक आहे, आणि जर त्या खर्चाचा राजमार्ग प्रचारांत येणें किती साहाजिक आहे—याचें दिग्दर्शन मात्र करण्याचा माझा इरादा आहे. अयोग्य व कुटिल प्रकारांचा व्यासंग सुरू होईल. नियमांचा प्रतिकार करण्याचें शास्त्र आधींच साधारणपणें अस्तित्वांत आहे, तें तर अत्यंत पूर्णतेस येऊन पोंचेल. केवढें अरिष्ट सहन केलेंच पाहिजे हें जाणणें लहान-सहान शहाणपणाचें काम नाहीं; नाहींतर निकृष्ट कालवर्तमानांत

दुःसाध्य पवित्रता संपादन करण्याच्या प्रयत्नानें प्रचलित कुकर्मास फांटा बसण्याचे ऐवजीं त्यांवरच आच्छादन घालण्यासाठीं व त्यांचें संगोपन करण्यासाठीं नवीन भ्रष्टाचार उत्पन्न व्हावयाचे. पार्लमेंटांतील सभासदांचे मनांची कोणत्याही कारणानें चलबिचल न होणें इष्ट आहे यांत संशय नाहीं. पण अशा प्रकारच्या सर्व कारणांत राजकीय हुद्दा हें कारण हुद्देदारास कमी लाजिरवाणें व देशास अत्यंत निर्भयपणाचें आहे असें मला वाटतें. जोंपर्यंत कॉन्ट्रॅक्ट्स्, सबस्क्रिप्शन्स्, प्रत्यक्ष लांच आणि गुप्त अनीतीचे अगणित अन्य मार्ग विपुलपणें दरबारचे स्वाधीन आहेत व अनीतियोग्य स्वभाव आमच्यांत वास करीत आहे, तोंपर्यंत त्या अनीतीचे साधनांचा उपयोग व्हावयाचाच. त्यांचा जोर जेव्हां समूळ नाहींसा करितां येणार नाहीं, तेव्हां जो मार्ग उघड व दृश्य आहे व ज्याचा देशप्रतिष्ठेशीं व देशसेवेशीं संबंध आहे, तो मार्ग बंद करण्याचे भरीस मी तरी पडणार नाहीं. आमच्या राज्यपद्धतीची संस्था फारच नाजुक आहे; व तिच्या सभोंवार अत्युच्च कडे व अगाध समुद्र आहेत. एका बाजूवरील तिचा झोंक दूर करण्याच्या प्रयत्नानें दुसऱ्या बाजूवर ती उलटून पडण्याची बरीच धास्ती आहे. आमच्यासारख्या केवळ स्वतः मिश्र नव्हे, तर मिश्रतर बाह्योपाधींनीं युक्त अशा राज्यपद्धतींत महत्वाचा फेरफार करण्याची महत्वाकांक्षा दुर्धर आहे. त्याविषयीं उतावळेपणानें विचारी मनुष्य कधींही निश्चय करणार नाहीं; व्यवहारकुशल मनुष्य कधींही प्रयत्न करणार नाहीं; व प्रामाणिक मनुष्य कधींही वचन देणार नाहीं. ज्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे, अथवा जें करण्यास आपण समर्थ आहों अशी आपली खात्री आहे, त्यापलीकडे जे कोणी कशाची हमी घेतात ते समाजाचा व आपलाही अवमान करितात. हे माझे विचार कदाचित् प्रौढ नसतील; परंतु त्यांत कपटाचा किंवा पक्षपाताचा लेशही नाहीं; आणि आपल्या देशाच्या राज्यपद्धतीस जे अनुकूल आहेत, व ज्यांस तिच्या हिताहिताची पूर्ण माहिती आहे, अशा गंभीर सज्जनांचें पुढें मीं ते मांडिले आहेत; त्यांचा ते योग्य विचार करतील अशी मला आशा आहे.

अवाढव्य जमाबंदी, बेताल कर्ज, प्रचल संस्था, सरकार स्वतःच जंगी पेढीवाले व जंगी व्यापारी, अशा आमच्या स्थितींत ज्या ज्या वेळीं एखाद्या उघड उघड कृत्यानें किंवा एखाद्या अनपेक्षित महासुधारणेनें प्रतिनिधी कायद्याचें उल्लंघन करूं पहात आहेत आणि अनियमित सत्ता स्थापित आहेत असें दृष्टोत्पत्तीस येईल, त्या त्या वेळीं त्या प्रतिनिधींचे ठायीं सार्वजनिक हिताची उचित आस्था जागृत राखण्याचा खुद्द लोकसमाजाचे मध्यस्थीशिवाय खरोखर दुसरा मार्ग नाहीं. हा मध्यस्थीचा उपचार कटुतम आहे यांत शंका नाहीं. पण हा जर न्याय्य उपचार असेल, तर त्याचा उचित प्रसंगीं उपयोग व्हावा हाच इरादा आहे. आणि राज्यपद्धति खऱ्या तत्वानुरूप ठेवण्यास तदितर उपाय नाहीं असें जेव्हां दिसेल, त्याच प्रसंगीं त्याचा उपयोग केला पाहिजे.

गेल्या शतकांतील भयंकर व निराकरणीय असे मुख्य विषय राजसत्तेच्या अव्यवस्था होत; या शतकांतील ( ज्या गोष्टींबद्दल लोकांस भीति वाटत आहे व ज्यांचें निराकरण केल्याशिवाय स्वस्थता व सुख मिळणें अशक्य ) अशा गोष्टी पार्लमेंटच्या अव्यवस्था होत. पार्लमेंटरी अव्यवस्थांचे उपचार पार्लमेंटांतच संपतात असें नाहीं; त्यांचा त्या ठिकाणीं आरंभ होणेंही कठीण आहे. सरकारावर पुनरपि विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं असें सिद्ध होईपर्यंत लोकांनीं खवळून जाऊन आपल्या प्रतिनिधींच्या वर्तणुकीकडे जास्त कडक व सूक्ष्म लक्ष पुरविलें पाहिजे. काउन्टीज् व निरनिराळ्या मंडळ्या यांचे सभांत त्यांच्या वर्तणुकीची जास्त व्यवस्थितपणें परीक्षा करण्याची इयत्ता ठरली पाहिजे; सर्व महत्वाचे प्रश्नांवर कोणी काय मत दिलें, याविषयीं खात्रीलायक यादी लोकांनीं वारंवार मिळविल्या पाहिजेत.

ह्या प्रकारच्या साधनांनीं कांहीं तरी निष्पन्न होईल. जे सर्व प्रधानमंडळांस, तारतम्य विचार केल्याशिवाय, साहाय्य करून नेकी व विश्वास ह्यांस सार्वजनिक कामांतून पूर्णपणें हद्दपार करीत आहेत; जे उच्च न नीच मनुष्यांत कांहींच फरक करीत नाहींत; व जे राज्यप-

द्धतीच्या नेहमींच्या व्यवस्थेस पाठबळ व सुस्वरूप देण्याचें एकीकडे ठेवून तीस निःशक्त व स्नेहहीन करून सोडीत आहेत, ते गृहस्थ कोण ह्याचा खुलासा ह्या प्रकारच्या साधनांनीं होईल. स्वदेशस्वातंत्र्यापेक्षां राज्यव्यवस्था व शांतता यांची ज्यास विशेष कळकळ आहे, त्या मनुष्याचे दृष्टीनेंही अंधपरंपरेनें अनुमोदन देण्याच्या रीतीस देशोधडीस लावणें इष्ट आहे. दरबारापासूनच सर्व प्रकारच्या अव्यवस्था उत्पन्न झाल्या आहेत व त्यांपैकींच कांहींच्या भीतीनें वरील गृहस्थ त्या फळीच्या अंकित झाले आहेत व आपल्या अंध व तारतम्यरहित अनुमोदनानें सर्व दृश्य व नियमित राज्याधिकारास क्षीण करून त्याच अव्यवस्थांचे बीजानें पुष्टीकरण करीत आहेत. ह्या अव्यवस्था दूर करण्यासाठीं ते जे विचारशून्य व विपरीत प्रयत्न करीत आहेत अथवा कल्पना काढीत आहेत, त्यांनीं तर त्या अव्यवस्था वाढतच चालल्या आहेत.

दुर्बल ह्मणूनच निवडलेल्या अथवा त्यास आज्ञाधारक करण्याकरितां नंतर मुद्दाम दुर्बल केलेल्या बहिर्गत प्रधानमंडळास कोणीच जुमानणार नाहीं. जेव्हां कायद्याची बजावणी करणारे लोक तिरस्कारास्पद असतात, तेव्हां खुद्द कायद्यासही कोणी मान देत नाहीं; व जेव्हां त्या लोकांची सत्ता प्रत्यक्ष राजापासून प्राप्त झालेली नसते अथवा राज्यांतील सृष्टिक्रमानें आलेली नसते, तेव्हां ते तिरस्कारास्पद व्हावे यांत नवल नाहीं. पार्लमेंटांत प्रधानमंडळास अशी मदत केव्हांच मिळाली नाहीं. पार्लमेंटाची मदत व्यक्ति अथवा गुण यांजवर अवलंबून नसून हुद्याबरोबरच प्राप्त होते व नष्ट होते. सरकारास तरी बळकटी आली आहे काय? नाहीं. तें दिवसेंदिवस अशक्त होत चाललें आहे. त्याजकडे लोकांचा प्रवाह प्रत्येक तासास वाढत आहे. स्वानुभवाचा आपण उपयोग केला पाहिजे. सरकारास मदतीची उणीव आहे असें मुळींच नाहीं; सुधारणेची जरूर आहे. जेव्हां मंत्रिमंडळ सार्वजनिक मतावर अवलंबून असतें तेव्हां ह्मणजे त्याचा पाया ‘ अशनिसम शिलातलावर ’ रचिलेला असतो असें कांहीं नाहीं; तरी पण त्यास त्यानें विशेष स्थैर्य येतें. परंतु तें जेव्हां खासगी मर्जीवर अवलंबून असतें,

तेव्हां त्याची रचना फोलाची असते आणि त्याचा पाया वाळूवर रचिलेला असतो. मी पुन्हा ह्मणतों कीं जो प्रत्येक मंत्रिमंडळास साहाय्य करितो, तो सरकारची उचलबांगडी करितो. त्याचें कारण असें आहे. उच्च अथवा नीच, समंजस अथवा मूर्ख, निंद्य अथवा अब्रूदार यांपैकीं कोणाच्याही हातांतील दरबारच्या फायद्याचें सर्व काम हल्लीं एकसारखें सुयंत्र चाललें आहे; ह्मणून दरबारचें हित अमुक एक जनसमाजांत आहे किंवा अमुक एक राज्यनीतिपद्धतीस अनुरूप आहे असें मानण्यास कांहींएक जागा नाहीं. सार्वजनिक सेवकावर दरबारचा जो मनसोक्त पूर्ण अंमल चालत आहे, त्यास प्रतिबंध करण्याकरितां मध्यंतरीं कांहीं-एक दाब उत्पन्न होत नाहीं. चांडालचौकडीच्या निंद्यतम कृष्ण-कारस्थानांच्या तत्वान्वयें प्रधानमंडळावर धक्के व फेरफार यांची संतत-धार धरण्यांत आली आहे. ह्यापासून हितकारक अथवा शाश्वत यत्किंतूही उत्पन्न व्हावयाचें नाहीं. अशा सेवाधर्माची शिसारी बसल्या-मुळें सर्व सज्जन परिणामीं त्यापासून पराङ्मुख झाले आहेत. स्वतंत्र राज्यांतील दरजाच्या व योग्यतेच्या लोकांस ज्या तेजानें स्फुरण चढलें पाहिजे, तें तेज अंगीं असल्यामुळें असे लोक जरी आपल्या कृतीवर व आपल्या संपत्तीवर कृष्णकारस्थानाचा अधिकार कबूल करीत नाहींत. तरी ते दोहोंविषयीं आपल्या देशावर हवाला ठेवण्यास आनंदानें तयार आहेत. शोधक व विवेकदृष्टीच्या पार्लमेंटावर ते भरंवसा ठेवितील; कारण तें चवकशी करितें व भिन्नता पहातें. जर आपलें वर्तन चांगलें असेल, तर अशा पार्लमेंटांत आपणास कोणत्याही कारस्थानाविरुद्ध मदत मिळेल असें त्यांस माहीत असतें; तसेंच जर आपलें वर्तन वाईट असेल, तर कोणत्याही कारस्थानानें आपलें रक्षण होणार नाहीं हेंही त्यांस पक्कें माहीत असतें. परंतु एका तासाचे आंत बसल्या बैठकीस कांहींएक विरुद्ध अथवा साधनीय कारणाशिवाय सत्तेच्या अत्युच्च शिखरावरून ढांसळून अत्यंत अप्रसिद्ध कोनाकोपऱ्यांत अथवा कदाचित् जीवावरील व अब्रूवरील भयंकर वावटळींत जाऊन पडणें त्यांस दुःखमय व अपमानकारक वाटणें साहजिक आहे. ही

स्थिति टाळण्याचा प्रत्येक समंजस व पाणीदार गृहस्थ सारखाच प्रयत्न करील यांत संशय नाहीं.

दरबार व प्रधानमंडळ हीं भिन्नभिन्न केल्याचे व सार्वजनिक गृहस्थांत आपआपसांत कलह उत्पन्न केल्याचे हे परिणाम आहेत. ह्यांतील पहिल्यानें कायदेशीर राज्यव्यवस्था लयास गेली आहे; व दुसऱ्यानें बेकायदा सत्तेचा प्रतिपक्ष अशक्त झाला आहे. प्रधानमंडळावर वरचष्मा मिरवून त्यास दास्याप्रत मिळविण्याकरितां प्रयत्न करणारी राजमित्र नांवाची जी टोळी जणुं काय भक्कम किल्ल्याचाच सुरक्षित आश्रय करून बसली आहे, तिची फुटाफूट होऊन ती दशदिशा पळून जाईपर्यंत, आपण कोणतेंही प्रधानमंडळ कबूल करावयाचें नाहीं. इतका प्रामाणिकपणा व इतकी धमक जर मोठमोठ्या मंडळ्यांत असेल, तर राज्यव्यवस्था पुनरपि स्थापित होण्याचा बराच संभव आहे. ह्या टोळीचें रक्षण करण्याची, तिच्या आज्ञेंत वागण्याची, अथवा तिच्या पक्षास जाऊन मिळण्याची सार्वजनिक व्यक्तिमात्राची प्रवृत्ति हीच ह्यापुढील प्रधानमंडळाच्या परीक्षेची कसोटी आहे. या स्वार्थसाधु पक्षापासून सार्वजनिक शांततेस व चांगल्या राज्यव्यवस्थेच्या कोणत्याही उद्देशांस धक्का न पोंचणें केवळ दुरापस्त आहे अशी पुरी खात्री झालेली नाहीं असा एकही मनुष्य नाहीं. कारण जर तो त्या पक्षाचे विरुद्ध गेला, तर सरकाची नोकरी बजाविण्याची त्यास मुळींच आशा रहात नाहीं; आणि जर त्याची सत्ता त्यानें कबूल केली, तर लोकमान्यतेवर त्यास पाणी सोडावें लागतें. त्या पक्षाशीं आपला कांहींएक संबंध नाहीं अशी प्रधानमंडळी, लोकांची पूर्ण खात्री करून देत तोंपर्यंत त्यांनीं आमच्यापुढें कितीही साखर पेरिली तरी स्वाधिकारकर्तव्यापेक्षां स्वतःला बक्षिसें मिळविण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष आहे असें आपण पक्कें समजलें पाहिजे. जर ही खात्री करण्याचें त्यांनीं नाकारिलें, तर त्यांची काय किंमत आहे हें तेव्हांच आम्हीं समजूं. ह्या गोष्टीसंबंधानें नियोजकांनीं आपल्या प्रतिनिधींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. अशा प्रकारच्या मंत्रिमंडळाला पार्लमेंटांत एकदां मत देणें काय व त्यांतच एखादी जागा स्वीकारणें काय अथवा

त्याकडे काना डोळ करणें काय व त्याच्याच बाजूनें वागणें काय सारखेंच दोषास्पद आहे असें नियोजकांनीं समजलें पाहिजे. आपण प्रतिनिधीं-कडे जें काम सोंपविलें आहे त्यांत, मनुष्यास उद्देशून किंवा सूचनांस उद्देशून त्यांच्या मनांत काय काय व कसकसा फेरबदल होतो हें त्यांनीं अगदीं डोळ्यांत तेल घालून पाहिलें पाहिजे. कारण राज्यांतील सद्गुणी सन्मान्य व उपयोगी अशा सर्व पक्षांत फाटाफूट करण्याची व्यवस्था करणाऱ्या त्या विघातक पद्धतींचें मतचांचल्य हें एक मुख्य आश्रयस्थान आहे.

ह्या चौकडीनें एक सिद्धांत मोठ्या प्रयासानें लोकांत प्रसिद्ध केला आहे. तो त्या विश्वासघातकी कृत्यांवर पांघरूण घालण्यास उपयोगी पडतो; आणि जोंपर्यंत त्यास लोकांत थारा मिळत आहे, तोंपर्यंत दरबारी मंडळास निश्चयानें प्रतिबंध करूं पहाणें केवळ मूर्खपणाचें होईल. तो सिद्धांत हा कीं सर्व राजकीय पक्ष जात्याच स्वार्थसाधु असतात, आणि ह्मणूनच त्यांची वाताहत करून त्यांस पंचत्वास पोंचविलें पाहिजे; आणि प्रत्येक पक्षांतून अथवा सार्वजनिक मंडळींतून चौकडीच्या मतानें निवडून काढिलेल्या शेलक्या शेलक्या महात्म्यांसच मंत्रिमंडळाचा दरवाजा खुला असावा. हा सिद्धांत दरबारी मंडळांतीलच श्रेष्ठ पुरुषानें मोठ्या गंभीरतेनें जगास विदित केला आहे. अर्ल ऑफ् ब्यूट सन १७६६ त तत्कालीन मंत्रिमंडळाविरुद्ध भाषण करीत असतांना ( हे गृहस्थ मंत्रिमंडळाचे विरुद्ध एकदांच काय ते गेले आहेत) वरील सिद्धांत त्यांच्या मुखानें बाहेर पडला आहे.

अशा मनुष्यांनीं अशीं भाषणें करावीं यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पक्ष जेथून तेथून स्वार्थसाधूच असतात ह्या मताचा, राज्यव्यवस्थेच्या नियमांस गुंडाळून ठेवणाऱ्या मुत्सद्यांनीं काळजीपूर्वक सदोदित पसार केला आहे. ह्याचें कारण उघडच आहे. जेव्हां लोक एकजुटीनें असतात तेव्हां त्यांना एखाद्या कृष्णकारस्थानाच्या इशाऱ्याची तार आपआपसांत तेव्हांच सुलभ रीतीनें पोंचवितां येते. त्याची एकमतानें शहानिशा करण्यास व त्याला एकजोरानें टक्कर देण्यास त्यांस सांपडतें.

तेंच, ते स्नेहरहित, अव्यवस्थित, बेशिस्त व परस्पर विलग्न असले ह्मणजे एकमेकांस तार पोंचविणें अनिश्चित असतें, सल्लामसलतही करणें कठिण पडतें व प्रतिबंध तर बहुतेक अशक्यच होतो. कामधंद्यांत जुटीनें यत्न न केल्यामुळें एकमेकांच्या तत्वांची ज्यांस मुद्लींच ओळख झालेली नाहीं किंवा एकमेकांच्या मतांचा बिलकुल परिचय नाहीं अथवा परस्परांच्या प्रवृत्तीची व प्रकृतीची काडीभरही पारख नाहीं इतकेंच नव्हे, तर ज्यांमध्यें परस्परांत भरंवसा, मैत्री किंवा तसला कोणताच बंध वास करीत नाहीं, ते लोक सार्वजनिक कृत्यांत एकदिलानें अश्रांत किंवा निश्चयपूर्वक प्रयत्न कधींही करणार नाहींत हें उघड आहे. अगदीं क्षुद्र प्राणीसुद्धां मंडळीं करून असल्यानें, त्याचें वजन वाढतें व ह्मणूनच त्यांस महत्व व उपयुक्तता हीं प्राप्त होतात; परंतु मंडळीच्या बाहेर असलेल्या अलौकिक विद्वत्तेचासुद्धां समाजास बिलकुल उपयोग होत नाहीं. आपणा स्वतःच्या एकट्या स्फुट अव्यवस्थित प्रयत्नांनीं, महत्वाकांक्षी व मिळून असणाऱ्या चौकडीच्या कृष्णकारस्थानांचा आपण पाडाव करूं शकूं अशी घमेंड ‘ ग ’ च्या बाधेनेंही फुगून गेलेला मनुष्य कधींही मारणार नाहीं. वाईट लोकांची सांगड झाली ह्मणजे चांगल्यांना एकमेकांचा आश्रय पाहिलाच पाहिजे; नाहींतर उत्पन्न होणाऱ्या हलकट लट्ठालट्ठींत बिचारे एकामागून एक व्यर्थ बळी पडावयाचे.

प्रजासत्ताक राज्यांत जोखमेच्या जाग्यावर असलेल्या मनुष्यानें देशाचें हित चिंतणें एवढेंच बस्स नाहीं; त्यानें स्वतः कधींही कांहीं वाईट कृत्य न केल्यानें व शिवाय सदोदित आपल्या विचारशक्तीस वाटेल त्याप्रमाणें मत दिल्यानें व स्वदेशहितास अपायकारक ह्मणून जी जी गोष्ट त्याला वाटली, त्या त्या गोष्टीच्या विरुद्ध बोलण्यानें त्याचें कर्तव्य आटपत नाहीं. ही अनपायकारक व पुळपुळीत वर्तणूक स्वतःस दोषमुक्त करून घेण्याच्या व आयत्यावेळीं कानावर हात ठेवण्याच्याच उद्देशानें झाली असावी असें दिसतें; व ह्मणूनच ती सार्वजनिक कर्तव्याचे कसोटीस उतरण्याची कधींही आशा बाळगण्यास

नको. त्या कर्तव्यास स्मरून वागावयाचें ह्मटलें ह्मणजे मनुष्यानें सत्य कार्यें लोकांस सांगूनच स्वस्थ बसतां कामा नये, तर त्यानें त्याचा प्रसारही केला पाहिजे. तसेंच असत्यास ओळखूनच स्वस्थ न बसतां त्याचा बीमोड केला पाहिजे. ज्या गोष्टीनें स्वकर्तव्य नीट बजावितां येईल, अशी एखादी गोष्ट अंगावर घेण्यांत जेव्हां सार्वजनिक काका आपलें औदासिन्य दाखवितो, तेव्हां तें औदासिन्य विश्वासघाताइतकेंच त्याजकडे सोंपविलेल्या कृत्यास अपायकारक होतें. 'अमुक एक मनुष्य सदोदित सत्यपणें वागत होता; पण त्यानें आपलें वर्तन अशाप्रकारें ठेवण्याची खबरदारी घेतली होती कीं त्यायोगें त्याच्या प्रयत्नापासून तादृशही फायदा होण्याचा संभव नव्हता.' अशाप्रकारें आपल्या चरित्राचें वर्णन कोणास समाधानकारक होईल असें मला वाटत नाहीं.

कांहीं मंडळ्यांच्या वर्तनानें, नाजुक प्रकृतीच्या कडकडीत नीतिमान् मनुष्यांचें मन सर्व प्रकारच्या राजकीय मंडळ्यांवरून अगदीं उडून गेलें असेल यांत नवल नाहीं. अशा प्रकारच्या कटांनीं बरेच लोक कोत्या दृष्टीचे, हट्टी व खुनशी होतात व स्वपक्षाच्या नेमक्या हितापुढें सार्वजनिक हिताची कल्पनासुद्धां त्यांच्या डोक्यांत शिरणें कठीण जातें हें मला कबूल आहे. परंतु ज्यावेळीं कर्तव्यकर्मास अनुसरून एखादा अधिकार गाजविणें भाग पडतें, त्यावेळीं त्याबरोबर कांहीं आनुषंगिक अनिष्टें येतात ह्मणून तो अधिकारच मुळीं सोडून न देतां होतां होईल तितकें तीं अनिष्टें टाळण्याचा प्रयत्न करणें हें आपलें काम आहे. जर एखादा किल्ला फार वाईट हवेंत असेल, तर किल्लेदारानें किल्ला सोडून जावयाचें नाहीं तर त्यानें आपल्या शरीरप्रकृतीकडे विशेष लक्ष द्यावें. प्रत्येक धंद्यांत, फार तर काय, शिपायगिरीसारख्या मर्दुमकीचे धंद्यांतही अथवा उपाध्यायाचे पवित्र धंद्यांतसुद्धां कांहीं कांहीं विशेष दुर्गुण आनुषंगिक आहेतच; पण त्यामुळें ते धंदेच मुळीं कोणी पतकरूं नये असें प्रतिपादितां येणार नाहीं, अथवा तो धंदा करणाऱ्या झाडून सर्व मनुष्यांस ते ते दुर्गुण अवश्य जडतात असेंही ह्मणतां येणार नाहीं. अशाच प्रकारचे आमचे राजकीय पक्ष आहेत; ह्मणजे आमचीं सार्वजनिक कामें पूर्णपणें पार

पाडण्यास ते अवश्य आहेत; पण त्यांस स्वार्थसाधुपक्षाचें हलकट रूप प्राप्त होणें न होणें हें प्रकृतिविशेषावर अवलंबून आहे. प्रजासत्ताक राज्यें पुष्कळ घराणीं एकत्र झाल्यानें होतात व स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यांत निरनिराळे पक्षही असतात; आणि जर आमच्या पक्षबंधनांनीं स्वदेशबंधनें शिथिल होतात, तर कुलबंधनांनीं व आप्तप्रीतीनें लोक उद्दाम नागरिक होणें अपरिहार्य आहे असेंही ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

कांहीं कायदे करणारांनीं तर पक्षांविषयीं अलिप्तता दाखविणें ह्मणजे राजद्रोहाचा गुन्हाच करणें होय असें ह्मटलें आहे. ही त्या तत्वाची जरा ओढाताणच झाली आहे किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं; तरी इतकें खरें आहे कीं मोठमोठ्या प्रजासत्ताक राज्यांतील कट्टया देशाभिमान्यांनीं असल्या पक्षांची सदोदित स्तुति केली आहे व त्यास उत्तेजनही दिलें आहे. परस्परांत स्नेह व प्रीति उत्पन्न होण्यास राजकीय मतैक्य एक मुख्य साधन आहे असें त्यांस वाटत असे, व दुसऱ्या कोणत्याही साधनानें जास्त दृढप्रिय, आनंददायक, सभ्य व सद्गुणपूर्ण अशा रीतिभाती अंगीं लागतील असें मला वाटत नाहीं. रोमन लोकांनीं तर प्रकृत तत्वाचा फारच गोष्टींत उपयोग केला. निवडून नव्हे तर चिठ्या काढून वांटल्या जाणाऱ्या अधिकारांच्या संयुक्त आधिपत्यानेंही त्यांच्यांत जें नातें उत्पन्न होत असे तें आमरण तसेंच चालत असे. त्याला ते 'आकस्मिक स्नेह' असें ह्मणत; व त्यास भक्तिपूर्वक पूज्यभावानें लेखित असत. अशा प्रकारच्या सामाजिक बंधनांचें उल्लंघन करणें फारच मोठ्या हलकटपणाचें काम आहे असें त्यांस वाटत असे. राज्यव्यवस्थेसाठीं त्यांच्या राष्ट्रांतील सर्व लोकांचे कांहीं भाग केले होते, त्यांपैकीं प्रत्येकास 'टोळी' असें ह्मणत असत; आणि ते लोक आपआपल्या विवक्षित टोळीच्या हिताहिताचे कांहीं प्रश्न उत्पन्न झाल्यास त्यासंबंधानें सर्व प्रकारची मेहनत करीत असत. कारण आपल्या प्रकृतीच्या व मतांच्या लोकांस उच्च पदास नेऊन पोंचविण्याकरितां व त्यांस सत्ता प्राप्त करून देण्याकरितां प्रामाणिकपणानें एकसारखे प्रयत्न करणें गुन्हेगारीचें आहे असें त्यावेळीं मानिलें जात नसे. शिवाय 'टोळींत पर-

स्पर बंधनें कांहीं नाहींत व तिचें कर्तव्यही ठरलेलें नाहीं; तसेंच स्वार्थसाधनाची वेळ आली ह्मणजे वाटेल तेव्हां कांहीं एक मानहानी-वांचून आपली टोळी सोडितां येते ' अशी कल्पनाही रोमन लोकांचे मनांत कधीं आली नाहीं. ज्यानें खासगी व्यवहारांत नेकी दाखविली, त्याजवर सार्वजनिक कामें विसंब्रावयास कांहीं हरकत नाहीं; मित्रप्रीति जसजशी वाढत जाईल तसतसा देशाभिमान वाढत जाण्यास कांहीं हरकत नाहीं; आणि ज्याच्या जगांतील नेहमींच्या वर्तणुकीवरून असें दिसून येतें कीं, त्याचें स्वतःशिवाय इतर लोकांकडे लक्ष आहे, तो मनुष्य सार्वजनिक कृत्यांतही स्वहितास एकीकडे ठेऊन लोक-हिताचा बहुतकरून विचार करील असा त्यांचा समज असे. एका फ्रेंच नाटक-कारानें ह्मटल्याप्रमाणें आमचें शहाणपण आमच्या शहाण्या पूर्वजांचे पलीकडे न वहावें ह्मणजे झालें. व्यावहारिक गुण व राजकीय गुण यांत कधींही विसंगतता, वैमण्य व अहिनकुल नसावें; तर त्यांची एक-वाक्यता होऊन त्यांत व्यवस्थित क्रमानें उत्तम जन्यजनकभाव उत्पन्न व्हावा व एक दुसऱ्यास परिपोषक व्हावें अशी त्यांची इच्छा होती. राज्यव्यवस्था पक्षनियंत्रित असण्याजोगें आमच्या देशाचेंही पूर्वकालीं एकदां दैव उदयास आलें होतें. ऍन राणीचे कारकीर्दीत प्रख्यात व्हिग् पक्षाकडे राज्यव्यवस्था होती. आपणास अतिशय चहाणाऱ्या पक्षाच्या राज्यनीतितत्वांचे स्तुतिपाठ एका कवीनें गाईले आहेत. ऍडि-सन्‌ला त्यांची माहिती होती ह्मणून त्यांना आवडणार नाहीं अशा-विषयासंबंधानें त्याला त्यांची स्तुति करितां येईना; शिवाय तो जातीचा कवि पडल्यामुळें लोकांस ज्या गोष्टी अत्यंत प्रिय नाहींत, त्या गोष्टींसं-बंधानें त्याला त्यांचे पोवाडे गातां येत ना, ह्मणून तो ब्रिटन् देशाला उद्देशून ह्मणतोः—

आर्या.

प्रिय सुत तव ते येती उदया दैवाचिया न लीलेनें ।
किंवा राजन्यांच्या कौटिल्यें आणि मानसस्खलनें ॥ १ ॥
सुचिरपरीक्षित जनताविश्वासें शुद्ध सख्यसंबंधें ।
पात्रत्वाच्या निश्चल पायावर तत्प्रकर्ष तो नांदे ॥ २ ॥

जर आपणास सत्ता मिळवावयाची असेल, तर ती केवळ खऱ्या मित्रत्वाच्या व ताऊन सुलाखून निघालेल्या प्रामाणिकपणाच्याच कष्ट्या प्रयत्नांनींच मिळणारी आहे असा त्या वेळचा व्हिग लोकांचा समज होता. स्वदेशप्रीति ही रक्तप्राशन करणारी एक भयंकर देवता आहे व तिला मुलेंबाळें व आईबाप अथवा आपले प्रियतम खासगी आप्तमित्र व त्याच नात्यांपासून उत्पन्न होणारे सर्व सद्गुण अर्पण करावे लागतात असें त्यावेळीं कधीं कोणाच्या मनांतही आलें नाहीं. आपल्या मित्रांचीं दुःखें शांतपणें सहन करण्यांतच खरी सहनशीलता दृग्गोचर होते, व ' नैवेद्यार्थे हलवायाचे दुकानं समर्पयामि ' असें करण्यांतच स्वार्थनिरपेक्षता व्यक्त होते असें मानण्याइतकी त्यांची नीति कल्पक व अलौकिक नव्हती. जे लोक एकजुटीनें वागणार नाहींत आणि जे लोक मतैक्यानें, अन्योन्य प्रीतीनें व उद्देशैक्यानें एकत्र बांधले गेले नाहींत, त्यांच्यांत परस्पर भरंवसाही कधीं वास करावयाचा नाहीं अशी त्यांची पक्की खात्री होती.

लॉर्ड् संडरलंड्, लॉर्ड् गोडोल्फिन्, लॉर्ड् सॉमर्स् व लॉर्ड् मार्ल्बरो हे विद्वान् लोक—यांस मला विद्वान् ह्मटल्याशिवाय रहावत नाहीं—वर सांगितलेल्या ज्या तत्वांवर सार्वजनिक शक्तीची सर्व इमारत उभारिली आहे, त्या तत्वांत इतके निष्णात झाले होते कीं बडबड करणाऱ्या प्रत्येक बालिशाच्या ध्वनीनें त्यांचें धाबें कधींही दणाणून गेलें नाहीं. कोणी आपली गणना महत्वाकांक्षी कटांत करील व अधिकार स्वीकारणें किंवा सोडणें तो एकजुटीनें स्वीकारावयाचा किंवा सोडावयाचा या आपल्या दृढनिश्चयास कोणी ' खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान ' होणारे लोक अधिकारतृष्णा ह्मणतील ह्मणून त्यांस कधींही भीति वाटली नाहीं.

स्वसंमत तत्वविशेषास अनुसरून एकप्रयत्नानें राष्ट्रहित साधण्यास तयार झालेल्या जनसमूहास पक्ष ह्मणतात. आपल्या राजनीति तत्वांस राज्यकारभारांत जागा मिळण्याचे उपाय योजण्यास जो मनुष्य तयार होत नाहीं, त्याचा त्या तत्वांवर कांहीं विश्वास आहे किंवा तीं त्यास कांहीं महत्वाचीं वाटत आहेत अशी कल्पना निदान मला तरी

करवत नाहीं. राज्यव्यवस्थेचे योग्य हेतु कोणते हें सांगण्याचें काम तत्वैकादिदृक्षूचें होय. त्या हेतूंचीं योग्य साधनें कोणतीं हें ठरविण्याचें व तीं यथार्थ अमलांत आणण्याचें काम कृत्यैकदिदृक्षु जो मुत्सद्दी त्याचें होय. ह्मणून आपल्या मतांप्रमाणें ज्यांचीं मतें आहेत त्या मनुष्यांस आपले विचार राज्याधिकाराचे व राज्यसत्तेचे पूर्ण आश्रयानें अमलांत आणितां येण्यासाठीं अवश्य स्थिति प्राप्त करून देण्याकरितां प्रामाणिकपणें हरप्रयत्न करून सोडण्याचें प्रत्येक खऱ्या पक्षाचें ब्रीद झालें पाहिजे; आणि ज्याअर्थीं हा अधिकार व ही सत्ता कांहीं विशेष जागांनाच आहे, त्याअर्थीं त्याच जागा मिळाविण्याचा यत्न करणें त्यांचें कर्तव्य आहे. इतरांचे हक्क न मारितां आपल्याच पक्षाचे लोकांस सर्व गोष्टींत पुढें करणें, तसेंच सर्व पक्षाचा ज्यांत अन्तरभाव होत नाहीं त्या जागा स्वार्थैकदृष्टीनें कधींही न पतकरणें, आणि स्वपक्षाचीं मुख्य तत्वें, व सर्व सत्पक्षांस संमत अशीं जीं साधारण तत्वें यांस झुगारून देणाऱ्या लोकांचें अधिकाऱ्याचे नात्यानें किंवा प्रतिनिधीचे नात्यानें कांहीं एक ऐकावयाचें नाहीं किंवा त्यांचा पगडा आपल्यावर बसूं द्यावयाचा नाहीं अथवा त्यांची सरशी होऊं द्यावयाची नाहीं. ह्या उद्देशानें झटून प्रयत्न करणें हा त्यांचा धर्म होय. अशा सबळ व न्याय्य तत्वानुरूप अधिकार मिळविण्याचा उदार प्रयत्न जागा व पैसा मिळविण्याच्या क्षुद्र व आपळ-पोट्या प्रयत्नांपासून तेव्हांच ओळखतां येईल. अज्ञान लोकांस जे मोठ-मोठ्या भपकेदार भाषणांनीं घेरून टाकितात व नंतर आपल्या अतिनीच व अधमाधम कृतींनीं त्यांस खवळून सोडितात त्या अनेक लबाड लोकांतून वरील मनुष्यांस निवडून काढण्यास त्यांची चालचलणुकच पुरे आहे.

ज्ञानदर्शक व नीतिविषयक वचनांचें स्वरूप मनोहर असतें व ढोबळ दृष्टीस तीं निर्विवाद प्रधान तत्वें वाटतात, ही गोष्ट कोत्या ज्ञानाच्या व कोत्या नीतीच्या पथ्यावरच पडते. तीं सुबोध व सुगम असतात. तीं तांब्याच्या नाण्यांइतकीं व्यवहारांत प्रचलित असतात व त्यांची किंमतही तितकीच असते. त्यांचा कुशाग्र बुद्धीस ज्याप्रमाणें उपयोग होतो त्याचप्रमाणें मृत्पिंड बुद्धीसही होतो; आणि तीं सज्जनांच्याइतकीं

तरी निदान दुर्जनांचेही कामीं पडतात. ‘ मनुष्य नव्हत, तर प्रश्न ’ हें निःपक्षपातित्वाचें वचन अशाच प्रकारचें आहे. याच्या मंजुल नादानेंच पुष्कळ लोक प्रामाणिकपणाच्या मार्गापासून निवृत्त होतात. असें असंगत व बेशिस्त वर्तन करून स्वहिताचाच नव्हे तर पक्षहिताचाही नाश करण्यास जेव्हां एखादा मनुष्य प्रवृत्त होतो तेव्हां त्याचें वर्तन योग्य असतें असें मी ह्मणणार नाहीं; पण तो जें करितो तें मनापासून करितो असें समजण्यास मी तयार आहें. मी सद्गुणांचा भोक्ता आहें, मग त्यास एखाद्या न्यूनपणाची अयोग्य संगति असली तरी चिंता नाहीं. मौल्यवान् व अलौकिक गुणरत्नें लोकांच्या उपयोगास न येतां उकिरड्यावर पडलेलीं पाहून मला फार वाईट वाटतें. पण जेव्हां एखादा मनुष्य जंगी फायद्याकरितां आपल्या जुन्या पक्षास सोडून जातो व असें आपण कां करिता असें विचारिलें असतां ‘ मला स्वमत ह्मणून कांहीं आहे; मी पुढें येणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांच्या किंवा सूचनांच्या योग्यायोग्यतेचा विचार करून मग मत देतों; व मी आपल्या स्वतःच्या बुद्धीनें चालतों, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पीत नाहीं ’ असें प्रतिपादन करितो तेव्हां तो जीं कारणें देतो त्यांचें खंडन करणें जरी अशक्य आहे तरी ह्या वर्तनांत त्याचा जो स्वभाव बाहेर येतो तोही दृष्टीआड घालणें अशक्य आहे. लोकांची सत्ता जाईपर्यंत त्यांच्याहून ज्याचें मत कधींही भिन्न पडलें नाहीं, पण त्यांची सत्ता गेल्यानंतर त्यांच्याशीं ज्याचें कधींच पटलें नाहीं त्या मनुष्याविषयीं आपणांस काय वाटेल? अशा तऱ्हेची हित व मत यांची संगति सुदैवघटितच नव्हे काय? जेव्हां स्वपक्ष सत्ताधीन होतो अथवा जेव्हां आपण खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान होतों त्याच वेळीं स्वपक्षांतील लोक स्वार्थसाधु व्हावे हा यक्षिणीच्याच कांडीचा अलौकिक खेळ नव्हे काय? जेव्हां लोक आपल्या पक्षास फसवितात तेव्हां त्यांचें कृत्य कसें असतें ह्याबद्दल मुळींच वादविवाद नाहीं. त्याची वाटेल त्या प्रामाणिक मनुष्यास परीक्षा करितां येण्याजोगी आहे. सरकारची अमुक एक सूचना बरोबर आहे कीं नाहीं हें तितकें निर्विवाद नाहीं; तें फारच वादग्रस्त असतें. लोकांच्या तद्विषयक वादाचा व भांडणाचा शेवट लागणें

कठिण आहे. पण अमुक एका व्यक्तीचें त्याविषयीं काय मत आहे हें सांगणें मानवी शक्तीच्या पलीकडे फारच अंतरावर आहे. ह्मणून नेहमीच्या कचेरींत ज्याचा निकाल लागेल अशा गोष्टीवर आपल्या वर्तनाचा निकाल न ठेवितां जी गोष्ट केवळ आपल्याच सदसद्विवेक-बुद्धिरूप अन्तर्न्यायासनापुढें येऊं शकते, त्याच गोष्टीवर त्याचा निकाल ठेवणें राजनीतिविशारदांस फारच सोईचें आहे; कारण त्या न्यायासना-पुढें त्यांचें ह्मणणें दयार्द्र अन्तःकरणानें ऐकिलें जाण्याची त्यांस खात्री असते, अथवा फारच झालें आणि शिक्षा झाली तरी तिचें दुःख त्यांस आंतल्या आंत गुप्त राखितां येतें.

मनुष्याच्या आचरणावरून स्वभावाची परीक्षा बंद करण्याचा ज्या तत्वांचा कल आहे, त्या तत्वांत कांहीं अर्थ आहे असें वाचकांस वाटत असेल असें मला वाटत नाहीं. ह्मणून अप्रामाणिकपणाला अज्ञान स्थितीची उत्तम सोय असल्यामुळें ज्या मुद्याविषयीं लोकांत बरेंच अज्ञान व बराच संशय आहे तो स्पष्ट करण्याकरितां आणखी दोन शब्द लिहिल्याबद्दल ते मला माफी करितील अशी आशा आहे.

राजकीय पक्षांची नालस्ती करण्याकरितां हे राजनीतिनिपुण त्यांज-विषयीं असें ह्मणतात कीं, 'आपल्या स्वतःच्या खात्रीपूर्वक समजुतीं-विरुद्ध जेव्हां आपल्या पक्षाचें मत असतें, तेव्हांसुद्धां त्याच्याप्रमाणें आपल्यास वागावें लागतें; हा एक या पक्षांचा अपरिहार्य परिणाम आहे. अशी गुलामगिरी सहन करण्याचा विचारसुद्धां पाणिदार मनु-ष्यास आवडणार नाहीं, पण कांहीं दरबारी स्वार्थसाधुपक्षांखेरीज दुसरा पक्ष अशा तऱ्हेची अरेरावी गाजविण्या इतका अक्कलशून्य व जुलमी असेल असें मला वाटत नाहीं. स्वतंत्रपणें विचार करण्याची ज्यांस संवय आहे, अशा लोकांचा कांहीं विशेष मुद्यांवर मतभेद होणें साहजिक आहे. परंतु सार्वजनिक कृत्यपरंपरेंत उत्पन्न होणारे बहुतेक प्रश्न ज्याअर्थीं कांहीं मुख्य व साधारण राजकीय तत्वांवर अवलंबून असतात किंवा त्यांशीं संबद्ध असतात त्याअर्थीं स्वपक्षांतील लोकांशीं नऊ दशांश गोष्टींत ज्याचें एकमत होणार नाहीं त्या मनुष्यास आपल्यास अनुरून

अशा राजकीय पक्षाची निवड करितां आली नाहीं हें त्याचें दुर्दैवच समजलें पाहिजे. ज्या तत्वांस अनुलक्षून पक्षाची स्थापना झालेली असते व ज्यांमुळेंच व्यवहारांत एकमत होणें रास्त आहे तींच सर्वसाधारण तत्वें जर त्यास पसंत नसतील तर त्यानें प्रथमपासूनच स्वमताच्या तत्वांचा दुसरा एखादा पक्ष स्वीकारावयास पाहिजे होता. जेव्हां प्रश्नच मुळीं जात्या संशययुक्त असत अथवा गौण असते, तेव्हां मनुष्यास शोभणाऱ्या विनयानें, व सुविचारप्राप्त अशा ( दरबारी नीतीचे विरुद्ध ) मित्रत्वास अनुरूप असणाऱ्या पक्षपातानें पुष्कळ वेळा बहुमतास लोकांची संमति मिळते. ह्याप्रमाणें मतभेद साहाजिकच विरळ होईल; आणि विचारस्वातंत्र्य उपभोगण्याकरितां जरी कधीं मतभेद झाला, तरी त्यानें एकी मोडणार नाहीं व व्यवस्था बिघडणार नाहीं. आणि राजकीय पक्षांची स्थिरता व उत्तम एकवाक्यता राखण्याकरितां जें काय पाहिजे तें इतकेंच. कोणताही पक्ष न स्वीकारितां लोक कसे वागतात व त्यांचें कसें चालतें ह्याची मला तरी कल्पना करितां येत नाहीं. ज्या मनुष्यास पार्लमेंटांत साडेपांचशें स्वदेशीयांत, मनोविकारांचे भयंकर वावटळींत, इतक्या मेंदूंच्या प्रकृतीच्या व स्वभावांच्या तीक्ष्ण झटापटींत, अशा महा-प्रश्नांचे वादविवादांत व अशा मोठ्या व भारदस्त पक्षांचे वाग्युद्धांत अशा प्रकारचे कोणीही लोक वर्षानुवर्षे सांपडत नाहींत कीं, ज्यांचा स्वभाव, आचरण व गुण पाहून त्यांच्याशीं आपण स्नेह करावा व सार्वजनिक कामांत एकमेकांस मदत करावी, असें ज्यास वाटत नाहीं स्वतःला तो मनुष्य कोणत्या अवयवांचा घडला असेल बरें? व त्याचा स्वभावतरी कोणत्या प्रकारचा बनला असला पाहिजे बरें! याची वाचकांनींच कल्पना करावी.

'जो मनुष्य इतर लोकांशीं कांहीं एक संबंध न ठेवितां वेगळा रहातो तो एकतर देवदूत असला पाहिजे, नाहींतर राक्षस तरी असला पाहिजे' अशा अर्थाचें एक पुराणवचन आहे. अशा आमच्या एकलकोंड्या लोकांचे अंगीं जेव्हां मला अमानुष पवित्रता, तेज व उपकारबुद्धि दिसून येतील तेव्हांच ते देवदूत आहेत असें मी कबूल करीन. तोंपर्यंत आह्मीं सर्व मनुष्यें ह्मणूनच जन्मास आलों आहों असें ह्मटलें पाहिजे. आह्मीं देवदूतच व्हावयास पाहिजे असें नाहीं. जरी आपणास आह्मी

चांगलीं मनुष्येंच बनविलें तरीसुद्धां पुरे आहे. ह्मणून मनुष्यप्राण्यास प्राप्त झालेले जे जे उदार व प्रामाणिक मनोविकार आहेत, त्यांची आपल्या मनोभूमींत लागवड करण्याची व त्यांस अत्यंत जोरदार व सुफलित करण्याची काळजी घेणें हें आपलें काम आहे. तसेंच खासगी कृत्यांत जे गुण चांगले आहेत ते सार्वजनिक कृत्यांत उपयोगांत आणणें; देशसेवेंतही सभ्यपणा न सोडणें; स्नेह संपादणें व शत्रुत्वही जोडणें; दोन्हीही सबल पण निवडक करणें; एकासंबंधानें लवचिक असणें व दुसऱ्याविषयीं अचल असणें; आपल्या कर्तव्यास व स्थितीस अनुरूप असें आपल्या तत्वांस स्वरूप देणें; आचरणातील सर्व सद्गुण निरुपयोगी होत अशी पक्की खात्री करून घेणें; व निंदास्पद झालों तरी बेहेत्तर, पण निरुपयोगानें आयुष्याचे दिवस कंठण्यापेक्षां ज्या मार्गानें आपणांस ईर्षेनें व उपयुक्ततेनें कांहीं काम करितां येईल त्या मार्गाचें कांहीं झालें तरी अवलंबन करणें हें आपलें कर्तव्य होय. सार्वजनिक आयुष्य उद्योगशालितेचें व जोखिमेचें आहे; ह्मणून जो पहाऱ्याचे वेळीं निजतो तो, व जो शत्रूस जाऊन मिळतो तो हे दोन्हीही आपल्या कर्तव्यापासून सारखेच पराङ्मुख होतात असें ह्मटलें पाहिजे.

तरी प्रत्येक गोष्टीचा कांहीं एक योग्य काल असतो. प्रत्येक प्रसंगीं कळकळीच्या मनुष्यांनीं आपली कर्तृत्वशक्ति सारखीच दाखविली पाहिजे असें नाहीं. परंतु आणीबाणीचे प्रसंग कधीं कधीं उत्पन्न होतात; आणि हल्लींचा प्रसंग तसा नसला तर आपला कान उपटून घेण्यास मी तयार होईन. सत्यपणें एक होण्याची आवश्यकता लोकांस पुढें मागें दिसून येईल; परंतु तें कदाचित् वरातीपाठीमागून घोडें असें होईल. ते तेव्हां एक झाले तर मग त्यांची एकी त्यांसच घातुक होईल; व तीपासून देशासही कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं; आणि वेळींच एकी झाली असतां जसें त्यांस कायदेशीर रीतीनें कायद्याकरितां भांडतां येईल तसें मग येणार नाहीं, व शेवटीं त्यांस सल्लामसलतींच्या ऐवजीं कारस्थानेंही करावीं लागतील. ज्या कायद्याकरितां ते पुढें येतील तोच कायदा स्वशत्रूंचे हातांतील अस्त्र होऊन राहील; आणि अशी व्यवस्था झाली ह्मणजे सरतेशेवटीं त्यांस दास्य किंवा बंड यांपैकीं कोणतें

तरी निरुपायास्तव स्वीकारावें लागेल; पण असें झाल्यानें कोणाही समंजस मनुष्यास दुःख झाल्यावांचून रहाणार नाहीं. कारण, अशा स्थितींत मनोदेवतेस नीट स्मरून त्यास कोणताच पक्ष उचलतां येणें अशक्य आहे. ह्मणून ज्या स्थितींत आपल्यास पश्चात्ताप होईल व आपणांस अपराधी व्हावें लागेल, ती स्थिति होईल तितकी दूर राखणें आपलें पहिलें कर्तव्यकर्म होय. वक्तशीर उद्योगानें पुढील निरर्थक वादळ टळण्याचा संभव आहे. अद्यापि आमचे डोळे मिटले नाहींत. सार्वजनिक शांततेच्या शत्रूंच्या कारस्थानांनीं आमच्यांत घोंटाळा झाला आहे, तरी त्यांनीं अद्यापि आमचा नाश झाला नाहीं.

मी वर्णन केल्याप्रमाणें एक स्वार्थसाधुपक्ष अस्तित्वांत आहे; तो सर्व साधारण प्रजाजनांचे इच्छेविरुद्ध दरबारी मंडळाचे खासगी कलाप्रमाणें राज्यव्यवस्था चालवित आहे, आणि आमच्या स्वातंत्र्याचा पाया खणून काढण्याच्या युक्त्या योजण्यांतच तो गुंतल्यामुळें सध्यां तरी विधायक सत्तेचा अंमल शिथिल झाला आहे, व त्यामुळेंच परदेशांत आह्मी निंदास्पद ठरलों आहों, व स्वदेशीं बुचकळ्यांत पडलों आहों, असें जर वाचकांस वाटेल तर त्या पक्षाविरुद्ध सार्वजनिक लोकांची दृढ एकीच, तीस एकंदर लोकांचा पाठिंबा असल्यास कांहीं तरी करूं शकेल असेंही त्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं, सार्वजनिक लोकांस लोकमतास मान देण्यास लावण्याची व राज्यव्यवस्था पूर्वपद्धतीप्रत आणण्याची आवश्यकता लोकांस तेव्हांच दिसून येईल, आणि हाउस् ऑफ् कामन्सला अव्यापारेषु व्यापार करूं न देण्याची ते तजवीज करितील. त्या सभेचें अस्तित्व, त्या सभेची सत्ता व तिचे हक्क हीं जितकीं इतर कोणत्याही मंडळावर अवलंबून रहाणार नाहींत, तितकींच तीं आपल्यावर अवलंबून रहातील अशी तजवीज करण्याची ते काळजी घेतील. हाउस् ऑफ् कामन्सचें हें पारतंत्र्य ‘ ईश्वरी कायद्या ’ प्रमाणें ‘ पूर्ण स्वातंत्र्य ’ आहे. कारण स्वाधिकाराच्या खऱ्या व एकल्याच उगमास पराङ्मुख होऊन, जर तींतील प्रतिनिधीही स्वाभाविक, समंजस व उदार आज्ञाधारकता सोडून देतील, तर त्यांस दुसऱ्या कोणत्या तरी क्षुद्र व विजातीय मंडळाचा आश्रय करणें भाग आहे. जर तन्नियोजकांनीं एकी करून

कायदेशीर मध्यस्थीनें त्या सभेस पूर्वींचा कायदेशीर मान मिळवून दिला, तर ज्या अन्याय्य सत्तेच्या व्याजभूषणांनीं कांहीं काळपर्यंत तीस काळिमा आणिला आहे, तीं दास्यचिन्हें ह्मणून मोठ्या तिरस्कारानें फेंकून देण्यांस ती हळू हळू तयार झाल्यावांचून राहणार नाहीं. आपलें जुनें काम, दाब ठेवणें हें होय असें तिला वाटूं लागेल; आणि ज्यांवर लोकांचा भरंवसा नाहीं, जे लोकांस प्रिय नाहींत अथवा ज्यांत नैसर्गिक बंधनें व विश्वास नाहीं अशा लोकांचे हातीं राज्यव्यवस्थेचीं सूत्रें जाणें हें भयंकर अरिष्ट प्रतिनिधिसभा देशांत कधींही उत्पन्न होऊं देणार नाहीं.

त्या सभेचे सभासदांस एकदां हें वळण लागलें ह्मणजे 'राजास एकच मंत्रिमंडळ असणें फारच हितावह आहे आणि जे लोक आपल्या मर्जींतील मनुष्याचे वतीनें नव्हे तर प्रजाजनांचे मतानें आपली योग्यता स्थापन करितात, तेच लोक त्या मंडळांत बसण्यास योग्य होत' असें राजास शिकविण्यास ते योग्य व सिद्ध होतील, हींच माणसें आपल्या राजाची इमानेंइतबारें व एकदिलानें नोकरी बजावितील; कारण अशा रीतीनें त्यांची निवड होणें हाच त्यांचे सद्गुणास अनुरूप असा त्यांस बहुमान आहे. हेच लोक राजाच्या फार उपयोगीं पडतील; कारण त्यांच्यायोगानें त्याच्या अमलास लोकांचें पाठबळ मिळणार आहे. हेच लोक आपल्या राजाची मोठ्या इभ्रतीनें सेवा करितील; कारण आपला स्वतःचा राग शांत करण्याकरितां किंवा स्वतःची तृष्णा भागविण्याकरितां ते त्याच्या नांवाचा कधींच दुरुपयोग करणार नाहींत. लोकांस आपण जबाबदार आहों असें जोंपर्यंत हाउस् ऑफ् कामन्स समजत आहे व हाउस् ऑफ् कामन्सला आपण जबाबदार आहों असें मंत्रिमंडळही जोंपर्यंत मानीत आहे, तोंपर्यंत (मानवी स्वभावास वजावाट घातली तर) मंत्रिमंडळाची साधारण प्रकृति अशी सुरेख राहील असें भविष्य करण्यास प्रत्यवाय नाहीं. तेंच जर अन्य विचारांचें प्राबल्य होईल तर वस्तुस्थिति हल्लीं आहे अशीच घोंटाळ्यांत राहील; व अखेरीस एकतर देशांतील लोक क्षुब्ध होऊन जाऊन स्वस्थपणें दास्याचे गाढनिद्रेंत मृतप्राय होऊन पडतील.

---

[illegible]
[illegible]